अहवाल क्रमांक : १६०

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत**

# सोळावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक       जुलै, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१८

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

# सोळावा अहवाल

# पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची 'कार्यकारी समिती प्रमुख' म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सोळावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट्य असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला 'Mini Legislature' सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहित तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात, त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो, परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबींसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याच प्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेस दिनांक २२, २३ व २४ फेब्रुवारी, २०१६ रोजी भेट देऊन श्री. आनंद रायते, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २३ व २४ जानेवारी, २०१८ रोजी जिल्हा परिषद, उस्मानाबाद संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. एस. एस. संधू, अपर मुख्य सचिव, सहकार विभाग,श्री.श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,श्री.विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी विभाग,श्री.नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय देशमुख, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.डी.एल.सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.वैभव राजेघाटगे, उप सचिव, वित्त विभाग, श्री.सचिन्द्र प्रताप सिंह, कृषि आयुक्त,श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, श्री.गिरीष देशमुख, सह संचालक, (वि. व ले.), म.प्रा.शि.प., शिक्षण विभाग, डॉ.रा.ऊ.लोकरे, कृषि उपसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे, तसेच श्री.प्रताप मोहिते,संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १६ जुलै, २०१८.

**सुधीर पारवे**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका



| अ. क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | कडधान्य गळीत धान्य कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पी.एस.बी. पाकिटे खरेदी पुरवठा करणेबाबतची अनियमितता (सन २००८-०९) | ३.७२८/११ | १ |
| (२) | दोन | प्राथमिक शाळांना पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वित करण्याच्या कामातील अनियमिततेबाबत (सन २००८-०९) | ३.१४३ | १० |
| (३) | तीन | स्वयंसेवी संस्थांनी चालविलेले मागासवर्गीय वसतीगृहास परिपोषण अनुदान निर्धारणात नियमबाह्य व जादा रक्कमेचे प्रदानाबाबत (सन २००८-०९) | ३.८८६/८ | १७ |
| (४) | चार | शासनाच्या अखर्चित रक्कमा (सन २००८-०९) | ३.१०३३/८ | २२ |
| (५) | पाच | अंतिम देयकासोबत गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करणेबाबत (सन २००८-०९) | ३.३२१ | २६ |
| (६) | सहा | जिल्हा परिषदेमधील अपूर्ण स्थितीतील बांधकामे (सन २००८-०९) | ३.१०३६/६४ | ३० |
| (७) | सात | अपात्र मागासवर्गीय शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर ५ एच.पी.पाणबुडी पंपांचे वाटप खर्चातील अनियमिततेबाबत (सन २०११-१२) | ३.६८२/२ | ३५ |
| (८) | आठ | पंचायत समिती स्तरावरील भांडारपाल यांनी लोकवाट्याची वसुल केलेली रक्कम भरणा न करता अपहार केल्याबाबत (सन २०११-१२) | ३.५२७/३० | ५८ |
| (९) | नऊ | थकित आगाऊ रक्कमा (थकित अग्रिम) (सन २०११-१२) | ३.८१४/४० | ७५ |
| (१०) | दहा | यशवंत पंचायत राज अभियान अंतर्गत हाती घेतलेल्या कामावरील खर्चाबाबत (सन २०११-१२) | ४.१७८ | ८१ |
| (११) | अकरा | वाशी (ता.वाशी) ग्रामपंचायतीमधील इतर अनियमितता (सन २०११-१२) | ५.५०/२ | ८४ |
| (१२) | बारा | लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणेबाबत | | ८७ |
| | | **परिशिष्ट—अ** शासनाचे आदेश व परिपत्रके | | १८७ |
| | | **परिशिष्ट—ब** समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | २०३ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**कडधान्य गळीत धान्य कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पी. एस. बी. पाकिटे खरेदी पुरवठा करणेबाबतची अनियमितता परिच्छेद क्रमांक ३.७२८/११ (सन २००८-२००९)**

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र झेडपीए ९/२०००/प्र.क्र.४१/३१, दि.१७ जानेवारी, २००१ मधील वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.१०८९/प्र.क्र.५/३४ दि. ५ ऑक्टोबर, १९८९ प्रमाणे योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.पंरास/१०८४/सीआ-१६३३/५७ दि. १९ जानेवारी, १९८५ नुसार लोकवाटा वसुली नंतरच साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे, परंतु लोकवाटा सन २००९-१० या वर्षात वसुल केला आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांचे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे योजना यशस्वी होण्यासाठी कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी यांनी टक्केवारी प्रमाणे पहाणी केलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.व्हीपीआर-१०८८/सीआर ७९४ दि.२६/१०/१९८९ नुसार ज्या वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. प्रस्तुत योजनेचे साहित्य पुढील वर्षात वाटप केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रमांचे मुख्य उद्देश गळीतधान्य/कडधान्य पिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरिता संरक्षित सिंचन सुविधा किड व रोगांचा प्रतिबंध करणे व जादा उत्पादन देणा-या नवीन वाणाचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्तरावर उपलब्ध करून देणे हा आहे. सदर योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर जैविक खते (पी.एस.बी.पाकीट) पुरवठा करणेची योजना राबविण्यात आली आहे. सदर दोन्ही योजनेंतर्गत एकूण ९०,००० पाकीटे (के.पु.गळीत धान्य उत्पादन कार्यक्रम ४५२०० व के.पु. कडधान्य उत्पादन कार्यक्रम ४४८०० पाकीटे) पुरवठा नोंदवून शेतक-यांना वाटप केले आहे.

(१) दिनांक १७ जानेवारी, २००१ मधील वेळापत्रक व जिल्हा परिषदेमार्फत केलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. (१) | कार्यवाहीची बाब (२) | वेळापत्रक (३) | जि.प.मार्फत केलेली कार्यवाही (४) |
|---|---|---|---|
| (१) | योजनेची निवड व अर्थ संकल्पात तरतूद करणे | मे पूर्वी | मे पूर्वी |
| (२) | विविध योजनेचे प्रारूप निश्चित करून त्यास विषय समितीची मान्यता / मंजुरी घेणे | ३० जून | २०.५.०८ |
| (३) | योजनेस प्रशासकीय तांत्रिक मंजुरी देणे | ३१ ऑगस्ट | प्र.मं.५.९.०८ ता.मं. १७.४.०८ |
| (४) | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप करणे व प्रस्ताव मागविणे, प्रस्तावांची छाननी करणे. | ३१ जुलै अखेर | ७.१२.०८ |
| (५) | लाभार्थीची निवड करणे | ३१ जुलै अखेर | |
| (६) | निविदा प्रक्रिया पूर्ण करून खरेदीस सक्षम अधिकारी/ समितीची मान्यता घेणे | ३१ ऑक्टोबर पर्यंत | ९.६.०८ च्या शासन दरकरारानुसार |
| (७) | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश | ३० नोव्हेंबर | २०.२.०९ |
| (८) | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे | ३१ जानेवारी | ३०.३.०९ ते ६.६.०९ |
| (९) | पुरवठादारांचे देयके अदा करणे | फेब्रुवारी पर्यंत | ३१.३.०९ |
| (१०) | विनियोग दाखले प्राप्त करून घेणे. | मार्च | |

केंद्र पुरस्कृत गळितधान्य योजनेअंतर्गत कृषि विकास अधिकारी स्तरावर जिवाणू संवर्धनाचे वाटप ही योजना राबविण्यासाठी १७ मे, २००८ रोजी मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. सदर योजना राबविण्यासाठी कृषी विषय समितीची म.जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०९ ची मान्यता दि.२०/५/२००८ रोजी घेण्यात आली आहे. कृषी संचालक (नि.व.गु.नि.) यांचे सदर बाबीचे दर कराराचे (दि.९/६/२००८) पत्र दि.१८ जून, २००८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाले आहे. पुढे गटांची पीएसबी पाकीट ऐवजी जिप्समसाठी मागणी पाहता दि.२५/६/२००८ अन्वये बाब बदल प्रस्ताव सादर केला होता.

तथापि सदर बाब बदलास मान्यता देता येणार नाही असे विभागीय कृषि सहसंचालक, लातूर यांनी पत्र क्रमांक ७७१२/८, दि.१/१०/२००८, जा.क्र./९४७७/२००८ दिनांक ११/१२/२००८, पत्र क्र.३६९/२००९, दिनांक १४/१/२००९ अन्वये कळविल्यानुसार दि.२०/२/२००९ रोजी जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई परिपत्रक क्र.१०८९/प्र.क्र.५५/३४, दिनांक ५ ऑक्टोबर, १९८९ प्रमाणे पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात आल्या आहेत.

(३) केंद्र पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य कार्यक्रम सन २००८-०९ अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पी.एस.बी. पाकीटे एकूण ४५२०० व ४४८०० नग दर प्रती नग रुपये १२.५०/- (५० टक्के लोकवाटा रक्कम रु.६.२५/-) खालील प्रमाणे गट स्तरावरुन वाटप करुन लोकवाटा भरणा केलेला आहे.

| अ. क्र. (१) | तालुका (२) | नग (३) | लोकवाटा (४) | भरणा केलेली रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | उस्मानाबाद | १२००० | ७५००० | ७०००० |
| (२) | तुळजापूर | १२००० | ७५००० | ६१८७५ |
| (३) | उमरगा | १२००० | ७५००० | ७०००२ |
| (४) | लोहारा | ९२०० | ५७५०० | ० |
| (५) | कळंब | १२००० | ७५००० | २१८७५ |
| (६) | वाशी | ८८०० | ५५००० | २८७५० |
| (७) | भुम | १२००० | ७५००० | ० |
| (८) | परांडा | १२००० | ७५००० | २८१२५ |
| | **एकूण . .** | **९००००** | **५६२५००** | **२८०६२७** |

केंद्र पुरस्कृत गळीत धान्य/कडधान्य उत्पादन कार्यक्रम २००८-०९ मध्ये पी.एस.बी अनुदानापोटी के.पु.योजनेमधुन रुपये २,८२,५००/- व के.पु.कडधान्य योजनेमधुन रुपये २,८०,०००/- असे एकूण ५,६२,५००/- अनुदानाचा धनादेश जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आलेला होता, परंतु पीसएबी पाकिटाचा सदर नमुना अप्रमाणित झाल्याचे अर्धवेळ गुणनियंत्रण तथा कृषी अधिकारी पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी दिनांक ६/६/२००९ चे पत्रान्वये कळविल्यानुसार या कार्यालयाने अनुदानाची रक्कम जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून पत्र क्रमांक २०१०/८३१ दिनांक २/३/२०१० अन्वये रुपये ५,१९,२३१/- दिनांक २३/३/२०११ च्या पत्रान्वये उर्वरित अनुदान रक्कम रुपये २५४०२/- व रुपये १७,८६७/- असे एकूण रुपये ५,६२,५००/- जमा केले आहे. उक्त सदर अनुदान रक्कम शासन खाती जमा करून लोकवाट्याची रक्कम रुपये २८०६२७/- संबंधित गटांना दिनांक २३/६/२०१० रोजी परत केली आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी पाहणी केलेली आहे.

(५) शेतक-यांची पीएसबी पाकिटाऐवजी जिप्समसाठी मागणी पाहता दि.२५/६/२००८ अन्वये बाब बदल प्रस्ताव विभागीय कृषी सहसंचालक, लातुर यांना सादर केला होता. तथापि, सदर बाब बदलास मान्यता देता येणार नाही असे विभागीय कृषी सहसंचालक, लातुर यांनी पत्र क्रमांक ७७१२/८ दि.१/१०/०८, जा.क्र/९४७७/२००८ दिनांक ११/१२/२००८, पत्र क्र. ३६९/०९ दिनांक १४/१/२००९ अन्वये कळविल्यानुसार दि.२०/२/०९ रोजी जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे. त्यामुळे त्याच आर्थिक वर्षात साहित्याचे वाटप करता आले नाही.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००८-२००९ च्या खरीप व रब्बी हंगामासाठी पीएसबी पाकिटे खरेदी करावयाची असताना मार्च २००९ मध्ये खरेदी हंगाम संपल्यानंतर का केली, पीएसबी पाकिटे मुदतबाह्य होण्याचा कालावधी किती असतो, पीएसबी पाकिटे मुदतबाह्य होण्यापूर्वी वापर झाला काय, जिल्हा मार्केटींग अधिकारी यांना अदा केलेली रक्कम रु.५६,२५,०००/- परत घेण्यात आले. सदरची रक्कम शासन खाती कधी भरणा केली, निकृष्ट साहित्य पुरवठा केल्याबाबत जिल्हा परिषदेमार्फत काय कार्यवाही करण्यात आली.

यावर जिल्हा कृषी अधिकारी यांनी विदित केले की, केंद्र पुरस्कृत गळीतधान्य कार्यक्रमाअंतर्गत पीएसबी पाकिटे खरेदी करावयाची होती, परंतु त्यावेळी जिप्सम घटकाची जास्त मागणी असल्यामुळे तत्कालीन कृषी विकास अधिकारी यांनी विभागीय कृषी सहसंचालक, लातूर यांच्याकडे सादर केली होती. परंतु सदर बाब बदलास मान्यता देता येणार नाही असे विभागीय कृषि सहसंचालक, लातुर यांनी कळविल्यानुसार दि. २०/२/२००९ रोजी पीएसबी पाकिटांचा जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पुरवठा आदेश देण्यात आला. एक पाकीट ५०० ग्रॅमचे होते, त्याची किंमत १२.५० रुपये होती. एकूण नग ९०,००० तसेच लोकवाटा ५,६५,५००/- रुपये होती.

सदर वाटप निकषानुसार यामध्ये एससी,एसटी, महिला आणि नंतर सामान्य असा प्राधान्य क्रम होता. पीएसबी पाकिटे ३ ते ४ महिने चांगले राहू शकतात. याचे नमुने पुण्यामध्ये पाठविण्यात आले होते. परंतु सदर नमुने अपयशी ठरले होते. नमुने अपयशी ठरल्यामुळे आपण जी रक्कम अदा केली होती, ती परत घेण्यात आली होती. ज्या शेतक-यांना पाकिटे दिली होती ती गोळा करण्यात आली.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, शेतक-यांना पीएसबीचा लाभ घेता आला नाही त्यामुळे ही पाकिटे ज्या कंपनीने दिली होती, त्यांच्याकडून पैसे परत घेण्यात आले, परंतु सदर कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली.

यावर तत्कालिन कृषी विकास अधिकारी यांनी खुलासा केला की, पीएसबीच्या अगोदर जिप्समची मागणी सर्वसाधारण सभेत करण्यात आल्यामुळे त्याचा पाठपुरावा केला होता. परंतु फेब्रुवारी पर्यंत मान्यता मिळाली नाही. त्यामुळे आम्हाला पीएसबीचा पुरवठा आदेश देणे भाग पडले. पीएसबी खरेदी केली तेंव्हा ती मुदतबाह्य झाली नाही. परंतु हे पॅकेट प्रमाणकाच्यापेक्षा खाली आहे, असे जून महिन्यामध्ये समजले. पीएसबी १०० टक्के अपयशी झालेले नव्हते.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पीएसबीचे नमुने गुणनियंत्रणासाठी पाठविले होते, परंतु यासंदर्भातील अहवाल कमी दर्जाचा आला. शेतक-यांना या पाकिटाचा उपयोग झाला नाही, अशी तक्रार करुन संबंधित कंपनीकडून पैसे वसूल केले आणि ते पैसे शेतक-यांना दिले. पीएसबी पासून शेतक-यांना वाढीव फायदा झाला नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर समितीने पुन्हा विचारणा केली की, बोगस बियाण्यांमुळे शेतक-यांचे झालेले नुकसान या विषयावर विधिमंडळात चर्चा झाली होती. त्यामध्ये शेतक-यांचा फायदा न झाल्यामुळे त्या कंपनीने शेतक-यांना नुकसान भरपाई दिली होती. पीएसबीमुळे शेतक-यांचे जे नुकसान झाले ते मिळवून देण्यासाठी आपण काही प्रयत्न केले होते काय, पुढच्या वर्षी याच कंपन्याकडून माल खरेदी करण्यात आला होता काय, याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर कंपन्यांकडून पुढील वर्षी माल खरेदी करण्यात आला नाही. तसेच दर करारानुसार पुरवठा करण्यात आला होता. या विषयाच्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव दिलेला आहे. यासंदर्भात शासन स्तरावर कारवाई होणे आवश्यक आहे. शासन अंगिकृत कंपनीकडून पीएसबी पाकिटे खरेदी करण्यात आली होती.

समितीने विचारणा केली की, चाचणी घेतल्याशिवाय शेतक-याला वस्तूचे वाटप करु नये याबाबत आपण काही भूमिका घेतली आहे काय, शेतक-यांना वस्तूचे वाटप करण्याच्या अगोदर चाचणी अहवाल आला पाहिजे. चाचणी अहवाल येण्याच्या अगोदर शेतक-यांना वस्तुचे वाटप करु नये याबाबत आपण काही योजना आखली आहे काय, काही कंपन्या शेतक-यांना अनेक वर्षापासून लुबाडत आहेत. या बोगस कंपन्या खत म्हणून माती विकण्याचे काम करीत असतात. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात समितीला पूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी. बोगस कंपन्याचे लायसन्स रद्द करण्याच्या संदर्भात समिती प्रयत्न करणार आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारची योजना नाही. ज्या ज्या कंपनीकडून जिल्हा परिषदेने माल घेतलेला आहे, अशा सर्व कंपन्याची माहिती समितीला उपलब्ध करुन दिली जाईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, उस्मानाबाद जिल्हा परिषदेला पीएसबीच्या संदर्भात जो अनुभव आला आहे, तो सर्व जिल्हा परिषदांना कळविला पाहिजे. केवळ उस्मानाबाद जिल्हा परिषदेने या कंपनीला काळ्या यादीत टाकून चालणार नाही तर सर्व जिल्हा परिषदांनी या कंपनीला काळ्या यादीत टाकले पाहिजे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, आयुक्त,कृषी यांच्याकडे आम्ही यासंदर्भात अहवाल पाठविला होता. उस्मानाबाद जिल्हा परिषदेचा अनुभव त्यांना पाठविलेला आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रमाचा मुख्य उद्देश गळीतधान्य कडधान्य पिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरीता संरक्षित सिंचन सुविधा, किडींचा प्रतिबंध करणे व जादा उत्पादन देणा-या न विनवाणाचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्तरावर उपलब्ध करून देणे आहे. सदर योजनेअंतर्गत ५० टक्के अनुदानावर जैविक खते (पी. एस. बी. पाकीट) पुरवठा करणेची योजना राबविण्यात आली आहे. सदरहू पाकिटांचा दर्जा चांगला नसल्यामुळे ज्या शेतक-यांना पी. एस. बी. पाकीट वाटप करण्यात आले, त्यांच्याकडून ती पाकीटे परत घेण्यात आली, असे असताना काही कंपन्या शासनाला व शेतक-यांना अनेक वर्षापासून फसवत आहेत. या कंपन्या खते, बियाणे, किटकनाशके म्हणून निकृष्ट उत्पादने विकण्याचे काम करीत असतात, त्यामुळे संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली तसेच बोगस कंपन्यांचे परवाने रद्द करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(२) जिल्हा परिषद प्रशासनाने दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी कृषी आयुक्तांकडे प्रकाश सीड्स, ॲग्रो डिव्हीजन, उस्मानाबाद या कंपनीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्याची विनंती करण्यात येवूनही आयुक्त कार्यालयाकडून त्यावर अद्याप कारवाई न करण्याची कारणे काय आहेत व होत असलेल्या विलंबाची शासनाने संबंधितावर जबाबदारी निश्चित केली आहे काय ?

(३) केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रमाचा उद्देश सफल झाला नसल्याचे प्रस्तुत प्रकरणावरून दिसून येत आहे. तरी सदर योजनेची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात येत आहे?

(४) प्रस्तुत प्रकरणी योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्यासंदर्भात कोणत्या अधिका-यावर जबाबदारी निश्चित करण्यात आल्याचे दिसून येत नाही, यावर शासनाची भुमिका काय आहे?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रम अंतर्गत पीएसबी पाकिटे पुरवठा आदेश जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आला होता. जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी प्रकाश सीड्स जन ॲग्रोडिव्ही उस्मानाबाद यांच्यामार्फत पुरवठा केला असल्यामुळे सदर कंपनीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त कृषी यांना या कार्यालयाचे पत्रक.जाक्र/जिपऊ /कृषी/तंत्र-३/कावि/२८९६/२०१६ दि.२१.११.२०१६ अन्वये सादर केला आहे. सन २०१७-१८ मधील गुणनियंत्रण विभागाची कार्यवाही खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. (१) | बाब (२) | लक्षांक (३) | साध्य (४) | अप्रमाणित (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | बियाणे | २७५ | २७५ | ३२ | ३ प्रकरणे न्यायालयात दावे दाखल, २८ प्रकरणे परवाने रद्द करण्यात आले आणि ०१ प्रकरणी ताकीद देण्यात आली. |
| (२) | खते | २४४ | २४९ | ४० | ६ प्रकरणे न्यायालयात दावे दाखल, ३६ प्रकरणे परवाने रद्द करण्यात आले आणि ३८ प्रकरणी ताकीद देण्यात आली. |
| (३) | किटक नाशके | ५४ | ६२ | ४५ | ३ प्रकरणे न्यायालयात दावे दाखल, ४२ प्रकरणे परवाने रद्द करण्यात आले. |

उस्मानाबाद जिल्हा यामध्ये बनावट/संशयास्पद कोराजन किटकनाशक खाजगी व्यक्तीमार्फत विकण्याचा प्रयत्न करताना आढळुन आल्याने सदर व्यक्तीवर उस्मानाबाद शहर पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि. १८६० कलम ४२०, ३४ व कॉपीराईट ॲक्ट १९५७ कलम ५१/६३ अन्वये गुन्हा रजि.नं.०२१८ दि.३०/०७/२०१७ प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे. किटकनाशक फवारणी करत असताना शेतक-यांनी घ्यावयाची काळजीबाबत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरावर तालुकास्तरावर जि.प.मतदार संघनिहाय जनजागृती, घडिपत्रिकाव्दारे प्रसिद्धी करण्यात आलेली आहे.

(२) कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र.जा.क्र.राखते/गुनि/०७- ०८/१८/२०१८ दिनांक ०४/०१/२०१८ च्या अनुषंगाने आता या प्रकरणी संबंधित कंपनी विरूद्ध मा.जिल्हा सत्र न्यायालय, उस्मानाबाद येथे दिनांक ०९/०१/२०१८ रोजी कोर्ट केस दाखल केली आहे.

(३) केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य उद्देश गळीतधान्य कडधान्यपिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरिता पिक संरक्षण उपकरणे, जिप्सम, जिवाणु संवर्धनाचे वाटप, संरक्षित सिंचन सुविधा, किडींचा प्रतिबंध करणे व जादा उत्पादन देणा-या नविन वाणाचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्तरावर उपलब्ध करून देणे आहे. वरील विविध घटकांपैकी जिवाणु संवर्धनाचे वाटप अंतर्गत पीएसबी पाकिटांचे वाटप या कार्यालयामार्फत करण्यात आलेला होता. परंतु सदरचा नमुना अप्रमाणित असल्याचे आढळल्याने संबंधित पुरवठादारकास देण्यात आलेली शासन अनुदानाची रक्कम शासन खाती परत भरणा केलेली आहे व शेतक-यांकडुन जमा केलेली लोकवाट्याची रक्कम शेतक-यांना परत केलेली आहे. त्यामुळे शासन अथवा शेतक-यांचे कुठल्याही प्रकारची नुकसान झालेले नाही. योजनेची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावरून थेट लाभ हस्तांतरण सर्व योजनांना लागु करण्यात आलेला आहे.

(४) जि. प. उस्मानाबादचे याबाबत कोणतेही अभिप्राय नाहीत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**कृषी व पदुम (कृषी) विभागाचे अभिप्राय :-**

(१) केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रम अंतर्गत पीएसबी पाकिटे पुरवठा आदेश जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आला होता. जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी प्रकाश सीड्स ॲग्रो डिव्हीजन, उस्मानाबाद यांच्या मार्फत पुरवठा केलेल्या पी. एस. बी. या जिवाणु खताचा नमुना अप्रमाणित असल्यामुळे पुरवठादार कंपनी यांना अदा केलेली शासन अनुदानाची रक्कम परत घेवुन शासन खाती जमा केली आहे. लोकवाट्याची रक्कम शेतक-यांना परत केली आहे. कंपनीचे लायसेन्स निलंबित करण्याची कारवाई सुरू आहे.

**सन २०१६-१७ मधील गुणनियंत्रण विभागाची कार्यवाही :-**

(अ) उस्मानाबाद जिल्ह्यातील गुणनियंत्रण निरीक्षकांनी काढलेले नमुने

बियाणे लक्षांक -२७५ साध्य-२७६

खते- लक्षांक-२२७ साध्य-२२९

किटकनाशक -लक्षांक -४९ साध्य-४९

वरील प्रमाणे नमुने काढण्यात आलेले आहेत.

(ब) त्यापैकी अप्रमाणित नमुने खालील पैकी आहेत.

बियाणे-कोर्टकेस पात्र-०१ ताकीद पात्र ०३

खते-कोर्टकेस पात्र -१२ ताकीद पात्र २४

किटकनाशक-कोर्टकेस पात्र -०४

मा.न्यायालयात कोर्ट केस दाखल करण्याची कार्यवाही चालु आहे.

(क) परवाने रद्द करण्यात आलेली कार्यवाही-

(१) बियाणे-निरंक (२) खते -२ (३) किटकनाशक-निरंक

**सन २०१७-१८ मधील गुणनियंत्रण विभागाची कार्यवाही**

(अ) उस्मानाबाद जिल्ह्यातील गुणनियंत्रण निरिक्षकांनी काढलेले नमुने

बियाणे-लक्षांक-२७५ साध्य-२७५

खते-लक्षांक-२४४ साध्य-२४९

किटकनाशके-लक्षांक-५४ साध्य-६२

वरील प्रमाणे नमुने काढण्यात आलेले आहेत.

(ब) त्यापैकी अप्रमाणित नमुने खालील पैकी आहेत.

बियाणे-कोर्टकेस पात्र-०१ ताकीद पात्र ०३

खते-कोर्टकेस पात्र-०६ ताकीद पात्र ३८

किटकनाशके- कोर्टकेस पात्र-०३ कोर्टकेस दाखल करण्याची कार्यवाही चालु आहे.

(क) परवाने रद्द करण्यात आलेली कार्यवाही-

(१) बियाणे-२८ (२) खते-३६ (३) किटकनाशक-४२

(ड) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये बनावट/संशयास्पद कोराजन किटकनाशक खाजगी व्यक्ती मार्फत विकण्याचा प्रयत्न करताना आढळुन आल्याने सदर व्यक्तीवर उस्मानाबाद शहर पोलीस स्टेशन येथे भा. दं. वि. १८६० कलम ४२०, ३४ व कॉपी राईट ॲक्ट १९५७ कलम ५१/६३ अन्वये गुन्हा रजि. नं.०२१८ दि.३०/०७/२०१७ प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे.

(इ) किटकनाशक फवारणी करत असताना शेतक-यांनी घ्यावयाच्या काळजीबाबत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये जिल्हा व तालुका स्तरावर जि.प.मतदार संघनिहाय जनजागृती, घडिपत्रिकाव्दारे प्रसिद्धी करण्यात आलेली आहे.

(२) जिल्हा परिषद प्रशासनाने प्रकाश ॲग्रो सिड्स डिव्हीजन, उस्मानाबाद या कंपनी विरूद्ध कायदेशीर कारवाई प्रकरणी खत नियंत्रण आदेश १९८५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यास संबंधीत खत निरीक्षक हेच सक्षम आहेत. त्यामुळे त्यांच्या स्तरावरच कारवाई करण्याचे निर्देश कृषी आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.राखते/गुनि ७/८/२०१८, दिनांक ०४/०१/२०१८ नुसार देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने आता या प्रकरणी संबंधीत कंपनी विरूद्ध जिल्हा सत्र न्यायालय, उस्मानाबाद येथे दिनांक ०९/०१/२०१८ रोजी कोर्टकेस दाखल केली आहे. कंपनीचे लायसेन्स निलंबित करण्याची कारवाई सुरू करण्यात आलेली आहे.

(३) कृषी विकास अधिकारी स्तरावरून राबविण्यात येणा-या केंद्र पुरस्कृत गळीतधान्य व कडधान्य कार्यक्रमामध्ये बियाणे वितरण, पीक संरक्षण उपकरणे, सुधारित कृषी औजारे, जिवाणू संवर्धन पाकिटे, जिप्सम पुरवठा, पी.व्ही.सी.पाईप पुरवठा, इ.बाबींचा समावेश होता. पैकी जिवाणू संवर्धन पाकिटे बाबीमध्ये गुणवत्तेच्या संदर्भात अडचणी निर्माण झाल्याने, संबंधित पुरवठादाराकडून (दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑ.मार्केटींग फेडरेशन लि.) यांचेकडून रू.५,६२,५००/- वसुल करून ती शासन खाती भरण्यात आली आहे. सदर योजनेतील इतर घटक राबविण्यात आलेले आहेत. सदर योजना राबविल्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यात गळीतधान्य व कडधान्य पिकांच्या उत्पादन व उत्पादकतेमध्ये वाढ झालेली असुन योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला आहे.

सदर योजनेअंतर्गत पुरवठा करण्यात येणा-या कृषी औजारे व निविष्ठांचा गुणवत्तापूर्ण पुरवठा होण्यासाठी वेळोवेळी तपासणी होवून केवळ गुणवत्ता पूर्ण साहित्याचेच अनुदान संबंधित पुरवठादारास अदा करण्यात येते.

गळीतधान्य योजनेअंतर्गत कृषी विकास अधिकारी, जि.प.उस्मानाबाद यांना रू. ४१.४६ लाख निधी उपलब्ध करून देण्यात आला होता, त्यापैकी ९९ टक्के निधी प्रत्यक्ष खर्च करण्यात आला. तसेच राज्यासाठी सदर योजनेकरीता रू. ३०१४.६७ लाख उपलब्ध निधी पैकी ९४ टक्के निधी खर्च करण्यात आला आहे.

कडधान्य योजने अंतर्गत कृषी विकास अधिकारी, जि.प.उस्मानाबाद यांना रू.१७.२२ लाख निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यापैकी ९८ टक्के निधी खर्च करण्यात आला. तसेच राज्यात सदर योजनेसाठी रू. ९५५.५५ लाख उपलब्ध निधी पैकी ९० टक्के निधी खर्च करण्यात आला आहे.

सदर योजना परिणामकारकरित्या राबविण्यासाठी डीबीटी तत्वावर अनुदान थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात येत आहे. त्यामुळे अनुदान थेट शेतक-यास प्राप्त होत आहे.

(४) गळीतधान्य व कडधान्य विकास कार्यक्रमाअंतर्गत एकुण बाबींपैकी जिवाणु खतामधील पी.एस.बी. चा नमुना अपात्र दिसुन आल्याने त्यापोटी पुरवठादारास दिलेली रक्कम रूपये ५,६२,५००/- वसुल करण्यात आलेली आहे. तसेच त्यांच्याविरूद्ध कोर्ट केस दाखल करण्यात आली आहे. योजनेतील इतर बाबी राबविण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे याबाबत प्रश्न उपस्थित होत नाही.

## चौकशी अहवाल

### पुरक टिप्पणी (परिच्छेद क्रमांक ३.७२८)

| | |
|---|---|
| योजनेचे नाव | केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रम पी.एस.बी.पॉकिटे पूरवठा करणे |
| योजनेचे वर्ष | २००८-२००९ |
| उद्देश | केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रमाचा मुख्य उद्देश गळीतधान्य/कडधान्य पिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरिता संरक्षित सिंचन सुविधा, किड व रोगांना प्रतिबंध करणे व ज्यादा उत्पादन देणा-या नविन वाणांचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्थरावर उपलब्ध करून देणे हा आहे. |
| उपलब्ध तरतुद | (अ) ५० टक्के अनुदान रूपये ५६२५००/-<br>(ब) ५० टक्के लोकवाटा रूपये ५६२५००/-<br>एकूण ११२५०००/- |
| प्रशासकीय मान्यता | शासन निर्णय क्रमांक आयएसओडी/१६०८/सीआर/-१६/४एक दि.८ जुलै,२००८ |
| तांत्रिक मान्यता | कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.गळीत /२००८/०९/मार्गदर्शक सुचना/वि.प्र.३/१४१/२००८ दिनांक १७ एप्रिल,२००८ |
| खरेदी प्रक्रिया | कृषी संचालक (नि व गु नि.), कृषी आयुक्तालय, म. रा., पुणे यांचे दिनांक ९ जून २००८ यांचे परिपत्रकानुसार दरास मान्यता प्राप्त. |
| पुरवठा आदेश | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ कलम १२६ नुसार मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश दिनांक २०-२-२००९.<br>सदर योजनेसाठी केंद्र सरकार कडून ७५ टक्के व राज्य शासनाकडून २५ टक्के असे एकूण १०० टक्के निधी व लोक वाटा रक्कम ५० टक्के वापरून शेतक-यांना ५० टक्के अनुदानावर पी.एस.बी.पॉकिटे पुरवठा करणे ही योजना राबविण्यात आलेली आहे.सदर योजने अंतर्गत ५० टक्के अनुदानावर जैविक खते (पी.एस.बी.पॉकिटे) पुरवठा करण्याची योजना राबविण्यात आलेली आहे.सदर दोन्ही योजनेअंतर्गत एकूण ९०००० पॉकिटे (केंद्र पुरस्कृत गळीत धान्य उत्पादन कार्यक्रम रु. ४५२००/- व केंद्र पुरस्कृत कडधान्य उत्पादन कार्यक्रम ४४८०० पॉकिटे) पुरवठा नोंदवून शेतक-यांना वाटप केले आहे. |
| केलेली कार्यवाही | कृषी अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी दि.६-६-२००९ चे पत्रान्वये पी.एस.बी.नमुने अप्रमाणित असलेबाबत कळविले नुसार संबधित पुरवठाधारकास देण्यात आलेली रू.५,६२,५००/-(अनुदानाची रक्कम) शासन खाती परत जमा केली आहे व लोकवाटयाचे रक्कम रु. २८०६२७/- संबधित शेतक-यांना परत केलेली आहे.<br>सदर कंपनी विरूध्द कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार मा.आयुक्त, कृषी यांना असल्यामुळे संबधितांविरूध्द कायदेशीर कारवाई करणे बाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त कृषी यांना या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र./जिपऊ/कृषी/तत्र-३/कवि।२८९६/२०१६, दि.२१-११-२०१६ अन्वये सादर केला आहे. |

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कडधान्य गळीत कार्यक्रमांतर्गत ५० टक्के पीएसबी पाकिटे खरेदी करण्याबाबत झालेली अनियमिततेप्रकरणी खुलासा करण्यात यावा.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या ठिकाणी उपस्थित झालेला प्रश्न परवाना रद्द करण्याबाबतचा आहे. येथे असे म्हटले आहे की, संबंधित अधिका-यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच बोगस कंपन्यांचे लायसन्स रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. या प्रकरणी परिणामकारक कार्यवाही झालेली नाही हा मुद्दा मान्य करावा लागेल. संबंधित कंपनी विरुध्द खटला दाखल करण्याची कार्यवाही दिनांक ९-१-२०१८ रोजी पासून सुरू केली आहे. जेव्हा खालच्या अधिका-यांना विचारणा केली की, आपण आपल्याला अधिकार असताना या कंपन्यांवर कार्यवाही का केली नाही तर त्यानंतर त्यांनी संबंधित कंपनी विरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक ९-१-२०१८ रोजी कोर्ट केस दाखल केली आहे आणि कंपनीचा परवाना निलंबन करण्यासाठी त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, या प्रकरणाला किती वर्षे पूर्ण झाली आणि हे प्रकरण केव्हापासून प्रलंबित आहे, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, हे प्रकरण सन २००८-०९ चे आहे. त्याबद्दल कार्यवाही करण्यास उशीर झाला आहे. अलिकडे सूचना दिल्यामुळे ही कार्यवाही करण्यात आली आहे. दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी त्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती आहे. यामध्ये आणखी एक मुद्दा सांगायचा आहे जो आम्ही उत्तरामध्ये समाविष्ट करू शकलो नाही. मार्च महिन्यामध्ये कडधान्यावर कोणते पीएसबी टाकले ते कृषी विकास अधिका-याला विचारण्यात आले होते. मार्च महिन्यामध्ये उस्मानाबादला कोणते कडधान्य लागले, त्यावर पीएसबी अप्लाय होईल. यामध्ये ही मार्च अखेरची खरेदी असल्याचे दिसते. शेतक-यांना मालाचा पुरवठा केला आणि शेतक-यांच्या शेतावरून तो माल परत आला असेल तो मुद्दा यामध्ये अद्याप निर्माण झालेला नाही. आम्हाला मिळालेल्या एक दिवसाच्या मुदतीत हा मुद्दा उत्तरामध्ये समाविष्ट करता आलेला नाही. याची तारीख पाहिली तर गुन्हा झाल्याचा दिनांक ५-३-२००९ ते १६-३-२००९ असे नमूद आहे. माहे मार्च, २००९ मध्ये उस्मानाबादला २ लाख ८० हजार गळीत धान्य आणि २ लाख ८० हजार कडधान्यासाठी त्यांनी वापरले. २ लाख ९ हजार इतके सूर्यफुल वगैरे असले, परंतु कडधान्य तर काहीच नसावे. त्या पैलूने आम्ही तपासलेले नाही. परंतु हा एक अतिशय गंभीर पैलू आहे की, त्यावेळी खरिपाच्या लागवडीची म्हणजे खरीब, रब्बी आणि उन्हाळी मुदत संपली होती. मग अशा परिस्थितीत यांनी पीएसबी कसा काय लावला आणि त्याचा वापर कशासाठी झाला, फक्त देयक तयार झाले असावे असेच यावरून दिसते. कारण पीक लावण्याची मुदत संपली होती. या बाबतीत तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक होते.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, पीएसबी या जीवाणू खतांचा नमुना अप्रमाणित असल्यामुळे पुरवठादार कंपनीस अदा केलेली रक्कम परत घेण्याची खात्री केली आहे. पण हे अप्रमाणित खाताचे नमूने घेण्याचे काही कारणच नव्हते. याबाबतचे पैसेही देऊन टाकले आहेत. ही फार मोठी चूक झाली आहे.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मार्चमध्ये जो खरेदी आदेश दिला आणि त्यानुसार २६ मार्चला नमुने काढण्यात आले. हे नमुने प्रयोगशाळेमध्ये कधी पाठविले ते सुध्दा आपल्याला समजू शकते. कारण ११ मे रोजी त्याचा अहवाल आला आहे. अहवालासाठी इतके दिवस लागणार नाहीत. त्यामुळे विभागाचे निवेदन इतकेच राहिल की, एकंदरीत प्रकरण फक्त अप्रमाणित नमुने देण्यापुरते मर्यादित नाही तर ही खरेदी कागदावरची असावी असे दिसते. आता हे निश्चित आहे की, यामध्ये विलंब झालेला आहे. विलंब होण्याचे मुख्य कारण जे पत्र व्यवहारावरून दिसले ते म्हणजे जिल्हा परिषदेमधून जेव्हा ए.डी.ओ. वर जबाबदारी निश्चित करायची असते आणि त्यानंतरचा कोणता तरी कृषी विकास अधिकारी आयुक्तालयास लिहित असतो. विभागीय चौकशीची सर्वसाधारण प्रक्रिया अशी आहे की, कार्यालयाचा प्रमुख म्हणजे सक्षम प्राधिका-याने आयुक्तांच्या नावाने पत्र पाठवावयास हवे होते. यामध्ये फक्त खालच्या स्तरावरून पत्र व्यवहार करून वेळ घालविण्यात आला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणाला १० वर्षे झाली आणि यामध्ये विलंब करणारे जे अधिकारी असतील त्यांना या प्रकरणामध्ये हात गुंतल्यासारखे वाटते. म्हणून आपण सक्षम सचिव म्हणून काम करीत असताना या संपूर्ण प्रकरणाची आपल्या स्तरावर तत्काळ चौकशी करून कार्यवाही करावी व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करवी.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कार्यवाही करण्यात येईल हे प्रकरण फक्त कमी दर्जाचे अप्रमाणित पीएसबी पुरविण्याचे प्रकरण नाही तर निरर्थक पुरवठा करण्याचे प्रकरण आहे. कारण मार्च महिन्याच्या अखेरीस पीएसबी पुरवठा करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. या प्रकरणी एक ते दीड महिन्यात कार्यवाही करण्यात येईल. त्यानुसार समितीला अहवाल देण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रमाचा उद्देश गळीतधान्य, कडधान्य पिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरीता पिक संरक्षण उपकरणे, जिप्सम, जिवाणू संवर्धनाचे वाटप संरक्षित सिंचन सुविधा किडींचा प्रतिबंध करणे व जादा उत्पादन देणा-या नवीन वाणाचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्तरांवर उपलब्ध करून देणे आहे. वरील विविध घटकांपैकी जिवाणू संवर्धनाचे वाटप अंतर्गत पीएसबी पाकिटांचे वाटप उस्मानाबाद जिल्हा परिषद कार्यालयामार्फत करण्यात आलेले होते.

सदर योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर जैविक खते (पी.एस.बी पॉकेट) पुरवठा करण्याची योजना राबविण्यात आली. यामध्ये एकूण ९०,००० पॉकेट (केंद्र पुरस्कृत गळीतधान्य उत्पदिन कार्यक्रम ४५,२०० व केंद्र पुरस्कृत कडधान्य उत्पादन कार्यक्रम ४४,८०० पॉकिटे) पुरवठा मे.प्रकाश सीडस्, ॲगो डिव्हीजन, उस्मानाबाद यांच्यामार्फत करण्यात आला होता. जिप्समची मागणी असताना देखील पीएसबी पाकिटाचा पुरवठा करण्यात आला. त्याचप्रमाणे शासन निर्णयानुसार सदरची योजना वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात आली नाही, योजनेची मास्टर नोंदवही न ठेवणे, लोकवाटा वसुली नंतरच साहित्य खरेदी करणे आवश्यक असताना विलंबाने लोकवाटा वसुली करणे, कृषी संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योजना यशस्वी होण्यासाठी कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी व जिल्हा कृषी अधिकारी यांनी टक्केवारीप्रमाणे पाहणी केलेली नाही. ज्या वर्षात साहित्य खरेदी केलेले आहे, त्याच वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक असताना प्रस्तुत योजनेचे साहित्य वाटप पुढील वर्षात करण्यात येणे इत्यादी बाबी लेखा परिक्षणात आढळून आल्या. या संदर्भात विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केंद्र पुरस्कृत गळीत धान्य/कडधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत पी.एस.बी. पाकिटे खरेदी करावयाची होती. तथापि, त्यावेळी जिप्सम पाकिटाची जास्त मागणी असल्यामुळे तत्कालीन कृषी विकास अधिकारी यांनी विभागीय कृषी सहसंचालक यांचेकडे सादर केली होती. परंतु योजनेतील झालेल्या या बदलास मान्यता देता येणार नाही असे विभागीय कृषी सहसंचालक, लातूर यांनी कळविले असल्यामुळे पी.एस.बी. पाकिटांचा जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पुरवठा आदेश देण्यात आला व त्याचा नमुना तपासणी करिता पाठविला असता ते अपयशी ठरल्याचे निश्चित झाले. या पाकिटांचा नमुना अपयशी ठरल्यामुळे कंपनीला दिलेली रक्कम परत घेण्यात आली परंतु त्यामुळे ज्या उद्देशाने शेतक-यांकडून सदरची योजना राबविण्यात आली तोच उद्देश सफल न झाल्यामुळे शेतकरी या लाभापासून वंचित राहिले. तद्वतच कंपनीने पी.एस.बी. चे नमुने गुणनियंत्रण प्रयोगशाळेत पाठविले असता ते अप्रमाणित असल्याचा अहवाल प्राप्त झाला. या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता त्यात त्यांनी या प्रकरणात सखोल चौकशी केली असून संबंधित कंपनीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून अनेक कंपन्यांचे परवानेदेखील रद्द केले असल्याचे समितीसमोर विशद केले.

त्याचप्रमाणे विभागाने असेही कळविले की, केंद्र पुरस्कृत गळीत धान्य/कडधान्य कार्यक्रमांतर्गत पी.एस.बी. पाकिटे पुरवठा आदेश जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आला होता. जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी प्रकाश सीड्स जन ॲग्रोडिव्हीजन, उस्मानाबाद यांच्यामार्फत पुरवठा केलेली पी.एस.बी. या जिप्सम पाकिटांचा नमुना अप्रमाणित असल्यामुळे पुरवठादार यांना अदा केलेली रक्कम शासन खाती जमा केलेली आहे. तसेच लोकवाट्याची रक्कम शेतक-यांना परत केली आहे. कंपनीचे परवानापत्र निलंबित करण्याची कारवाई सुरु आहे, या प्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. अहवाल वर्षात योजना राबविणा-या सर्व संबंधित अधिका-यांनी याबाबत संपूर्ण दक्षता घेऊन कामे केली नसून अक्षम्य निष्काळजीपणा योजना राबविताना दाखविलेला आहे. **योजना वेळापत्रकाप्रमाणे न राबविणे, योजनेची मास्टर नोंदवही न ठेवणे, योजनेतील लोकवाटा विलंबाने वसूल करणे, साहित्य खरेदी करताना आहे त्या वर्षात साहित्य खरेदी न करणे इत्यादी प्रकरणात सर्व संबंधित अधिकारी दोषी आढळले असून त्यांच्यावर जिल्हा परिषदेच्या सर्व संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याची बाब दिसून येत नाही. जी प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत किंवा न्यायालयात दाखल केलेली आहेत किंवा जी प्रमाणपत्रे रद्द करण्यात आलेली आहेत अशी कोणतीही कंपनी उक्त प्रकरणात आहे असे दिसून येत नाही. ही अलीकडची कारवाई आहे व या केलेल्या कारवाईबद्दल समिती समाधान व्यक्त करते. तथापि, प्रस्तुत योजना राबविताना ज्या अधिका-यांनी ही योजना राबविताना अक्षम्य निष्काळजीपणा केला व शेतक-यांना सदर योजनेपासून वंचित ठेवले अशा अधिका-यांवर समितीने निदेश देऊनही कारवाई न केल्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व या प्रकरणी सर्व संबंधित अधिका-यांची चौकशी करुन दोषी असलेल्या अधिका-यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करते. याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

### प्राथमिक शाळांना पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वित करण्याच्या कामातील अनियमितेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१४३ (सन २००८-२००९)**

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र. झेडपीए-२००८/प.क्र.-४४६/वि-९, दिनांक २०-०६-२००८ अन्वये जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणा-या विविध योजनेचे नियोजन व अंमलबजावणी परिशिष्ट क्रमांक ड मधील वेळापत्रकाप्रमाणे केलेले नाही.

(२) ठेकेदाराची रक्कम प्राप्त झाल्याबाबत महसूल मुद्रांकित सही घेतलेली नाही.

(३) मोजमाप पुस्तिका क्र. ३३ व ३३८ वर कनिष्ठ अभियंता यांनी स्वाक्ष-या केलेल्या नसताना ठेकेदाराला रक्कम प्रदान केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्राथमिक शाळांना पाणीपुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वीत करणे ही योजना जिल्हा परिषद स्वसंपादित उत्पन्नातून सन २००८-०९ या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पामध्ये मुळ तरतूद रु. ३४.०० लक्ष ठेवण्यात आली होती.

(२) योजनेस प्रशासकीय मंजुरी आदेश क्र. जिपउ/शिक्षण/भांडार/कवि/२५६/०८, दि. १/१०/२००८ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रदान केलेली आहे. तसेच सदरील योजना ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत राबविण्यात आलेली आहे.

(३) योजनेची तांत्रिक मान्यता A-१ टेंडर करणे करिता कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी दि. २०-०२-२००९ अन्वये प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) जिल्ह्यातील १३१ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना शुध्दपिण्याचे पाणीपुरवठा करणेसाठी जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वीत करण्यासाठी नमुना अंदाज पत्रक रु. २५,९३१/- चे तयार करुन एकूण योजनेस रु. ३४.०० लक्ष दिनांक ४-१०-२००८ विषय समितीच्या ठराव क्र. ६ व ९ नुसार मंजुरी देण्यात आली.

(५) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठरले प्रमाणे यंत्रे कार्यान्वीत करणे हे काम तांत्रिक असल्यामुळे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांना दिनांक १५-०१-०९ च्या आदेशान्वये रु. ३४.०० लक्ष तरतुद वर्ग करण्यात आली त्यानुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी खालील प्रमाणे तालुका निहाय कामे हाती घेण्यात आली.—

| अ. क्र. (१) | पंचायत समितीचे नाव (२) | यंत्रे कार्यान्वीत करण्याच्या शाळांची संख्या (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | १८ | |
| २ | कळंब | १८ | |
| ३ | तुळजापूर | १८ | |
| ४ | लोहारा | १५ | |
| ५ | उमरगा | १८ | |
| ६ | भुम | १५ | |
| ७ | वाशी | १४ | |
| ८ | परांडा | १५ | |
| | एकूण | १३१ | |

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र. झेडपीए-२००८/पक्र.-४४६/वि-९, दिनांक २०-०६-२००८ (परिशिष्ट २.१)मधील परिशिष्ट (ड) मध्ये दर्शविल्याप्रमाणे बांधकाम विषयक योजना/शासकीय योजना राबविण्याबाबत महिना निहाय कार्यवाही करण्याबाबत सुचित केले आहे, परंतू काही तांत्रिक कारणामुळे परिशिष्ट (ड) प्रमाणे सदरील योजना जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वीत करणे राबविता आले नाही. वेळा पत्रकानुसार योजनेस आवश्यक असणा-या विविध मान्यता घेऊन वेळोवेळी सुचनांचे पालन केले आहे. यापुढे समय मर्यादेचे पालन करण्याची दक्षात घेण्यात आली आहे.

(२) ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकावर ठेकेदाराच्या मुद्रांक न लावता स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या असून तपासणीसाठी प्रमाणके उपलब्ध आहेत.

(३) मोजमाप पुस्तिका क्र. ३३१ व ३३८ वर कनिष्ठ अभियंता यांनी कामाचे मापे नोंदवून तपासणी करुन कनिष्ठ अभियंता यांनी स्वाक्षरी केली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,जलशुध्दीकरण यंत्र बसविणेसाठी बांधकामाच्या कंत्राटदाराकडून निविदा कोणत्या प्राधिकारान्वये मागविल्या. जलशुध्दीकरण यंत्रे बसविणेचे काम मजुर सहकारी संस्था/बांधकामाचे कंत्राटदाराव्दारा यांनी कसे केले. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय २०-०६-२००८ नुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात कोणत्या अडचणी आल्या, योजना वेळापत्रकाप्रमाणे राबविण्याकरिता खात्याकडून कोणते प्रयत्न करण्यात आले.

यावर शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला की, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्रामधील परिशिष्ट (ड) मध्ये दर्शविल्याप्रमाणे बांधकाम विषयक योजना/शासकीय योजना राबविण्याबाबत महिना निहाय कार्यवाही करण्याबाबत सूचित केले आहे. परंतु, काही तांत्रिक कारणामुळे सदर वेळापत्रकाप्रमाणे करता आली नाही. शिक्षण समितीच्या बैठका पुढे, मागे होणे, अशा काही कारणांमुळे वेळेवर निधी खर्च होऊ शकला नाही. भविष्यात वेळापत्रकाप्रमाणे योजनेस आवश्यक मान्यता घेऊन राबविण्यात आल्या आहेत. आता कामकाज विहित मुदतीत करीत आहोत. ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकावर ठेकेदाराच्या मुद्रांक न लावता स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या होत्या. मात्र, आता महसूल मुद्रांकित स्वाक्ष-या घेण्यात आल्या असून तपासणीसाठी प्रमाणके उपलब्ध आहेत.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, जलशुध्दीकरण यंत्रासाठी A-१ टेंडर कोणत्या नियमानुसार मागविण्यात आले होते. यावर पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, नमुना अंदाजपत्रक २५,९३१/- रुपयांचे आहे. ५० हजार रुपयांच्या आत निविदा मागविण्याचे अधिकार उप अभियंता यांना आहेत. त्यामुळे निविदा उप विभाग पातळीवर करण्यात आली आहे. अशा प्रकारे अे-१ निविदा उप विभागीय पातळीवर मागविण्यात येतात काय अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, उप अभियंता यांना निविदा मागविण्याचे अधिकार आहेत. एकूण निधी ३४ लक्ष रुपये प्राप्त झाला असला तरी एका कामाची निविदा मागविण्यात आली आहे. कारण शाळा व गावे वेगळी आहेत. एकत्रित निविदा मागविलेली नसून प्रत्येक शाळेसाठी स्वतंत्र निविदा केली आहे. जलशुध्दीकरण यंत्र बसविण्यासाठी जो आधार तयार करावयाचा असतो त्याचा सांगाडा तयार करण्याचे काम यामधून केलेले आहे.

यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अधिकची माहिती दिली की, जलशुध्दीकरण यंत्रे खरेदी करण्यात आली होती व ती प्रत्येक शाळेवर बसवायची होती. ही यंत्रे बसविण्यासाठी बांधावयाच्या फाऊंडेशन वर्कसाठी निधी उपलब्ध झाला नव्हता. त्यामुळे फाऊंडेशनचे काम जिल्हा परिषद सेसमधून मंजूर करण्यात आले होते व त्यासाठी ३४ लक्ष रुपये एवढा निधी उपलब्ध रुपये देण्यात आला होता. यामध्ये प्रत्येक शाळेत, यंत्र बसविण्यासाठी सांगाडा उभारणे, पाईप लाईन टाकणे, टाक्या बसविणे, अशी कामे प्रस्तावित होती. एकूण १३१ शाळांमध्ये फाऊंडेशनचे काम करावयाचे होते. यंत्रांची खरेदी केल्यानंतर ही यंत्रे प्रत्येक शाळेवर प्राप्त झाली.ही यंत्रे कार्यान्वीत करण्यासाठी तयार करावयाच्या फाऊंडेशन वर्कसाठी ३४ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले होते.

या खर्चात जलशुध्दीकरण यंत्राचा समावेश नाही. या खर्चात केवळ फाऊंडेशन वर्कचा समावेश आहे. हा यंत्र बसविण्याचा खर्च आहे.सर्व यंत्रांसाठी किती खर्च आला व बसविण्यासाठी एकूण किती खर्च आला अशी विचारणा समितीने केली असता समितीच्या विचारणा केलेल्या प्रश्नास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, प्रती जलशुध्दीकरण यंत्राची म्हणजे ॲक्वागार्डची यंत्राची किंमत रु. ८९४४/- एवढी आहे व प्रति जलशुध्दीकरण यंत्र बसविण्याचा खर्च रुपये २५९३१/- एवढा आहे. यामध्ये ५०० लिटरच्या टाक्या, लोखंडी सांगाडा, पाईपलाईन व इन्स्टॉलेशन यांचा खर्च समाविष्ट आहे.

यावर समितीने अशी विचारणाकेली की, ॲक्वागार्ड यंत्रणा कोणी पुरवले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ॲक्वागार्ड यंत्रणा जिल्हा परिषदेने पुरवली आहेत. यंत्रांची खरेदी शालेय शिक्षण विभागाकडून झाली होती. यंत्रणा बसविण्यासाठी शाळेमध्ये पाण्याचा सोर्स नव्हता त्यामुळे यंत्र बसविण्यासाठी लागणारा लोखंडी सांगाडा, पाण्याची टाकी बसविण्यासाठी कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी अंदाजपत्रक तयार करुन दिले होते. जो खर्च येणार होता त्याला समितीने मान्यता दिली होती. ॲक्वाकेअर यंत्र बसविण्याचा सरासरी खर्च गृहित आहे.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, यंत्रणा बसविण्यासाठी जिल्हा परिषदेने जवळपास ३४ लक्ष रुपये खर्च केले आहेत. सर्व ठिकाणी यंत्रणा बसवली गेली व ही यंत्रणा सुरु आहे यासंदर्भात काही माहिती उपलब्ध आहे काय, १३१ यंत्रे बसवली आहेत ती सद्य:स्थितीत सुरु आहेत काय, या समितीच्या प्रश्नास सर्व यंत्रणा सुस्थितीत आहे असे उत्तर शिक्षणाधिकारी यांनी समितीस दिले.

त्यानंतर समितीने अशी सूचना केली की,समितीच्या जिल्ह्यातील पंचायत समितींना भेटीच्यावेळी सदरहू शाळेला भेट देऊन शाळेमध्ये ही यंत्रणा सुरु आहे की, नाही ते बघितले जाईल. ही यंत्रणा १३१ शाळेमध्ये बसवण्यात आली असून त्या १३१ शाळेंची नावे समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, ही यंत्रणा सर्व शाळेमध्ये कार्यान्वित झाली आहे की, नाही याबाबतची माहिती कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा यांच्याकडून अद्याप मिळालेली नसल्यामुळे हा मुद्दा अनिर्णित आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, या विषयाच्या संदर्भातील माहिती मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे अद्यापि प्राप्त झालेली नाही. सदस्यांच्या मनात जो प्रश्न निर्माण झालेला आहे त्याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कल्पना आलेली आहे. त्यामुळे १३१ शाळेपैकी काही शाळांना भेटी देऊन ही यंत्रणा कार्यान्वित आहे की, नाही याची माहिती घ्यावी व त्याचा अहवाल समितीला उपलब्ध करुन द्यावा. या योजनेवर ३४ लाख रुपये खर्च करण्यात आला असून हा खर्च योग्य प्रकारे झाला आहे की, नाही हे पाहण्याची गरज आहे. एका यंत्राची किंमत ९ हजार रुपये असून यंत्र बसविण्यासाठी २५ हजार रुपये खर्च झालेला आहे. देखभाल दुरुस्तीची काय परिस्थिती आहे याचीही माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्रस्तुत प्रकरणात समितीच्या निर्देशानुसार केलेल्या चौकशीत जलशुध्दीकरणयंत्राची क्षमता विचारात न घेता झालेल्या खरेदीत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येवूनही जिल्हा परिषदेचा ६२,०८,६९३/- रूपयाचा खर्च निष्फळ झाल्या प्रकरणी त्यांचेवर रकमेची वसुली, कर्तव्यात कसुर केले प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा अंतर्गत विहीत कारवाई अद्यापही न करण्याची कारणे काय आहेत व होत असलेल्या विलंबास कोण जबाबदार आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.—**

सदरील योजना १२ वा वित्त आयोग प्राप्त झालेल्या निधीमधून रक्कम रू. २६,००,०२१/- प्रमाणे ३२३ जलशुध्दीकरण यंत्राची खरेदी करून सदरची योजना कार्यान्वित करणेसाठी जि.प.स्वसंपादित उत्पन्नातून रू.२५,९३१/- प्रमाणे रू.३३,९६,९६१/-असा एकूण येणे रु.५९,९६,८९२/- खर्च झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी खरेदी प्रक्रियेत अनियमितता झालेबाबत नमुद केल्यानुसार महाराष्ट्र नागरीसेवा अंतर्गत तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. डी. एन. कुलकर्णी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यानुसार मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे आदेश दिनांक १३-०१-२०१४ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे आदेश दिनांक ०९-०९-२०१४ नुसार त्यांची एक वेतनवाढ एक वर्षाकरिता रोखुन ठेवण्यात आलेली आहे.

तसेच लोकलेखा समितीच्या दिलेल्या निर्देशानुसार प्राथमिक शाळांना पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वित करण्याच्या कामातील अनियमिततेच्या प्रस्तुत प्रकरणी श्री.एस.एम. जाधव तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व सध्या कार्यरत गट शिक्षणधिकारी कार्यालय पंचायत समिती, भूम यांची विभागीय चौकशी करणेसाठीचा प्रस्ताव मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र. जिपउ/शिक्षण/आ-९/कावि-१०९९/१२, दिनांक २७-०६-२०१२ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. (जोडपत्र १ते ४ सह) तसेच याबाबत पंचायत राज समितीने जिल्हा परिषद उस्मानाबादला दिलेल्या भेटी वेळी दिलेल्या निर्देशानुसार पुन:श्च श्री.एस.एम.जाधव तत्कालीन शिक्षणधिकारी (प्राथमिक) यांना दिनांक १८-०२-२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीसचा खुलासा श्री.जाधव यांनी दिनांक २८-०२-२०१७ रोजी सादर केलेला आहे. सदर खुलाश्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा अंतर्गत शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपउ/शिक्षण/भांडार/कावि-६३०/३४/१७, दिनांक ०३-०५-२०१७ अन्वये मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्रायः-**

सदरील योजना १२ वा वित्त आयोग प्राप्त झालेल्या निधीमधून रक्कम रू. २६,००,०२१/- प्रमाणे ३२३ जलशुध्दीकरण यंत्रांची खरेदी करून सदरची योजना कार्यान्वित करणेसाठी जिल्हा परिषद स्वसंपादित उत्पन्नातून रू.२५,९३१/- प्रमाणे रू.३३,९६,९६१/- असा एकूण येणे रू.५९,९६,८९२/- खर्च झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याप्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ अंतर्गत दोषारोप सिध्द झाल्याने सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांच्या दिनांक १३-०१-२०१४ (दोन स्वतंत्र आदेश प्रत संलग्न) च्या आदेशानुसार श्री.डी.एन.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता व श्री.एच.आर.नागदे, उप अभियंता (प्रभारी कार्यकारी अभियंता) यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांची पुढील वेतनवाढ एका वर्षाकरीता परिणामाशिवाय रोखण्याची शिक्षा बजाविण्यात आलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, प्राथमिक शाळांना पाणीपुरवठा योजनेंतर्गत जल शुध्दीकरण यंत्र कार्यान्वित करण्याच्या कामातील अनियिमिततेबाबत समितीस माहिती द्यावी. यावर पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी विदित केले की, ग्रामविकास विभागामार्फत सन २००६ मध्ये जिल्हा परिषदांना जो निधी देण्यात आला होता. त्यातून जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये आर.ओ.ची मशिन बसविणेचा विषय आहे. या आर.ओ. मशिनची किंमत ९ हजार रुपये होती आणि ग्रामविकास विभागामार्फत त्याचे दर करार करण्यात आले होते. याबाबतचा निधी शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत जिल्हा परिषदांना दिला होता आणि यामध्ये अशा सूचना होत्या की, जिल्हा परिषदांनी ज्या ज्या शाळांना अशा आर.ओ. मशिनची गरज आहे त्या शाळांची यादी तयार करुन तेथे हे यंत्र बसविण्यात यावे. त्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ३२३ आर.ओ. यंत्र जिल्हा परिषदेने ठरलेल्या दरानुसार खरेदी केली होती. त्यासाठी ४ एजन्सी नेमण्यात आल्या होत्या. चारही एजन्सींचा दर एकच होता आणि जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी या चारपैकी एक एजन्सीची निवड करुन त्यांना हे काम करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आर.ओ.यंत्र पुरविण्यात आले. या आर.ओ.यंत्राची आय.टी.आय.मार्फत तांत्रिक तपासणी करण्यात आली. त्यांनी सांगितले की, ही यंत्रे चांगल्या प्रकारची आहेत. त्यामुळे त्यांचे देयक सुध्दा अदा करण्यात आले आहे. मात्र ही यंत्र त्या त्या शाळांमध्ये एक ते सव्वा वर्षे पडून राहिली. प्रत्यक्षात बसविण्यात आली नाहीत. कारण ही यंत्रे बांधणे किंवा वीजेचे कनेक्शन बसविणे या सर्व बाबींसाठी लागणा-या निधीची तरतूद ग्रामविकास विभागामार्फत करण्यात आली नव्हती. त्याचप्रमाणे ग्रामविकास विभागाने पुढे याबाबत काय करायचे यासंबंधी सुचनाही केल्या नव्हत्या. जिल्हा परिषदेने एक वर्षे वाट पाहून पुढील वर्षात म्हणजे सन २००८-०९ मध्ये ३४ लाख रुपयांचे स्वतःचे बजेट तयार केले व ३२३ यंत्रांपैकी १३१ यंत्रे बसविण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने कार्यकारी अभियंत्यांना अंदाजपत्रक व रचना तयार करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार संबंधित कार्यकारी अभियंता यांनी आराखडा तयार केला व त्यानुसार वरच्या बाजूस ५०० लिटर्सची पाण्याची टाकी तयार करण्यात आली. यंत्र बसविण्याची जागा निश्चित करण्यात आली व त्यानंतर खाली छोटी २०० लिटर्सची टाकी अशा पध्दतीने बसवायची की, आर.ओ. केलेले पाणी जमा होईल व जेणेकरुन विद्यार्थ्यांना पिण्यासाठी नेहमी पाणी मिळत राहील अशा प्रकारचा तो आराखडा होता. हा आराखडा दरम्यानच्या काळात केला असेल. परंतु त्याची अंमलबजावणी पुढील वर्षी म्हणजे सन २००८-०९ मध्ये करण्यात आली व त्यासाठी ३४ लाख रुपयांची अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात आली होती व त्या १३१ शाळांमध्ये ही यंत्रे बसविण्यात आली. काही शाळांमध्ये विजेचे कनेक्शन नव्हते तर काही ठिकाणी पाणीच नव्हते. या जिल्ह्यामध्ये जे गट शिक्षणाधिकारी होते, त्यांनी त्यावेळी या शाळांच्या दिलेल्या यादीमध्ये काही चुका झाल्याचे दिसून आले आहे.

सद्यःस्थितीत त्या यंत्रांची काय अवस्था आहे, ती यंत्रे सुस्थितीत आहेत किंवा कसे. कारण आपण याबाबत धोरण तयार करताना यासंबंधी सविस्तर चर्चा होऊन त्यांची दक्षता घेण्यासाठी व त्या शाळांमध्ये पाणी मिळण्यासाठी एक रचना तयार होणे आवश्यक होते, ते झाले नाही असे समितीच्या निदर्शनास आले. यानंतर समितीने अशी विचारणा केली की, ही संपूर्ण यंत्रणा बसवून शासनाचा निधी यामध्ये व्यर्थ गेला आहे. शासनाच्या निधीचे नुकसान करणा-या अधिका-यांवर कारवाई का करण्यात आली नाही. यावर सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, जे कार्यकारी अभियंता आणि त्यांचे जे उप कार्यकारी अभियंता, श्री.कुलकर्णी आणि श्री.नागदे या दोघांच्या विरुध्द चार्जशीट तयार करण्यात आली होती. चार्जशीटनुसार त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येऊन त्यांची वेतनवाढ थांबविण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत. वेतनवाढ थांबविणे ही कार्यवाही आपल्याला पुरेशी आहे असे वाटते काय अशी समितीने विचारणा केली असता सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी विदित केले की, ही कार्यवाही कमी आहे. त्यांनी जास्त काळजी घ्यायला हवी होती आणि काम चांगल्या पध्दतीने करायला हवे होते. कार्यकारी अभियंता आणि त्यांचे अभियंते यांनी ३५ लाख रुपयांचे काम विभागून २५-२५ हजार रुपयांचे काम प्रत्येक गावातील प्रत्येक शाळेच्या बाबतीत

जिल्हा परिषदेचे तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची परवानगी घेऊन हे सर्व काम केले आहे. त्यांच्याविरुध्द असलेल्या चार्जशीटमध्ये सुध्दा हा मुद्दा नमुद करण्यात आला होता. दुसरे म्हणजे कार्यकारी अभियंत्यांच्या बाबतीत विचार केला तर जो दोष आहे तो तेवढा मोठा नाही. कारण त्यांना सांगितले होते की, ही यंत्रे बसवावीत. त्यानुसार त्यांनी अंदाजपत्रक तयार केले आणि ही यंत्रे बसविली. सदर प्रकरणात कार्यकारी अभियंता यांचा दोष मोठा नाही. त्यांना असे सांगितले होते की, हे यंत्र बसवायचे आहे. त्यांनी अंदाजपत्रक तयार केल्यानंतर यंत्र बसविण्यात आले. शासनाने यंत्र बसविण्याकरीता पैसे दिले आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, यासंदर्भात शासनाने मार्गदर्शक सुचना देखील दिल्या असतील. यावर सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, मार्गदर्शक सुचना दिल्या नाहीत. ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयामध्ये यंत्र कसे बसवायचे, यंत्र बसविण्यासाठी किती खर्च येईल याचा उल्लेख आहे. या सर्व प्रकरणांमध्ये पाणीपुरवठा विभागाला विभागाला विचारणा करण्यात आलेली नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू कामाकरीता कोणत्या शीर्षाअंतर्गत निधी देण्यात आलेला होता. यावर सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी खुलासा केला की, बाराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून सन २००६ च्या वित्तीय वर्षात रुपये ८८ लक्ष २४ हजार रुपये जिल्हा परिषदेला वाटप करण्यात आले. हा निधी जिल्हा परिषदेला ग्रामविकास विभागाने दिलेला आहे.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, तांत्रिक मान्यता उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्याकडून देण्यात आल्यामुळे त्यांची एका वर्षाकरीता वेतनवाढ कमी केलेली आहे. परंतु ज्यांनी तपासणी केलेले प्रमाणपत्र दिले त्यांनी कामाचे मोजमाप देखील केले असेल परंतु पाण्याचा सोर्स नसताना देखील तेथे यंत्र कसे लावण्यात आले तसेच मुख्याध्यापक स्वतः लिहून देतात की यंत्र लावण्यात आलेले नाही. यावर सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, या योजनेमध्ये चुका झालेल्या आहेत हे मान्य करतो. यंत्र बसवताना त्यांनी पहायला हवे होते, तेथे वीज व पाणी उपलब्ध आहे की नाही. यंत्र बसविण्याचा करारनामा कोणासोबत केलेला आहे, तसेच याकरिता लागणारा निधी शाळा समितीला दिला होता काय, यावर सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, तुकडे पाडून काम देण्यात आले होते. २५ हजार रुपयांचा एका कामाचा करार होता. यामध्ये दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत. आर.ओ.मशिन लावणे व ते मशिन लावण्यासाठी सांगाडा तयार करणे अशी दोन कामे होती. तसेच यासाठी लागणारा निधी शाळा समितीला दिला नसून त्याची देयके जिल्हा परिषदेमार्फत काढण्यात आली आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, हा निधी जिल्हा परिषदेच्या सेस फंडामधील आहे. जिल्हा परिषदेचे अधिकारी समितीला चुकीची माहिती देत आहेत. सदरच्या कामावरील खर्च हा लेखाशिर्ष क्र. ३०१३ जिल्हा परिषद प्राप्त निधी यामधून करण्यात यावा असे नमुद केले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, या कामाचे दोन भाग आहेत. जलशुध्दीकरण यंत्र हे ग्रामविकास विभागाकडून बाराव्या वित्त आयोगाच्या निधीतून देण्यात आले. तर सन २००९ मध्ये यंत्र बसविण्यासाठी सांगाडा बसवावयाचा होता त्याकरीता जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभेत मंजुरी देऊन स्वःनिधीने घेण्याचे ठरविले होते.

समितीने पुढे विचारणा केली की, यंत्र खरेदी करण्यापासून चुकीची कार्यवाही झालेली आहे. कोणतेही इन्फ्रास्ट्रक्चर नसताना ऑर्डर दिली, शासनाच्या निधीचा अपव्यय झाला तसेच या यंत्रांचा काही लाभ झाला नाही. यामध्ये बरीच अनियमितता झाली आहे. यामध्ये जे अधिकारी/ कर्मचारी दोषी आहेत त्यांच्यावर काय कारवाई केली आहे. समितीच्या या प्रश्नास सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी २ कार्यकारी अभियंता यांनी काम केलेले असल्यामुळे त्यानुसार चार्जशीट देऊन त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. तसेच तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री.जाधव यांच्याविरुध्द दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांचा खुलासा शिक्षण संचालनालय, प्राथमिक यांच्याकडे सादर केला असून त्यांच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

या प्रकरणामधून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना जबाबदारीतून मुक्त केले आहे. त्यांनी देयके देताना सर्व कागदपत्रे तपासणे आवश्यक होते परंतु त्यांनी कोणतीही बाब तपासली नाही. याबाबत सखोल चौकशी करावी व याला जबाबदार असणा-या अधिका-यांवर कारवाई केली पाहिजे. ज्या एजन्सीने करारनाम्यातील अटी व शर्तींची पूर्तता केली नाही त्यांच्यावर देखील कारवाई करावी. परंतु जिल्हा परिषदेने व विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये सदरहू एजन्सीवर कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याचे दिसून येत नाही असे समितीने मत व्यक्त केले. सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये एजन्सीचा कोणताही दोष नाही. कारण पुरवठा करणा-यांनी चांगला पुरवठा केला व त्यांचे देयक अदा झाले आहे. उलट त्यांचे आणखी १० टक्के देयक देणे बाकी आहे. तसेच ही यंत्रे बसविण्यासाठी वेगवेगळे किरकोळ कंत्राटदार नियुक्त केले होते. प्रत्येक गावाचे केवळ २५ हजार रुपयांचे काम होते. एकाच कंत्राटदाराला हे काम देण्यात आले नव्हते. नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारांनी कामे केली असून त्यांचे त्या-त्या वेळी देयक अदा करण्यात आले आहे.

एकूण ३२३ जल शुध्दीकरण यंत्रे बसविण्यात आली होती व ती सर्वच्या सर्व बंद आहेत असे आपण समितीस सांगितले आहे. तसेच ज्या ठिकाणी पाण्याचा स्त्रोत नव्हता त्या ठिकाणी देखील यंत्रे लावण्यात आली अशा यंत्रांचा काय उपयोग आहे. ही सर्व प्रक्रिया चुकीच्या मार्गाने झाली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस खुलासा केला की, एजन्सीला ही यंत्रे लावण्याचा

आदेश मिळाल्यामुळे त्यांनी लावली तसेच ही सर्व प्रक्रिया चुकीच्या मार्गाने झाली आहे हे देखील मी मान्य करतो. यावर समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणी सर्व संबंधित यंत्रणेवर कारवाई झाली पाहिजे. कारण ज्या ठिकाणी पाणी व वीज असूनही यंत्रे बंद आहेत याचा अर्थ असा होतो की, ज्यांनी मशीनचा पुरवठा केला त्यांचादेखील यामध्ये दोष आहे. यावर सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस विदित केले की, या कार्यावाहीला आता ७-८ वर्षे झाली आहेत. यंत्रांची वेळोवेळी दुरुस्ती व देखभाल न केल्यामुळे ही यंत्रे बंद आहेत.

प्राथमिक शाळांना पाणीपुरवठा योजनेंतर्गत जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वित करण्याबाबतच्या कामातील अनियमितते संदर्भातील हा विषय आहे. ३२३ जलशुध्दीकरण यंत्रांच्या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे चर्चेवरुन दिसून येत आहे. याबाबत शासन स्तरावरुन स्पष्ट आदेश असणे आवश्यक होते. तसेच ते खालच्या पातळीपर्यंत जाणे आवश्यक होते, परंतु तसे झाल्याचे यामध्ये दिसून येत नाही. यंत्र दिल्यानंतर ते कुठे व कसे लावायचे, विजेची व्यवस्था, पाण्याची उपलब्धता तसेच इतर बाबी पाहिल्याचे समितीस यामध्ये दिसून येत नाही. सेस फंडातून ही पाणी पुरवठ्याची योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत आदेश निर्गमित करणे आवश्यक होते. मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्यापासून खालील यंत्रणेने जबाबदा-यांचे पालन केलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे प्रत्येक शाळेतील मुलांना पिण्याचे स्वच्छ पाणी पुरविणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने उस्मानाबाद जिल्ह्यातील शाळांना यंत्र पुरविण्याचे काम केले, परंतु त्यामुळे मुलांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळालेच नाही. यापासून मुलांना वंचित ठेवण्याचे काम झालेले आहे. देखभाल व दुरुस्तीबाबत ज्या जबाबदा-या निश्चित करणे आवश्यक होते त्यादेखील निश्चित केल्या गेल्या नाहीत. त्यामुळे सचिव यांनी जिल्हा स्तरावरील मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्यापासून खालील स्तरापर्यंत सखोल चौकशी करावी. तसेच ६ वर्षांपासून प्रलंबित असलेली विभागीय चौकशी तात्काळ पूर्ण करण्याबाबत संबंधितांना निर्देश द्यावेत. याप्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करुन तसा अहवाल समितीला तात्काळ सादर करावा असे समितीने निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

प्राथमिक शाळांना पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण यंत्र कार्यान्वित करण्याच्या कामात योजनेचे नियोजन व अंमलबजावणी वेळापत्रकाप्रमाणे न करणे, ठेकेदाराची रक्कम प्राप्त झाल्याबाबत महसूल मुद्रांकित स्वाक्षरी न घेणे, मोजमाप पुस्तिकेत कनिष्ठ अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नसताना ठेकेदारांना रक्कम प्रदान करणे इत्यादी नोंदी लेखा परिक्षणात होत्या. त्याबाबत समितीस पाठविलेल्या लेखी स्वरुपाच्या माहितीने समितीचे समाधान झालेले नाही. याबाबत मुख्य कार्यकारी अधिका-यांची साक्ष घेतली असता उक्त साक्षीच्या वेळेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काही तांत्रिक कारणांमुळे सदर योजनेचे काम वेळापत्रकाप्रमाणे करता आले नाही. शिक्षण समितीच्या बैठकांमुळे वेळेवर निधी खर्च होऊ शकला नाही. ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकावर ठेकेदारांचा मुद्रांक न लावता स्वाक्षरी घेण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. लेखा आक्षेपास एकप्रकारे शिक्षण अधिकारी यांनी उक्त साक्षीत लेखा आक्षेपातील बाब मान्य केली. याबाबत सर्व संबंधित अधिका-यांकडून दुर्लक्ष झाले आहे. अशी माहिती समितीसमोर आलेली आहे.

या प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता पाणीपुरवठा विभागाच्या विभागीय सचिव यांनी असे विदित केले की, जिल्हा परिषदांना जो निधी देण्यात आला होता त्यातून जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये आरओ मशीन बसविण्याचा विषय आहे. या आरओ मशीनची किंमत रु.९०००/- प्रती मशिन अशी होती आणि ग्राम विकास विभागामार्फत त्याचे दर करार करण्यात आले होते. या बाबतचा निधी शासनाच्या ग्राम विकास विभागामार्फत जिल्हा परिषदांना दिला होता आणि अशी सूचना केली होती की, जिल्हा परिषदेतील ज्या ज्या शाळांना आरओ मशीनची गरज आहे त्या त्या शाळांची यादी तयार करुन तेथे यंत्रे बसविण्यात यावी. त्यानुसार उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये ३२३ आरओ यंत्रे जिल्हा परिषदेने दर करारानुसार खरेदी केली होती. त्यासाठी एकूण ४ एजन्सीज नेमण्यात आल्या होत्या. या चार एजन्सीचे दर एकच होते आणि जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी या चार एजन्सीपैकी एका एजन्सीची निवड करुन त्यांना सदर आरओ मशीन बसविण्याचे काम दिले होते. या आरओ यंत्राची आय.टी.आय. मार्फत तांत्रिक तपासणी करण्यात आली. त्यांनी सदरची यंत्रे चांगल्या प्रकारची असल्याचे सांगितले होते. त्यानुसार संबंधित एजन्सीला देयक अदा करण्यात आले होते. मात्र सदरची यंत्रे त्या त्या शाळांमध्ये एक ते सव्वा वर्षे पडून राहिली होती. सदरची यंत्रे त्या त्या शाळांमध्ये पडून होती ही बाब विभागीय सचिवांनीदेखील मान्य केली आहे. त्यामुळे ज्या उद्देशाने शासनाने कोट्यवधी रुपये या योजनेवर खर्च केले ती अशा प्रकारे अयशस्वी होणे व विद्यार्थ्यांना स्वच्छ पाण्यापासून वंचित रहावे लागणे ही गंभीर बाब आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असल्याचे नमूद केल्यामुळे व मा.न्यायालयाने राज्य व केंद्र शासनाला दिलेल्या निदेशात प्रत्येक शाळांत विद्यार्थ्यांना स्वच्छ पाणी पुरविण्याची जबाबदारी सोपविलेली असल्यामुळे व शासनाने सदरची जबाबदारी पार पाडीत असताना या योजनेची जबाबदारी पार पाडण्याच्या कामी क्षेत्रीय अधिका-यांवर सोपविलेली असताना क्षेत्रीय अधिका-यांनी हलगर्जीपणाने सदरची योजना राबविणे व त्याकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष करणे हे अनाकलनीय आहे. विद्यार्थ्यांना पिण्याच्या स्वच्छ पाण्यापासून वंचित ठेवणे हे एकप्रकारे अमानवी कृत्य आहे. शासन मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करीत असताना अधिका-यांच्या उदासिनतेमुळे अशा अत्यंत महत्वाच्या योजनांचे वाटोळे होत असून त्यावर होणारा खर्च वाया जात आहे. खरेदी केलेली यंत्रणा पडून राहणे, बसविलेली यंत्रे काम करीत नसणे हे नित्याचेच होत आहे. यावर शासनाचे

कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. समितीने निदेश देऊनही दोषी अधिका-यांची चौकशी करण्यात आलेली नाही व योजना राबविताना ग्राम विकास, शालेय शिक्षण व पाणीपुरवठा या विभागांचा समन्वय आवश्यक असताना तो राखला गेला असल्याचे आढळून आले नाही, हेही एक वास्तव नमूद करावेसे वाटते. विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यापासून एकप्रकारे वंचित ठेवण्याचे काम या सर्व संबंधित अधिका-यांनी केले असल्याचे समितीला सकृतदर्शनी दिसून येते.

समितीला पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी सांगितले की, कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई केली असून त्यांची एक वेतनवाढ रोखली आहे. परंतु इतर कोणत्याही अधिका-यांवर कारवाई केल्याची बाब समितीसमोर दिसून येत नाही. हा गंभीर विषय असतानादेखील या बाबतच्या चौकशीला विलंब लावला जातो त्यामुळे अशा चौकशी करणा-या अधिका-यांवरदेखील कारवाई केली पाहिजे असे सचिवांनी समितीला सांगितले. एकीकडे चूक झाल्याचे मान्य करायचे मात्र त्याचवेळी संबंधित सर्व अधिका-यांवर कारवाई करायची नाही ही बाब समितीला अनाकलनीय वाटते. **विभागीय सचिव हे शासन म्हणूनच काम करीत असतात आणि शासन म्हणून त्यांचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी अनियमितता, गैरव्यवहार, अपहार इत्यादी बाबींसंदर्भात सर्व संबंधितांवर कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणी हे झाल्याचे दिसून येत नाही. सबब, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी. ग्रामविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग आणि पाणीपुरवठा विभाग या तिन्ही विभागांनी त्या त्या विभागाच्या सर्व संबंधित अधिका-यांची सखोल चौकशी करुन त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी व अशा प्रकारच्या योजनांच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

### स्वयंसेवी संस्थांनी चालविलेले मागासवर्गीय वसतिगृहास परिपोषण अनुदान निर्धारणात नियमबाह्य व जादा रकमेचे प्रदानाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८८६/८ (सन २००८-२००९)**

स्वंयसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतीगृहांना परिपोषण अनुदान निर्धारण्यास नियमबाहय व जादा रक्कमेचे प्रदान केलेले आढळून आले आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, कल्याण व सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, निर्णय क्र. बीसीएच/१०९७/ प्र.क्र.१/ १०७/मावक-४ दिनांक १६/०३/१९९८ चे सहपत्र जोडपत्र नुसार स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय मुला/मुलींची वसतिगृहांना सहाय्यक अनुदाने देण्याबाबतचे नियमातील परिच्छेद क्र.७ प्रमाणे निर्धारण केलेले नाही.

(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग निर्णय क्र.बी.सी.एच/२००७/ प्र.क्र.१०२/मावक-४ दि. ३१.१०.२००८ नुसार प्रवेशाची टक्केवारी न तपासता व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी न घेता हप्ता वाटप केला आहे. तसेच सनदी लेखापरिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील खर्च व अनुदान निर्धारणात देय होणारी रक्कम यांची देयता न तपासता रक्कम अदा करण्यात आली आहे.

(३) समाज कल्याण विभागाने अनुदान निर्धारण वाटप केल्याबाबतची वसतिगृह निहाय नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार देयक अदा झाल्याबाबतची खात्री करता आलेली नाही.

(४) लेखा परिक्षण निवड महिन्याव्यतिरिक्त इतर महिन्यामध्ये तपासणी करून जादा अदाई झाली नसल्याची खात्री घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १६.०३.१९९८ चे सहपत्रानुसार वसतिगृहांना सहाय्यक अनुदान या योजनेअंतर्गत परिपोषण अनुदानाचे निर्धारण करित असताना खालील ०९ वसतीगृहांना जादा रक्कम रुपये १,०४,४१७/- अदाई झालेली आहे. याबाबत तत्कालीन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, डॉ. किरण पराग सध्या कार्यरत जिल्हा परिषद, सोलापूर यांना पत्र देऊन सदरील वसतिगृहांना जादा रक्कम अदाई का करण्यात आली याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रजा.क्र/जिपउ/सकवि/अनुवगृह/५७२ दि. ०७.१२.१५ अन्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे.

| अ. क्र.<br>(१) | वसतिगृहाचे नांव<br>(२) | चलन क्र. व दिनांक<br>(३) | रक्कम<br>(४) |
|---|---|---|---|
| (१) | इंदिरा गांधी मुलांचे वि. वसतीगृह, बावी | चलन क्र. ३७ दि. १९.८.१५ | ६९१८ |
| (२) | आई विद्यार्थी वसतिगृह, उस्मानाबाद | चलन क्र. १५ दि. १९.८.१५ | १५६११ |
| (३) | मातोश्री वि. वसतीगृह, कळंब | चलन क्र. ४५ दि. १९.८.१५ | ४५५ |
| (४) | महात्मा फुले वि. वसतीगृह, सावरगांव | चलन क्र. २४ दि. १९.८.१५ | ८९११ |
| (५) | महात्मा फुले वि.वसतीगृह, निपाणी | चलन क्र. ४१ दि. १९.८.१५ | १८२४१ |
| (६) | महात्मा फुले वि. वसतीगृह, घारगांव | चलन क्र. ४० दि. १९.८.१५ | १७०३६ |
| (७) | कमला नेहरू मुलींचे वसतीगृह, माडज | चलन क्र. ८७ दि. २४.८.१५ | ८६२२ |
| (८) | प्रबोधन मा.विद्यार्थी व राजुरी ता. उस्मानाबाद | चलन क्र. १५० २४/०/२०१५ | १६५९२ |
| (९) | सावित्रीबाई फुले मुलींचे वसतीगृह सास्तुर, ता. लोहारा | चलन क्र.६९ दिनांक ०३.१०.२०१५ | १२०३१ |
| | | एकूण . . | १०४४१७ |

वरील तक्त्याप्रमाणे एकूण ०९ वसतीगृहांकडून जादा अदाई झालेली वसूल पात्र रक्कम रूपये १,०४,४१७/- संबंधित वसतिगृहाकडून वसुल करून शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. भरणा केलेल्या चलनाच्या प्रती कार्यालयात उपलब्ध आहेत.

(२) याबाबत खुलासा सविनय सादर की, सदरील शासन निर्णयाची प्रत या कार्यालयास डिसेंबर, २००८ मध्ये प्राप्त झाली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया जुलै, २००८ मध्ये पूर्ण झालेली होती. तसेच शासन निर्णय क्र.बी.सीएच. १०९७/प्र.क्र.१०७/मावक-/ दि.१६.०३.१९९८ मधील आठ अ नुसार माहे जून मध्ये ६० टक्के परिपोषण अनुदान देण्यात यावे असे नमूद असलेने महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बीसीएच/२००७/ प्र.क्र.१५२/मावक-४ दिनांक ३१.१०.२००८ अन्वये कार्यवाही होऊ शकली नाही.

तसेच वसतिगृहांना दुसरा टप्पा परिपोषण अनुदान अदा करताना वरील शासन निर्णय दिनांक ३१.१०.२००८ नुसार (१) अनु.जाती.-७५ टक्के (२) अनु.जमाती- १० टक्के (३) विमुक्त जाती भटक्या जमाती- १० टक्के (४) विशेष मागास प्रवर्ग- टक्के (५) अंध व अपंग- ३ टक्के या विहित टक्केवारीनुसार वसतिगृहांनी विद्यार्थ्यांना प्रवर्ग निहाय प्रवेश दिल्याची वसतिगृहातील प्रवेश नोंदवही (रजिस्टर) तपासून अंतिम अनुदान वाटप केलेले आहे.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे आदेश दिनांक २०.०३.१९९८ अन्वये अनुदानित वसतिगृहांना ६० टक्के व ४० टक्के अनुदानाच्या संचिकाना मान्यता देणे व देयके पारित करणेचे कायम स्वरूपाचे अधिकार जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना प्रदान केलेले आहेत. तसेच वसतिगृहातील सनदी लेखा परिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील खर्च व मूल्य निर्धारणातील अनुज्ञेय रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम शासन नियमानुसार अदा करण्यात आलेली आहे. सोबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश दिनांक २०.०३.१९९८ व शासन निर्णय दिनांक ३१.१०.२००८ ची प्रत या कार्यालयात उपलब्ध आहे.

(३) समाज कल्याण विभागामध्ये संबंधीत वसतिगृह निहाय व वर्षनिहाय अनुदान वाटप नोंदवही ठेवलेली असून त्यानुसार खात्री करून पुढील अनुदान निर्धारण वाटपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. नोंदवही तपासणीसाठी उपलब्ध आहे.

(४) सन २००८-०९ मधील एकूण ५६ अनुदानित वसतिगृहांना देण्यात येणा-या देयकाची पाहणी पडताळणी करून अंतर्गत तपासणी करून जादा अदाई झाले नसल्याची खात्री केलेली आहे. त्याबाबतची अनुदान वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. सदरील काळातील अनुदान वाटप नोंदवही या कार्यालयात उपलब्ध आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने पुढील प्रमाणे अशी विचारणा केली की,(१) स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतीगृहास मागील वर्षाचे अनुदान निर्धारण न करता अनुदान वाटप करण्यास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर याबाबत कोणती प्रशासकीय कारवाई केली आहे. (२) नियमबाह्यपणे जादा वाटप करण्यात आलेल्या सहाय्यक अनुदानाची रक्कम ६ वर्षे इतक्या विलंबाने वसूल करण्यास कोण जबाबदार आहेत. (३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २००८ नुसार प्रवेशाची टक्केवारी तपासणे व कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्याची कार्यवाही का डावलण्यात आली, त्यामुळे झालेल्या अनियमिततेस कोण जबाबदार आहे. (४) अनुदान निर्धारण नोंदवही केव्हा ठेवण्यात आली, ही नोंदवही लेखापरिक्षणास त्याचवेळी का दर्शविण्यात आली नाही.

या परिच्छेदात देखील महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० च्या नियम (७) नुसार अशा संबंधित अधिका-यांना २५ हजार रुपयांचा दंड ठोठाविण्यात यावा अशी तरतूद आहे. माननीय समिती प्रमुखांनी यापूर्वी अशा प्रकारचे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशा सर्व संबंधित अधिका-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० च्या नियम (७) नुसार कारवाई करण्याबाबत आणि २५ हजार रुपये दंड तो शासनाच्या तिजोरीत भरण्याबाबत आश्वासन दिलेले आहे.

उपरोक्त प्रकरणातील ९ वसतिगृहांना रु. १,०४,४१७/- इतकी जादा रक्कम अदाई करण्यात आल्याने याबाबत तत्कालिन जिल्हा सदस्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिनांक ७.१२.२०१५ रोजी खुलासा मागविण्यात आला असता एकूण ९ वसतीगृहांकडून जादा अदाई झालेली वसूल पात्र रक्कम रुपये १,०४,४१७/- भरणा करण्यात आल्याने जिल्हा सदस्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती विशद केली.

समितीने दिनांक २२.२.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची विभागीय साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या वेळी परिच्छेदात १४ वसतिगृहास मागील वर्षाचे अनुदान निर्धारण न करता वाटप करणे, नियमबाह्यपणे अनुदानाची रक्कम वसूल करण्यास ६ वर्षाचा विलंब का लागला, प्रवेशाची टक्केवारी तपासणे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूरी घेण्यात कार्यवाही डावलण्याची कारणे काय आणि अनुदान निर्धारण नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणे अशी समितीने विचारणा केली असता वरील संबंधित अधिका-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम (७) नुसार कार्यवाही करण्यात आली असून रुपये २५,०००/- इतका दंड आकारून सदरहू रक्कम शासनाच्या तिजोरीत भरण्यात येईल असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिले.

जादा रक्कम कशी दिली व सदरहू रक्कम केव्हा वसूल करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता स.क.अ (वर्ग-१) यांनी उक्त रुपयांचे मूल्य निर्धारण झाले, एका वसतिगृहाचे १,८८,३८२ रुपयांचे मूल्य निर्धारण झाले, त्यापैकी रुपये १,९५,३०० इतकी रक्कम देण्यात आली असून रुपये ६९१८ जास्तीची रक्कम दिनांक ३.१०.२०१५ रोजी वसूली करण्यात आली, तसेच ७५% उपस्थिती असेल तर संस्थेला १००% अनुदान द्यावे अशा प्रकारचा शासन निर्णय आहे असे स.क.अ (वर्ग-१) यांनी समितीला माहिती विशद केली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००८-०९ या कालावधीत त्यांनी रक्कम अदा करण्यात आली सदरहू घटनेला ७ ते ८ वर्षाचा कालवधी झालेला आहे. सदर रक्कम आता वसूल केली म्हणून संबंधित अधिका-यांचे त्या संस्थेसोबत साटेलोटे असतील, तसेच पंचायती राज समिती जिल्ह्यात दौ-याच्या निमिताने आली नसती तर सदरहू रक्कम वसूल झालीच नसती. या प्रकरणी शंका निर्माण होत असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करून कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल समितीकडे अवलोकनार्थ सादर करावा आणि विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित करण्यात आले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतिगृहास परिपोषण अनुदान निर्धारणात नियमबाह्य जादा रक्कमेचे प्रदान करण्याबाबतच्या नियमबाह्य जादा वाटप करण्यात आलेल्या सहाय्यक अनुदानाची रक्कम ६ वर्षे इतक्या विलंबाने वसूल करण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करून समितीच्या निर्देशानुसार केलेल्या चौकशीत श्री.पी.ए.पवार, समाज कल्याण निरीक्षक यांच्यावर समज देणे ही केलेली कार्यवाही पुरेशी आहे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतीगृहास अनुदान निर्धारणात नियमबाह्य व जादा रक्कमेचे प्रदान करण्याबाबतच्या नियमबाह्य जादा वाटप करण्यात आलेली रक्कम सर्व वसतीगृहाकडून वसूल करण्यात आलेली आहे.

तसेच सदरील वसतीगृहास नियमबाह्य झालेली ज्यादा अनुदान रक्कम वसूल करण्यास झालेल्या विलंबास जबाबदार असलेने या कार्यालयातील श्री.पी.एच.पवार, तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद हे सन २०१४ पासून समाज कल्याण निरिक्षक या पदावर सहाय्यक आयुक्त कार्यालय, सामाजिक न्याय विभाग, उस्मानाबाद येथे राज्य शासनाकडे कार्यरत असलेने त्यांचेवर पुरेशी कार्यवाही अनुसरणे करिता या कार्यालयाचे आदेश जा.क्र.१४२/२०१६, दिनांक १५/०२/२०१६ च्या आदेशान्वये संबंधितास समज देण्याची कार्यवाही अनुसरण्यात आलेली आहे.

तथापि संबंधिताविरूध्द कारवाई ही पुरेशी नसल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन समाज कल्याण अधिकारी श्री. एस. के. मिनगिरे यांचा खुलासा मागविण्यात आलेला असून, आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र.११ दिनांक ०१/०१/२०१८ अन्वये श्री. पी. एच. पवार यांचेवर कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे उत्तराशी / अभिप्रायाशी सहमत आहे.

## चौकशी अहवाल

या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपउ/सकवि/अनुवगृह/कवि/७०३/१६, दिनांक २०.०९.२०१६ अन्वये स्थानिक निधी लेखा परिक्षण, परिच्छेद क्र. ०८, सन २००८-०९ तसेच पंचायती राज समिती परिच्छेद क्र.३.८८६ स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतिगृहास परिपोषण अनुदान निर्धारणात नियमबाह्य व ज्यादा रकमेच्या प्रदानाबाबत परिच्छेद असून संबंधित परिच्छेदाच्या अनुषंगाने कार्यालयातील वसतिगृह शाखेकडील सन २००८-०९ मधील सर्व अनुदानित वसतिगृहांना ६० टक्के व ४० टक्के परिपोषण अनुदान वाटप प्रस्ताव संचिकाची सखोल तपासणी केली असता पंचायती राज समिती परिच्छेद क्र. ३.८८६ मधील मुद्दा क्र.८ नुसार लेखा परिक्षण निवड महिन्याव्यतिरिक्त इतर महिन्यांमध्ये ज्यादा रक्कम अदाई झाली किंवा नाही याची खात्री केली असता शासन निर्णय दिनांक १६ मार्च, १९९८ मधील तरतुदीनुसार वसतिगृहांनी प्रत्यक्षात सनदी लेखा परिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील खर्च व अनुदान निर्धारणात देय होणारी रक्कम यापैकी जी कमी रक्कम आहे ती देय असताना खालील विवरणपत्रातील अनुदानित वसतिगृहांना (लेखा परिक्षण निवड महिन्यांव्यतिरिक्त) वाटप झालेले परिपोषण अनुदान ज्यादा रक्कम अदाई झालेचे उपलब्ध लेखे अभिलेखे तपासणी अंती दिसून आले.

तसेच संस्थेकडील लेखा परिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील खर्च व अनुदान निर्धारणात देय होणारी रक्कम यापैकी जी कमी रक्कम देय असताना स्थानिक निधी लेखा परिक्षण परिच्छेद क्र.०८ मधील मुद्दयामध्ये एकूण ०९ वसतिगृहांना ज्यादा रक्कम अदाई झालेले दर्शविलेले आहे. त्यामधील सोबतच्या तक्त्यातील अ.क्र.९ सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह सास्तुर, ता.लोहारा या वसतिगृहाची लेखा परिक्षणात दर्शविलेली व वसूल करुन शासन खाती भरणा केलेली रक्कम रुपये १२,०३१/- चे वसुलीचे प्रकरण प्रत्यक्षात वसूली योग्य नाही असे दिसून येते. त्याव्यतिरिक्त सर्व वसतिगृहाचे लेखे अभिलेखेची अधिकची अंतिम तपासणी केली असता खालील नमुद विवरणपत्रातील एकूण ०३ वसतिगृहांना ज्यादा रक्कम अदाई झालेले निदर्शनास आलेले आहे.

| अ. क्र. (१) | अनुदानित वसतिगृहांचे नाव (२) | तालुका (३) | वसुलपात्र रक्कम (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १. | कुलस्वामीनी विद्यार्थी वसतीगृह, तुळजापूर | तुळजापूर | ६२५०/- | |
| २. | समता विद्यार्थी वसतीगृह, काक्रंबा | तुळजापूर | ९४/- | |
| ३. | चेतना विद्यार्थी वसतिगृह, कलदेव-निंबाळा | उमरगा | २६९२/- | |
| | | एकूण . . | ९०३६/- | |

परंतु शासन निर्णय क्रमांक विभशा/प्र.क्र.५९/मावक-६ मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०००३२ दिनांक २० नोव्हेंबर, २००२ अन्वये मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांकरिता प्रत्येक १० महिन्याकरिता दरडोई रु. ५००/- प्रमाणे परिपोषण अनुदान वाटप करण्यात येत होते. त्यास अनुसरुन संस्था, शासन निर्णय, दिनांक १६ मार्च, १९८८ नुसार मागील शैक्षणिक, सन २००७-०८ वर्षाचे वसतीगृहाचे लेखा परिक्षण करुन सनदी लेखा परिक्षण अहवाल चालू शैक्षणिक वर्ष सन २००८-०९ मध्ये माहे ऑक्टोबर, २००८ अखेरपर्यंत सादर केले होते.

तसेच शासन निर्णय क्र. विअशा २००६/५११५/मावक-६ दिनांक २७ मे, २००८ अन्वये अनुदानित वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांसाठी रु. ५००/- ऐवजी दरमहा दरडोई ६३०/- म्हणजे १३०/- प्रमाणे वाढीव परिपोषण अनुदान दिनांक ०१.०४.२००८ पासून शासनाने लागू करण्यास मंजूरी दिलेली असल्याने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश क्र.जा.क्र./जिपउ/सकवि/अनुवगृह/आदेश प्राप्त/ १३१५/२००८ दिनांक २४.१०.२००८ नुसार ५००/- ऐवजी ६३०/प्रमाणे अनुदान वाटप करण्यास मान्यता दिलेली असल्याने सन २००८-०९ मध्ये अंतिम मुल्यनिर्धारण करुन ४० टक्केची देयके अदा करतेवेळी सनदी लेखापालाचा खर्चाचा अहवाल सन २००७-२००८ मधील विचारात घेण्यात आला, ज्यामध्ये परिपोषणाचा दर रु. ५००/- अदा केला तर शासन निर्णय व मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी नुसार वाढीव परिपोषणाचा फरक १० महिनेचा १३०/- प्रमाणे २००८-०९ मध्ये माहे मार्च, २००९ अदा केला म्हणून केवळ सनदी लेखापालाच्या जमा खर्चापेक्षा एकूण ११ वसतिगृहांना लेखा परिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील एकूण रकमेपेक्षा कार्यालयाने जादा अदाई केली असे दिसून येते. परंतु शासन निर्णय दिनांक २७ मे, २००८ अन्वये अनुदान वाटप केल्याने ज्यादा अदाई झालेली रक्कम वसूल प्राप्त असलेचे संयुक्तिक वाटत नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, उपरोक्त मुद्याबाबत खुलासा करावा, असे समितीने निदेश दिले असता, त्यासंदर्भात अनुदानाची जादा रक्कम १ लाख ४ हजार ४१७ रुपये वसूल करून शासनाकडे चलानद्वारे भरणा केलेली आहे. वसतीगृहाने रक्कम उशिरा भरल्यामुळे व्याज रु.५५ हजार ८५९ इतके लावण्यात आले आहे. त्यापैकी ३८ हजार ५९५ रुपये वसूल केले असून चलानाद्वारे भरणा केले आहे. दोन वसतिगृहाकडून १७ हजार २६४ रुपये वसूल करणे शिल्लक असून ती रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे, असे सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी साक्षीच्या वेळी माहिती अवगत केली. याबाबत समितीचे असे म्हणणे होते की, दोषी कर्मचारी श्री.पवार यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केवळ समज दिली असून ती कारवाई पुरेशी नाही. संबंधित कर्मचा-यांविरुध्द विभागीय चौकशीकरिता आवश्यक नमुना दोषारोप १ ते ४ व सहपत्रे, साक्षीदारांच्या यादीसह आयुक्त, समाज कल्याण विभाग यांनी सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना प्रस्ताव पाठवण्याबाबत संबंधितांना निदेश दिलेले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात येईल, अशी माहिती सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिली असता समितीने समाधान व्यक्त करून लवकारात लवकर कारवाई करावी असे निदेश देण्यात आले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

स्वयंसेवी संस्थांनी चालविलेले मागासवर्गीय वसतीगृहास परिपोषण अनुदान निर्धारणात नियमबाह्य व जादा रकमेचे प्रदान केल्याबाबत मागासवर्गीय मुला/मुलींच्या वसतीगृहांना सहाय्यक अनुदान देण्याबाबतचे प्रमाण निर्धारण केलेले नसून वसतीगृहातील प्रवेशाची टक्केवारी न तपासता व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी न घेता हप्ता वाटप करणे तसेच सनदी लेखा परिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील खर्च व अनुदान निर्धारणात देय होणारी रक्कम यांची देयता न तपासता रक्कम अदा करण्यात येणे, समाजकल्याण विभागाने अनुदान निर्धारण वाटप केल्याबाबतची वसतीगृह नोंदवही न ठेवणे व दुबार देयक अदा झाल्याबाबतची खात्री न करणे इत्यादी बाबी लेखा परिक्षणाच्या आक्षेपात नमूद करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा परिषदेने लेखी स्वरुपात पाठविलेल्या खुलाशानुसार सर्व संबंधित अधिका-यांचा खुलासा मागविण्यात आला असल्याचे नमूद केले आहे. एकूण ९ वसतीगृहांकडून रुपये १,०४,४१७/- वसुली करुन शासन खाती भरणा करण्यात आले असल्याचे लेखी माहितीत पाठविलेले आहे. मात्र इतर बाबींची माहिती समितीला लेखा आक्षेपांच्या अनुषंगाने उत्तरादाखल सादर केलेली आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समितीने साक्ष घेतली असता, मुख्य कार्यकारी अधिका-यांनीदेखील सर्व संबंधित वसतीगृहांकडून उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे दंड वसूल केला असल्याचे नमूद करुन ज्या अधिकारी/कर्मचा-यांनी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा सर्व संबंधित अधिका-यांकडून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार २५,०००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापि, केवळ कागदपत्रे दाखविली नाही म्हणून दंड करुन सर्व संबंधित अधिका-यांवर दंडात्मक कारवाई केली असल्यामुळे समितीचे समाधान झाले नाही. याबाबत सर्व संबंधित अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी. **त्याचप्रमाणे ज्या स्वयंसेवी मागासवर्गीय वसतीगृहांनी नियमबाह्यपणे अनुदान घेतले अशा वसतीगृह संस्था चालकांवर देखील कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे समितीला वाटते व त्यानुसार प्रशासनावरील केलेली कारवाई ही नियमानुसार जरी असली तरी या कारवाईने वसतीगृह संस्था चालकांवर वचक बसला आहे असे दिसून येत नाही. भविष्यकाळात खर्च व अनुदाननिर्धारण गैरव्यवहार करणा-या वसतीगृहांवर कठोर कारवाई करण्यासंदर्भात एकतर अशा वसतीगृहांची मान्यता रद्द करावी अथवा कठोर दंडात्मक तरतूद करण्यात यावी व त्या अनुषंगाने विभागाने शासन निर्णयात योग्य ते बदल करावे अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## शासनाच्या अखर्चित रकमा

**परिच्छेद क्रमांक ३.१०३३/८ (सन २००८-२००९)**

शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग, क्र.पंरास/१०८५/प्र.क्र.५८७/२३, दि.३ डिसेंबर, १९८५ नुसार जिल्हा परिषदांना शासनाकडून मिळालेल्या अनुदानाच्या रकमा अस्थायी अर्थोपाय अग्रिम रकमा यापैकी अखर्चित व असमायोजित रकमा शासनाकडे त्वरीत भरणा करणेबाबत आदेश आहेत. तथापि सन २००८/०९ चे लेखा परिक्षणात पुढील जिल्हा परिषदांकडे शासनास परत करावयाच्या रक्कमा थकित असल्याचे दिसून आले आहे.

| अ. क्र. (१) | जिल्हा परिषदेचे नाव (२) | जिल्हा परिषदेचा विभाग (३) | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक (४) | गुंतलेली रक्कम रूपये (५) |
|---|---|---|---|---|
| ८ | उस्मानाबाद | वित्त विभाग | ३० | २४,१५,४९,९०४ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-०९ या वित्तीय वर्षातील अखर्चित रक्कम रू.२४,१५,४९,९०४/- आक्षेपात दर्शविली आहे. परंतु सन २००८-०९ चे वार्षिक लेख्यावरून पडताळणी केली असता शासन खाती भरणा करावयाची अखर्चित रक्कम रू.१२,८१,५४,१३८/- एवढी आहे. त्यापैकी रू.५,३७,०८,३५५/- रक्कम शासन खाती भरणा केली आहे, ती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. (१) | विभाग (२) | अखर्चित रक्कम २००८-०९ (३) | भरणा चलन व दिनांक (४) | भरणा केलेली रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | सा.प्र.वि. | ५,७०,३५९ | ३१/०३/१० | ५,७०,३५९ |
| (२) | कृषी | ३,५७,५५७ | ११/०२/१० | ३,५७,५५७ |
| (३) | आरोग्य | १,६७,३२,६९७ | १०/०९/१२ | १,६७,३२,६९७ |
| (४) | ल.पा.वि. | १,६८,६७१ | ०१/१२/१० | १,६८,६७१ |
| (५) | पशुसंवर्धन | ३,९५,०४९ | २२/०५/१४ | ३,९५,०४९ |
| (६) | समाज कल्याण | ४१,४०,६६४ | ०३/०२/१२ | ४१,४०,६६४ |
| (७) | बांधकाम | १७,१४,०३५ | २२/१२/०९ | १७,१४,०३५ |
| | | १,३०,१२९ | १३/०९/१३ | १,३०,१२९ |
| | | ५६,४५३ | ०९/०२/११ | ५६,४४३ |
| | | १८ | १३/०६/१३ | १८ |
| (८) | शिक्षण (नि.) | १,१७,७०० | १७/०८/०९ | १,१७,७०० |
| (९) | पंचायत (वेतन) | ७,०६,४८३ | ०७/१०/०९ | ७,०६,४८३ |
| (१०) | ग्रा.पा.पु. | ६,७१,०१४ | १८/०९/०९ | ६,७१,०१४ |
| (११) | पंचायत | ४,९५,७९,७७८ | १६/०९/१५ | २,७९,४७,५२६ |
| (१२) | शिक्षण | २,४७,०४,४८४ | - | - |
| (१३) | ग्रा.पा.पु. | ३,०८,१४४ | - | - |
| (१४) | १२ वा वित्त आयोग | २,७८,००,९०३ | - | - |
| | एकूण | १२,८१,५४,१३८ | – | ५,३७,०८,३५५ |

अखर्चित रक्कम रू. १२,८१,५४,१३८/- पैकी रू.५,३७,०८,३५५/- शासन खाती भरणा करून शिल्लक रक्कम रू.७,४४,४५,७८३/- पैकी १५२ वा वित्त आयोगाची रक्कम रू.२,७८,००,९०३/- विकास कामाच्या रकमेस शासनाचे पत्र क्रमांक बाविआ-२००६/प्र.क्र.-५७४/वित्त-४ दि.१५/१०/२०११ अन्वये खर्चास मार्च, २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याने उक्त रक्कम रूपये खर्च करण्यात आली आहे.

तथापि अद्याप पर्यंत रू.४,६६,४४,८८०/- शासन खाती भरणा करणे बाकी आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. (१) | विभाग (२) | अखर्चित रक्कम २००८-०९ (३) | भरणा केलेली रक्कम (४) | शिल्लक रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | पंचायत | २,१६,३२,२५२ | ० | २,१६,३२,२५२ |
| (२) | शिक्षण | २,४७,०४,४८४ | ० | २,४७,०४,४८४ |
| (३) | ग्रा.पा.पु. | ३,०८,१४४ | ० | ३,०८,१४४ |
| | एकूण | ४,६६,४४,८८० | ० | ४,६६,४४,८८० |

सदरचा अखर्चित निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकला असल्याने शासनखाती भरणा करण्यात आला नाही. बँकेकडून उक्त निधी प्राप्त होताच शासनखाती भरणा करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,अखर्चित रक्कम रुपये २४,१५,४९,९०४/- कोणत्या दिनांकास जमा केली आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, लेखा आक्षेपात अखर्चित रक्कम रुपये २४,१५,४९,९०४/- एवढी दर्शविण्यात आली आहे. परंतु, सन २००८-२००९ चे वार्षिक रुपये पडताळणी केली असता शासनखाती भरणा करावयाची अखर्चित रक्कम रुपये १२,८१,५४,१३८/- एवढी आहे. त्यापैकी रुपये ५,३७,०८,३५५/- रक्कम शासनखाती भरणा केली आहे. उर्वरित रक्कम रुपये ७,४४,४५,७८३/ पैकी बाराव्या वित्त आयोगाची रक्कम रुपये २,७८,००,९०३/- विकास कामाच्या रकमेस शासनाचे पत्र दिनांक १५/१०/२०११ अन्वये खर्चास मार्च, २०१२ पर्यंत मुदतवाढ असल्याने उक्त रक्कम खर्च करण्यात आली आहे. अद्यापपर्यंत रुपये ४,६६,४४,८८०/- शासनखाती भरणा करणे बाकी आहे. सदरचा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकला असल्याने शासन खाती भरणा करण्यात आलेला नाही.

यानंतर ग्रामविकास विभागाचे वित्तीय सल्लागारांनी खुलासा केला की, या संदर्भात मला काही माहिती समितीसमोर मांडावयाची आहे. राज्यातील ८ जिल्हा परिषदांची सुमारे २५० कोटी पेक्षा जास्त रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकली आहे. तत्कालीन सचिव आणि माननीय मंत्री महोदयांशी चर्चा करुन एक टिप्पणी माननीय सहकार सचिव यांच्याकडे पाठविली आहे आणि या ८ जिल्हा परिषदांना २५० कोटी रुपये सहाय्य करावे आणि ही रक्कम परत मिळवून द्यावी, अशी विनंती केली आहे. ही नस्ती प्रक्रियेमध्ये आहे. सन १९६१ पासूनची रक्कम जिल्हा परिषदांनी शासन खाती भरलेली नाही. एक आदेश काढून अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, या रकमा त्यांनी शासन खाती भरल्या पाहिजेत. हे शासनाचे अनुदान आहे. त्यामुळे साधारणपणे २५०० ते ३००० हजार कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा केलेले आहेत. तसेच जिल्हा परिषद सेस आणि अनुशेष शासनाने जिल्हा परिषदांना द्यावयास हवा. त्यामुळे साधारणपणे २२५० कोटी रुपये अनुशेष जिल्हा परिषदांना मिळालेला आहे.

अनेक जिल्हा परिषदांचे पैसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकले आहेत, हे समितीच्या लक्षात आलेले आहे. समितीने सर्व संबंधितांची साक्ष आयोजित करुन यामधून मार्ग काढला पाहिजे व जिल्हा परिषदांना मदत केली पाहिजे.जिल्हा परिषदांचे बँकांमध्ये अडकलेले पैसे परत मिळवून देण्याचा प्रयत्न करुण्यात यावा असे मत समितीने व्यक्त केले आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र.पंरास/१०८५/प्र.क्र.५८७/२३, दि.३ डिसेंबर, १९८५ नुसार जिल्हा परिषदांना शासनाकडून मिळालेल्या अनुदानाच्या अखर्चित व समायोजित रक्कमा शासनाकडे त्वरीत भरणा करणेबाबत आदेश आहेत. सदरहू अखर्चित रक्कमा शासनखाती जमा करण्यात आल्या आहेत काय, अद्यापपर्यंत शासनखाती भरणा करणे बाकी असलेली रक्कम किती आहे. याबाबत चौकशी अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहेत, व त्यास कोण जबाबदार आहे, तसेच अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आलेली नसल्याप्रकरणी सदरचा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकला असल्यास या संदर्भात शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेने शासन निर्णय दि.३ डिसेंबर, १९८५ नुसार जिल्हा परिषदेकडील सन २०१३-१४ ते २०१६ पर्यंतचा अखर्चित निधी शासनखाती भरणा करण्यात आला आहे. वेतन व योजनेचा शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ नुसार मार्च, २०१७ पर्यंतचा अखर्चित निधी शासनखाती भरणा केला आहे. या बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| वर्ष (१) | रक्कम (२) |
|---|---|
| २०१३-२०१४ | ४४,३७,०५,०५७/- |
| २०१५-२०१६ | ३६,६९,५६,९४६/- |
| २०१६-२०१७ | ३४,६६,२७,६०२/- |
| एकूण . . | ११५,७२,८९,६०५/- |

सन २०१३-२०१४ ते सन २०१६-२०१७ मध्ये एकूण रू.११५,७२,८९,६०५/- अखर्चित निधी शासनखाती भरणा करण्यात आला आहे. उस्मानाबाद जिल्हा परिषदेचा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत एकूण रू.५९.०६ कोटी इतका निधी अडकलेला आहे. त्यापैकी शासनखाती भरणा करावयाचा अखर्चित निधी रू.४३.७७ कोटी जुलै, २०१२ पूर्वीचा आहे.

मा. पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या कार्यवृत्ताचे अवलोकन करता, याप्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्यासंदर्भात कोणतेही निर्देश नसल्याने चौकशी अहवाल सादर करण्यात आला नाही.

सदरचा निधी परत मिळणेकरिता शासनास व बँकेस वारंवार पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तथापि बँकेकडून याबाबत कोणतीही अपेक्षित कार्यवाही झालेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

(वित्त-३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ च्या नियम ४९ नुसार जिल्हा परिषदांना, त्यांचा जिल्हा निधी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवणे बंधनकारक आहे. मात्र वित्त विभागाने दिलेल्या सूचनेनुसार या विभागाच्या दिनांक ५/७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी धुळे, नंदूरबार, उस्मानाबाद, बुलढाणा, वर्धा व नागपूर यांना पत्र पाठवून जिल्हा परिषदांच्या आर्थिक ठेवी सर्वार्थाने सुरक्षित रहाव्यात याकरिता तातडीने कार्यवाही करणेबाबत निदेश देण्यात आले आहेत.

माहे जुलै, २०१२ मध्ये शासनाच्या परवानगीने जिल्हा परिषदेची सर्व खाती राष्ट्रीयकृत बँकेत (एस.बी.एच.) मध्ये उघडण्यात आली असून वेतन व भत्यांचे प्रदान वेळोवेळी त्या-त्या महिन्यांत शासनाकडून प्राप्त होणा-या कॅशफ्लोप्रमाणे वेतनाचा खर्च करण्यात आलेला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकून पडलेला निधी हा वेतन व भत्ते यांचा अखर्चित निधी शासनास परत करणे तसेच योजना व विकास कामाचा असल्यामुळे अपूर्ण कामे पूर्ण करण्यांस व अखर्चित निधी शासनास भरणा करण्यास अडचणी निर्माण झाल्याने विकास कामांवर विपरीत परिणाम होत आहे.

प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांस या विभागाकडून दिनांक ६ मे, २०१३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा निधीचा जिल्हा सहकारी बँकेत अडकलेला विकास निधी राष्ट्रीयकृत बँकेत वर्ग करण्याबाबत त्या विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

तसेच जिल्हा निधीची रक्कम सुरक्षित रहाण्याच्या दृष्टीने संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत वेळोवेळी आढावा घेणेबाबत व योग्य वाटल्यास जिल्हा निधीचे खाते, शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत आहेत तेथे व्यवहार सुरू करण्याबाबतच्या सूचना दि.११/८/२०१४ च्या पत्राद्वारे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आलेल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शासनाच्या अखर्चित रकमा जमा करणे याबाबत खुलासा करावा, यावर सचिव, ग्रामविकास विभागाने खुलासा केला की, या संबंधी दोन भाग आहेत. शासनाकडून जिल्हा परिषदेला दिल्या जाणा-या निधीच्या माध्यमातून खर्च करण्याकरिता मर्यादा निश्चित केलेली असते. सन २०१६-१७ मध्ये निधी दिला असेल तर त्यांना सन २०१७-१८ पर्यंत खर्च करण्याची मुभा असते. काही कारणामुळे सन २०१७-१८ मध्ये देखील निधी खर्च झाला नसेल तर तो निधी त्वरीत त्यांना परत करावा लागतो किंवा वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागते किंवा वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागते. पूर्वी डीसीसी बँकेमध्ये निधी ठेवला जात होता. काही जिल्ह्यांमध्ये डीसीसी बँकेत निधी अडकला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात ५९ कोटी रुपये डीसीसी बँकेत अडकले आहेत. आता नियम बदलले निदेश डायरेक्शन्स बदली आहेत. डीसीसी बँकेत अडकलेली रक्कम जमा करणे शक्य नाही. आता डीसीसी बँकेच्या मार्फत काही निधी वाटला जात आहे, काही ठिकाणी कर्ज माफ केले जात आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, ११५ कोटी ७२ लाख रुपयांचा भरणा करण्यात आलेला आहे, अशी लेखी माहिती दिलेली आहे, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केली की, ४३ कोटी रुपये डीसीसी बँकेत अडकले आहेत ते परत करणे शक्य नाही. ५९ कोटी रुपयांपैकी ४३ कोटी रुपये अडकले आहेत. ती रक्कम मिळविण्याकरिता प्रयत्न सुरु असून उर्वरित सर्व रक्कम जमा केलेली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

शासनाकडून मिळालेल्या अनुदानाच्या रक्कमा अस्थायी अर्थोपाय अग्रिम रकमा यापैकी अखर्चित व असमायोजित रकमा शासनाकडे त्वरीत भरणा करणेबाबत आदेश आहेत. त्यानुसार सन २००८-०९ या वित्तीय वर्षामध्ये जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडील अखर्चित रक्कम रू.२४,१५,४९,९०४/- शासनाकडे परत करावयाच्या रकमांमध्ये थकित असल्याचे दिसून आले. उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून लेखी खुलासा कळविण्यात आला, त्यामध्ये सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्या वरून पडताळणी केली असता अखर्चित रक्कम रू.१२,८१,५४,१३८/-एवढी आहे. त्यापैकी रू.५,३७,०८,३५५/- रक्कम शासनखाती भरणा केली आहे. सदर रक्कम भरणा करून शिल्लक रक्कम रू.७,४४,४५,७८३/- पैकी १५ व्या वित्त आयोगाची रक्कम रू.२,७८,००,९०३/-एवढया रकमेस माहे मार्च, २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याने उक्त रक्कम खर्च करण्यात आली आहे. त्यामुळे उरलेली रक्कम रू.४६,६४,४८,८०/- शासन खाती जमा करणे बाकी आहे.

**उपरोक्त अखर्चित निधी रू.४,६६,४४,८८०/- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम ४९ नुसार जिल्हा परिषदांना त्याचा जिल्हा निधी संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवणे बंधनकारक असल्यामुळे तो जिल्हा बँकेत ठेवण्यात आला होता. वरील नियमानुसार राज्यातील ८ जिल्हा परिषदांचे २५० कोटी रूपयांपेक्षा जास्त रक्कम अडकलेली आहे. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हा परिषदेचा रू.४,६६,४४,८८०/- एवढा अखर्चित निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शासन खाती जमा करण्यात यावा. इतर जिल्हा परिषदेच्या बाबतीत देखील सहकार विभागाने यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन त्वरित कार्यवाही करावी तसेच जिल्हानिधीची रक्कम सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने योग्य वाटल्यास जिल्हा निधीचे खाते शासनाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या राष्ट्रीयकृत बँकेत चालतात त्या बँकेत सुरू करण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## अंतिम देयकासोबत गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.३२१ (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषद उस्मानाबाद सन २००८-०९ (परिच्छेद क्र. ३३) - गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करणे बाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८७ नुसार अंतिम देयका सोबत गुणवत्ता व चाचणी अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना एकूण ८७ कामांचे अंतिम देयकाचे प्रदान नियमबाह्यपणे केलेले आहे, त्यामुळे कामांची गुणवत्ता योग्य असल्याची पडताळणी करता येत नाही.

(२) संबंधितांनी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व हस्तांतरण केल्याची कार्यवाही केली नाही. गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच डिपॉझीट रक्कम परत केली जाते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम अंतिम देयकासोबत गुणवत्ता व चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त आक्षेपात नमूद केलेल्या (८७) कामाचे अंतिम देयके अदायी करते वेळी सदर कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत. विविध चाचण्यांच्या निकषानुसार आवश्यक कालावधी पूर्ण न झाल्यामुळे केवळ चाचणी अहवाल आर्थिक वर्षाचे अखेर प्राप्त न झाल्यामुळे काही रक्कम अनामत खाती जमा ठेवण्यात येऊन देयके अदा करण्यात आली. आक्षेपात नमूद एकूण (८७) कामांपैकी सद्य:स्थितीत (४८) कामाचे चाचणी अहवाल उपलब्ध आहेत. उर्वरित (३९) कामाचे चाचणी अहवाल उपलब्ध नसल्याने संबंधितांस नोटीस दिली आहे.

(२) आक्षेपात नमुद (८७) कामांपैकी (६९) पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहेत. उर्वरित (१८) कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्याने संबंधितांस नोटीस दिली आहे व एकूण (८७) कामांपैकी (३८) कामे मार्ग व पूलाचे व निवासस्थानाचे असल्याने ताबा पावतीची आवश्यकता नाही. उर्वरित (४९) कामांपैकी (१९) कामांच्या ताबा पावती उपलब्ध आहेत.उर्वरित (३०) कामाचे ताबा पावती उपलब्ध नसल्याने संबंधितास नोटीस दिली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम ८७ नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची त्याच वेळी प्रयोगशाळेतून तपासणी का करुन घेण्यात आली नाही. या अनियमिततेस कोण जबाबदार आहे. काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, कामावर वापरलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र व कामे हस्तांतरणाची कार्यवाही ही प्रक्रिया पूर्ण न होताच कामाची अनामत रक्कम का परत करण्यात आली. कामासाठी वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त नसतांना अंतिम देयक प्रदान करणे व सुरक्षा अनामत परत करण्याची कार्यवाही कोणत्या प्राधिकारान्वये करण्यात आली, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, आक्षेपात नमूद एकूण ८७ कामांपैकी सद्य:स्थितीत ४८ कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध आहेत. उर्वरित ३९ कामाचे चाचणी अहवाल उपलब्ध नसल्याने संबंधितास नोटीस दिली आहे. आक्षेपात नमूद ८७ कामांपैकी ६९ कामांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहेत. उर्वरित १८ कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने संबंधितास नोटीस दिली आहे. एकूण ८७ कामापैकी ३८ कामे मार्ग व पुलाचे व निवासस्थानाचे असल्याने ताबा पावतीची आवश्यकता नाही. उर्वरित ४९ कामांपैकी १९ कामांच्या ताबा पावती उपलब्ध आहेत. उर्वरित ३० कामांचे ताबा पावती उपलब्ध नसल्याने संबंधितास नोटीस दिली आहे. त्यावेळेस लेखापरिक्षणास कागदपत्रे दाखविण्यात आली नव्हती ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, संबंधितांवर यासंदर्भात जबाबदारी निश्चित करावी लागेल. चाचणी अहवाल प्राप्त नसताना अंतिम देयके प्रदान करणे व सुरक्षा अनामत परत करण्याची कार्यवाही कोणत्या प्राधिकरान्वये करण्यात आली. यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी खुलासा केला की, यामध्ये पूर्ण पैसे दिले नसून १.३६ लक्ष रुपये बाकी ठेवण्यात आले आहेत. एकूण रक्कम ३६.१७ लक्ष रुपये होती. कामांची गुणवत्ता तपासण्यासाठी गुणनियंत्रण यांचेकडून तपासणी केली जाते. काही कामाची गुणवत्ता तपासणीचा अहवाल उपलब्ध आहे.

समितीने विचारणा केली की, सगळी कामे तपासली जात नाही काय, दक्षता विभागाने सर्व कामाची तपासणी करावी अशी मागणी आपल्या कार्यालयाकडून करण्यात आली होती काय, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी सर्व कामाची तपासणी करावी अशी मागणी कार्यालयाकडून करण्यात आली नाही असे सांगितले. गुणनियंत्रणकडून जी कामे तपासली जातात त्याचे शुल्क देण्यात येते. तद्नंतर गुणनियंत्रणाकडून तपासणी केली आहे, त्याचे देयक सुध्दा दिले आहे. परंतु ब-याच ठिकाणी गुणनियंत्रणाकडून तपासणी केली जाते, परंतु त्यांना देयक दिले जात नाही असे प्रकार घडतात. आपल्याकडून जेवढी तपासणी केली गेली त्या सर्वांचे देयक आपण दिले आहेत काय,

यावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सर्व कामांचे देयक दिले गेले नाही. काही कामांचे देयक बाकी आहे. परंतु एकंदर किती कामांचे देयक देणे बाकी आहे. याची माहिती घेऊन समितीला अहवाल सादर करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अंतिम देयकासोबत गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करणे बाबत.

सन २००८-०९ या कालावधीत बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त नसताना अंतिम देयके प्रदान करणे, सुरक्षा अनामत परत करणे इत्यादी प्रकरणात तत्कालीन उप अभियंता यांचेविरुध्द कारणे दाखवा नोटीसीशिवाय इतर कोणतीही कारवाई झालेली नाही. तरी प्रस्तुत प्रकरणात अद्यापही कारवाई पूर्ण झालेली नसल्याची कारणे काय आहेत व होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

परिच्छेद क्र.३.३२१ (सन २००८-०९) अंतिम देयकासोबत गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करणे याबाबत केलेली कार्यवाही खालील प्रमाणे सन २००८-०९ मध्ये खालील उप अभियंता हे उप अभियंता म्हणून जिल्हा परिषद अंतर्गत उपविभागात कार्यरत होते.

| अ. क्र. (१) | उप अभियंता यांचे नाव (२) | उपविभागाचे नाव (३) | सध्या कार्यरत हुद्दा व ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस. ए. सूळ | जि.प.उपविभाग, तुळजापूर | उप अभियंता पदावर अधीक्षक अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे |
| २. | श्री. डी. एन. मोमले | जि.प.उपविभाग, उमरगा | कार्यकारी अभियंता (बां) पदावर जि.प.जालना |
| ३. | श्री. नैमोद्दिन ए | जि.प.उपविभाग, उमरगा | उप अभियता पदावर सार्वजनिक बांधकाम उप विभाग भूम |
| ४. | श्री शेख जिलानी | जि.प.उपविभाग, उस्मानाबाद | सेवानिवृत्त |
| ५. | श्री एन डी. वाघमारे | जि.प.उपविभाग, कळंब | सेवानिवृत्त |

सन २००८-०९ मध्ये जिल्हा परिषदेत कार्यरत असलेले वरील पाच उप अभियंत्यापैकी ०२ उप अभियंते सेवानिवृत्त आहेत, व इतर ३ उप अभियंते हे सद्य:स्थितीत राज्य शासनाच्या आस्थापनेवर कार्यरत असल्याने मा.समितीच्या निर्देशाप्रमाणे संबंधितावर कारवाई करणेबाबत ते कार्यरत असलेल्या आस्थापना प्रमुख कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपउ/बां/पंरास/कावि/१७३८/१७ दिनांक २७/७/२०१७ अन्वये कळविण्यात आलेले आहे. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपउ/ बां/पंरास/कावि/ १७३७/१७ दिनांक २७/७/२०१७ अन्वये कळविण्यात आलेले आहे. अद्याप कारवाईचा अहवाल अप्राप्त असल्याने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपउ/बां/लेखा/कावि/१८३/२०१८ दिनांक ०६/०१/२०१८ अन्वये मा.समितीच्या सूचनेप्रमाणे कारवाई करणेबाबत कळविण्यात आले आहे. संबधित अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार त्या खात्यांच्या वरिष्ठांना आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

(बांधकाम -३) पंचायत राज समितीने जिल्हा परिषदेस निर्देश दिल्यानंतरही आजतागायत कारवाई पूर्ण झाली नसल्याने तत्कालीन उप अभियंता, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्यावर तातडीने कार्यवाही करणे तसेच तत्कालीन उप अभियंता यांच्यावरील कारवाईच्या विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यांवर देखील कारवाई करण्याच्या सूचना उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना देण्यात आल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अंतिम देयकांसोबत गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहेत. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी खुलासा केला की, याबाबत जिल्हा परिषदेने कार्यवाही केलेली आहे. तसेच वर्ग- १ अधिका-यांवर कारवाई करण्याबाबतचे पत्र सचिवांना देण्यात आले आहे, हे अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे असल्यामुळे यास विलंब झाला आहे. यामध्ये एकूण ८७ कामे होती. अंतिम देयकांसोबत चाचणी अहवाल सादर न केल्याने संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबतचा अहवाल सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. याबाबतची कार्यवाही सुरू आहे. दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर अहवाल सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रकरण जुने असून याबाबत नक्कीच विलंब झालेला आहे. यामध्ये सचिवांकडे प्रस्ताव सादर न करता कार्यकारी अभियंता तसेच अधिक्षक अभियंता यांच्याकडे सादर करण्यात आलेला प्रस्ताव अगोदर सचिवांकडेच सादर करणे आवश्यक होते.

पूर्वी चर्चेच्या वेळी सादर करण्यात आला होता. दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी सचिव, सार्वजिनक बांधकाम विभाग यांच्याकडे सादर करण्यात आला असला तरीही त्यासाठी १० वर्षांचा कालावधी लागतो एवढा विलंब होत कामा नये. ज्यांनी यामध्ये विलंब केला ते कारवाईस पात्र आहेत.

याप्रकरणी विलंब करणा-यांवर कारवाई करण्याबाबत उप आयुक्त कार्यालयास सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये देण्यात आलेल्या देयकांसंबंधीचे पत्र चाचणीसाठी प्रयोगशाळेत देण्यात आले होते. परंतु ते मंजूर करण्याच्या अगोदरच देयके देण्यात आली. याबाबतचे सर्व चाचणी अहवाल प्राप्त झालेले आहेत.

याबाबत नियमानुसार कारवाई करावी. समितीच्या असे निदर्शनास आले की, सदरहू घटनेला तब्बल १० वर्षे झाली आहेत. यामध्ये खूप विलंब झाला आहे. आता केवळ साक्ष असल्यामुळे याबाबत कार्यवाही केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

### अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद,उस्मानाबाद संदर्भात अंतिम देयकासोबत गुणवत्ता चाचणी अहवाल सादर करणे बंधनकारक असताना एकूण ८७ कामांचे अंतिम देयकाचे प्रदान नियमबाहय केल्याप्रकरणी समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशावर आधारित साक्ष आयोजित करण्यात आली होती. त्यादरम्यान समितीच्या निर्दशनास आले की,महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता,१९६८ चे नियम ८७ नुसार अंतिम देयकाचे प्रदान नियमबाह्यपणे केलेले आहे. त्यामुळे कामांची गुणवत्ता योग्य असल्याची पडताळणी करता येत नाही. संबंधितांनी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व हस्तांतरण केल्याची कार्यवाही केली नाही. गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच अग्रिम रक्कम परत केली जाते.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये बांधकाम विभागाच्या ८७ कामांपैकी सद्य:स्थितीत ४८ कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध नव्हते, त्यामुळे ३९ कामांशी संबंधितांना नोटीस दिली आहे.८७ कामांपैकी ६८ कामांचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे. उर्वरित १८ कामांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नसल्याने संबंधितांना नोटीस दिली आहे.एकुण ८७ कामांपैकी ३८ कामे मार्ग व पुलाचे व निवासस्थानाचे असल्याने ताबा पावतीची आवश्यकता नाही. उर्वरित ४९ कामांपैकी १९ कामांच्या ताबा पावती उपलब्ध आहेत. उर्वरित ३० कामांचे ताबा पावती उपलब्ध नसल्याने संबंधितांस नोटीस दिली आहे. त्यावेळेस लेखापरिक्षणास कागदपत्रे दाखविण्यात आली नव्हती. वरील माहितीवरून समितीचे असे मत आहे की, ३९ कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध नव्हते १८ कामांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नव्हते, तसेच ३० कामांचा ताबा पावती उपलब्ध नव्हते, असे असताना कामांची देयके अदा करण्यात आली आहेत. समितीने निदेश देऊनही तसेच ग्रामविकास विभागाने आदेश देऊनही सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात आली

नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. कामाचे देयके प्रदान करताना ज्यांनी नियमाचे पालन केले नाही अशा सर्व संबंधित अधिका-यांची चौकशी तातडीने करण्यात यावी तसेच या कामी **समितीने निदेश देऊन व शासनाने आदेश देऊनही संबंधित विभाग प्रमुखांनी कार्यवाही करुन दोषींवर कारवाई होत नसल्याने संबंधित विभाग प्रमुखांवर देखील कठोर कारवाई तातडीने करण्यात यावी. तसेच कामाचे देयके अदा करताना अनियमितता करणा-या सर्व संबंधितांविरुध्द तातडीने चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी गुणनियंत्रणाकडून सर्व कामांची तपासणी करणे आवश्यक होते, तथापि तसे झाल्याचे दिसून येत नाही. बहुतांश ठिकाणी गुणनियंत्रण कक्षाकडून तपासणी केली जाऊन देखील देयक अदा केली जात नाहीत, अशा एकंदर किती कामाचे देयक अदा केलेले नाही. उपरोक्त प्रकरणी सर्वंकष चौकशी करण्यात यावी व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीची माहिती मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी अशी शिफारस करण्यात येत आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## जिल्हा परिषदेमधील अपूर्ण स्थितीतील बांधकामे

**परिच्छेद क्रमांक ३.१०३६/(६४) (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषदांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना, विहिरी, (निष्फळ सुरू झालेल्या परंतु अपूर्ण) खेड्यातील, जिल्ह्यातील रस्ते दुरूस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरूस्ती व बांधकामे, पशुवैद्यकीय दवाखाना, शाळागृहे, समाजमंदिर दुरूस्ती व बांधकामे, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे इत्यादी स्थानिक व सामूहिक विकासाच्या जिल्हा परिषद, शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात ती कामे पूर्ण होण्याची शासनाची अपेक्षा असते. तथापि, त्यापैकी काही कामे विभिन्न कारणांमुळे त्या त्या वर्षात पूर्ण होत नाहीत; अशी अपूर्णावस्थेतील कामे वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे त्यात गुंतलेला पैसा निरर्थक अडकून पडतो. त्याच प्रमाणे स्थानिक जनतेला विकास योजनांचा लाभ मिळू शकत नाही. तसेच अशी बांधकामे फार काळ अपूर्णावस्थेत राहिल्याने त्यांची पडझड होण्याची व त्यामुळे गुंतलेल्या निधीचे नुकसान होण्याची शक्यता असते. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समितीने योजनांतर्गत व योजनेत विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्णावस्थेत राहणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या माहितीनुसार अशाप्रकारे अपूर्णावस्थेत पडून असलेल्या बांधकामाचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ. क्र. (१) | जिल्हा परिषदेचे नाव (२) | जिल्हा परिषदेचा विभाग (३) | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक (४) | गुंतलेली रक्कम रूपये (५) |
|---|---|---|---|---|
| ६४ | उस्मानाबाद | बांधकाम | ८१ | १०,१०,२६,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषद, उस्मानाबाद बांधकाम विभागांतर्गत सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एकूण (४९४) कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी २००८-०९ या वर्षात (२०७) कामे पूर्ण झाली. उर्वरित (२८७) कामे मार्च, २००९ अखेर अपूर्ण राहिली. सदर कामांपैकी सद्यःस्थितीत (२४३) कामे पूर्ण झालेली आहेत. व (४२) कामे रद्द झालेली आहेत. (२) कामे अद्याप न्यायालयीन प्रकरणांमुळे अपूर्ण आहेत.

पूर्ण झालेल्या (२४३) कामापैकी (२३३) कामांची पूर्णत्वाची प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत. उर्वरित (१०) कामांचे पूर्णत्वाची प्रमाणपत्रे उपलब्ध न झाल्याने संबंधितास कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

उर्वरित (२) न्यायालयात प्रलंबित असलेल्या कामांचा तपशील खालील प्रमाणे आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा बांधकामे (अपूर्ण कामे ०२) खालील प्रमाणे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे पत्र क्र.९९७/१५ दिनांक २२/०९/२०१५ अन्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

(१) जि.प. प्रशाला बांधकाम, भूम याबाबत रिट याचिका क्रमांक ४५५/२०१२ (बाबू नागू पवार तर्फे वारस विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर) हे प्रकरण मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे न्यायप्रविष्ट आहे.

(२) जि.प. कन्या प्रशाला, परांडा या प्रशालेबाबत दुसरे अपील क्रमांक १२५/२०१५ (सारंग शहा विरूध्द जिल्हा परिषद, उस्मानाबाद)

सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे न्याय प्रविष्ट आहे. सदर दाव्याचा निकाल जिल्हा परिषद उस्मानाबादच्या बाजूने दि.१९.१०.२०१५ रोजी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी अपील क्र.१२५/२०१५ पूर्णपणे रद्द ठरवून दिलेला आहे. तरी सदर बांधकामासाठी निधी उपलब्ध करून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर अर्धवट अवस्थेतील वरील दोन्ही माध्यमिक शाळांना इमारती बांधकामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत शासकीय माध्यमिक शाळेच्या इमारत बांधकाम/दुरूस्तीसाठी जि.प.ना. अनुदान लेखाशीर्ष २२०२ ए-८४३ अन्वये रू.९००.०० लक्ष निधीची आवश्यकता असल्याने निधी उपलब्ध करून देणेबाबत जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, उस्मानाबाद यांना शिक्षणाधिकारी (प्रा)

जि.प.उस्मानाबाद यांनी पत्र क्र.५०१/१४ दिनांक १९/०६/२०१४ या कार्यालयाचे पत्र क्र.२७०२/१५ दिनांक ११.१२.२०१५ अन्वये तसेच शिक्षण उपसंचालक (माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे पत्र क्र.२६७/१५ दिनांक १८.०३.२०१५ अन्वये निधीची मागणी केलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,बांधकाम विभागाअंतर्गत ४९४ कामे अपूर्ण होती. त्यापैकी ४५७ कामे पूर्ण झाली आहेत, ही कामे केव्हा पूर्ण झाली, ४२ कामे कोणत्या कारणास्तव रद्द करण्यात आली, त्या कामांवर झालेला एकूण खर्च किती आहे, २ अपूर्ण कामांची प्रकरणे न्यायालयात जाण्याची कारणे काय आहेत व त्या कामांची सद्यःस्थिती काय आहे. याबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीला खालील प्रमाणे माहिती दिली.

सन २००८-२००९ मध्ये अपूर्ण राहिलेल्या कामांची संख्या २८९ एवढी आहे. सन २००९ मध्ये २४२ कामे पूर्ण झाली आहेत. एकूण ४२ कामे रद्द झाली असून २ कामे न्यायालयीन प्रकरणामुळे अपूर्ण आहेत. या दोन अपूर्ण कामांपैकी जिल्हा परिषद प्रशाला बांधकाम, भूम या कामाबाबत रिट याचिका क्रमांक ४५५/२०१२ हे प्रकरण उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात न्यायप्रविष्ट आहे. दुसरे काम जिल्हा परिषद कन्या प्रशाला, परांडा हे प्रकरण देखील औरंगाबाद खंडपीठात न्यायप्रविष्ट होते. या दाव्याचा निकाल जिल्हा परिषदेच्या बाजूने दिनांक १९/१०/२०१५ रोजी लागला असून निधी उपलब्ध करून देऊन सदर काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पूर्ण झालेल्या कामांची प्रत्यक्ष पहाणी केली आहे काय व आपल्याला अभिलेख कोणी दिला आहे. तसेच समितीला ९ अपूर्ण कामांची यादी सादर करावी अशी समितीने विचारणा केली असता तत्कालिन अधिकारी आजच्या बैठकीस उपस्थित नाहीत. ज्यावेळी या कामांचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी २४२ कामे पूर्ण झाली आहेत, अशी माहिती सादर करण्यात आली होती. या कामांचा बांधकाम परवाना मागितला असता यापैकी ९ कामांचा बांधकाम परवाना (सी.सी.) आम्हाला करुन न दिल्यामुळे संबंधितांवर नोटीसा बजावल्या आहेत. कार्यकारी अभियंता यांच्याकडून कामांची पहाणी झालेली नाही. पूर्ण झालेली कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत किंवा नाहीत, याबाबतची माहिती घेऊन समितीला अवगत करावे लागेल.या प्रकरणी संबंधितांना नोटीसा बजावल्या असून खुलासा प्राप्त झाल्यानंतर समाधान झाले नाही तर कारवाई करण्यात येईल अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती दिली.

सन २००८-२००९ मधील ही कामे असताना ९ कामांचे बांधकाम परवाने उपलब्ध होत नसतील तर ही बाब अतिशय गंभीर आहे. यापूर्वी समितीने कार्यकारी अभियंता यांना माहिती विचारली असता त्यांनी संपूर्ण माहिती दिली व ९ कामे अपूर्ण आहेत असे सांगितले. त्यानंतर समितीने ९ कामांबाबत विचारणा केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ९ कामांच्या सी.सी.उपलब्ध न झाल्यामुळे आम्ही कारणे दाखवा नोटीसा संबंधितांना बजावल्या आहेत असे समितीने मत व्यक्त केले.

कार्यकारी अभियंता अशा प्रकारे समितीची व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिशाभूल करीत असतील तर हे योग्य नाही, याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू परिच्छेदांबाबतची सर्व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यावेळी ९ कामांच्या सी.सी.उपलब्ध नाहीत, अशी माहिती मिळाली होती. त्यानंतर आम्ही नोटीसा काढल्या. आता त्या उपलब्ध झाल्या असल्यास समितीला माहिती सादर करण्यात येईल.

यावर समितीने अशा सूचना केल्या की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ९ कामांना भेटी द्याव्यात आणि सद्यःस्थितीबाबतचा अहवाल समितीला सादर करावा. सदरहू विषयाबाबत सचिवांची साक्ष घेण्यात येईल. समितीला अशीही माहिती प्राप्त झाली आहे की, ४२ कामे पूर्ण दाखविण्यात आली असली तरी काही इमारती अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत किंवा कामच झालेले नाही. समितीने परांडा येथील शाळेच्या सद्यःस्थिती बाबत विचारणा केली असता त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू प्रकरण न्यायालयात होते व आता जिल्हा परिषदेच्या बाजूने निर्णय लागलेला आहे. आता पुन्हा अंदाजपत्रक तयार करुन शासनाची मान्यता घेऊन काम पूर्ण करुन घ्यावे लागेल अशी माहिती समितीला दिली. त्यानंतर समितीने या ठिकाणी काही बांधकाम झाले होते का, असा उपप्रश्न विचारला असता कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी त्याबाबत समितीला या कामाच्या बाबतीत १२.६३ लक्ष रुपये देयक अदा करण्यात आले आहे. बांधकामावर खर्च झाला आहे. काम सुरु केल्यानंतर न्यायालयात प्रकरण गेले व न्यायालयाकडून सदरहू कामास स्थगिती मिळाली. जेवढा खर्च झाला आहे तेवढ्या कामाची मोजमाप पुस्तिकेत नोंद केली आहे अशी माहिती देण्यात आली.

सदरहू कामावर १२.६३ लक्ष रुपये खर्च झाला आहे. कार्यकारी अभियंता यांनी कामाची पहाणी केलेली नाही. आपण ही सर्व माहिती कागदपत्राच्या आधारे समितीला देत आहात. समितीला हे काम बघावयाचे आहे. त्यामुळे या कामाशी संबंधित सर्व कागदपत्रे समितीला सादर करावीत असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सदरहू प्रकरणी बांधकाम विभागांतर्गत ४९४ कामापैकी २४२ कामे पूर्ण झाली व ४२ कामे रद्द झाली असून २ कामे न्यायालयीन प्रकरणामुळे अपूर्ण असल्याची माहिती समितीस देण्यात आली. यामध्ये ९ कामांच्या सी. सी. उपलब्ध नसल्याप्रकरणी या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या ९ कामांना भेटी देऊन सद्य:स्थितीबाबतचा अहवाल समितीस सादर करणेबाबत निर्देश समितीने दिलेले आहेत. तसेच पूर्ण झालेली कामे खरोखरच पूर्ण झाली आहेत याची पुनर्तपासणी करण्याचे समितीने निर्देश देऊनही त्यानुसार चौकशी अहवाल सादर न करण्याची कारणे काय आहेत व अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे तसेच याबाबत जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे काय ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. समितीने दिलेल्या निर्देशांप्रमाणे खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

मा.समिती प्रमुख यांच्या सुचनेप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर ९ कामांची पहाणी करुन सद्य:स्थितीबाबत अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्यानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर ९ कामांपैकी भुम व परांडा तालुक्यातील कामाची व कार्यकारी अभियंता (बां) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी तुळजापूर, उमरगा, उस्मानाबाद या तालुक्यातील कामांना प्रत्यक्ष भेटी देवून पाहणी केली व सर्व ९ कामे सद्य:स्थितीत चालू असून सोबत सदर ९ कामांच्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र संलग्न करण्यात आले आहेत. सोबत - सदर ९ कामांचा सद्य:स्थितीचा अहवाल मा.समिती प्रमुखाच्या अवलोकनार्थ सविनय सादर.

तसेच नमूद २४२ कामे ही पूर्ण झालेली असून त्या कामांची पुर्ण झालेबाबतची खातरजमा केली असून सोबत सर्व २४२ कामांचे पूर्णत्वाची प्रमाणपत्रे सादर करण्यात येत आहे व न्यायालयीन प्रकरणामुळे अपूर्ण असलेली ०२ कामे न्याय प्रविष्ट असल्याने अद्यापही अपूर्ण आहेत.

**अहवाल**

**परिच्छेद क्र.३.१०३६ (६४)**

| अ. क्र. | कामाचे नांव | सद्य:स्थिती कामे | शेरा |
|---|---|---|---|
| १. | पाडोळी ते बोरखेडा रस्ता १/०० ते १/५०० डांबरी खडे भरणे व नाली खोदणे, ता.उस्मानाबाद | पूर्ण | सदर कामाच्या ठिकाणी स्थानिक लोकांनी विचारणा केली असता सदर काम त्यावेळी झाल्याचे सांगितले आहे. |
| २. | नांदुरी ते धोत्री रस्ता सुस्थितीत रहाणेसाठी बाजू पट्टा भरणे, ता.तुळजापूर | पुर्ण | सदर कामाच्या ठिकाणी स्थानिक लोकांनी विचारणा केली असता सदर काम त्यावेळी झाल्याचे सांगितले आहे. |
| ३. | राज्य मार्ग १५५ (ईट) वाडवना रोड ते जिल्हा सरहंद रस्ता ०/०० ते १/७०० डांबरी खडे भरणे, ता.भुम | पुर्ण | सदर कामाच्या ठिकाणी स्थानिक लोकांनी विचारणा केली असता सदर काम त्यावेळी झाल्याचे सांगितले आहे. |
| ४. | महिला व बालकल्याण इमारत दुरुस्ती करणे, ता. उस्मानाबाद. | पूर्ण | सद्य:स्थितीत इमारती मधील कार्यालय चालु आहे. |
| ५. | प्राथमिक आरोग्य उपकेंद्र बांधकाम, चिंचपूर (ब्रु), ता.परांडा | पूर्ण | सद्य:स्थितीत इमारती मधील कार्यालय चालु आहे. |
| ६. | जि.प.प्रशासकीय व विस्तारी इमारत पदाधिकारी निवासस्थान, स्वच्छता गृहाची साफसफाई करणे, ता.उस्मानाबाद. | पूर्ण | नियमित साफसफाई चालू आहे. |
| ७. | आचलबेट देवस्थान येथे भक्त निवास बांधणे, आचलबेट, ता. उमरगा. | पूर्ण | सद्य:स्थितीत भक्त निवास वापरात आहे. |
| ८. | टेंभी आई मंदिर मी, बावी येथे धर्मशाळा बांधणे, ता.उस्मानाबाद. | पूर्ण | सद्य:स्थितीत धर्मशाळा वापरात आहे. |
| ९. | सामाजिक सभागृह बांधणे, मौ.देवळाली, ता.उस्मानाबाद | पूर्ण | सद्य:स्थितीत सभागृह वापरात आहे. |

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** समितीने दिलेल्या निर्देशास अनुसरुन उक्त ९ कामांना भेटी देऊन त्याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे. जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर मुद्दा हा जिल्हा परिषदेतील अपूर्ण स्थितीतील बांधकामांसंबंधात आहे. त्या संबंधात विभागाचे काय म्हणणे आहे, याबाबत सचिव, (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) यांनी खुलासा केला की, एकूण ४९४ कामे होती, त्यावेळी २८६ कामे अपूर्ण होती, त्यापैकी २४२ कामे पूर्ण झाली आहेत. ४२ कामे रद्द झाली आहेत तर दोन कामे न्यायालयीन प्रक्रियेमुळे सुरु झालेली नाहीत. २४२ पूर्ण झालेल्या कामांपैकी ९ कामांची तपासणी करण्यात यावी असे आदेश देण्यात आले होते, सदरहू कामे तपासलेली आहेत. त्याचे कम्प्लीशन रिपोर्ट प्राप्त झाले असून आता फक्त दोन कामेच शिल्लक राहिली आहेत. सदर कामे न्यायप्रविष्ट आहेत. रद्द करण्यात आलेली ४२ कामे रद्द करण्यात आली असून ती बहुतांशी रोजगार हमी योजनेतील कामे होती. जागेअभावी कामे वगळण्यात आलेली आहेत.

समितीने विचारणा केली की, सदर कामे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासावीत असे निदेश समिती प्रमुखांनी दिले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत:ची जबाबदारी पार न पाडता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर जबाबदारी सोपविली. बांधकाम विभाग हा मुळातच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिपत्याखाली काम करतो. त्याचा प्रमुख तोच आहे. ज्याच्या अकार्यक्षमतेमुळे कामे पूर्ण झाली नाहीत त्यालाच आपण पुन्हा कामे पूर्ण झाली आहेत किंवा नाही हे तपासण्यासाठी पाठवीत आहात. यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चूक झाली नाही काय अशी विचारणा केली असता यावर सचिव, (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) यांनी खुलासा केला की, ही कामे लहान होती. जिल्हा परिषदेमधील बांधकामाचा प्रशासकीय प्रमुख अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आहे.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कामे तपासण्याचे निदेश समितीने दिल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कामे तपासण्याचे आदेश दिले, त्यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना ही कामे तपासण्याचे आदेश दिले पाहिजे होते. यापुढे दक्षता घेण्यात येईल असे सचिव (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) यांनी सांगितले. यानंतर समितीने विचारणा केली की, जी ९ कामे आहेत त्याच्या किंमती येथे देण्यात आलेल्या नाहीत. पाडोळी ते बोरखेडा रस्ता या कामाची किंमत किती होती. यावर सचिव (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) यांनी खुलासा केला की, या कामाची किंमत रुपये २.०० लाख होती. ही सगळी दुरुस्तीची कामे आहेत. एक काम दोन लाख रुपयाचे आहे, दुसरे काम रुपये ४.७० लाखांचे आहे. तिसरे काम रुपये १.०० लाखाचे आहे. ही लहान लहान कामे आहेत. जिल्हा परिषद प्रशासकीय व विस्तारित इमारत, पदाधिकारी निवासस्थाने, स्वच्छतागृहे यांची साफसफाई करणे ही कामे सेसमधील आहे. सगळी कामे सेस फंडातील नाहीत. पहिली तीन कामे ही ३०५४ मधील आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना, विहिरी, जिल्ह्यातील रस्ते दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्रे दुरुस्ती व बांधकामे, पशुवैद्यकीय दवाखाना, शाळागृहे, समाजमंदिर दुरुस्ती व बांधकामे, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे इत्यादी स्थानिक व सामूहिक विकासाच्या जिल्हा परिषद, शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षात ती कामे पूर्ण होण्याची शासनाची अपेक्षा असते. तथापि, काही कामे विभिन्न कारणांमुळे त्या त्या वर्षात पूर्ण होत नाहीत अशी अपूर्णावस्थेतील कामे वर्षानुवर्षे पडून असतात. त्यामुळे गुंतलेल्या निधीचे नुकसान होण्याची शक्यता असते अशा प्रकारे अपुर्णावस्थेत पडून असलेल्या जिल्हा उस्मानाबाद बांधकाम विभागांतर्गत सन २००८-०९ या आर्थिक वर्षात एकूण ४९४ कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी ४२ कामे रद्द झाली आहेत तर २ कामे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात न्यायप्रविष्ट असल्यामुळे सुरु झालेली नाहीत.

सन २००८-०९ मध्ये अपूर्ण राहिलेल्या कामांची संख्या २८९ एवढी आहे. सन २००९ मध्ये २४२ कामे पुर्ण झाली आहेत असे समितीला विदित करण्यात आले होते. त्यामुळे समितीने २४२ कामांच्या बांधकाम परवान्यांची (सी.सी.) साक्षीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिका-यांना मागणी केली असता २४२ कामांपैकी ९ कामांचे बांधकाम परवाने (सी.सी) जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन न दिल्यामुळे जिल्हापरिषदेने संबंधितांना नोटीसेस बजावल्या आहेत. कार्यकारी अभियंता यांनी कामाची पहाणी केलेली नाही त्यामुळे पूर्ण झालेली कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत किंवा नाहीत याबाबतची माहिती समितीला देता आली नाही. सन २००८-२००९ मधील ही कामे असताना ९ कामांच्या बांधकाम परवाना (सी.सी) प्रमाणपत्राच्या प्रती उपलब्ध नाहीत. त्यामुळे कारणेदाखवा नोटीस संबंधिताना बजावली आहे. तथापि, या प्रकरणी कोणावरही दोषारोप अद्यापही

ठेवले नसल्यामुळे प्रशासकीय दिरंगाई व दोषींना पाठीशी घालण्याचा हा निंदनीय प्रकार अतिशय गंभीर आहे. कार्यकारी अभियंता यांनी अशा प्रकारे केवळ संबंधितांना नोटीस बजावल्याचे सांगितले, तथापि पुढील कोणती कार्यवाही केली हे त्यांनी समितीस सांगितले नाही त्यामुळे ही समितीची एक प्रकारे दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**कार्यकारी अभियंता बैठकीला उपस्थित असताना आणि त्यांच्यासमोर सर्व चर्चा सुरु असताना ९ कामांचे बांधकाम परवाने (सी.सी) उपलब्ध असतानादेखील उपलब्ध नसल्याची माहिती सांगणे हा देखील समितीचा एकप्रकारे अवमान आहे. त्यासाठी सबंधित कार्यकारी अभियंता यांना सक्त ताकीद देण्यात यावी व भविष्यात समितीसमोर येताना वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यात येऊ नये असे त्यांना बजावण्यात यावे. जिल्हा परिषदेमधील अधिका-यांनी अशा प्रकरणांमध्ये योग्य समन्वय ठेवणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीस वाटते. जिल्हा परिषदेमधील अधिका-यांमध्ये समन्वय असल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. त्यामुळे समितीने साक्षीदरम्यान निदेश दिले होते की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर ९ कामांना भेटी द्याव्यात आणि सद्य:स्थितीबाबतचा अहवाल समितीला सादर करावा. त्यानुसार २४२ पूर्ण झालेल्या कामांपैकी ९ कामांची तपासणी करण्यात आली. त्या कामांचे पूर्णत्वाचे अहवाल प्राप्त झाले आहेत सदर कामे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासावीत असे समितीचे निदेश असतानादेखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत:ची जबाबदारी पार न पाडता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासारख्या बांधकाम विभागाचा प्रशासकीय प्रमुख असणा-या अधिका-यामार्फत कामाची तपासणी करण्यात आली. ज्याने कामात अनियमितता केली आहे त्यांनाच या कामासाठी नियुक्त करणे ही बाब योग्य नाही. सदर कामामध्ये फार मोठी दिरंगाई झाली असल्यामुळे कामाची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली नाही त्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. याप्रकरणी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही समज द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**तसेच यापुढे राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाणी पुरवठा योजना, विहिरी, रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती बांधकामे, शाळागृहे, समाजमंदिर दुरुस्ती व बांधकामे इत्यादी स्थानिक व सामुहिक विकासाच्या जिल्हा परिषद, शासकीय व अभिकरण निधीतील योजनांना ज्या वर्षी मंजुरी दिली जाते त्या वर्षातच पूर्ण करण्यात यावी व संबंधित कामे पूर्ण करण्यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व जिल्हा परिषद व पंचायत समितीने योजनांतर्गत व योजनेत विकास कार्यक्रमाप्रमाणे हाती घेतलेली कामे अपूर्णवस्थेत राहणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या दृष्टीने कडक स्वरुपाचे सर्वंकष परिपत्रक निर्गमित करावे अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावी.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

### अपात्र मागासवर्गीय शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर ५ एच.पी. पाणबुडी पंपांचे वाटप खर्चातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.६८२/२ (सन २०११-२०१२)**

समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद द्वारा मागासवर्गीय शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर ५ एचपी पाणबुडी पंप खरेदी व वाटपापोटी रुपये ४९,९३,२००/- खर्च नोंदविला आहे. याबाबत पुढील प्रमाणे आक्षेप आहेत.

१) महाराष्ट्र शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, मंत्रालय मुंबई -३२, दि.२०/६/२००८ चे परिशिष्ट ई च्या योजना राबविण्याचे वेळापत्रक निश्चित केलेले आहे. तथापि, परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे योजना न राबविता विलंबाने खरेदी करुन पाणबुडी पंप वाटप केलेले आहेत.

२) लेखा परिक्षणासाठी उपलब्ध केलेले प्रस्ताव तपासले असता एकाच कुटुंबातील पती / पत्नी रा.तुळजापुर (भातंब्री) तसेच दुस-या एका कुटुंबातील पती /पत्नी रा. उमरेगव्हाण, ता.उस्मानाबाद हे पती/पत्नी असताना दोन्ही कुटुंबात योजनेचा एका व्यक्तीस लाभ अनुज्ञेय असल्याने नियमबाह्य लाभ दिल्याचे वरील दोन्ही कुटुंबाकडून प्रत्येकी रुपये १७,५२०/- प्रमाणे रुपये ३५,०४०/- वसूल करणे आवश्यक आहे.

३) श्री. राजेंद्र रामा चव्हाण, रा. ईटकुर, ता कळंब यांना २० टक्के सेस योजनांतर्गत समाज कल्याण विभागामार्फत मागील ५ वर्षात कसल्याही प्रकारचा लाभ दिला गेला नसल्याने त्यांचेकडून रुपये १७,५२०/- वसूल करणे आवश्यक आहे ?

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८३(३) नुसार विभाग प्रमुखाने विद्युत मोटारीचा पुरवठा सुस्थितीत प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक तपासणी अहवाल घेवूनच ९० टक्के रक्कम अदायी करावयाची आहे. लेख्याच्या पडताळणीवरुन असे निदर्शनास आले की, विद्युत मोटारीचा पुरवठा मे. लक्ष्मी हैड्रॉलीक्स प्रा.लि., सोलापूर, यांचा असून या कंपनीने तपासणी अहवाल दिला आहे. त्या आधारे विभागाने देयक मंजुर केलेले आहे, जे नियमबाह्य आहे. सदर मोटारीची तपासणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून करुन घेण्यात आलेली नाही.

५) संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक विघयो/पंपयंत्र/विप्र-५/४०८, दिनांक ०२/०१/२००२ अन्वये शासकीय योजनांतर्गत पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात येणा-या पंपसंचाच्या किंमती याच दर्जाच्या स्पेसिफिकेशनच्या पंपसंचांच्या किंमती खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा अधिक असणार नाही, याची खात्री केलेली दिसून आली नाही, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग क्र.परांस-०८९/६८६/२६६/३४, दिनांक २९/०७/१९८९ नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या योजनांचे फलश्रुतीचे मूल्यमापन यशस्वी व परिणामकारक होण्यासाठी अंतर्गत मुल्यमापन स्वतंत्रपणे विभाग प्रमुखांकडून व तिस-या स्तरावरील मूल्यमापन विभागीय आयुक्तामार्फत करुन मूल्यमापनाच्या फलश्रुतीचा अहवाल शासनास सादर करावा. परंतु असा अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

७)समाजकल्याण विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र क्र. ३५२, दिनांक १०/०७/२०१२ अन्वये सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार २३ लाभार्थींची प्रती पाणबुडी पंप रक्कम १७५२०/- प्रमाणे एकूण रुपये ४,०२,९६०/- पंचायत समिती तुळजापूर येथील भांडारपालाकडुन वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सदर योजना शासन परिपत्रक क्र. झेडपीए २००८/प्र.क्र. ४४६/वित्त-९, मंत्रालय मुंबई-३२, दि.२०/६/२०१५ चे परिशिष्ट ई च्या योजना राबविण्याचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००९-१० पासून पुढील कालावधीसाठी सूचना | प्रत्यक्षात कार्यालयाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | योजनानिवड व अर्थसंकल्पात तरतूद | मार्च पूर्वी | मार्चपूर्वी |
| २. | योजना प्रारूपनिश्चिती व विषय समिती मान्यता/मंजुरी | ३० एप्रिल | १३ मे २०११ |
| ३. | योजना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी | ३० जून | तांत्रिक मान्यता १४ सप्टेंबर २०११ व प्रशा. मान्यता २२ सप्टेंबर २०११ |
| ४. | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप व प्रस्ताव मागणी | ३१ मे अखेर | ९ जून २०११ |
| ५. | लाभार्थी निवड | ३१ मे अखेर | ३१-१२-२०११<br>१४-०३-२०१२<br>१८-०२-२०१२ |
| ६. | निविदा प्रक्रीया पूर्ण करून सक्षम अधिकारी यांची मान्यता. | ३१ ऑगस्ट पर्यंत | शासन दरकरारनुसार दरास म.जि.प.व., पं.स.अधिनियम, १९६१ चे कलम १२५ व १२६ नुसार दिनांक २२.०९.२०११ मान्यता घेण्यात आली. |
| ७. | साहित्याचे खरेदीचे पुरवठा आदेश | ३० सप्टेंबर | ५ नोव्हेंबर २०११ |
| ८. | लाभार्थ्यांना साहित्य वाटप | ३१ नोव्हेंबर | २७-०२-२०१२ |
| ९. | पुरवठादाराचे देयक अदा करणे | ३० जानेवारी | २२ नोव्हेंबर २०११<br>२२ फेब्रुवारी २०१२ |
| १०. | विनियोग दाखले प्राप्त करणे | मार्च | दिनांक २७.०२.२०१२ ते माहे ३१ मार्च पर्यन्त वाटप करुन विनियोग दाखले प्राप्त आहेत. |

सन २०११-१२ या वर्षात मागासवर्गीय शेतक-यांना विद्युत पंप पुरवठा करणे या योजनेचे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.२८ जून २०११ अन्वये पुर्नविनियोजन करण्यात आल्याने महाराष्ट्र शासन परिपत्रकामधील वेळापत्रकानुसार योजना विहीत मुदतीत राबविता आली नाही. तरी देखील सदर योजना त्याच दिलेला आहे. तसेच सदरिल योजनेचा उद्देश सफल झालेला आहे.

२) जि.प. स्वसंपादीत उत्पन्नातील २० टक्के सेस योजना सन २०११-१२ या आर्थिक वर्षात औदुंबर पंडीत कदम व श्रीमती हेमा औदुंबर कदम राहणार भांतब्री, ता.तुळजापूर तालुक्यातील सदर लाभार्थी नात्याने पती/पत्नी असले तरी ते एकमेकापासून विभक्त असल्याने साहित्याचा लाभ देण्यात आलेला आहे. शपथपत्र क्र.४४९५१३, दिनांक २५/११/२०१३ चे शपथ पत्राद्वारे सदर पती/पत्नी विभक्त असल्याचे नोटरी प्रतिज्ञापत्र व संबंधीत ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र आहे. तथापी लाभार्थ्यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करुन त्यातील श्री. औदुंबर पंडीत कदम यांच्याकडून पाणबुडी पंपाची रक्कम रुपये १७,५२०/- इतक्या रक्कमेची वसुली करणेबाबत संबंधीत गटविकास अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र.क्र. ५७५/१५ दि.७/१२/१५, अन्वये सूचना दिलेली आहे. रक्कम रु.१७,५२०/- वसूल करुन दि.२१/१२/१५ रोजी चलनद्वारे भरणा केली आहे. तसेच श्री. लक्ष्मण तिमा बंडगर व श्रीमती तानाबाई लक्ष्मण बंडगर राहणार उमरेगव्हाण, ता उस्मानाबाद हे लाभार्थी नात्याने पती/पत्नी

नाहीत. या लाभार्थ्यांची दोन वेगवेगळे स्वतंत्र कुटूंबे आहेत. स्वतंत्र कुटूंबे असल्याचा पुरावा उपलब्ध आहे. तसेच संबधीतांना नियमानुसार लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे वसुली करण्याची गरज नाही. श्री.राजेंद्र रामा चव्हाण, रा.ईटकुर, ता.कळंब यांना २० टक्के सेस योजनांतर्गत समाज कल्याण विभागामार्फत मागील ५ वर्षात कसल्याही प्रकारचा लाभ दिला नसल्याने व श्री. राजेंद्र रामा चव्हाण व श्री. जयद्रथ रामा चव्हाण या दोन्ही भावडांमध्ये ३ एच पी इतक्या कमी पावरची एक समाईक मोटार असलेने व संबंधित लाभार्थ्याकडे १ हेक्टर ४६ आर (३.५ एकर) इतकी जमीन असल्याने व लाभार्थी पात्र असल्याने संबंधीताने ५ एच पी पाणबुडी पंपाचा मागणी प्रस्ताव सादर केल्यामुळे त्यास लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग क्रमांक सुक्रओ/२०१०/प्रक्र/१३५/५१ अे/ दिनांक ०३/०८/२०१० प्रपत्र २ मधील मार्गदर्शक सूचनेमधील नियमानुसार अक्र. २ अन्वये महामंडळाने स्वतःच्या यंत्रणेमार्फत साहित्याची तांत्रिक तपासणी केली आहे. त्यामुळे मोटारींची तपासणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून करुन घेण्यात आलेली नाही. तसेच संबधित एजन्सीने तपासणी अहवाल दिनांक १४-११-२०११ रोजी सादर केल्यानंतरच संबंधित कंपनीला दिनांक २१-११-२०११ रोजी ९० टक्के रक्कम तसेच दिनांक ०३-०२-२०१२ अन्वये संबंधित संस्थेचे साहित्याची तांत्रिक तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच १० टक्के रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

४) संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक विघयो/पंपयंत्र/विप्र-५/४०८, दिनांक २७/१२/२००१ व दिनांक ०२/०१/२००२ अन्वये शासकीय योजनांतर्गत पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात येणा-या पंप संचाच्या किंमती शासन दरकरारातील दरापेक्षा जास्त नाहीत याची खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा अधिक नाहीत याची खात्री जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी करुनच खरेदी केलेली आहे, तसे कोटेशन व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे.

५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग क्र.परांस/१०८९/६८६/२६६/३४, दिनांक २९/०७/१९८९ नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या योजनांचे फलश्रुतीचे मुल्यमापन यशस्वी व परिणामकारक होण्यासाठी अंतर्गत मुल्यमापन पंचायत समिती स्तरावरून लाभार्थ्यांचे फलश्रुती अहवाल प्राप्त असून खातेप्रमुखामार्फत तसेच दुस-या स्तरावरील मुल्यमापन स्वतंत्रपणे विभाग प्रमुखाकडून सादर करण्याची यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

६) समाज कल्याण विभागामार्फत पंचायत समिती, तुळजापूर अंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांना ५ एच.पी. पाणबुडी पंपाचा पुरवठा करण्यात आलेले वाटपातील अनियमिततेबाबत दिनांक १०/०७/२०१२ च्या चौकशी अहवालाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेले पत्र क्र. ३५२, दि.१०/०७/२०१२ अन्वये पंचायत समिती, तुळजापूर येथील भांडारपाल श्री.वेदपाठक ए.एच, तत्कालिन कनिष्ठ सहाय्यक हे जबाबदार असल्याने त्यांच्या विरोधात या विभागाचे पत्र क्र.११३७, दि.१६/१०/२०१२ अन्वये पोलिस ठाणे, तुळजापूर येथे गुन्हा रजि.नं.१६१/१२ नुसार कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८ अन्वये, दि.०३/११/२०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधीत कर्मचा-यास विभागीय आयुक्त निलंबन आढावा समिती औरंगाबाद यांच्या दि. १७-०७-२०१४ रोजी शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथे अकार्यकारी पदावर पुनर्स्थापित करण्यात आले आहे. गटविकास अधिकारी पंचायत समिती, तुळजापूर व शिक्षणाधिकारी (प्रा) यांना पत्र देऊन श्री. वेदापाठक यांनी केलेल्या अपहाराची रक्कम रुपये ४,०२,९६०/- इतकी संबंधीत कर्मचा-यांच्या वेतनातून वसूल करणेबाबत या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपउ/सकवि/सेस/५७४/१५, दि.०७-१२-२०१५ अन्वये कळविले आहे. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, १०० टक्के अनुदानावर ५ एच. पी. पाणबुडीचे पंप पुरविणे योजना शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक २० जून, २००८ (परिशिष्ट २.१) नुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यास कोणत्या अडचणी आल्या आहेत तसेच पती व पत्नी विभक्त असल्याच्या केवळ शपथपत्रावर एकाच कुटुंबातील दोन लाभार्थ्यांना लाभ कोणत्या प्राधिकारान्वये दिला, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, संबंधितांवर याबाबत कोणती कारवाई करण्यात आली.

यावर समाजकल्याण अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक २० जून, २००८ च्या शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार सदर योजना विहित मुदतीत राबविता आली नाही. कारण २६ डिसेंबर, २०११ रोजी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये पुर्नविनियोजन केल्यामुळे योजना राबविण्यास

विलंब झालेला होता. शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार योजना विहित मुदतीत राबविता आली नसली तरी देखील सदर योजना त्याच आर्थिक वर्षात यशस्वीरित्या राबवून लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

श्री. औदुंबर पंडीत यांच्याकडून पाणबुडी पंपाची रक्कम रुपये १७,५२०/- इतक्या रक्कमेची वसुली केल्यानंतर ती दिनांक २१/१२/२०१५ रोजी चलनाद्वारे भरणा केलेली आहे. श्री.लक्ष्मण तिमा बंडगर व श्रीमती तानाबाई लक्ष्मण बंडगर, राहणार उमरेगव्हाण, तालुका उस्मानाबाद हे लाभार्थी नात्याने पती-पत्नी नाहीत. या लाभार्थ्यांची दोन वेगवेगळी कुटुंबे आहेत. स्वतंत्र कुटुंबे असल्याचा पुरावा उपलब्ध असल्यामुळे संबंधितांना नियमानुसार लाभ दिलेला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून वसुली करण्यात आलेली नाही. श्री. राजेंद्र रामा चव्हाण, रा.ईटकुर, तालुका कळंब यांना २० टक्के सेस योजनांतर्गत समाजकल्याण विभागामार्फत मागील ५ वर्षात कोणत्याही प्रकारचा लाभ दिला नसल्याचे प्रमाणपत्र ग्रामपंचायत व पंचायत समितीने दिले असल्याने व श्री. राजेंद्र रामा चव्हाण व श्री. जयद्रथ रामा चव्हाण या दोन्ही भावंडामध्ये ३ एच.पी. इतक्या कमी क्षमतेची एक सामाईक मोटार असल्याने व सबंधित लाभार्थ्यांकडे १ हेक्टर ४६ आर इतकी जमीन असल्याने व लाभार्थी पात्र असल्याने संबंधिताने ५ एच.पी. पाणबुडी पंपाची मागणी प्रस्ताव सादर केल्यामुळे त्यास लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

शासन निर्णय कृषी, व पदमु विभाग, दिनांक ०३-०८-२०१० प्रपत्र २ मधील मार्गदर्शक सूचनेमधील नियमानुसार अनुक्रमांक २ अन्वये महामंडळाने स्वतःच्या यंत्रणेमार्फत साहित्याची तांत्रिक तपासणी केली आहे. त्यामुळे मोटारीची तपासणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून करुन घेण्यात आलेली नाही. तसेच संबंधित एजन्सीने तपासणी अहवाल दिनांक १४-११-२०१० रोजी सादर केल्यानंतरच संबंधित कंपनीला दिनांक २१-११-२०११ रोजी ९० टक्के रक्कम तसेच दिनांक ०३-०२-२०१२ अन्वये संबंधित संस्थेचे साहित्याची तांत्रिक तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच १२० टक्के रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र, दिनांक २७-१२-२००१ व दिनांक ०२-०१-२००२ अन्वये शासकीय योजनांतर्गत पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात येणा-या पंप संचाच्या किंमती शासन दर करारातील दरापेक्षा जास्त नाही याची खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा अधिक नाहीत याची खात्री जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी करुनच खरेदी केलेली आहे.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील प्रमाणे अधिकची माहिती दिली की, विभागाचे पत्र क्रमांक ११३७, दिनांक १६-१०-२०१२ अन्वये पोलीस ठाणे तुळजापुर येथे तत्कालिन भांडारपाल श्री. अतुल वेदपाठक यांच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक १६१/१२ नुसार कलम ४२०, ४६७, ४६८, दिनांक ३-११-२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित कर्मचा-यास निलंबन आढावा समिती औरंगाबाद यांच्या दिनांक १७-७-२०१४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार माननीय न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून दिनांक २९-१०-२०१४ रोजी शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथे कार्यकारी पदावर पुनर्स्थापीत करण्यात आलेले आहे. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर व शिक्षणाधिकारी, प्राथमिक यांना पत्र लिहून श्री.वेदपाठक यांनी केलेल्या अपहाराची रक्कम रुपये ४ लाख २ हजार ९६० इतकी संबंधित कर्मचा-याच्या वेतनातून वसूल करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे शिक्षाधिकारी प्राथमिक यांनी फेब्रुवारी, २०१६ पासून त्यांच्या वेतनातून कपात सुरु केलेली आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, वसुलीकरिता कोर्टाचा स्टे आहे का, अपहारित रक्कम वसुल करण्यास एवढा विलंब का झाला आहे. या कर्मचा-यांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. सदरील अपहारित रक्कम व्याजासह वसूल करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, वसुलीकरिता कोर्टाचा स्टे नाही. कर्मचा-यांच्या वेतनातून आता वसुली केली जात आहे. कर्मचा-यांना नोटीस देऊन सदरील रक्कम एकरकमी भरण्याबाबतची कार्यवाहीसुध्दा करण्यात येत आहे. तसेच याबाबतचा गुन्हा तुळजापूर येथे प्रथम दाखल झाला होता, त्यानंतर तो उस्मानाबाद येथे वर्ग झालेला आहे. त्याची सद्यःस्थिती जाणून लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत न्यायालयाकडे विनंती केलेली आहे. तसेच विभागीय चौकशीचा अहवाल निलंबन समितीकडे गेला तेव्हा त्यांनी सांगितले की, यांना अकार्यकारी पदावर देण्यात यावे. शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या पगारातून काही रक्कम वसूल केलेली आहे. याबाबत अजूनही कार्यवाही सुरू आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, याबाबतच्या चौकशी समितीचा अहवाल एकत्रित करून समितीला पाठविण्यात यावा. समिती हा विषय सचिवांच्या साक्षीकरिता घेणार आहे. चौकशी समितीच्या अहवालानंतर त्यांना पुनर्स्थापित करता येईल. भविष्यात अशा घटना घडू नयेत. म्हणून या विषयावर सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने माहे डिसेंबरमध्ये पुनर्नियोजन केलेले असल्यामुळे दिनांक २० जून २००९ रोजीच्या शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार सदरहू योजना राबविण्यात आलेली नाही असे कारण प्रस्तुत आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस प्राप्त झालेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनास उक्त वेळापत्रकाची तंतोतंत अंमलबजावणी करताना उदभवणा-या अडचणी सोडविण्याकरिता विभागाने कोणती उपाययोजना केली आहे.

२) प्रस्तुत प्रकरणात पंपसेट पुरविण्याबाबत योजनेचे मुल्यमापन खातेप्रमुखाने व विभागीय आयुक्त यांचेकडून न करणे व इतर नियमबाह्य आक्षेपाधिन बाबी संदर्भात विभागाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?

३) प्रस्तुत प्रकरणी कनिष्ठ सहायक श्री. वेदपाठक यांची विभागीय चौकशी पूर्ण करून प्रशासनाने बडतर्फ केलेले आहे. परंतु विभागीय साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपहाराची रक्कम रूपये ४,०२,९६०/- वसूल करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे विदित केले आहे त्यानुसार आतापर्यंत किती रक्कम वसूल केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने माहे डिसेंबरमध्ये पुनर्नियोजन केलेले असल्यामुळे दिनांक २० जून २००९ रोजीच्या शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार कार्यवाही अनुसरण्यात आली आहे.

२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी लाभार्थीची तपासणी केलेली आहे. तसेच तुळजापूर पंचायत समिती अंतर्गत मोटार वाटपाबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली चौकशी केलेली आहे त्यानुसार कनिष्ठ सहायक श्री. वेदपाठक यांची विभागीय चौकशी पूर्ण करून संबंधितास सेवेतून बडतर्फ केलेले आहे.

३) शिक्षणाधिकारी जि.प. उस्मानाबाद यांनी श्री. अतुल वेदपाठक, कनिष्ठ सहायक यांचे कडून त्यांच्या वेतनातून रक्कम रू.५००००/- वसूल केली आहे व जिल्हा परिषदेकडे चलनाने जमा करण्यात आलली आहे. सद्यःस्थितीत सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्याने उर्वरित रकमेची वसुली संबंधितांकडून करता येत नाही. तथापि, संबंधिताचे गट विमा योजना, भविष्य निर्वाह निधी मधून न्यायालयाचे अंतिम निर्णयानंतर वसुली करण्यात येत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद यांचे अभिप्रायाशी सहमत.

**चौकशी अहवाल**

**प्रस्तावनाः-** महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ मधील नियम क्र. ६(३) च्या तरतुदीनुसार श्री. ए. एच. वेदपाठक, निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांच्या विरूध्द मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी त्यांचे ज्ञापन क्रमांक जिपउ/साप्रवि/ने-५/कावि/३०७७-७९/२०१२ दिनांक १९.१०.२०१२ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करून त्यांचे आदेश क्रमांक जिपउ/साप्रवि/ने-५ /कावि/२३८-२४२/२०१२, दिनांक १९-०१-२०१३ अन्वये माजी चौकशी अधिकारी व श्री. एस. सी. जाधव, सहाय्यक प्रशासन अधिकारी,पंचायत समिती, तुळजापूर यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करून सदरचे प्रकरण विभागीय चौकशीसाठी सुपुर्द केले आहे.

**अपचारी कर्मचारी श्री. ए. एच. वेदपाठक, निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत.**

**दोषारोप क्रमांक १ :-** श्री. ए. एच. वेदपाठक, कनिष्ठ सहाय्यक यांनी त्यांच्याकडे आस्थापना विभागाचा पदभार दिला असता त्यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केला आहे.

**दोषारोप क्रमांक २:-** श्री. ए. एच. वेदपाठक कनिष्ठ सहाय्यक यांनी पंचायत समिती सेस योजना नियम, १९६७ मधील नियम ३ चा भंग केला आहे.

**दोषारोप क्रमांक ३:-** श्री. ए. एच. वेदपाठक कनिष्ठ सहाय्यक यांनी पंचायत समिती तुळजापूर येथील समाज कल्याण विभागाकडून मिळालेल्या ५ एचपी पाणबुडी पंप वाटपाबाबत अनियमितता करून महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ चा भंग केला आहे.

**दोषारोप क्रमांक ४:-** श्री. ए. एच.वेदपाठक कनिष्ठ सहाय्यक यांनी इंदिरा आवास योजना,राजीव गांधी ग्रामीण निवास योजना, रमाई घरकुल योजनामध्ये अनियमितता केली असून त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ चा भंग केला आहे.

**दोषारोप क्रमांक ५:-** जिल्हा परिषद स्वयंसंपादित उत्पन्नातील २०टक्के सेस अतंर्गत मागासवर्गीय शेतक-यांना ५ एच पी पाणबुडी पंप पुरवठा करणे या योजनेअंतर्गत पंचायत समिती मोटार वाटपामध्ये अनियमितता केली असून त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ चा भंग केला आहे.

**अपचारी कर्मचारी श्री. ए. एच. वेदपाठक, निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ चे नियम ६ (६) मधील तरतुदीनुसार:-**

दिनांक ३१-०१-२०१३ रोजी अपचारी कर्मचारी यांना प्रथम सुनावणीची नोटीस पाठवून चौकशी ठिकाण,वेळ व तारीख याची माहिती दिली.

दिनांक १६-०२-२०१३ रोजी अपचारी कर्मचारी अनुपस्थित असल्याने चौकशीचे कामकाज सुरू करता आले नाही.

दिनांक १८-०२-२०१३ रोजी अपचारी कर्मचारी यांनी एकही दोषारोप मान्य नसल्याचे, बचाव सहाय्यक व बचाव साक्षीदार द्यावयाचे नसल्याचे, तसेच जोडपत्र-३ मधील पुरावा कागदपत्राची आवश्यकता नसल्याचे प्राथमिक निवदेनाव्दारे चौकशीत लेखी नमूद केले.

पुढील सुनावणीच्या वेळी प्राथमिक जबाब नोंदवित असल्याचे अपचारी कर्मचारी यांनी स्पष्ट केले.

दिनांक २७-०२-२०१३ रोजी सरकारी साक्षीदार क्रमांक १ ते ६ अनुपस्थित असल्याने चौकशी कामकाज सुरू करता आले नाही.

दिनांक १९-०३-२०१३ रोजी सरकारी साक्षीदार क्रमांक ४७ श्री. राठोड यांनी त्यांची साक्ष नोंदविली. उर्वरित सरकारी साक्षीदारांना पुढील सुनावणीच्या वेळी हजर ठेवणे बाबत सादरकर्ता अधिकारी यांना सूचित केले.

दिनांक २६-०३-२०१३ रोजी सरकारी साक्षीदार क्रमांक १ व २ यांनी त्यांची साक्ष नोंदविली.अपचारी कर्मचारी यांना त्यांची उलट तपासणी प्रक्रिया पूर्ण केली.

दिनांक ३०-०३-२०१३ रोजी सरकारी साक्षीदार अनुपस्थित असल्याने चौकशीचे कामकाज सुरू करता आले नाही.

दिनांक १२-०४-२०१३ रोजी सरकारी साक्षीदार अनुपस्थित असल्याने चौकशीचे कामकाज सुरू करता आले नाही.

दिनांक २२-०४-२०१३ रोजी सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांची साक्ष नोंदविली. अपचारी कर्मचारी यांनी त्यांची उलट तपासणी प्रक्रिया पूर्ण केली.

सरकारी साक्षीदार क्रमांक ५ व ६ हे सतत गैरहजर असल्याने त्यांचे बाबतीत समाज कल्याण अधिकारी यांना पत्र देवून अखेरची संधी देण्यात येत आहे.

दिनांक ०९-०५-२०१३ रोजी सरकारी साक्षीदार क्रमांक ५ व ६यांनी त्यांची साक्ष नोंदविली. अपचारी कर्मचारी यांनी सरकारी साक्षीदार क्रमांक ६ उलट तपासणी प्रक्रिया पूर्ण केली असून सरकारी साक्षीदार क्रमांक ५ उलट तपासणी घ्यावयाची नाही, असे चौकशीत स्पष्ट केले.

सादरकर्ता अधिकारी यांनी एक आठवड्यात त्यांचे अंतिम अभिकथन (टाचण) सादर करत असल्याचे चौकशीत स्पष्ट केले.

दिनांक २५-०५-२०१३ रोजी सादरकर्ता अधिकारी यांनी त्यांचे अंतिम अभिकथन (टाचण) सादर करून सदरचे प्रकरण अंतिम करण्याबाबत चौकशीत लेखी विनंती केली.

अपचारी कर्मचारी यांना अंतिम अभिकथनाची (टाचण) प्रत देण्यात येऊन, त्यांना त्यांचे बचावात्मक अंतिम अभिकथन दिनांक २-०७-२०१३ अखेर पर्यंत सादर करण्याविषयी पत्राव्दारे सूचित करण्यात आले.

दिनांक ०८-०७-२०१३ रोजी अपचारी कर्मचारी यांचे बचावात्मक अंतिम अभिकथन प्राप्त झाल्याने सदरचे प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

दिनांक ३१-१२-२०१३ रोजी सदरचा विभागीय चौकशी अहवाल अंतिम करण्यात आला.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ चे नियम ६ (७) नुसार विभागीय चौकशी अहवाल खालील प्रमाणे आहे.**

**सरकारी साक्षीदार क्रमांक १ श्री. गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांची साक्षः-**

मी खुशाल भिकनराव गायकवाड वय ३० वर्ष,राहणार उस्मानाबाद,दिनांक ०९.०८.२०१० पासून आजपर्यंत जिल्हा समाज कल्याण अधिकारी या पदावर जिल्हा परिषद उस्मानाबाद येथे कार्यरत आहे.

मी श्री. ए. एच. वेदपाठक यांना ओळखतो. त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे. त्यांचे विरुध्द असलेल्या विभागीय चौकशी मध्ये मी माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

दोषारोप क्रमांक १,२ व ४ दोषारोपाशी माझा काही संबंध नसल्याने मी याबाबत काहीही सांगू शकत नाही.

**दोषारोप क्रमांक ३ व ५ :-** अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या मान्यतेने समाज कल्याण विभागांर्तगत जिल्हा परिषद स्वसंपादीत उत्पन्नातील २० टक्के शेष योजना सन २०११-१२ मध्ये ५ एचपी पाणबुडी पंपाचा पुरवठा करणे बाबत विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादीत उस्मानाबाद यांना आदेशीत केले होते. दिनांक ०५-११-२०११ च्या आदेशानुसार पंचायत समिती तुळजापूरला ४५-५ एचपी पाणबुडी पंप व दिनांक ०३.०१.२०१२ च्या आदेशान्वये २०-५ एचपी पाणबुडी पंप वितरीत करण्याबाबत देण्यात आले होते.या योजनेअंतर्गत ६५ लाभार्थीची यादी पंचायत समिती तुळजापूर यांना दिनांक १८.०२.२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे.

श्री. अशोक जाधव, राहणार काटी यांनी दिनांक ३०.०५.२०१२ रोजीच्या पत्रान्वये समाज कल्याण विभागामार्फत तुळजापूर तालुक्यातील मागासवर्गीय शेतक-यांना मंजूर झालेल्या पाणबुडी पंपामध्ये अनियमितता झाली असल्याबद्दल तक्रार अर्ज गट विकास अधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक ०६.०६.२०१२ च्या पत्रान्वये प्रत्यक्ष अभिलेख्याची पडताळणी करून तसेच प्रत्यक्ष लाभार्थी ग्रह भेट देऊन तपासणी करणेबाबत आदेशीत केले असल्याने त्यानुसार कार्यवाही करून मी माझा अहवाल दिनांक १०-०७-२०१२ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना सादर केलेला आहे.या अहवालात एकूण ६५ लाभार्थ्याची सविस्तर माहिती दिलेली असून ३२ लाभार्थ्याच्या वाटपात अनियमितता झाली असल्याचे,२ लाभार्थ्यांना साहित्य मिळाले परंतू काही साहित्य मिळाले नसल्याचे,२० लाभार्थ्यांना लाभार्थी यादीत नाव असूनही लाभ मिळाला नसाल्याचे माझ्या निदर्शनास आलेले आहे. या अहवालावर माझ्यासह श्री. पी. एम. कांबळे, विस्तार अधिकारी व श्री. वाय. एस. शहापूरे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांची स्वाक्षरी असून या अहवालाशी मी आजही सहमत आहे.

चौकशी करतांना या प्रकरणाशी संबंधित श्री. वेदपाठक यांचे कडे विचारणा करण्यात आलेली नसून, त्यांचा खुलासाही घेण्यात आलेला नाही.

या उपर मला अधिक काही सांगावयाचे नाही.

**सरकारी साक्षीदार क्रमांक १ श्री. गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी उलट तपासणीत स्पष्ट केले की,:-**

- ज्या २० लाभार्थ्यांना पाणबुडी पंपाचा लाभ मिळाला नाही अशा २० लाभार्थ्यांनी माझ्याकडे तक्रार दिली होती.

- श्रीमती मस्के चंद्रभागा विश्वनाथ या लाभार्थ्यांने ५ एचपी पंप प्राप्त झाल्यानंतर सदर मोटार शहाजी कोळी यांना विकली असल्याचे दिनांक १४-०६-२०१२ रोजी मला समक्ष सांगितले असून मी त्यानुसार अहवाल तयार करून त्यावर स्वाक्षरी केलेली आहे, हे खरे आहे.

➢ मी दिनांक १४-०६-२०१२ रोजी काक्रंबा येथे भेट दिली असता, श्री लोंढे भैरू संतु यास ५ एचपी पंपाचा लाभ मिळालेला आहे. असे माझ्या निदर्शनास आलेले आहे.याबद्दल लाभार्थ्यांची काहीही तक्रार नाही.

➢ मी माझ्या अहवालात अनुक्रमांक ४ मधील क्रमांक ९ व १९ वर गायकवाड अनिल सुखदेव रा.दहिवडी या लाभार्थीचे नांव नमूद करून त्यास लाभ मिळालेला नाही. असे नमूद केलेले आहे, हे खरे आहे.

➢ पाणबुडी पंप मंजूर करत असतांना लाभार्थ्याच्या नावावर असलेल्या ७/१२ उता-यावर विहिरीची नोंद आहे किंवा नाही हे पाहिले जाते. हे खरे आहे.

➢ राजकीय दबावापोटी आपल्यावर एफआयआर दाखल करण्यासाठी विस्तार अधिकारी श्री. कांबळे यांना मी आदेशीत केले होते. हे खरे नाही.

➢ समाज कल्याण विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजना तालुका पातळीवर राबविण्याची जबाबदारी ग्रामसेवक व ग्राम विस्तार अधिकारी यांची आहे.असे समाज कल्याणच्या मॅन्युअलमध्ये नमुद केलेले आहे.याबाबत मला निश्चित सांगता येणार नाही.

**सरकारी साक्षीदार क्रमांक २ कु. ढेरे, गटविकास अधिकारी, तुळजापूर यांची साक्षः-**

मी, ढेरे तृप्ती रामकृष्ण, वय १७ राहणार, तुळजापूर दिनांक २२-०८-२०११ पासून आजपर्यंत गटविकास अधिकारी या पदावर पंचयात समिती तुळजापूर येथे कार्यरत आहे.

मी श्री. ए. एच. वेदपाठक यांना ओळखते. त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे. त्यांचे विरुध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशी मध्ये मी माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे आदेश दिनांक १५-०६-२०१२ नुसार मी स्वतः सर्वश्री डी. व्ही. सुळ लेखाधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद व श्री आर.व्ही.राठोड सहाय्यक लेखाधिकारी पंचयात समिती तुळजापूर यांचे समवेत श्री. ए. एच. वेदपाठक कनिष्ठ सहाय्यक यांच्या कामकाजाबाबत सविस्तर चौकशी करून दिनांक २४-०८-२०१२ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशी अहवाल सादर केलेला आहे. या चौकशी अहवालात तपशीलासह मी निष्कर्ष नोंदविलेले आहेत.या निष्कर्षावरच ही विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**दोषारोप क्रमांक १:-** श्री. वेदपाठक यांच्याकडे आस्थापना विभागाचा पदभार होता.त्यांनी पंचायत समितीचे कार्यवृत्तांत पुस्तक भाग-१ नियम ४५ नमुना क अद्यावत लिहिलेला नाही. त्यामध्ये दिनांक ०७-११-२०११ च्या बैठकीचे इतिवृत्त श्री. वेदपाठक यांनी लिहिलेले नाही तसेच भाग-२ नियम ४५,३८,४३ नमुना क ठेवण्यात आलेला नाही. पंचायत समिती सदस्याचं मानधन व प्रवास भत्ता देयक वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. यावरून त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केली असल्याचे स्पष्ट होत आहे.

**दोषारोप क्रमांक २:-** पंचायत समिती सेस अंतर्गत सन २०११-१२ मधील १४-समाज कल्याण अंतग्रत १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरवठा करणे,या योजनेसाठी रू.१,३८,५००/- ची तरतुद असतांनाही श्री. वेदपाठक यांनी ही योजना राबविलेली नाही.

**दोषारोप क्रमांक ३:-** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी मंजूर केलेले ५ एचपी पाणबुडी पंपाचे ६५ नग प्राप्त झाल्याची नोंद साठा नोंदवहीवर घेऊन गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक होते व त्यानंतरच साहित्य वाटप करणे आवश्यक होते.परंतू श्री वेदपाठक यांनी तशी कार्यवाही केलेली नाही.

एकूण प्राप्त ६५ पंपापैकी ६३ पंप वाटप करण्यात आले असून शिल्लक २ पाणबुडी पंप व पूर्वीचे २ पाणबुडी पंप असे एकूण ४ पाणबुडी पंप शिल्लक दाखवून प्रमाणित करून घेणे आवश्यक होते.तशी कार्यवाही देखील श्री. वेदपाठक यांनी केलेली नसल्याचे साठा नोंदवही पाहता दिसून येते.तसेच लाभार्थ्यांना वाटप केलेल्या पंपाबाबत साठा नोंदवहीत लाभार्थ्याच्या नावा पुढे मुद्रांक लावून त्यावर स्वाक्षरी / अंगठा घेतलेला आहे. तथापि, कोणत्याही समक्ष अधिकारी/कर्मचारी यांनी त्यास प्रमाणित केलेले नसल्याने ते संबंधित पात्र लाभार्थ्यांनाच वाटप केल्याची खात्री करता येत नाही.

**दोषारोप क्रमांक ४:-** इंदिरा आवास योजना,राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना,रमाई घरकुल योजनेचा कार्यभार दिनांक ०२-०३-२०१२ ते २४-०४-२०१२ या कालावधीत श्री. वेदपाठक यांचेकडेच होता. सदर कालावधीमध्ये लाभार्थ्याची पहिल्या व दुस-या हप्त्याची प्राप्त देयके लेखा विभागात सादर करण्यासाठी नमुना नंबर १२ श्री. वेदपाठक यांनी ठेवलेला नसल्याचे दिसून येते.

**दोषारोप क्रमांक ५:-** समाज कल्याण विभागाकडील प्राप्त पाणबुडी पंपाचे वाटप करतांना श्री वेदपाठक यांचेकडून दोषारोप जोडपत्र भाग -२ मध्ये दर्शविलेल्या ५ लाभार्थ्यांच्या बाबतीत अनियमितता झालेली असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

या उपर मला अधिक काही सांगावयाचे नाही.

**सरकारी साक्षीदार क्रमांक २ कु.ढेरे, गटविकास अधिकारी,पंचायत समिती, तुळजापूर यांनी उलट तपासणीत स्पष्ट केले की,**

➢ आपणाकडे आस्थापना व परिषद विभाग,समाज कल्याण विभाग,इंदिरा आवास घरकुल योजना या तीन विभागाचा पदभार मी दिलेला होता.हे खरे आहे.

➢ समाज कल्याण विभागाकडील पाणबुडी पंप वाटप करण्याबाबत मी आपणांस लेखी आदेश दिलेले नव्हते.हे खरे नाही.

➢ २० टक्के सेस योजनेतून शिलाई मशिन वाटप करण्याची योजना राबविण्याची आपली जबाबदारी नाही.हे खरे नाही.

➢ जिल्हा परिषद योजनेअंतर्गत महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेकडून दिनांक २१-१०-२०११ च्या पत्रानुसार प्राप्त झालेले ४५ पाणबुडी पंप आपण उतरून घेतले असून तशी स्वाक्षरी आपली स्वतःची केली असून माझी गटविकास अधिकारी या नात्याने सुध्दा त्यावर स्वाक्षरी घेतलेली आहे.हे खरे नाही.

➢ या योजनेअंतर्गत प्राप्त २० पाणबुडी पंप आपण उतरून घेतलेले नसून श्री मुळे विस्तार अधिकारी (कृषी) यांनी उतरून घेतलेले असून त्यावर श्री.मुळे यांची स्वाक्षरी आहे किंवा नाही याबाबत मला सांगता येत नाही.

➢ मी माझ्या साक्षीत नोंदविलेल्या अनियमिततेबाबत मी कधीही आपणास कारणे दाखवा नोटीस देवून विचारणा केलेली नाही.हे खरे नाही.दिनांक २६-०४-२०१२ रोजी इंदिरा आवास योजनेबाबत व दिनांक ०५-०६-२०१२ रोजी पाणबुडी पंपाबाबत तसेच दिनांक २१-१२-२०११ रोजी आपल्या कामाकाजाबाबत आपणास ज्ञापन देण्यात आलेले होते.

**सरकारी साक्षीदार क्रमांक ३ श्री.डी.व्ही. सुळ, लेखाधिकारी-१ अर्थ विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांची साक्ष :-**

मी ज्ञानेश्वर वसंत सुळ,वय ४४ वर्ष राहणार उस्मानाबाद दिनांक २०.०१.२०१० पासून आजपर्यंत लेखाधिकारी -१ या पदावर जिल्हा परिषद उस्मानाबाद येथें कार्यरत आहे.

मी श्री.ए.एच.वेदपाठक यांना ओळखतो.त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे.त्यांचे विरूध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशीमध्ये मी माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

**दोषारोप क्रमांक १ :-(अ)** श्री.वेदपाठक यांच्या कालावधीत झालेल्या बैठकी पैकी दिनांक १४.०७.२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत तयार केले असून ते भाग १ मध्ये लिहिलेले नाही.

**(ब)** पंचयात समिती अहवाल पुस्तिका दिनांक ८-०६-२०११ ते १३-०२-२०१२ मध्ये,

झालेल्या सभेचे इतिवृत्त भाग-२ मध्ये लिहिण्यात आलेली नाही.

**(क)** सदस्यांचे बैठकीत उपस्थित असलेले प्रवास भत्ता देयके संबधितांना केव्हा देण्यात आली. ही बाब धनादेश वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्यामुळे तपासता आली नाही.

**दोषारोप क्रमांक २ :-** पंचायत समिती शेष च्या टिपणीचे अवलोकन केले असता,समाज कल्याण विभागातंर्गत १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरवठा करणे ही योजना राबविण्याचे प्रस्तावित होते.त्यासाठी सन २०११-१२ या वर्षात रु.३,३८,५००/- इतकी तरतुद ठेवण्यात आली होती.याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

संचिकेचे अवलोकन केले असता,सदर योजना राबविण्यासाठी टिपणी क्रमांक २१ ते २५ अन्वये शिलाई मशिनचा दरकरार उपलब्ध नसल्याने संबंधिताने पुढील कार्यवाही केलेली नाही.वास्तविक पाहता सदर योजना राबविण्यासाठी दरकरार उपलब्ध नसेल तर,शासन निर्णय दिनांक ०२.०१.१९९२ नुसार व लेखा संहिता १९६८ चे नियम ८१ ते ८९ अन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक होते.तशी कार्यवाही केलेली नाही.

शिलाई मशिन १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यासाठी रजिष्टर ठेवले नसल्याने पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागवल्याची खात्री करता आली नाही.

**दोषारोप क्रमांक ३:-** पंचायत समितीकडील स्टॉक बुक नमुना नंबर ३३ पान क्रमांक ५६ चे अवलोकन केले असता,दोन पाणबुडी पंप शिल्लक असल्याचे नोंदवही वरून दिसून येते.

दिनांक १६.०७.२०११ रोजी प्राप्त झालेले ६ पाणबुडी पंप पैकी पान क्रमांक ६६ वरून ४ पाणबुडी पंप वाटप केलेले आहेत.परंतू ते कोणत्या दिनांकास वाटप केले याबाबत साठा नोंदवही मध्ये नोंद घेण्यात आलेली नाही.व राहिलेले दोन पाणबुडी पंप शिल्लक दाखवून तसे प्रमाणपत्र नोंदवून गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

महिना अखेरीस किंवा पुर्वीच्या शिल्लकेतील तपशील सविस्तरपणे नोंदवून गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक होते.तशी कार्यवाही केलेली नाही.

१. लेखा संहिता नियम १९६८ चे नियम ९०(२) अन्वये वर्षाच्या सुरूवातीची शिल्लक प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र नोंदवलेले नाही.

२. दोन लाभार्थी श्री.नागटिळक लाला विश्वनाथ केमवाडी व जाधव अशोक अगदराव राहणार काटी ता.तुळजापूर यांना पाणबुडी पंप वाटप रजिष्टरवरून सदर साहित्य / पाणबुडी पंप मंजूर लाभार्थ्यांना वाटप केले किंवा नाही हे त्यांच्याकडून पाणबुडी पंप पोहच पावती न घेतल्यामुळे खात्री करता आली नाही.

३. वाटप रजिष्टरवर पाणबुडी पंप वाटप केलेल्या लाभार्थ्यांच्या सह्या व अंगठा घेण्यात आलेला आहेत. त्यावर कोणत्याही सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केलेले नाही.

४. प्राप्त साहित्य ६५ पाणबुडी पंपापैकी ६३ पाणबुडी पंपाचे वाटप करण्यात आलेले असून शिल्लकसाठा २ दर्शविणे आवश्यक असतांना तशी शिल्लक दर्शवून गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक होते.ती घेण्यात आलेली नाही.

५. पुर्वीचा शिल्लक साठा पाणबुडी पंप नग २ व सद्याचा शिल्लक नग २ अशी एकूण ४ नग शिल्लक दर्शवून प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते ते साठा नोंदवहीवर नोंदविण्यात आलेले नाही.

| अ.क्र. | समाज कल्याण विभागा कडून पात्रता यादीतील अ.क्र. | स.क.विभागाकडून यादीतील नांव | वाटप नोंदवहीवर वाटप केलेल्या व्यक्तीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | ७ | लोंढे भैरू सतु | लोंढे भैरू सतु | लाभार्थी नसतांना वाटप |
| २) | ९ | कांबळे शाम मुलाबा | कांबळे शाम मुलाबा | लाभार्थी नसतांना वाटप |
| ३) | २६ | नागटिळक लाला विश्वनाथ(केमवाडी) | नागटिळक लाला विश्वनाथ(केमवाडी) | पाणबुडी वाटप करण्यात आले नाही |
| ४) | ४० | चदरे फुलचंद दिंगबर | चदरे फुलचंद दिंगबर | पुर्ण नांव नाही |
| ५) | ४४ | जाधव अशोक अंगतराव (काटी) | जाधव अशोक अंगतराव (काटी) | पाणबुडी वाटप करण्यात आले नाही |

उपरोक्त नावाच्या तपशीलावरून समाज कल्याण अधिकारी,उस्मानाबाद यांचे पत्र दिनांक १८.०२.२०१२ अन्वये मधील मंजूर लाभार्थ्याचे नांव व प्रत्यक्ष लाभार्थ्याचे नांव या मध्ये फरक आहे.

६.लेखा संहिता १९६८ नियम ९१ अन्वये कार्यालय प्रमुखांकडून यापूर्वीच्या व सध्याच्या साठ्याची तपासणी केल्याचे दिसून येत नाही

**दोषारोप क्रमांक ४:-**इंदिरा आवास योजना,रमाई योजना घरकुल याबाबत श्री.पुराणीक यांचेकडे असलेला वरील योजनेचा पदभार दिनांक ०२.०३.२०१२ पासून श्री.वेदपाठक कनिष्ठ सहाय्यक यांच्याकडे गविअ यांचे आदेश दिनांक ०२-०३-२०१२ अन्वये देण्यात आलेला आहे.संबंधिताकडे सदर योजना कार्यभार दिनांक ०२-०३-२०१२ ते २४-०४-२०१२ पर्यंत या कालावधीमधील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांच्याकडून लाभार्थ्याची पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागात सादर करण्यासाठी नमुना नंबर १२ ठेवण्यात आलेले नाही.

**दोषारोप क्रमांक ५:-** याबाबतचे अभिप्राय दोषारोप क्रमांक ३ मध्ये सविस्तर देण्यात आलेले आहे. यापेक्षा मला आधिक काही सांगावयाचे नाही.

**सरकारी साक्षीदार क्रमांक ३ श्री. डी. व्ही. सुळ, लेखाधिकारी-१ अर्थ विभाग,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांची उलट तपासणी स्पष्ट केले की,:-**

➢ समाज कल्याण अधिकारी यांनी दिनांक १०.०७.२०१२ रोजी या प्रकरणी चौकशी केलेली आहे.सदर चौकशी अहवाल मी केलेल्या चौकशी दरम्यान विचारात घेतलेला नाही .हे खरे आहे.

➢ मी केलेल्या चौकशी अहवालाच्या १ ते १० च्या निष्कर्षाशी मी सहमत आहे.

➢ पंचायत समितीचे कार्यवृत्तांत भाग १ व २ चौकशीच्या दरम्यान माझ्या प्रत्यक्ष निदर्शनास किंवा पाहण्यात आले आहे.

➢ आपल्या चौकशी दरम्यान आपले कुठलेही स्टेमेंन्ट घेतलेले नाही.हे खरे आहे.

➢ समाज कल्याणच्या ६५ मोटारीपैकी ६३ मोटारीचे वाटप व २ मोटारी शिल्लक हा निष्कर्ष मी स्टॉकबुकवरून काढलेला आहे.

➢ इंदिरा आवास योजनेचा आपणाकडे फक्त दीड महिन्यासाठीच पदभार होता.या कालावधीत आपण ५८६ लाभार्थ्यांची देयके निकाली काढलेली आहेत. हे मला पहावयास मिळाले नाही.

**सरकारी साक्षीदार क्रमांक ४ श्री.आर.बी.राठोड,सहाय्यक लेखाधिकारी पंचायत समिती तुळजापूर यांची साक्ष :-**

मी रामा भिमा राठोड,वय ५० वर्ष,राहणार तुळजापूर,दिनांक १२.०८.२०११ पासून आजपर्यंत सहाय्यक लेखाधिकारी या पदावर पंचायत समिती तुळजापूर येथे कार्यरत आहे.

मी श्री.ए.एच.वेदपाठक यांना ओळखतो.त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे.त्यांचे विरूध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशीमध्ये मी माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १५.०६.२०१२ च्या आदेशान्वये श्री वेदपाठक यांची चौकशी करण्यासाठी मा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती तुळजापूर यांचे अध्यक्षतेखाली एक संयुक्त समिती नेमण्यात आली होती.या समितीचे सदस्य श्री.सुळ,लेखाधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद व मी स्वतः सहाय्यक लेखाधिकारी पंचायत समिती तुळजापूर या नात्याने नियुक्ती देण्यात आली होती.या समितीने सविस्तर चौकशी करून दिनांक २४.०८.२०१२ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना अहवाल सादर केलेला आहे.

**दोषारोप क्रमांक १:-** श्री.वेदपाठक यांच्याकडे आस्थापना विभागाचा पदभार होता त्यांच्या कालावधीत त्यांनी दिनांक १४-०७-२०११ च्या मासिक बैठकीचे इतिवृत्त तयार केले असून ते भाग १ मध्ये लिहिण्यात आलेले नाही.तसेच भाग २ नियम ४५,३८ व ४३ अन्वये दिनांक ०८.०६.२०११ ते १३.०२.२०१२ या कालावधीत झालेल्या सभेचे इतिवृत्त भाग २ मध्ये लिहिण्यात आलेले नाही.

पंचायत समितीच्या सभेस उपस्थित असणा-या सदस्यांचे उपस्थितीनुसार प्रवास भत्ता देयके केव्हा देण्यात आली.याची नोंद ठेवलेली नाही.धनादेश वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली नाही यावरून त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केला असल्याचे सिध्द होत आहे.

**दोषारोप क्रमांक २:-** सन २०११-१२ मध्ये १४ समाज कल्याण अंतर्गत १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरवठा करणे ही योजना घेण्यात आली होती.यासाठी रू.१,३८,५००/- ची तरतूद करण्यात आली होती.

दिनांक ०९.११.२०११ रोजी पंचायत समितीने सभेमध्ये कलम १०९ ची मान्यता घेण्यात आली असून कलम ९९ ची तांत्रिक मान्यता व कलम १२५ नुसार प्रशासकिय मान्यता गटविकास अधिकारी यांनी दिली होती.

शिलाई मशिनचा दर करार उपलब्ध नसल्याने लेखा संहितेतील तरतुदीनुसार जाहीर निविदा मागवून खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तसेच लाभार्थीचे अर्ज मागवून घेणे आवश्यक असतांनाही श्री वेदपाठक यांनी कुठलीही कार्यवाही केली नसल्याने ही योजना राबविता आली नाही.परिणामी या योजने अंतर्गत लाभार्थी शिलाई मशिनच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.यास श्री वेदपाठक हेच जबाबदार आहेत.

**दोषारोप क्रमांक ३:-**समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादकडून ५ एचपी पाणबुडी पंप १०० टक्के अनुदानावर वाटप करण्याची योजना घेतली होती.सन २०११-१२ मधील वाटप रजिष्टर पृष्ठ क्रमांक ५६ चे अवलोकन करता,दिनांक १६-०७-२०११ रोजी प्राप्त झालेले ६ पाणबुडी पंपापैकी ४ पाणबुडी वाटप केल्याचे दिसून येते.हे पंप कोणत्या तारखेचे वाटप केले याची नोंद वाटप रजिष्टर घेण्यात आली नाही. तसेच वाटप केल्यानंतर गटविकास अधिकारी यांची वाटप रजिष्टरवर स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.तसेच शिल्लक २ पाणबुडी पंप साठा नोंदवहीवर शिल्लक असतांनाही त्याची नोंद पुढील पानावर घेण्यात आलेली नाही.तसेच हे २ पाणबुडी पंप कोणास कधी वाटप केले याची नोंदच रजिष्टरवरून दिसून येत नाही.

**दोषारोप क्रमांक ४:-** श्री वेदपाठक यांनी इंदिरा आवास योजना,राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना व रमाई योजना अंतर्गत कनिष्ठ अभियंत्याकडून लाभार्थ्यांच्या पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागात सादर करण्यासाठी नमुना नंबर १२ मध्ये नोंद ठेवल्याचे दिसून येत नाही.

**दोषारोप क्रमांक ५:-** जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातील २० टक्के सेस अंतर्गत मागासवर्गीय शेतक-यांना ५ एचपी पंप पुरवठा करणे या योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेकडून दिनांक २१-१०-२०११ रोजी ४५ पाणबुडी पंप व दिनांक ०३-०१-२०१२ रोजी २० पाणबुडी पंप महराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडून प्राप्त झाल्याचे रजिष्टरमधील पोच पावतीवरून दिसून येते.या ६५ पाणबुडी पंपाची नोंद साठा नोंदवहीत जमा बाजूस घेण्यात आलेली नाही.मात्र साठा नोंदवहीचे अवलोकन करता,त्यापैकी ६३ पाणबुडी पंपाचे वाटप केल्याचे दिसून येते.

वाटप पत्राचे अवलोकन करता,(अ) लोंढे भैरू संतु या लाभधारका ऐवजी भैरू संतु पेठे यास वाटप केलेले आहे.(ब) कांबळे शाम गुलाबा या लाभधारका ऐवजी कांबळे राम गुलाम यास वाटप केलेले आहे. (क) नागटिळक लाला विश्वनाथ या लाभधारकास पाणबुडी पंप वाटप केलेला नाही.(ड) चादरे फुलचंद दिगंबर या लाभधारका ऐवजी श्री चादरे यांना वाटप केलेले आहे.पुर्ण नांव नमुद नाही.(इ) जाधव अशोक अगतराव (काटा) या लाभधारकाला पाणबुडी पंप वाटप केलेला नाही या उणीवासह चौकशी अहवालात नमुद केलेल्या क्रमांक ५ ते १३ वरील नमुद त्रुटीसाठी श्री वेदपाठक हेच जबाबदार आहेत.

जिल्हा परिषद स्वउत्पन्नातील २० टक्के सेस अंतर्गत मागासवर्गीय शेतक-यांना ५ एचपी पाणबुडी पंप पुरवठा करणे या योजनेअंतर्गत पाणबुडी वाटपामध्ये श्री वेदपाठक यांनी अनियमीतता केलेली आहे.या अनियमीततेबाबत सविस्तर तपशील जोडपत्र-२ मध्ये दिलेला असून,त्यास मी सहमत आहे.या अनियमिततेस श्री वेदपाठक जबाबदार असून त्यांचेकडून ही वसूली करणे क्रमप्राप्त ठरते.

दोषारोप क्रमांक ३ मधील २ पाणबुडी पंप व ६५ पैकी वाटप केलेले ६३ शिल्लक २ पाणबुडी पंप तसेच उपरोक्त परिच्छेदातील ५ पैकी ३ पाणबुडी पंप अशा एकूण ७ पाणबुडी पंपाची वसूली श्री.वेदपाठक यांचेकडून करणे आवश्यक ठरते.

या उपर मला अधिक काही सांगावयाचे नाही.

**सरकारी साक्षीदार क्रमांक ५ श्री. शहापूरे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा) यांची साक्षः-**

मी शहापूरे युवराज संतराम,वय ५० वर्ष राहणार उस्मानाबाद दिनांक २०-०४-२००७ पासून आजपर्यंत कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथे कार्यरत आहे.

मी श्री. ए. एच. वेदपाठक यांना ओळखतो त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे.त्यांचे विरूध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशी मध्ये माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

क्रमांक १, २ व ४ या दोषारोपाशी माझा काही संबंध येत नसल्याने मी याबाबत काहीही सांगू शकत नाही.

**दोषारोप क्रमांक ३:-** मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे पत्र क्रमांक ३५८ दिनांक ०६-०६-२०१२ अन्वये पंचायत समिती तुळजापूर या पंचायत समितीस वाटप करण्यात आलेल्या पाणबुडी पंपाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबतचे पत्र दिल्यावरून मी जिल्हा समाज कल्याण अधिकारी व विस्तार अधिकारी समाज कल्याण आम्ही तिघांनी दिनांक १३-०६-२०१२ रोजी पंचायत समिती तुळजापूर येथे प्रत्यक्ष जाऊन अभिलेख्याची तपासणी करून अहवाल सादर करण्यात आलेला आहे.तपासणी अहवाल कार्यालयाचे पत्र क्रमांक ३५२ दिनांक १०.०७.२०१२ अन्वये सादर केलेला आहे.या तपासणी अहवालाशी मी आजही पुर्णतः सहमत आहे.

**दोषारोप क्रमांक ५:-** दोषारोप क्रमांक ३ मध्ये या दोषारोपाबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.दोषारोप क्रमांक ३ व ५ हे दोन्ही एकाच विषयाच्या बाबतीत आहेत.या योजनेअंतर्गत मोटार वाटपामध्ये अनियमितता झाली असल्याने अपचारी कर्मचारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियाम १९६७ मधील नियम ३ चा भंग केला असल्याचे माझे मत आहे. यापेक्षा मी अधिक काही सांगावयाचे नाही.

अपचारी कर्मचारी यांनी वरील साक्ष वाचून पाहिली असता सरकारी साक्षीदार क्रमांक ५ यांची उलट तपासणी घ्यावयाची नाही.असे चौकशीत स्पष्ट केले.

**सरकारी साक्षीदार क्रमांक ६ श्री.पी.एम. कांबळे, विस्तार अधिकारी (स.क.)यांची साक्षः-**

मी पांडुरंग मारूती कांबळे,वय ५० वर्ष,राहणार उस्मानाबाद दिनांक ०४-०१-२००५ पासून आजपर्यंत विस्तार अधिकारी (स.क.) या पदावर जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथे कार्यरत आहे.

मी श्री. ए. एच. वेदपाठक यांना ओळखतो त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे.त्यांचे विरूध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशी मध्ये माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

क्रमांक १,२ व ४ या दोषारोपाशी माझा काही संबंध येत नसल्याने मी याबाबत काहीही सांगू शकत नाही.

**दोषारोप क्रमांक ३:-** जिल्हा परिषदे मार्फत पंचायत समिती तुळजापूर तालुक्यासाठी ५ एचपीचे एकूण ६५ पाणबुडी पंप वाटपासाठी देण्यात आले होते.या ६५ लाभार्थ्यांच्या गृहभेटी मी स्वतः दिलेल्या आहे.२० लाभार्थ्यांना पंप मिळाले नाहीत असे माझ्या निदर्शनास आले.या २० लाभार्थ्यांची यादी दिनांक १३-०६-२०१२ रोजी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात अनुक्रमांक ४ वर देण्यात आलेली आहे.या अहवालावर माझी स्वतःची स्वाक्षरी असून,या अहवालाशी मी आजही सहमत आहे.

**दोषारोप क्रमांक ५:-** दोषारोप क्रमांक ३ मध्ये या दोषारोपाबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.दोषारोप क्रमांक ३ व ५ हे दोन्ही एकाच विषयाच्या बाबतीत आहेत.या योजनेअंतर्गत मोटार वाटपामध्ये अनियमितता झाली असल्याने अपचारी कर्मचारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ चा भंग केला असल्याचे माझे मत आहे. यापेक्षा मला अधिक काही सांगावयाचे नाही.

**सरकारी साक्षीदार क्रमांक ६ श्री.पी.एम.कांबळे,विस्तार अधिकारी (स.क.) यांनी उलट तपासणीच्या वेळी स्पष्ट केले कीः-**

➢ ६५-५ एचपी पाणबुडी पंपापैकी ४५-५ एचपी पंप आपण स्वतः पंचायत समिती तुळजापूर येथे उतरून घेतले असल्याबाबतची पोहच आपण माझ्या कार्यालयास सादर केलेली होती हे खरे आहे.

➢ २० पंप विस्तार अधिकारी श्री.मुळे यांनी उतरून घेतले असल्याबाबतची पोहच माझ्या कार्यालयास,दिनांक २४.०१.२०१२ रोजी सादर केली होती. हे खरे आहे.

➢ मी विद्युत मोटारीचा पंचनामा गृहभेटीच्या वेळी केलेला आहे.हे खरे आहे.

➢ विद्युत मोटारीचा स्थळ पंचनामा लाभार्थीच्या विहीरीवर जाऊन करणे अपेक्षित नाही.तथापि,६५ लाभधारकापैकी काही गृहभेटी दिल्या असून काही प्रत्यक्ष लाभधारकांच्या विहीरीवर जाऊन संबंधित लाभधारकांना प्रत्यक्ष लाभ मिळाला किंवा नाही याची खातरजमा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

➢ तक्रारीच्या अनुषंगाने मी व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी लाभार्थीच्या घरी जाऊन विचारणा केली असता,त्यांना पाणबुडी पंपाचा लाभ मिळालेला नाही .असे त्यांनी आम्हाला लेखी लिहून दिलेले आहे.त्यावरून लाभार्थ्यांना लाभ मिळाला नसल्याची आमची खात्री झालेली आहे.

➢ जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२०१२ च्या आदेशान्वये पोलीस निरिक्षक पोलीस ठाणे, तुळजापूर यांना श्री.वेदपाठक यांचेवर गुन्हा दाखल करणेबाबत पत्र दिले असून,या प्रकरणी मला गुन्हा नोंद करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले असल्याने,मी स्वतः पोलीस निरिक्षक पोलीस ठाणे तुळजापूर यांचेकडे तक्रार नोंदविण्यासाठी गेलो होतो.पोलिस स्टेशन तुळजापूर येथे गु.र.नं.१६१/१२ (क) नुसार ४०९,४२०,४६७,४६८,४७१, भा.दं.वि.प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

➢ चौकशी दरम्यान लाभार्थ्यांना साहित्य वाटप केल्याबाबतचे कार्यालयीन अभिलेख्याची मी तपासणी केलेली नाही खरे नाही.

➢ लाभार्थ्यांनी साठा नोंदवहीवर पंप मिळाल्याबाबत केलेली स्वाक्षरी लाभार्थ्यांनी पंचनाम्यावर केलेली स्वाक्षरी,लाभार्थ्यांनी दाखल केलेल्या मूळ मागणी अर्जावर केलेली स्वाक्षरी तसेच लाभ घेत असतांना कार्यालयात १०० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर केलेली स्वाक्षरी या चारही ठिकाणी लाभार्थ्यांच्या स्वाक्षरीमध्ये तफावत असल्याचे दिसून येते हे खरे आहे.

**श्री जाधव एस. सी. सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती तुळजापूर यांचे अंतिम अभिकथन (टाचण)**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांचे आदेश दिनांक १९-०१-२०१३ अन्वये श्री.ए.एच.वेदपाठक निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांच्या विभागीय चौकशी प्रकरणी सादरकर्ता अधिकारी म्हणून माझी नियुक्ती केलेली आहे.त्यानुसार मी माझे अंतिम अभिकथन सादर करीत आहे.

**दोषारोप क्रमांक १:-** श्री वेदपाठक यांनी आस्थापना विभागाचे काम करत असतांना दिनांक १४-०७-२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक ०८-०६-२०११ ते १३-०२-२०१२ मध्ये झालेल्या सभेचे इतिवृत्त भाग २ मध्ये लिहिलेले नाही.सदस्यांच्या उपस्थितीनुसार प्रवास भत्ते देयके संबंधितांना केंव्हा देण्यात आली ही बाब धनादेश वाटप नोंदवही अद्यावत ठेवली नसल्याने त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे सिध्द होत आहे.

**दोषारोप क्रमांक २:-** सन २०११-१२ मध्ये पंचायत समिती सेस मधून समाज कल्याण अंतर्गत शिलाई मशिन पुरवठा करणेसाठी रु १,३८,५००/-ची तरतुद करण्यात आली होती.दिनांक ०९-११-२०११ मध्ये कलम १०९ ची व कलम १२५ ची मान्यता प्राप्त होऊनही श्री. वेदपाठक यांनी जाहिर निविदा मागवून मशिन खरेदीची कार्यवाही केली नसल्याने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द होत आहे.

**दोषारोप क्रमांक ३:-** समाज कल्याण विभागाकडून मिळालेल्या ५ एचपी पाणबुडी पंप वाटपाबाबत श्री.वेदपाठक यांनी अनियमितता केली असल्याचे सरकारी साक्षीदारावरून व प्राप्त चौकशी अहवालावरून सिध्द होत आहे.

**दोषारोप क्रमांक ४:-** इंदिरा आवास योजना,राजीव गांधी ग्रामीण निवारा व रमाई घरकुल योजने मध्ये कनिष्ठ/शाखा अभियंता यांच्याकडून लाभार्थ्यांच्या पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागात सादर करणेसाठी नमुना नंबर १२ न ठेवून अनियमितता केल्याचे सिध्द होत आहे.

**दोषारोप क्रमांक ५:-** जिल्हा परिषद स्वयसंपादित उत्पन्नातील २० टक्के सेस अंतर्गत मागासवर्गीय शेतक-यांना ५ एचपी पाणबुडी पंप वाटप मध्ये जाणीवपुर्वक अनियमितता केली असल्याने त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसुर केल्याचे सिध्द होत आहे.

कृपया सदरचे प्रकरण अंतिम करण्यात यावे ही विनंती.

**अपचारी कर्मचारी श्री.ए.एच.वेदपाठक, निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांचे बचावत्मक अंतिम अभिकथन**

वरील विषयी माझे अंतिम अभिकथन सविनय सादर की,

मी दिनांक ०७ जून,२०११ पासून पंचायत समिती,तुळजापूर येथे कनिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत होतो.यावेळी माझ्याकडे एकाच वेळी आस्थापना-२ परिषद विभाग,मा.सभापती यांचे स्वीय सहाय्यक,इंदिरा आवास,अशा चार विभागाचा पदभार सोपविलेला होता,यामुळे माझ्यावर कामाचा प्रचंड ताण येत होता.तरी मी सर्व कामे प्रामाणिकपणे पार पाडत होतो.

जुलै २०११ मध्ये घरकुल लाभार्थ्यांच्या अनुदानाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याने तत्कालिन जि.प.सदस्य श्री.मुकूंद डोंगरे व लाभार्थ्यांने आंदोलन करून पंचायत समितीच्या कार्यालयाला कुलुप लावले त्यामुळे तत्कालिन गटविकास अधिकारी व मा.सभापती यांनी (१५) दिवसात लाभार्थ्यांचे अनुदान वितरीत केले जाईल असे आश्वासन दिले.

याविभागावर कार्य करणारे कर्मचारी वैतागून गेले होते.कोणीही काम करण्यास तयार नव्हते.अशा परिस्थितीत तत्कालिन गटविकास अधिकारी यांनी मला अक्षरशः विनंती केली की, तुम्ही हे काम करू शकता.प्रशासनाची व लाभार्थ्यांची गरज लक्षात घेवून मी कसलेही आदेश नसतांना माझ्याकडील असलेल्या विभागाचे कामकाज सांभाळून इंदिरा आवास योजनेचे अतिरिक्त काम केले व (१५) दिवसामध्ये २६८ लाभार्थ्यांचे रुपये ४२,००,०००/-धनादेश वितरीत केले.त्यावेळेस वातावरण शांत झाले.

दिनांक १२.०६.२०११ रोजी झालेल्या पंचायत समितीच्या सर्व साधारण सभेमध्ये मी केलेल्या कामाची दखल घेवून माझ्या अभिनंदनाचा ठराव घेतला गेला त्याचे इतिवृत्त सोबत सादर करीत आहे.

यानंतर ऑक्टोबर २००१ ते फेब्रुवारी २०१२ पर्यंत इंदिरा आवास योजनेचे काम ठप्प होते.या कालावधीमध्ये फक्त ३० ते ३५ लाभार्थ्यांचे धनादेश काढण्यात आले.या विभागावर काम करणारे कर्मचारी सतत होणा-या त्रासाला कंटाळून रजेवर गेले होते.अनेक लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित राहिल्याने दररोज ५० ते १०० लाभार्थी कार्यालयात येवून गोंधळ घालत असत,त्यामुळे पंचायत समितीमधील वातावरण अशांत झाले होते.अशा

परिस्थितीत दिनांक ०३ मार्च,२०१२ च्या आदेशान्वये इंदिरा आवास योजनेचा पदभार माझ्याकडे सोपविण्यात आला.प्रशासनाचे आदेश स्वीकारून मी पदभार घेतला प्रत्यक्षात कामकाजास सुरूवात करतांना मला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.मागील दोन वर्षातील मंजूर लाभार्थ्यांचे कागदपत्रे, प्रस्ताव सापडत नव्हते. पूर्वीच्या कर्मचा-याने माझ्याकडे पदभार देतांना प्रलंबित प्रकरणांची यादी दिली नव्हती. प्रशासनाचे कसलेही सहकार्य मिळत नव्हते. मला कामकाज करण्यासाठी आवश्यक असणारी स्टेशनरी व टाचणीपासून लागणारे सर्व स्टेशनरी साहित्य बाहेरून आणावे लागत होते.दररोज १०० ते २०० प्रति झेरॉक्स काढणे आवश्यक असायचे त्यासुध्दा बाहेरून स्वखर्चाने काढून आणव्या लागत होत्या.कार्यालयातील झेरॉक्स मशिन सप्टेंबर,२०११ पासून किरकोळ दुरूस्ती अभावी बंद होती.एकदा तर ३ हजार प्रती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,उस्मानाबाद येथे येवून झेरॉक्स काढून नेल्या होत्या.कामकाजासाठी अंधारी खोली लाईट नाही दररोज १०० ते १५० लाभार्थ्यांचा सभोवताली गराडा,मागील तीन-तीन वर्षापासून लाभार्थ्यांना अनुदान मिळालेले नव्हते.कार्यालयातील अधिक्षक,कक्ष अधिकारी श्री.कांबळे डी.टी.संपत जाधव यांचे कसलेही सहाकार्य मिळत नव्हते.तरीही अशा परिस्थितीत माझ्या पुर्ण क्षमतेचा वापर करून कुठल्याही लाभार्थ्यांकडून कसलीही अभिलाषा न बाळगता दिनांक ०७ मार्च,२०१२ ते १५ एप्रिल,२०१२ या दीड महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रलंबित ३८५ लाभार्थ्यांचे प्रस्ताव निकाली काढून जवळपास ७०.०० लक्ष इतक्या रक्कमेचे धनादेश वितरीत केले, त्याची लाभार्थीनिहाय यादी सोबत जोडलेली आहे.मी काम करताना प्रत्येक शाखा अभियंत्यामार्फत दररोज ३० ते ४० या प्रमाणात १५० ते २०० प्रस्ताव प्राप्त होत होते.यामध्ये सन २००८-२००९ पासूनचे प्रस्ताव सादर करण्यात येत होते.जून २०११ मध्ये मंजूर झालेल्या लाभार्थ्यांचे पहिल्या हप्त्याचे प्रस्ताव मार्च २०१२ मध्ये सादर करण्यात येत होते.हे प्रस्ताव मोजमाप पुस्तिकेशिवाय सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या सदर प्रस्तावाची संख्या खूप होती.त्याची छाननी करणे आवश्यक होते.मला एकट्यालाच प्रस्ताव घेणे,छाननी करणे,मोजमाप पुस्तिकेवर देयक पास करणे,निधी वितरण नोंदवही अद्यावत ठेवणे ही सर्व कामे करावी लागत होती व दररोज मोठ्या संख्येने येणा-या लाभार्थ्यांना मलाच तोंड द्यावे लागत होते.कनिष्ठ लेखाधिकारी यांचेही सहकार्य मिळत नव्हते.शाखा अभियंता यांच्याकडून ८ ते १० महिने विलबांने देयके सादर केली होती व त्यातही अनेक प्रकारच्या त्रुटी होत्या. याच कालावधीत २४ आठवड्यामध्ये आपण घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये गटविकास अधिकारी यांना कामाचे तीन भाग करून मदतीला कर्मचारी द्या अशा सुचना दिल्या होत्या परंतू याकडे प्रशासनाने पुर्ण दुर्लक्ष केले मी वारंवार विनंती केली,कार्यालयीन अधिक्षक श्री.डी.टी.कांबळे यांनी तर स्पष्ट भाषा वापरली की,वेदपाठक मरतय ना तर त्याला एकट्यालाच मरू द्या मदतीला कर्मचारी देण्याची गरज नाही (सी.ई.ओ) ला सांगायला काय जातयं इथे माणसे नाहीत काय मिळतय त्या घरकुलात अशा शब्दात ते बोलले.श्री कांबळे डी.टी.यांनी मी काम पूर्ण करू शकत नव्हतो, म्हणून ते व त्यांचे मागासवर्गीय समर्थक माझ्या अंगावर धावत होते.त्यामुळे मला काम करणे अशक्य झाले होते.दररोज वादावादीचे प्रसंग निर्माण होत होते.

दिनांक २३-०४-२०१२ रोजी माझ्या कौटुंबिक कारणासाठी फक्त ७ दिवसाची अर्जित रजा मिळावी अशी लेखी मागणी केली होती.याबाबत मी समक्ष गटविकास अधिकारी यांना भेटून त्यांच्याशी चर्चा करून रजा देण्याची विनंती केली होती.परंतू त्यांनी सांगितले की,मी दौ-यावर निघालेली आहे,आल्यानंतर तुमच्या अर्जावर स्वाक्षरी करते, त्या दिवशी कार्यालयात रात्री ९.३० पर्यंत मी त्यांची वाट पहात थांबलो होतो.त्या आल्या नसल्याने मला परत यावे लागले.नंतर दुस-या दिवशी सकाळी दिनांक २४-०४-२०१२ रोजी रजेच्या अर्जावर सही घेण्यासाठी मी कार्यालयात गेलो असता,गटविकास अधिकारी ह्या एका विवाह समारंभास गेल्याचे कळाले,त्याच दिवशी माझ्या वडिलांचे श्राध्द असल्यामुळे माझ्या रजेच्या अर्जावर कार्यालयीन कक्ष अधिकारी यांच्या टपाल पॅडमध्ये ठेवा असे सांगितल्यामुळे मी त्या प्रमाणे केले.त्यानंतर दिनांक २५-०४-२०१२ रोजीच्या पत्रान्वये मला कळविण्यात आले की,आपण मागितलेली अर्जित रजा नामंजूर करण्यात येत आहे व दिनांक २६-०४-२०१२ च्या ज्ञापनाने आपण परवानगी न घेता परस्पर रजेवर गेलात असा अहवाल (साप्रवि) कडे पाठविण्यात आला हे सर्व प्रकार जाणीवपुर्वक केलेले आहे.

पंचायत समिती स्तरावरून व सामान्य प्रशासन विभागाकडून मला कसल्याही प्रकारची नोटीस देण्यात आलेली नाही,अथवा माझा खुलासा मागविण्यात आलेला नाही गटविकास अधिकारी यांच्यामार्फत विसंगत,चुकीचा व वरिष्ठांची दिशाभूल करणारा अहवाल पाठविण्यात आलेला आहे.याची दखल घेण्यात यावी ही विनंती,त्यामुळे माझ्यावर अन्यायकारक निलंबनाची कार्यवाही झालेली आहे.

गटविकास अधिकारी,पंचायत समिती तुळजापूर वाचा क्रमांक १ प्रमाणे कारणे दाखवा नोटीस पंचायत समिती,तुळजापूर/१९३२/१२ दिनांक १९.०४.२०१२ ची नोटीस मला देण्यात आलेली नाही.

मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांची संदर्भिय नोटीस मला मा.गटविकास अधिकारी यांचे मार्फत तामील करण्यात आलेली नाही.

दिनांक २५-०४-२०१२ ते ०५-०५-२०१२ या कालावधीमध्ये मला पंचायत समिती कार्यालयामार्फत २ पत्रे माझ्या घरच्या पत्यावर पोष्टाने बाय आरपीएडी प्राप्त झालेली आहेत, परंतू मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची कारणे दाखवा नोटीस दिनांक ०४-०५-२०१२ रोजीची मला तामील करण्यात आलेली नाही .त्यामुळे मला माझा खुलासा वेळेत देता आलेला नाही.

इंदिरा आवास घरकुल योजनेचा पदभार मी दिनांक ०७ मार्च,२०१२ रोजी घेतलेला होता.पदभार घेतल्यानंतर मी अनेक अडचणींचा सामना करत कामकाजास सुरुवात केली.पदभार घेतला त्यावेळेस जवळपास २०० देयके मोजमाप पुस्तिकेसह सादर केलेली प्रलंबीत होती.शासन निर्णय १० ऑगस्ट, २०१० नुसार स्पष्ट निर्देश होते की,घरकुल लाभार्थ्यांना १ व २ हप्ता मोजमाप पुस्तिकेशिवाय देण्यात यावा. परतू मागील २ वर्षापासून या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नव्हती.मी फक्त ७ मार्च,२०१२ ते २३ एप्रिल,२०१२ या कालावधीतच सदर विभागाचे काम केले आहे.मोजमाप पुस्तिकेसह सादर केलेली एकूण १४८ देयके मी निकाली काढलेली आहेत.याचा सर्व तपशील लाभार्थी यादीसह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक १४-०६-२०१२ चे निवेदनाव्दारे सादर केलेला आहे.याच कालावधीमध्ये एबी शिवाय प्राप्त झालेल्या देयकाची कागदपत्राची छाननी करणे आवश्यक होते.कारण लाभार्थी दररोज येवून गोंधळ घालत होते.कारण त्यांना दोन ते तीन वर्षापासून पैसे मिळालेले नव्हते.मी प्रामाणिकपणे माझ्या संपूर्ण क्षमतेनुसार काम करून ४२५ देयकांचे प्रस्ताव निकाली काढले.

मोजमाप पुस्तिकेशिवाय प्राप्त देयकांच्या कागदपत्रांमध्ये अनेक त्रुटी होत्या त्रुटीच्या पुर्ततेसाठी प्रस्ताव छाननी करून घेत होतो व त्यासोबतच एम.बी.सह प्राप्त देयके ही गटविकास अधिकारी यांचे स्वाक्षरीस्तव सादर करीत होतो.याच कालवधीत मी दिनांक २४-०४-२०१२ रोजी अर्जित रजेची मागणी केली होती.परंतू दिनांक २५-०४-२०१२ च्या पत्रान्वये मला फक्त ३ दिवसाची किरकोळ रजा मंजूर केल्याचे कळविले होते,परंतू याच कालावधीमध्ये मला काविळ हा आजार झाल्याने वैद्यकिय रजेवर जावे लागले.त्यामुळे एम.बी.शिवाय प्रस्ताव प्राप्त झालेल्या कागदपत्रातील त्रुटी अभावी मी वैद्यकिय रजेवर असल्याने मा.गटविकास अधिकारी यांचे स्वाक्षरीस्तव सादर करू शकलो नाही.

मी पदभार घेतल्यापासूनच्या फक्त दीड महिन्याच्या कालावधीमध्ये ४०० पेक्षा जास्त प्रस्ताव निकाली काढलेले आहेत,याचाही सहानुभुतीपूर्वक विचार करावा.

मागासवर्गीय शेतक-यांना ५ एचपी पाणबुडी पंप वाटपाबाबतच्या योजनेअंतर्गत एकूण ६५ विद्युत पंपाचे सेट प्राप्त झाले होते.याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पुरवठा तपशील पत्र तथा पोहोच पावती क्रमांक ४३०३ नुसार २० पंपसेट पंचायतीतील कार्यरत कृषी विस्तार अधिकारी श्री.मुळे यांनी दिनांक २४.०१.२०१२ रोजी त्यांचे स्वाक्षरीने ताब्यात घेतले होते.सदर पोच पावतीवर मा.गटविकास अधिकारी यांची अद्याप स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही,सदर विद्युत पंप मागासवर्गीय शेतक-यासाठी १०० टक्के अनुदानित योजनेअंतर्गत आहेत हे ही निदर्शनास आणुन दिले नाही.

पुरवठा तपशील पत्र पोहोच पावती क्रमांक १०५९९ नुसार ४५ विद्युत पंपसेट साधारणतः याच कालावधीत मी ताब्यात घेतले व गटविकास अधिकारी यांचे निदर्शनास आणून देवून त्यांची स्वाक्षरी घेवून कोणतेही गोडावून रिकामे नसल्याने एका रिकाम्या क्वार्टरमध्ये ठेवले. यानंतर समाज कल्याण अधिकारी जि.प.उस्मानाबाद यांचे दिनांक १८.०२.२०१२ च्या पत्रान्वये एकूण ६५ लाभार्थ्यांची मंजूर यादी दिनांक २५.०२.२०१२ रोजी मला प्राप्त झाली.

यादी प्राप्त होताच लाभार्थ्यांचा वाटपसाठी तगादा सुरू झाला, परंतू मंजूर यादी ६५ लाभार्थ्यांची व प्रत्यक्षात माझ्या ताब्यात ४५ विद्युत पंप होते, त्यामुळे मी तत्कालिन समाज कल्याण सभापती जनार्धन वाघमारे यांना ही गोष्ट सांगितली.त्यांनी सांगितले की,६५विद्युत पंप पाठवले आहेत,परंतू २० विद्युत पंप अप्राप्त असल्याने मी त्यांना समक्ष येवून पाहणी करा असे सांगितले.यानंतर ते दिनांक ०१ मार्च व ०२ मार्च रोजी कार्यालयात आले त्यांना मी माझ्या ताब्यातील ४५ पंपसेट मोजून दाखविले,त्यानंतर समाज कल्याण कार्यालयास विचारणा केली,असता कृषी विस्तार अधिकारी श्री.मुळे यांना विचारा असे सांगितले,त्यानंतर मा.सभापती व मी कृषी गोडावून मध्ये गेलो,तिथे मुळे यांना विचारा असे सांगितले,की माझ्या लक्षातच नाही हे विद्युतपंप त्यांच्याच ताब्यात होते.सभापती समक्ष मोजले असता फक्त १७ विद्युत पंपसेट होते व ३ माझ्याकडुन दिले गेलेले आहेत ते मी शेवटी परत करुन देतो असे सांगितले व हा विषय मा.सभापती श्री.जनार्धन वाघमारे यांचे समक्षच झाला.खात्रीसाठी आपण त्यांना विचारू शकता.यानंतर यादीनुसार लाभार्थ्यांना त्यांनी कागदपत्रे ७/१२, ८- अ रुपये १००/-स्टॅम्प करारनामा,मतदान ओळखपत्र व फोटो घेवूनच त्यांचे समक्ष स्वाक्षरी घेवून एकूण ६२ मंजूर यादीतील लाभार्थ्यांना विद्युत पंपाचे वाटप केलेले आहे.

माझ्या ताब्यात असलेल्या गोडावून मधून अशा दोन ठिकाणाहून विद्युत पंपाचे वाटप करण्यात आल्याने थोडासा गोंधळ उडाला व माझ्या नकळत २ लाभार्थ्यांनी माझ्याकडूनही व कृषी गोडावून मधूनही विद्युत पंप घेतलेले आहेत.परंतू नेमके लाभार्थी कोण आहेत हे सांगता येत नाही,असे झाल्याचीही शक्यता आहे,किंवा कृषी विस्तार अधिकारी श्री मुळे यांनी ३ विद्युत पंप परत देतो असे सांगितले होते,ते दिले का हेही समजून येत नाही.

त्याच्यासाठी नोंदवहीमध्ये २० पंपसेट ताब्यात आहेत.म्हणून मी स्वाक्षरी केली आहे,ते त्यांच्या गोडावूनमध्ये आहेत यासाठी मी स्वाक्षरी केलेली आहे.परंतू त्यांच्या साठा नोंदवहीत १७ लाभार्थ्यांना वाटप केल्याची नावासह नोंद केलेली होती.याबाबत ३ संचाबाबत काय झाले हे मला निश्चित सांगता येत नाही,परंतू ही बाब मी जाणीवपुर्वक अथवा हेतूपुरस्सर केलेली नाही.त्यामुळे मंजूर यादीतील (१) श्री.जाधव अशोक

भागवतराव, रा. काटी, (२) श्री. नागटिळक लाला विश्वनाथ, रा. केमवाडी, (३) श्री फडके निवृत्ती दाजी, रा. सावरगांव यांच्या नावाची साठा नोंदवही मध्ये पृष्ठ क्रमांक ३३ वर नोंद घेतली परंतू प्रत्यक्ष लाभार्थी नसल्याचे लक्षात आले व कागदपत्रे पुर्ण नव्हती म्हणून वाटप रद्द केले, ही बाब साठा नोंदवहीमध्ये दुरूस्त करण्याचे राहून गेले.

यापमाणे ३ लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत. शिल्लक ३ विद्युत पंप कोठे गहाळ झाले हे शोधून लवकरात लवकर मी उपलब्ध करून देतो. तथापि,याची चौकशीअंती जबाबदारी माझ्यावर निश्चित होत असेल तर ते मला मान्य आहे व त्यासाठीची नुकसान भरपाईही मी भरण्यास तयार आहे.

एकुण ६२ लाभार्थ्यांचे वाटप योग्य ती सर्व कागदपत्रे प्राप्त करून घेवूनच केलेले आहे.याचे सर्व रेकॉर्ड,मंजूर यादी,सर्व आवश्यक कागदपत्रे ७/१२,८-अ, रू.१००/- चा स्टॅम्प,मतदान ओळखपत्र, फोटो इ.एकूण ६२ लाभार्थ्यांचे वाटप नोंदवही दिनांक ०१-०६-२०१२ रोजी मी समक्ष कार्यालयात जावून श्री.औरादकर (क. स.)यांचे ताब्यात दिले आहे.

दिनांक ०१-०६-२०१२ रोजीचे सर्व अभिलेखे समक्ष हजर राहूनदिलेले असतांनाही दिनांक ०६-०६-२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.त्यामुळे मी दिनांक ०६-०६-२०१२ पुर्वीच अभिलेखे सादर केलेले आहेत.कार्यालयीन कक्ष अधिकारी, श्री संपतराव जाधव समक्ष दिनांक ०१-०६-२०१२ रोजी सर्व अभिलेखे ताब्यात दिले व तशी पोहोंच श्री. औरादकर (क.स.) यांचेकडून मी घेतलेली आहे.

वरील प्रमाणे माझ्यावर एकतर्फी चौकशी करून अन्यायकारक कारवाई केलेली आहे.संपुर्ण चौकशी दरम्यान माझे म्हणणे अथवा खुलासा प्रशासनाने घेतलेला नाही,मला माझे म्हणणे मांडण्याची संधी मिळालेली नाही.

या सर्व बाबींचा आपण सहानुभुतीपुर्वक विचार करून माझ्यावर कारवाई करू नये ही नम्र विनंती.

**भाग-२ :-**

**समालोचन**

अपचारी कर्मचारी श्री. ए. एच. वेदपाठक,कनिष्ठ सहाय्यक (निलंबित) पंचायत समिती तुळजापूर धारणाधिकार शिक्षण विभाग यांचेवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी दिनांक १९-१०-२०१२ अन्वये जोडपत्र-१ मध्ये दोषारोप क्रमांक १ ते ५ ठेवून विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सरकारी साक्षीदार क्रमांक १ ते ६ यांनी त्यांची साक्ष नोंदविली असून, अपचारी कर्मचारी यांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी त्यांचा प्राथमिक जबाब नोंदविला नाही. तसेच त्यांनी त्यांचे बचावात्मक अंतिम अभिकथन देखील दोषारोप निहाय सादर केलेले नाही.

**दोषारोप क्रमांक १ :-(अ)** मी दिनांक ०७ जून,२०११ पासून पंचायत समिती,तुळजापूर येथे कनिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत होतो.यावेळी माझ्याकडे एकाच वेळी आस्थापना-२, परिषद विभाग मा.सभापती यांचे स्वीय सहाय्यक,इंदिरा आवास, अशा चार विभागांचा पदभार सोपविलेला होता. यामुळे माझ्यावर कामाचा प्रचंड ताण येत होता. तरी मी सर्व कामे प्रामाणिकपणे पार पाडत होतो असे अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या बचावत्मक अंतिम अभिकथनात स्पष्ट केलेले आहे.

**(ब)** दोषारोप क्रमांक १ शी माझा काहीही संबंध नसल्याने मी याबाबत काहीही सांगू शकत नाही.असे सरकारी साक्षीदार क्रमांक १,५ व ६ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(क)** श्री.वेदपाठक यांच्याकडे आस्थापना विभागाचा पदभार होता. त्यांनी पंचायत समितीचे कार्यवृत्तांत पुस्तक भाग-१ नियम ४५ नमुना क अद्यावत लिहलेला नाही.त्यामध्ये दिनांक ०७-११-२०११ च्या बैठकीचे इतिवृत्त श्री.वेदपाठक यांनी लिहिलेले नाही. तसेच भाग-२ नियम ४५,३८,४३ नमुना क ठेवण्यात आलेला नाही.पंचायत समिती सदस्यांच मानधन व प्रवास भत्ता देयक वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.यावरून त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केली असल्याचे स्पष्ट होत असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ड) (१)** श्री. वेदपाठक यांच्या कालावधीत झालेल्या बैठकींपैकी दिनांक १४-०७-२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत तयार केले असून ते भाग १ मध्ये लिहिलेले नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

(२) पंचायत समिती अहवाल पुस्तिका दिनांक ०८-०६-२०११ ते १३-०२-२०१२ मध्ये झालेल्या सभेचे इतिवृत्त भाग-२ मध्ये लिहिण्यात आलेले नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(३)** सदस्यांचे बैठकीत उपस्थित असलेले प्रवास भत्ता देयके संबंधितांना केंव्हा देण्यात आली.  ही बाब धनादेश वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्यामुळे तपासता आली नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(इ) (१)** श्री. वेदपाठक यांच्याकडे आस्थापना विभागाचा पदभार होता.  त्यांच्या कालावधीत त्यांनी दिनांक १४-०७-२०११ च्या मासिक बैठकीचे इतिवृत्त तयार केले असून ते भाग १ मध्ये लिहिण्यात आलेले नाही. तसेच भाग २ नियम ४५, ३८ प ४३ अन्वये दिनांक ०८-०६-२०११ ते १३-०२-२०१२ या कालावधीत झालेल्या सभेचे इतिवृत्त भाग २ मध्ये लिहिण्यात आलेले नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(२)** पंचायत समितीच्या सभेत उपस्थित असणा-या सदस्यांचे उपस्थितीनुसार प्रवास भत्ता देयके केंव्हा देण्यात आली, याची नोंद ठेवलेली नाही.  धनादेश वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.  यावरून त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केला असल्याचे सिध्द होत असल्याचे,सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ई)** श्री. वेदपाठक यांनी आस्थापना विभागाचे काम करीत असतांना दिनांक २४-०७-२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त,दिनांक ०८-०६-२०११ ते १३-०२-२०१२ मध्ये झालेल्या सभेचे इतिवृत्त भाग २ मध्ये लिहिलेले नाही.सदस्यांच्या उपस्थितीनुसार प्रवास भत्ते देयके संबंधितांना केंव्हा देण्यात आली ही बाब धनादेश वाटप नोंदवही अद्यावत ठेवली नसल्याने त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे सिध्द होत असल्याचे सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

**उपरोक्त विवेचन व गटविकास अधिकारी,पंचायत समिती तुळजापूर यांनी नोंदविलेली साक्ष व सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम अभिकथन (टाचण) विचारात घेता,अपचारी कर्मचारी यांनी आस्थापना विभागाचा पदभार सांभाळण्यात कसुर केल्याने हा दोषारोप सिध्द होत आहे.**

**दोषारोप क्रमांक २ :-(अ) (१)** या विभागात कार्य करणारे कर्मचारी वैतागून गेले होते. कोणीही काम करण्यास तयार नव्हते.अशा परिस्थितीत तत्कालिन गटविकास अधिकारी यांनी मला अक्षरशः विनंती केली की, तुम्ही हे काम करू शकता.प्रशासनाची व लाभार्थ्यांची गरज लक्षात घेवून मी कसलेही आदेश नसतांना माझ्याकडील असलेल्या विभागाचे कामकाज सांभाळून इंदिरा आवास योजनेचे अतिरिक्त काम केले व (१५) दिवसामध्ये २६८ लाभार्थ्यांचे रुपये ४२,००,०००/-धनादेश वितरीत केले.  त्यावेळेस वातावरण शांत झाल्याचे, अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या बचावात्मक अंतिम अभिकथनात स्पष्ट केलेले आहे.

**(ब)-** दोषारोप क्रमांक २ शी माझा काहीही संबंध नसल्याने मी याबाबत काहीही सांगू शकत नाही.असे सरकारी साक्षीदार क्रमांक १,५ व ६ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(क)** पंचायत समिती सेस अंतर्गत सन २०११-१२ मधील १४ समाजकल्याण अंतर्गत १००टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरवठा करणे या योजनेसाठी रू.१,३८,५००/-ची तरतुद असतांनाही श्री. वेदपाठक यांनी ही योजना राबविलेली नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ड) (१)** वास्तविक पाहता, सदर योजना राबविण्यासाठी दरकरार उपलब्ध नसेल तर,शासन निर्णय दिनांक ०२-०१-१९९२ नुसार व लेखा संहिता १९६८ चे नियम ८१ ते ८९ अन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक होते.तशी कार्यवाही केलेली नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(२)** शिलाई मशिन १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यासाठी रजिष्टर ठेवले नसल्याने पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागवल्याची खात्री करता आली नसल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(इ) (१)** सन २०११-१२ मध्ये १४ समाज कल्याण अंतर्गत १०० टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरवठा करणे ही योजना घेण्यात आली होती.यासाठी रू.१,३८,५००/-ची तरतुद करण्यात आली होती सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(२)** दिनांक ०९-११-२०११ रोजी पंचायत समितीने सभेमध्ये कलम १०९ ची मान्यता घेण्यात आली असून कलम ९९ ची तांत्रिक मान्यता व कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता गटविकास अधिकारी यांनी दिली होती.  असे सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(३)** शिलाई मशिनचा दरकरार उपलब्ध नसल्याने लेखा संहितेतील तरतूदीनुसार जाहिर निविदा मागवून खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक असतांना तसेच लाभार्थीचे अर्ज मागवून घेणे आवश्यक असतांनाही श्री. वेदपाठक यांनी कुठलीही कार्यवाही केली नसल्याने, ही योजना राबविता आली नाही. परिणामी या योजने अंतर्गत लाभार्थी शिलाई मशिनच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. यास श्री. वेदपाठक हेच जबाबदार असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ई)** सन २०११-१२ मध्ये पंचायत समिती सेस मधून समाज कल्याण अंतर्गत शिलाई मशिन पुरवठा करणेसाठी रू.१,३८,५००/-ची तरतूद करण्यात आली होती.दिनांक ०९-११-२०११ मध्ये कलम १०९ ची कलम १२५ ची मान्यता प्राप्त होऊनही श्री. वेदपाठक यांनी जाहिर निविदा मागवून मशिन खरेदीची कार्यवाही केली नसल्याने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द होत आहे.असे सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

**उपरोक्त विवेचन,पंचायत समिती सेस अंतर्गत रू.१,३८,५००/-उपलब्ध तरतुदीस कलम १०९ व कलम १२५ ची मान्यता प्राप्त होऊनही अपचारी कर्मचारी यांनी शिलाई मशिन खरेदीसाठी संचिका सादर केली नसली तरी, वरिष्ठांनी या प्रकरणी दक्षता घेतली नसल्याची वस्तुस्थिती विचारात घेता, हा दोषारोप अंशतः सिध्द होत आहे.**

**दोषारोप क्रमांक ३:-(अ) (१)** माझ्या ताब्यात असलेल्या गोडावून मधून अशा दोन ठिकाणाहून विद्युत पंपाचे वाटप करण्यात आल्याने थोडासा गोंधळ उडाला व माझ्या नकळत २ लाभार्थ्यांने माझ्याकडूनही व कृषी गोडावून मधूनही विद्युत पंप घेतलेले आहेत, परंतू नेमके लाभार्थी कोण आहेत हे सांगता येत नाही, असे झाल्याचीही शक्यता आहे, किंवा कृषी विस्तार अधिकारी श्री.मुळे यांनी ३ विद्युत पंप परत देतो असे सांगितले होते, ते दिले का ? हेही समजून येत नसल्याचे, अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या बचावत्मक अंतिम अभिकथनात स्पष्ट केलेले आहे.

**(ब) (१)** अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या मान्यतेने समाज कल्याण विभागांर्तगत जिल्हा परिषद स्वसंपादीत उत्पन्नातील २० टक्के सेस योजना सन २०११-१२ मध्ये ५ एचपी पाणबुडी पंपाचा पुरवठा करणेबाबत विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादीत, उस्मानाबाद यांना आदेशीत केले होते.दिनांक ०५-११-२०११ च्या आदेशानुसार पंचायत समिती, तुळजापूरला ४५-५ एचपी पंप व दिनांक ०३-०१-२०१२ च्या आदेशन्वये २०-५ एचपी पाणबुडी पंप वितरीत करण्याबाबत देण्यात आले होते.या योजनेअंतर्गत ६५ लाभार्थ्यांची यादी पंचायत समिती तुळजापूर यांना दिनांक १८-०२-२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे.असे सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

(२) श्री.अशोक जाधव राहणार काटी यांनी दिनांक ३०-०५-२०१२ रोजीच्या पत्रान्वये समाज कल्याण विभागामार्फत तुळजापूर तालुक्यातील मागासवर्गीय शेतक-यांना मंजूर झालेल्या पाणबुडी पंपामध्ये अनियमितता झाली असल्याबद्दल तक्रार अर्ज गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडे प्राप्त झाला होता.त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०६-०६-२०१२ च्या पत्रान्वये अभिलेख्यांची पडताळणी करून,तसेच प्रत्यक्ष लाभार्थीची गृह भेट घेऊन तपासणी करणे बाबत आदेशीत केले असल्याने त्यानुसार कार्यवाही करून मी माझा अहवाल दिनांक १०-०७-२०१२ रोजीमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना सादर केलेला असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(३)** या अहवालात एकूण ६५ लाभार्थ्यांची सविस्तर माहिती दिलेली असून ३२ लाभार्थ्यांच्या वाटपात अनियमितता झाली असल्याचे, २ लाभार्थ्यांना साहित्य मिळाले परंतू काही साहित्य मिळाले नसल्याचे, २० लाभार्थ्यांना लाभार्थी यादीत नाव असूनही लाभ मिळाला नसल्याचे माझ्या निदर्शनास आलेले असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(क) (१)** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी मंजूर केलेल्या ५ एचपी पाणबुडी पंपाचे ६५ नग प्राप्त झाल्याची नोंदसाठा नोंदवहीवर घेवून गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक होते व त्यानंतरच साहित्य वाटप करणे आवश्यक होते. परंतू श्री. वेदपाठक यांनी तशी कार्यवाही केलेली नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(२)** एकूण प्राप्त ६५ पंपांपैकी ६३ पंप वाटप करण्यात आले असून शिल्लक २ पाणबुडी पंप व पुर्वीचे २ पाणबुडी पंप असे एकूण ४ पाणबुडी पंप शिल्लक दाखवून प्रमाणित करून घेणे आवश्यक होते, तशी कार्यवाही देखील श्री.वेदपाठक यांनी केलेली नसल्याचे साठा नोंदवही पाहता दिसून येत असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ड)** समाज कल्याण अधिकारी,उस्मानाबाद यांचे पत्र दिनांक १८-०२-२०१२ अन्वये मधील ५ मंजूर लाभार्थ्यांचे नांव व प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे नांव यामध्ये फरक असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(इ)** समाज कल्याण जिल्हा परिषद उस्मानाबाद विभागाकडून ५ एचपी पाणबुडी पंप १०० टक्के अनुदानावर वाटप करण्याची योजना घेतली होती. सन २०११-१२ मधील वाटप रजिष्टर पृष्ठ क्रमांक ५६ चे अवलोकन करता, दिनांक १६-०७-२०११ रोजी प्राप्त झालेल्या ६ पाणबुडी पंपापैकी ४ पाणबुडी पंप वाटप केल्याचे दिसून येते. हे पंप कोणत्या तारखेस वाटप केले याची नोंद वाटप रजिष्टरवर घेण्यात आलेली नाही.तसेच वाटप केल्यानंतर गटविकास अधिकारी यांची वाटप रजिष्टरवर स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. तसेच शिल्लक २ पाणबुडी पंपसाठा नोंदवहीवर शिल्लक असतांना त्याची नोंद पुढील पानावर घेण्यात आलेली नाही.तसेच हे २ पाणबुडी पंप कोणास कधी वाटप केले याची नोंदच रजिष्टरवरून दिसून येत नसल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ई)** अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे पत्र क्रमांक ३५८ दिनांक ०६-०६-२०१२ अन्वये पंचायत समिती तुळजापूर या पंचायत समितीस वाटप करण्यात आलेल्या पाणबुडी पंपाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबतचे पत्र दिल्यावरून मी जिल्हा समाज कल्याण अधिकारी व विस्तार अधिकारी समाज कल्याण आम्ही तिघांनी दिनांक १३-०६-२०१२ रोजी पंचायत समिती तुळजापूर येथे प्रत्यक्ष जाऊन अभिलेख्याची तपासणी करून अहवाल सादर करण्यात आलेला आहे.तपासणी अहवाल कार्यालयाचे पत्र क्रमांक ३५२ दिनांक १०-०७-२०१२ अन्वये सादर केलेला आहे. या तपासणी अहवालाशी मी आजही पुर्णतः सहमत असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक ५ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(उ)** जिल्हा परिषदे मार्फत पंचायत समिती तुळजापूर तालुक्यासाठी ५ एचपीचे एकूण ६५ पाणबुडी पंप वाटपासाठी देण्यात आले होते. ६५ लाभार्थ्यांच्या गृहभेटी मी स्वतः दिलेली आहे.२० लाभार्थ्यांना पंप मिळाले नाहीत असे माझ्या निदर्शनास आले.२० लाभार्थ्यांची यादी दिनांक १३-०६-२०१२ रोजी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात अनुक्रमांक ४ वर देण्यात आलेली आहे. या अहवालावर माझी स्वतःची स्वाक्षरी असून, या अहवालाशी मी आजही सहमत असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ६ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ऊ)** समाज कल्याण विभागाकडून मिळालेल्या ५ एचपी पाणबुडी पंप वाटपाबाबत श्री. वेदपाठक यांनी अनियमितता केली असल्याचे सरकारी साक्षीदारावरून व प्राप्त चौकशी अहवालावरून सिध्द होत असल्याचे सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

**उपरोक्त विवेचन,समाज कल्याण विभागामार्फत ५ एचपी पाणबुडी पंप ६५ नग वाटपामध्ये अपचारी कर्मचारी यांनी केलेली अनियमितता विचारात घेता,हा दोषारोप सिध्द होत आहे.**

**दोषारोप क्रमांक ४ :-(अ) (१)** कार्यालयातील अधीक्षक, कक्ष अधिकारी श्री. कांबळे डी. टी, श्री. संपत जाधव यांचे कसलेही सहकार्य मिळत नव्हते. तरीही अशा परिस्थितीत माझ्या पूर्ण क्षमतेचा वापर करून कुठल्याही लाभार्थ्यांकडुन कसलीही अभिलाषा न बाळगता दिनांक ०७ मार्च,२०१२ ते १५ एप्रिल, २०१२ या दिड महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रलंबीत ३८५ लाभार्थ्यांचे प्रस्ताव निकाली काढून जवळपास ७०.०० लक्ष इतक्या रक्कमेचे धनादेश वितरीत केले असल्याचे,अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या बचावात्मक अंतिम अभिकथनात स्पष्ट केलेले आहे.

**(ब)** दोषारोप क्रमांक ४१ शी माझा काहीही संबंध नसल्याने मी याबाबत काहीही सांगू शकत नाही. असे सरकारी साक्षीदार क्रमांक १,५ व ६ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(क)** इंदिरा आवास योजना,राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना, रमाई घरकुल योजनेचा कार्यभार दिनांक ०२-०३-२०१२ ते २४-०४-२०१२ या कालावधीत श्री. वेदपाठक यांचेकडेच होता. सदर कालावधीमध्ये लाभार्थ्यांची पहिल्या व दुस-या हप्त्याची प्राप्त देयके लेखा विभागात सादर करण्यासाठी नमुना क्रमांक १२ श्री. वेदपाठक यांनी ठेवलेला नसल्याचे दिसून येते. असे सरकारी साक्षीदार क्रमांक २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ड)** इंदिरा आवास योजना, रमाईघरकुल योजना याबाबत श्री. पुराणीक यांचकडे असलेला वरील योजनेचा पदभार दिनांक ०२-०३-२०१२ पासून श्री. वेदपाठक, कनिष्ठ सहाय्यक यांच्याकडे गटविकास अधिकारी यांचे आदेश दिनांक ०२-०३-२०१२ अन्वये देण्यात आलेला आहे. संबंधिताकडे सदर योजनेचा कार्यभार दिनांक ०२-०३-२०१२ ते २४-०४-२०१२ पर्यंत या कालावधीमधील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांच्याकडून लाभार्थ्यांची पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागात सादर करण्यासाठी नमुना क्रमांक १२ ठेवण्यात आलेले नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ३ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(इ)** इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना व रमाई घरकुल योजने अंतर्गत कनिष्ठ अभियंत्यांकडून लाभार्थ्यांच्या पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागात सादर करणेसाठी नमुना क्रमांक १२ मध्ये नोंद ठेवल्याचे दिसून येत नसल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ई)** इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना व रमाई घरकुल योजने अंतर्गत कनिष्ठ अभियंता कडून लाभार्थ्यांच्या पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागात सादर करणेसाठी नमुना क्रमांक १२ न ठेवून अनियमितता केल्याचे सिध्द होत आहे. असे सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

**उपरोक्त विवेचन, लाभार्थ्यांच्या पहिल्या व दुस-या हप्त्याची देयके लेखा विभागात सादर करण्यासाठी नमुना क्रमांक १२ न ठेवून अपचारी कर्मचारी यांनी अनियमितता केली असल्याची वस्तुस्थिती विचारात घेता, हा दोषारोप सिध्द होत आहे.**

**दोषारोप क्रमांक ५:-(अ)** ३ लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत. शिल्लक ३ विद्युत पंप कोठे गहाळ झाले हे शोधून लवकरात लवकर मी उपलब्ध करून देतो. तथापि, याची चौकशीअंती जबाबदारी माझ्यावर निश्चित होत असेल तर ते मला मान्य आहे व त्यासाठीची नुकसान भरपाई मी भरण्यास तयार असल्याचे, अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या बचावात्मक अंतिम अभिकथनात स्पष्ट केलेले आहे.

**(ब) (१)** अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्या मान्यतेने समाज कल्याण विभागांर्तगत जिल्हा परिषद स्वसंपादीत उत्पन्नातील २० टक्के सेस योजना सन २०११-१२ मध्ये ५ एच.पी. पाणबुडी पंपाचा पुरवठा करणे बाबत विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित उस्मानाबाद यांना आदेशीत केले होते. दिनांक ०५-११-२०११ रोजीच्या आदेशानुसार पंचायत समिती तुळजापूरला ४५-५ एच. पी. पाणबुडी पंप व दिनांक ०३-०१-२०१२ रोजीच्या आदेशान्वये २०-५ एच.पी. पाणबुडी पंप वितरीत करण्याबाबत देण्यात आले होते. या योजनेअंतर्गत ६५ लाभार्थ्यांची यादी पंचायत समिती तुळजापूर यांना दिनांक १८-०२-२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे, असे सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(२)** श्री.अशोक जाधव राहणार काटी यांनी दिनांक ३०-०५-२०१२ रोजीच्या पत्रान्वये समाज कल्याण विभागामार्फत तुळजापूर तालुक्यातील मागासवर्गीय शेतक-यांना मंजूर झालेल्या पाणबुडी पंपामध्ये अनियमितता झाली असल्याबद्दलची तक्रार अर्ज गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचेकडे प्राप्त झाला होता. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०६-०६-२०१२ रोजीच्या पत्रान्वये प्रत्यक्ष अभिलेख्याची पडताळणी करून, मी माझा अहवाल दिनांक १०-०७-२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना सादर केलेला असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(३)** या अहवालात एकूण ६५ लाभार्थ्यांची सविस्तर माहिती असून ३२ लाभार्थ्यांच्या वाटपात अनियमितता झाली असल्याचे २ लाभार्थ्यांना साहित्य मिळाले परंतू काही साहित्य मिळाले नसल्याचे,२० लाभार्थ्यांना लाभार्थी यादीत नाव असूनही लाभ मिळाला नसल्याचे माझ्या निदर्शनास आलेले असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ड)** दोषारोप क्रमांक ३ मधील २ पाणबुडी पंप व ६५ पंपांपैकी वाटप केलेले ६३ पंप वगळता शिल्लक २ पाणबुडी पंप तसेच उपरोक्त परिच्छेदातील ५ पैकी ३ पाणबुडी पंप अशा एकूण ७ पाणबुडी पंपाची वसुली श्री. वेदपाठक यांचेकडून करणे आवश्यक ठरत असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(इ)** दोषारोप क्रमांक ३ मध्ये या दोषारोपाबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. दोषारोप क्रमांक ३ व ५ हे दोन्ही एकाच विषयाच्या बाबतीत आहेत. या योजनेअंतर्गत मोटार वाटपामध्ये अनियमितता झाली असल्याने अपचारी कर्मचारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केला असल्याचे माझे मत असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक ५ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(ई)** दोषारोप क्रमांक ३ मध्ये या दोषारोपबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.दोषारोप क्रमांक ३ व ५ हे दोन्ही एकाच विषयाच्या बाबतीत आहेत.या योजनेअंतर्गत मोटार वाटपामध्ये अनियमितता झाली असल्याने अपचारी कर्मचारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केला असल्याचे माझे मत असल्याचे,सरकारी साक्षीदार क्रमांक ६ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

**(उ)** जिल्हा परिषद स्वयंसंपादित उत्पन्नातील २० टक्के सेस अंतर्गत मागासवर्गीय शेतक-यांना ५ एचपी पाणबुडी पंप वाटपामध्ये जाणीवपुर्वक अनियमितता केली असल्याने, त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याचे सिध्द होत आहे. असे सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

**उपरोक्त विवेचन, अपचारी कर्मचारी यांनी पाणबुडी पंप वाटपात केलेली अनियमितता, एकूण ७ पाणबुडी पंपाची वसुली अपचारी कर्मचारी यांचेकडून करणे आवश्यक असल्याची सरकारी साक्षीदार क्रमांक ४ यांनी नोंदविलेली साक्ष तसेच चौकशी अंती माझ्यावर जबाबदारी निश्चित होत असेल तर, त्यासाठीची नुकसान भरपाई भरण्यास तयार असल्याची अपचारी कर्मचारी यांनी दिलेली स्पष्ट कबुली विचारात घेता, हा दोषारोप सिध्द होत आहे.**

## निष्कर्ष

याप्रकरणात सादर करण्यात आलेले अभिलेखे / दस्तऐवज, सरकारी साक्षीदार क्रमांक १ ते ६ यांनी नोंदविलेल्या साक्षी व उलट तपासणीत स्पष्ट केलेली वस्तुस्थिती, अपचारी कर्मचारी श्री. ए. एच. वेदपाठक, कनिष्ठ सहाय्यक (निलंबीत) यांचे बचावत्मक अंतिम अभिकथन, तसेच सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,पंचायत समिती तुळजापूर श्री. जाधव यांचे स्वयंस्पष्ट असे अंतिम अभिकथन (टाचण) विचारात घेता,अपचारी कर्मचारी श्री. ए. एच. वेदपाठक, कनिष्ठ सहाय्यक (निलंबीत) पंचायत समिती, तुळजापूर धारणाधिकारी शिक्षण विभाग यांचेवर जोडपत्र १ मध्ये ठेवण्यात आलेले दोषारोप खालील प्रमाणे सिध्द होत आहेत.

१) दोषारोप क्रमांक १ :- पुर्णतः सिध्द होत आहे.

२) दोषारोप क्रमांक २ :- अंशतः सिध्द होत आहे.

३) दोषारोप क्रमांक ३ :- पुर्णतः सिध्द होत आहे.

४) दोषारोप क्रमांक ४ :- पुर्णतः सिध्द होत आहे.

५) दोषारोप क्रमांक ५ :- पुर्णतः सिध्द होत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी असे विदित केले की, अपात्र मागासवर्गीय शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर ५ एच.पी पाणबुडीचे वाटप करणे ही योजना जिल्हा परिषदेच्या सेस अंतर्गत येणा-या निधीमधून राबविण्यात आली होती. त्यामध्ये तुळजापूर तालुक्यातील ६५ लाभार्थ्यांना पाणबुडी पंप मिळाला नसल्याबाबत तक्रार होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने कनिष्ठ सहायक, श्री. वेदपाठक यांची चौकशी करण्यात येऊन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आणि त्यांच्याकडून रुपये ४,०२,९६०/- इतकी रक्कम वसूल करण्याचे ठरविण्यात आले आहे. आता श्री.वेदपाठक यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि त्यांना निलंबित करून विभागीय चौकशी पूर्ण होऊन त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. रुपये ४,०२,९६०/- या रकमेपैकी ५० हजार रुपये त्यांच्याकडून वसूल करण्यात आले आहेत. मात्र आता त्याच्यावर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. प्रकरण न्यायप्रविष्ठ असून त्यांना बडतर्फ करण्यात आले आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, श्री.वेदपाठक यांना बडतर्फ करण्यात आले आहे तसेच श्री.वेदपाठक यांच्याकडून शासनाचे पैसे वसूल केले आहेत काय, यावर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विदित केले की, आतापर्यंतम रुपये ४,०२,९६०/- या रकमेपैकी ५० हजार रुपये श्री. वेदपाठक यांच्याकडून वसूल करण्यात आले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, परंतू अद्याप पुष्कळ रक्कम वसूल करणे बाकी आहे. या समितीच्या प्रश्नास सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विदित केले की, श्री. वेदपाठक हे बडतर्फ असल्यामुळे त्यांस पगार मिळत नाही. तसेच त्यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तरीही त्यांच्या गटविमा योजना आणि भविष्य निर्वाह निधीतून न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून ही रक्कम वसूल करण्याचे विभागाचे मत आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, त्याच्या या रकमांमधून शासनाचा निधी वसूल करुन त्यानुसार कार्यवाही करावी.

## अभिप्राय व शिफारशी

समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद द्वारे मागासवर्गीय शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर ५ एच.पी. पाणबुडी पंप खरेदी व वाटपापोटी रुपये ४९,९३,२००/- खर्च नोंदवला आहे. याबाबत लेखापरिक्षणामध्ये असे आढळून आले आहे की, सन २००९ रोजीच्या शासन निर्णयातील वेळापत्रकानुसार योजना न राबविता विलंबाने खरेदी करून पाणबुडी पंप वाटप केलेले आहेत. लेखा परिक्षणासाठी उपलब्ध केलेले प्रस्ताव तपासले असता एकाच कुटुंबातील पती/पत्नी रा. तुळजापूर (भातंब्री) तसेच दुस-या एका कुटूंबातील पती/पत्नी रा.उमरेगव्हाण, ता.उस्मानाबाद हे पती/पत्नी असताना दोन्ही कुटुंबात योजनेचा एका व्यक्तीस लाभ अनुज्ञेय असताना नियमबाह्य लाभ दिल्याने वरील दोन्ही कुटुंबाकडून प्रत्येकी रुपये १७,५२०/- प्रमाणे रुपये २५,०४०/- वसूल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८३ (३) नुसार विभागप्रमुखाने विद्युत मोटारीचा पुरवठा सुस्थितीत प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक तपासणी अहवाल घेवून ९० टक्के रक्कम अदायी करायची आहे. लेख्याच्या पडताळणीवरून असे निदर्शनास आले की, विद्युत मोटारीचा पुरवठा मे. लक्ष्मी हैड्रॉलीक, प्रा. लि. सोलापूर यांचा असून कंपनीने दिलेल्या तपासणी अहवालाच्या आधारे नियमबाह्यरित्या देयक मंजूर केलेले आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून मोटारीची तपासणी करण्यात आलेली नाही. पुरविण्यात आलेल्या पंप संचाच्या किंमती खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा अधिक असणार नाही याची खात्री केल्याचे दिसून आले नाही.

समाजकल्याण विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार २३ लाभार्थ्यांची प्रती पाणबुडी पंप रक्कम १७,५२०/- प्रमाणे रुपये ४,०२,९६०/- पंचायत समिती, तुळजापूर येथील भांडारपालाकडून वसूल करणे आवश्यक आहे. उसानाबाद जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, दिनांक २६ डिसेंबर, २०११ रोजी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये पुर्नविनियोजन केल्यामुळे वेळापत्रकानुसार योजना राबविण्यास विलंब झालेला होता. तसेच उमरेगव्हण ता.उस्मानाबाद येथील लक्ष्मण बंडगर व श्रीमती तानाबाई बंडगर हे लाभार्थी नात्याने पती-पत्नी नसून दोन वेगवेगळे कुटुंबे असल्यामुळे पाणबुडी पंप दिलेले असले तरी औदुंबर पंडित या लाभार्थ्यांच्या पत्नीला देखील पाणबुडी पंपाचा लाभ दिल्यामुळे श्री. औदुंबर पंडीत यांच्याकडून पाणबुडी पंपाची रक्कम रुपये १७,५२०/- चलनाद्वारे भरलेली असल्यामुळे नियमबाह्यरित्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आल्याचे निष्पन्न होत आहे. पाणबुडी पंपाची तपासणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून करून न घेता संबंधित एजन्सीमार्फत तपासणी करून त्यांच्याकडून तांत्रिक तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करून रकमेचे वाटप केलेले आहे. तसेच पुरवठादार संस्थेकडून पुरविण्यात येणा-या पंप संचाच्या किंमती खुल्या बाजारातील दरापेक्षा अधिक नसल्याची खात्री समाजकल्याण अधिकारी यांनी केली आहे हे उत्तर अत्यंत मोघम स्वरुपाचे आहे. तसेच समाजकल्याण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार तुळजापूर येथील भांडारपाल श्री. अतुल वेदपाठक यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले असून मा.न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून श्री. वेदपाठक यांना शालेय शिक्षण विभाग, प्राथमिक जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथे अधिकारी पदावर पुनर्स्थापित करण्यात आलेले आहे. तसेच श्री. वेदपाठक यांनी केलेल्या अपहाराची रक्कम रुपये ४,०२,६९०/- वेतनातून वसुल करण्याबाबतच्या सुचना तुळजापूर पंचायत समितीच्या ग्रामविकास अधिका-यांनी दिलेल्या आहेत. तसेच श्री. वेदपाठक यांच्याविरुध्द कर्तव्यात कसूर केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ चा भंग करणे, पंचायत समिती सेस योजना नियम, १९६७ मधील ३ चा भंग, ५ एच.पी पाणीबुडी पंप वाटपाबाबत अनियममितता, इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवास योजना, रमाई घरकुल योजना यात अनियमितता इत्यादी दोषारोप आहेत.

**श्री. वेदपाठक यांचेकडून रुपये ४,०२,६९०/- रक्कमपैकी रुपये ५०,०००/- वसूल करण्यात आले आहेत. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून श्री. वेदपाठक यांना बडतर्फ करण्यात आले असले तरी त्यांच्या गटविमा योजना आणि भविष्य निर्वाह निधीतून न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून उर्वरित रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच भविष्यात असे अक्षम्य गुन्हे घडू नयेत यादृष्टीने संबंधित पंचायत समिती अथवा जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी शासनाच्या विविध योजनांचे सुयोग्य व पारदर्शक व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने जबाबदारी निश्चित करण्यात यावी व ग्रामविकास विभागाने योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात सर्वसमावेशक परिपत्रक निर्गमित करावे, अशी समितीची शिफारस आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

### पंचायत समिती स्तरावरील भांडारपाल यांनी लोकवाट्याची वसुल केलेली रक्कम भरणा न करता अपहार केल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.५२७/३० (सन २०११-२०१२)**

कृषि विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद द्वारा उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन पंचायत समितीस्तरावरुन वाटप करण्यासाठी पुरवठा केलेल्या कृषि औजारांचे वाटप केल्यानंतरच लाभार्थ्यांकडून वसुल केलेली लोकवाट्याची रक्कम संबंधित भांडारपाल यांनी कृषी विभागाकडे भरणा केली नसल्याचे आढळून आले, याबाबत पुढील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांचे पत्र क्र. पं.स.क./कृषि/कावि/६७७/२०१२, दिनांक ०६.०९.२०१२ नुसार सन २००८-०९ ते सन २०११-१२ मधील प्राप्त साहित्याचे वाटप करुन लोकवाट्याची रक्कम रु.१,२९,२६०/-अद्यापही भरणा केलेली नाही. सदरची रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

(२) कृषी अधिकारी, पंचायत समिती,भूम यांचे पत्र दि.११.१०.२०१२ अन्वये सन २००६-०७ ते २०११-१२ या कालावधीत वाटप केलेल्या साहित्याची लोकवाट्याची रक्कम रू.५,३४,३६६/- भरणा केली नाही असे कळविले आहे. सदरची रक्कम वसुल करून भरणा होणे आवश्यक आहे.

(३) कृषी अधिकारी, पंचायत समिती, परांडा यांचे पत्र क्र./पंसप/ कृषि/कावि/७५४/२०१२ दि.२७.०८.२०१२ अन्वये कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना कळविले आहे की, कृषि औजारांचे वाटप करून लोकवाट्याची रक्कम रू.३,२२,७०२/- वसूल केलेली असताना अद्यापही भरणा केलेली नाही. सदरची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

(४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांचे पत्र क्र/पसउ/आस्था-२/कावि/१२७०/२०१२ दि.०७.०७.२०१२ अन्वये कृषि अधिकारी पंचायत समिती उमरगा यांचे पत्र क्र.२०८०/१२ दि.२७.०६.२०१२ हा संदर्भ देऊन संबंधित गोदामपाल यांना कारणे दाखवा नोटिस देऊन वसूल केलेली रक्कम रु.५,९६,७११/- चा अपहार केल्या प्रकरणी संबंधितांविरूध्द पोलीसात गुन्हा नोंद करण्यास परवानगी मागितलेली असुन त्यानुसार कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी पत्र क्र.१८८९/२०१२ दि.१०.०७.२०१२ अन्वये संबंधितांनी रू.५,९६,७११/- चा अपहार केल्या प्रकरणी संबंधितांविरूध्द पोलीसात गुन्हा नोंद करण्यास परवनगी मागितलेली असुन त्यानुसार कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी पत्र क्र.१८८९/२०१२ दि.१०.०७.२०१२ अन्वये संबंधितांनी रू.५,९६,७११/- चा अपहार केले प्रकरणी संबंधितांविरूध्द पोलिसात गुन्हा नोंद करण्यास परवानगी दिलेली आहे. कृषि अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांचे पत्र क्र.२१०९/१२ दि.१३.०८.२०१२ अन्वये पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन, उमरगा येथे संबंधित गोदामपाल यांनी लोकवाट्याच्या एकुण रू.६,००,५६५/- चा अपहार केल्याने गुन्हा दाखल केलेला आहे.

संबंधित गोदामपाल यांनी सदरचा वसुल केलेला लोकवाटा अद्याप भरणा केलेला नाही. सदरची रक्कम संबंधिताकडून वसुल होणे अपेक्षित आहे.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. कार्यसुची/ २००७/ प्र.क्र.१३२/आस्था-९ दि. १९.०४.२००७ **(परिशिष्ट ८.१)** नुसार कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांची कार्यसूची देण्यात आलेली असून त्यात सुधारित औजारे, किटकनाशक औषधे व खताचे वाटप करण्याबाबतची कार्यवाही करणे बाबत कार्यसूची मध्ये नमुद करण्यात आलेले आहे, परंतु उपरोक्त प्रकरणी विस्तार अधिकारी (कृषी) यांनीच पंचायत समिती कळंब व परांडा येथे अपहार केलेला आहे त्यामुळे संबंधिताचे पर्यवेक्षिय अधिकारी म्हणून पंचायत समिती यांनी सदर बाब वेळीच निदर्शनास आणून देणे आवश्यक असताना सदर बाब अत्यंत विलंबाने निदर्शनास आणून दिली आहे.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १३ नुसार पैश्याच्या व्यवहाराची प्रत्येक नोंद कोणताही वेळ न दडवता त्वरीत लेख्यात घेवून योग्य त्या नोंदवहीत त्याच्या नोंदी घेवून सदर रक्कम त्वरीत जिल्हा निधीचे खाती असलेल्या बँकेत जमा करणे आवश्यक आहे. तसेच नियम ५० (३) नुसार वसूल केलेल्या रक्कमेबद्दल संबंधितास पावती देण्यात येईल व त्या पावती वर समितीच्या कार्यालयात रोखपाल व उपलेखापाल यांचेकडून सही करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ५० (४) नुसार समितीच्या कोणत्याही प्राधिका-यांकडून घेण्यात आलेल्या सर्व पैशाची नियमित व निरापवादपणे पैसे मिळत असतील त्या तारखेस नमुद क्रं.१० मधील दुहेरी बाजु असलेल्या कार्बन कागदाच्या दुस-या प्रतीत पावती देण्यात येईल. परंतु उपरोक्त नियमाप्रमाणे कोणतीच

कार्यवाही केलेली नाही. लाभार्थीकडून वसुल करण्यात आलेल्या लोकवाटा रक्कमेच्या पावत्या संबंधितांना देण्यात येत नाही, त्यामुळे संबंधित भांडारपाल हे लोकवाट्याची रक्कम वसुल केल्यावर त्वरित जिल्हा निधीत जमा करीत नसल्याचे आढळून आले आहे.

(७) भांडारपाल यांनी वसूल केलेल्या लोकवाट्याची रक्कम वेळीच भरणा न करता स्वतःकडे ठेवल्याने पुरवठादारास लोकवाट्याची रक्कम प्रदान करण्यात आलेली नाही. विभागीय व्यवस्थापक म.कृ.उ.वि.म.मर्या, उस्मानाबाद यांचे पत्र क्रं.विकाऊ/कृ.अ.-२०१२-१३/२०१५ दि २७.०६.२०१२ नुसार कृषि औजारांचा लोकवाटा रक्कम रु.७५,९७,६८६/- प्रलंबित आहे असे कळविले आहे. सदर रक्कम सन २००१-०२ ते २०११-१२ या वर्षात राबविण्यात आलेल्या विविध योजनांसाठीच्या लोकवाट्याची असुन त्यासाठी त्यांना प्रदान करावयाची लोकवाट्याची रक्कम अद्यापही प्रदान करण्यात आलेली नाही.

(८) संबंधित भांडारपाल, रोखपाल कनिष्ठ सहाय्यक यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करुन त्यांनी वसुल केलेली एकूण रक्कम रु.१५,८६,८९३/- वसुल करुन पुरवठादारास अदा करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ३६ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती कळंब अंतर्गत सन २००८-२००९ ते २०११-२०१२ या वर्षात के.पु.गळीत धान्य अंतर्गत बळीराम नांगर, नॅपसॅक, मोनोक्रोटोफॉस औषधी यांची रक्कम रुपये ५९,२५१/- एवढी श्री.जाधवर एम.बी, विस्तार अधिकारी कृषी यांच्याकडे प्रलंबित होती. तसेच सन २००८-२००९ ते २०१०-२०११ अंतर्गत गळीत धान्य योजनेअंतर्गत बळीराम नांगर, सारा यंत्र, नॅपसॅक पंप यांची रक्कम रुपये ३,७१६/- श्री. तावरे एस.एस, विस्तार अधिकारी कृषी यांच्याकडे प्रलंबीत होती तसेच सन २०१०-२०११ मध्ये गळीत धान्य योजने अंतर्गत पीएसबी, रायजोबियम, अझोटो बॅक्टर यांची रक्कम रुपये ६,६५०/- श्री.राऊत बी.आर, कृषी अधिकारी यांच्याकडे प्रलंबीत होती तसेच सन २००९-२०१० मध्ये केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत सारा यंत्र या औजाराची रक्कम रुपये ८३०/- श्री.देशपांडे डी.एन. यांच्याकडे प्रलंबित होती. त्याचप्रमाणे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब यांच्याकडे गळीत धान्य योजना सन २०११-२०१२ अंतर्गत औषधाची रक्कम रुपये ५८,५९०/- इतकी रक्कम प्रलंबित होती. रुपये २२३/- रक्कम किटकनाशक नमुना तपासणी साठी पाठविल्याने कमी करण्यात आलेली आहे याप्रमाणे एकूण १,२९,०३७/- संबधीतांना नोटीस देवुन वसुल करण्यात आलेली आहे.

(१) पंचायत समिती, कळंब येथे श्री.बी.आर.राऊत (कृ.अ) श्री.जाधवर, एम.बी., वि.अ (कृ), श्री.तावरे, एस.एस., वि.अ.कृ, श्री.देशपांडे डी.एन.,व.स. यांचेकडे कृषी गोदामाचा पदभार असताना रक्कम रुपये १,२९,२७०/- रोख स्वरुपात लोकवाटा शेतक-यांकडून घेऊन स्वतःकडे ठेवला होता. गट विकास अधिकारी पंचायत समिती कळंब यांनी पत्र पंसक/कृषी/कावि/६७७/२०१२ दिनांक ०६.०९.२०१२ अन्वये कळविल्यानुसार त्यांचेकडील प्रलंबित लोकवाटा खालील प्रमाणे डी.डी. द्वारे वसूल करुन एम.ए.आय.डी.सी. उस्मानाबाद यांचेकडे अदा करण्यात आला आहे. कर्मचारी निहाय प्रलंबित लोकवाटा रक्कम व वसुली खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री.एम.बी.जाधवर | वि.अ.कृ | ५९२५१ |
| २ | श्री.बी.आर.राऊत | कृ.अ. | ६६५० |
| ३ | श्री.एस.एस.तावरे | वि.अ.कृ | ३७१६ |
| ४ | श्री.डी.एन.देशपांडे | व.स. | ८३० |
| ५ | तालुका कृषी अधिकारी कळंब | | ५८५९० |
| ६ | सॅम्पल (पं.स.कळंब) | | २३३ |
| | | **एकूण** | **१,२९,२७०** |

तसेच संबंधित शासकीय रक्कम हातावर शिल्लक ठेवून अपहार केल्याने या कार्यालयांचे नोटीस दिनांक ०८/१२/२०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आला आहे.

कर्मचारी निहाय प्रलंबित रक्कम वसूल करुन पुरवठा संस्थेस अदा केल्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | डी.डी.क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ७२१४७३ | २०.९.१२ | १५८२५ |
| २. | ६०८३३७ | ११.९.१२ | ३४६२३ |
| ३. | ७२१६३५ | ०३.१०.१२ | २३१०० |
| ४. | ७२१७३८ | ०९.१०.१२ | १५००० |
| ५. | ७२२०२१ | २१.११.१२ | २०४९० |
| ६. | ६०८३४२ | ०९.१०.१२ | १२६६ |
| ७. | सँपल घेतले. | | २३३ |
| ८. | ७७७०८७ | २७.०९.१२ | ६६५० |
| ९. | ५६६७४९ | २३.०५.१२ | ५८९८ |
| १०. | ५९६७५० | २३.०५.१२ | १२८५ |
| ११. | ६०८४४१ | ०९.१०.१२ | १६२० |
| १२. | ५६३९९९ | २६.०९.१२ | १६२० |
| १३. | ६०८३४३ | ०९.१०.१२ | ८३० |
| १४. | ६०८३५१ | १७.१०.१२ | ८३० |
| | | **एकूण** | **१,२९,२७०** |

**प्रस्तावना :**

पंचायत समिती भूममध्ये सन २००६-२००७ या वर्षात केंद्र पुरस्कृत गळीत व कडधान्य कार्यक्रमांतर्गत एचडीपीई पाईपच्या १०५ नगाचा २ लाभार्थीचा लोकवाटा रक्कम रुपये २७८२५/- श्री.व्ही.बी.जांबळे (तत्कालिन गोदाम पाल) यांच्याकडे प्रलंबित होता. तसेच सन २००९-२०१० ते २०११-२०१२ या कालावधीत जि.प.सेस, के.,पु.गळीत व कडधान्य योजनांतर्गत नॅपसॅक पंप, एचडीपीई पाईप, व डिझेल इंजिन यांचेसाठी २०१६ लाभार्थ्यांनी भरणा केलेली ५० टक्के लोकवाट्याची रक्कम रुपये ५०६५४१/- श्री.सी.बी.खरपुडे (तत्कालिन गोदाम पाल) यांच्याकडे प्रलंबीत होती. ती स्वतःकडे ठेवून विलंबाने शासन खाती भरणा केलेली आहे.

(२) पंचायत समिती भूम यांचेकडे प्रलंबित लोकवाटा रू.५,३४,३६६/- (श्री.सी.बी.खरपुडे क.स.रु.५०६५४१/- व श्री.जांभळे रु.२७८२५/-) असून श्री.खरपुडे यांच्याकडून रुपये ५०६५४३/- व श्री. जांभळे यांच्याकडून रु २७८२५/- वसूल करुन एकूण रु.५३४३६८/- खालीलप्रमाणे डी.डी.द्वारे एम.ए.आय.डी.सी. उस्मानाबाद यांचेकडे अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. (१) | डी.डी.नं. (२) | दिनांक (३) | रक्कम (४) |
|---|---|---|---|
| १. | ९४९९०० | १४.१२.१२ | ११५५० |
| २. | ५९५५५७ | ३०.१०.१२ | ३६५१४ |
| ३. | ९४९८७५ | १२.१२.१२ | ३५५०४ |
| ४. | ५९५५५९ | ३०.१०.१२ | ६५१०० |
| ५. | ९४९७०१ | २७.१०.१२ | ४९३७४ |

**तक्ता—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ६. | ९४९८४८ | ०७.१२.१२ | ३७९८ |
| ७. | ९४९७०२ | २७.१०.१२ | २२४७९ |
| ८. | ५९५५५८ | ३०.१०.१२ | ९९१७० |
| ९. | ५९५४९३ | २७.०७.१२ | २१००० |
| १०. | ५९५५५६ | ३०.१०.१२ | २१००० |
| ११. | ५९५२१० | २७.०३.१२ | ४२१०६ |
| १२. | ५९५५६० | ३०.११.१२ | ४२१०८ |
| १३. | ५९५४९५ | ०१.०८.१२ | ८७६० |
| १४. | ५९४६४३ | ०३.११.१२ | २६२८० |
| १५. | ५९४६६२ | ०२.०९.१२ | २१८०० |
| १६. | ९७८८४८ | ०३.०९.१५ | ५२७५ |
| १७. | ९७६५२२ | ११.०९.१५ | ४००० |
| १८. | ९७८९२५ | ०८.०९.१५ | १८५५० |
| | | **एकूण रुपये** | **५३४३६८** |

परंतु याव्यतिरिक्त कृषी विभागाच्या अंतिम तपासणी ताळमेळ अहवालानुसार श्री.सी.बी.खरपुडे क.स.यांचेकडे रक्कम रु.१,०६,८१३ प्रलंबित असून संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन भूम येथे भा.दं.वि.संहिता कलम ४०९ नुसार गुन्हा क्रमांक १२० दिनांक ८/१२/२०१२ रोजी नोंद केला असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच श्री.जांभळे व्ही.व्ही. क.स. यांना दिनांक ८/१२/२०१५ अन्वये नोटीस देण्यात आली आहे.

**प्रस्तावना :**

पंचायत समिती, परांडा येथे सन २००९-२०१० ते २०११-२०१२ मधील केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजना पॉवर स्प्रे पंप ११ नग रुपये २३,७८०/-, ऊस विकास योजना पॉवर स्प्रे पंप १२ नग रुपये २५,३५०/-, जि.प.सेस पॉवर स्प्रे पंप ५ नग १०,५५०/-, के.पु.गळीत धान्य योजना एच.डी.पी.ई पाईप ४६७ नग १० लाभार्थी कडील रुपये १,५९,९५६/-, मका विकास कार्यक्रम एच.डी.पी.ई. पाईप २६६ नग ७ लाभार्थी रुपये ८९,२४३/- व के.पु गळीत धान्य योजना नॅपसॅक पंप २० नग रुपये १३,९२६/- असे एकूण रुपये ३,२२,७७५/- चा अपहार झाला होता. सदर अपहारित रक्कम श्री.जाधवर आर.जी., श्री.एस.आर.चव्हाण, श्री.रणखांब वाय.जे. यांच्याकडून वसुल करुन भरणा करण्यात आलेली आहे.

(३) पंचायत समिती परांडा येथे श्री.जाधवरआर.जी., कनिष्ठ सहाय्यक, श्री.चव्हाण, श्री.रणखांब वाय.जे.,वि.अ. (कृषी) यांचेकडे कृषी गोदामाचा पदभार होता. रक्कम रुपये ३,२२,७०२/- संबंधितांनी रोख स्वरुपात लोकवाटा जमा करुन स्वतः कडे ठेवली होती. गट विकास अधिकारी, परांडा यांनी संबंधितानी रोख स्वरुपात लोकवाटा जमा करुन स्वतः कडे ठेवली होती. गट विकास अधिकारी, परांडा यांनी संबंधितांना नोटीस देऊन लोकवाटा रक्कम वसूल करुन पूर्ण पुरवठा संस्थेस अदा केला आहे.

कर्मचारी निहाय प्रलंबित लोकवाटा रक्कम व वसुली खालील प्रमाणे.

| अ.क्र. (१) | कर्मचा-यांचे नाव (२) | पदनाम (३) | प्रलंबित लोकवाटा (४) | पुरवठा करुन संस्थेस भरणा केलेली रक्कम (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री.जाधवर | क.स. | २४७३५० | २४७३५० |
| (२) | श्री.चव्हाण एस.आर. | रोखपाल | ६६९१२ | ६६९१२ |
| (३) | श्री.रणखांब वाय.जे. | वि.अ.(कृ) | ८४४० | ८४४० |
| | | **एकूण** | **३,२२,७०२** | **३,२२,७०२** |

तसेच संबंधित शासकीय रक्कम स्वतःकडे शिल्लक ठेवून तात्पुरता अपहार केल्याने या कार्यालयांचे नोटीस क्रमांक जिपउ/कृषि/तंत्र-३/कावि/२७०४, २७०७, २७०९ / २०१५ दिनांक ०८/१२/२०१५ अन्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना** :

पंचायत समिती, उमरगा अंतर्गत सन २०११-२०१२ मधील गळीत धान्य विकास योजना, राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजना, जि.प.सेस योजना, जिल्हा परिषद, सेस योजना अंतर्गत नॅपसॅक स्प्रे पंप, एच.डी.पी.ई. पाईप, डायमिथोएट, कार्बनडायझिन, पॉवर पंप, एच.डी.पी.स्प्रे पंप ५ एच.पी.पाणबुडी पंप, या साहित्याचा अपहार तत्कालिन गोदाम पाल श्री.एस.डी. गायकवाड यांनी केलेला आहे.

(४) पंचायत समिती उमरगा यांचेकडील लोकवाटा रक्कम रु.६,००,५६५/-, इतक्या रक्कमेचा अपहार झालेला आहे. त्यास्तव संबंधीत कनिष्ठ लिपीक, श्री.एस.डी.गायकवाड यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांचे आदेश क्रमांक पंसउ/आस्था२/कावि/१६०३/२०१२. दिनांक २७/८/२०१२ अन्वये निलंबित करुन त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन, उमरगा येथे भा.दं.वि.सं.कलम ४०९ अन्वये गुन्हा क्रमांक १५८/२०१२ दिनांक १३/०८/२०१२ नोंद करण्यांत आलेला आहे. तसेच संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी करण्यांत आली असून चौकशीमध्ये सर्व दोषारोप सिध्द झालेले आहेत. परंतू, प्रकरण मा.प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग-१ उस्मानाबाद यांच्या न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(५) पंचायत समिती, परांडा येथे विस्तार अधिकारी (कृषी) श्री.रणखांब वाय.जे. यांनी लोकवाटा रक्कम अपहार केलेला असून गट विकास अधिकारी, परांडा यांनी नोटीस देऊन अपहारित रक्कम वसूल करुन पुरवठा संस्थेस अदा केली आहे.

पंचायत समिती कळंब येथे श्री.जाधवर एम.बी.विस्तार अधिकारी (कृषी) श्री.तावरे एस.एस.(वि.अ.कृ) व श्री.राऊत बी.आर (कृ.अ.) यांनी लोकवाटा अपहारित केल्याने गट विकास अधिकारी कळंब यांनी नोटीस देऊन अपहारित रक्कम वसूल करुन पुरवठा संस्थेस अदा केले आहे.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत सामिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १३, ५०(४) नुसार कार्यवाही करणेबाबत सर्व गट विकास अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत. तथापि, सद्यःस्थितीत शेतक-यांकडून लोकवाट्याची रक्कम रोख स्वरुपात न घेता धनाकर्ष स्वरुपात घेवून पुरवठा संस्थेस अदा करण्यात येत आहे.

(७) विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, उस्मानाबाद यांनी पत्र क्र.विकाऊ/कृअ/२०१२-१३/२०१५ दि.२७.०६.२०१२ अन्वये कृषि विभागाकडे सन २००१-०२ ते २०११-१२ या कालावधीत रुपये ७५,९७,६८६/- लोकवाटा प्रलंबित असलेबाबत कळविले आहे, त्यापैकी सद्यःस्थितीत रुपये ५६,१२,६३७/- इतका लोकवाटा विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, उस्मानाबाद यांचेकडे जमा करण्यात आलेला आहे. रक्कम रुपये ७,०७,३८०/- अद्याप अपहारितांकडे प्रलंबित आहे. तसेच रुपये २,९१,३३१/-, नादुरुस्त साहित्याचा लोकवाटा वसूल केला नाही.

(८) रक्कम रुपये १,६९,३७१८/- खालील प्रमाणे तालुकानिहाय अपहारित होती.

| अ.क्र | पं.स.चे.नाव | अपहारित रक्कम | अपहारात गुंतलेल्या कर्मचा-यांची नावे |
|---|---|---|---|
| १. | उमरगा | ६००५६५ | श्री.गायकवाड एस.डी. |
| २. | परांडा | ३२२७०२ | श्री.जाधवर आर.जी.क.स. |
| ३. | कळंब | १२९२७० | श्री.जाधवर एम.बी., |
| | | | श्री.राऊत बी.आर., |
| | | | श्री.तावरे एस.एस., |
| | | | श्री.देशपांडे डी.एन., |
| | | | ता.कृ.अ.कळंब |
| ४. | भुम | ६४११८१ | श्री.खरपुडे सी.बी.क.स. |
| | | | श्री.जांभळे व्ही.व्ही. क.स. |
| | **एकूण** | **१६,९३,७१८** | |

उक्त अपहारित रक्कमेपैकी खालील प्रमाणे रक्कम वसूल झालेली आहे.

| पं.स.चे.नाव | कर्मचा-यांची नाव | वसुल रक्कम | प्रलंबित रक्कम |
|---|---|---|---|
| परांडा | श्री.जाधवर आर.जी. क.स. | ३२२७०२ | निरंक |
| कळंब | श्री.जाधवर एम.बी. | | |
| | श्री.राऊत बी.आर. | | |
| | श्री.तावरे एस.एस. | १२९२७० | निरंक |
| | श्री.देशपांडे डी.एन. | | |
| उमरगा | श्री.गायकवाड एस.डी. क.स. | निरंक | ६००६५ |
| भुम | श्री.खरपुडे सी.बी., क.स. | ५०६५४१ | १०६८१५ |
| | श्री.जांभळे व्ही.व्ही.,क.स. | २७८२५ | निरंक |
| | **एकूण** | **९,८६,३३८** | **७,०७,३८०** |

रक्कम रुपये १६९७१८/- पैकी ९८६३३८/- वसुल करुन पुरवठादारास अदा करण्यात आले आहे. महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखासंहिता १९६८ चे नियम ३६ अनुसार संबंधितांवर कार्यवाही केली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कृषी विभागाकडील विविध योजनांमध्ये जमा केलेल्या लोकवाट्याची रक्कम रुपये १,२९,२७०/-, रुपये ५,३४,३६६/-, रुपये ३,२२,७०२/-, रुपये ६,००,५६५/- अशी एकूण रुपये १५,८६,९०३/- कार्यालयात जमा न करता नियमबाह्यपणे स्वतःकडे ठेऊन अपहार करणा-या कर्मचा-यांवर कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली, अशी कारवाई केली नसल्यास कारवाई न करण्याची कारणे काय आहेत, तसेच लोकवाट्याच्या अपहारित रक्कमेच्या वसुलीची सद्यःस्थिती काय आहे.

यावर जिल्हा कृषि विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पंचायत समिती, कळंब येथे विविध योजनांमध्ये जमा केलेल्या लोकवाट्याची रक्कम १,२९,२७०/- इतक्या रुपयांचा यामध्ये अपहार झालेला होता. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांनी दिनांक ०६-०९-२०१२ च्या पत्रान्वये लोकवाट्याची रक्कम डी.डी.द्वारे वसूल करुन एम.ए.आय.डी.सी.,उस्मानाबाद यांचेकडे जमा केलेली आहे.

मुद्दा क्रमांक दोनच्या अनुषंगाने पंचायत समिती, भूम यांच्याकडे प्रलंबित लोकवाटा ५,३४,३६६/- रक्कमेचा अपहार केलेला होता. अंतिम ताळमेळ बसविल्यानंतर अपहाराची रक्कम रुपये ६,४१,१७१/- एवढी होती. यामध्ये श्री.खरपुडे यांच्याकडून ५,०६,५४१/- रुपये व श्री. जांभळे यांच्याकडून २७,८२५/- रुपये वसुल केलेली आहे. सद्यःस्थितीत श्री.खरपुडे यांच्याकडून आणखी १,०६,८१५/- रुपये वसूल करण्याचे बाकी आहे.

मुद्दा क्रमांक तीनच्या अनुषंगाने पंचायत समिती, परांडा येथे रक्कम रुपये ३,२२,७०२/- संबंधितांनी रोख स्वरुपात लोकवाटा जमा करुन स्वतःकडे ठेवली होती.गट विकास अधिकारी परांडा यांनी सबंधितांना नोटीस देऊन लोकवाटा रक्कम वसूल करुन पूर्ण रक्कम पुरवठा संस्थेस अदा केली आहे.

उपरोक्त संबंधित तीनही कर्मचा-यांना नोटीसा देऊन लोकवाटा रक्कमा वसूल करुन पूर्ण रक्कम पुरवठा संस्थेस अदा केल्या आहेत. तसेच पंचायत समिती, उमरगा येथे संबंधितांनी ५,९६,७११/- रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद केलेला आहे. ताळमेळ केला असता रुपये ६,००,५६५/- एवढा अपहार केल्याचा गुन्हा दाखल केलेला आहे. संबंधित कर्मचारी श्री. गायकवाड यांना निलंबित करुन पोलीस स्टेशन, उमरगा येथे दिनांक १३-०८-२०१२ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला होता. संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली असून

चौकशीमध्ये सर्व दोषारोप सिध्द झालेले आहेत.परंतु, सद्यःस्थितीत प्रकरण माननीय प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग-१ उस्मानाबाद यांच्या न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

मुद्दा क्रमांक ५ च्या अनुषंगाने पंचायत समिती परांडा येथील विस्तार अधिकारी (कृषी) श्री. रणखांब वाय. जे. यांनी लोकवाटा रक्कम अपहार केलेली असून, गट विकास अधिकारी परांडा यांनी त्यांना नोटीस देऊन अपहारित रक्कम वसूल करुन पुरवठा संस्थेस अदा केलेली आहे.

पंचायत समिती, कळंब येथील श्री.जाधव एम. बी. विस्तार अधिकारी (कृषी), श्री.तावरे एस. एस. (वि.अ.कृ) व श्री.राऊत बी. आर. (कृषी अधिकारी) यांनी लोकवाटा रक्कम अपहारित केल्याने गट विकास अधिकारी, कळंब यांनी नोटीस देऊन अपहारित रक्कम वसूल करुन पुरवठा संस्थेस अदा केली आहे.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, अपहार झालेला आहे म्हणून त्यांच्याकडून रक्कम वसूल केली याबाबत समिती समाधान व्यक्त करते. परंतु संबंधितांच्या विरोधात कोणती कारवाई केलेली आहे याबाबत समितीस माहिती द्यावी. यावर जिल्हा कृषि अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, श्री. गायकवाड यांना निलंबित करुन पोलीस स्टेशन उमरगा येथे दिनांक १३-०८-२०१२ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये सर्व दोषारोप सिध्द झालेले आहेत. परंतु, सद्यःस्थितीत प्रकरण माननीय प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग-१ उस्मानाबाद यांच्या न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे, त्याचप्रमाणे श्री.खरपुडे यांच्या विरोधात देखील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रकरण न्यायप्रविष्ठ असून, त्याची सद्यःस्थिती काय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधित कर्मचा-यांनी अपहार केलेला असल्यामुळे प्रथम त्यांच्याविरोधात एफआयआर नोंदविल्यानंतर पोलीस केस दाखल केली होती. संबंधित कर्मचा-यांची विभागीय चौकशी पूर्ण केल्यानंतर नोकरीतून का काढून टाकण्यात येऊ नये अशा प्रकारची नोटीस बजावलेली आहे.संबंधित कर्मचा-यांच्या विरोधात फौजदारी कारवाई सुरु आहे. सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. आता सद्यःस्थितीत फौजदारी प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्यांना निलंबित केलेले आहे.

विभागीय चौकशीमध्ये दोषी असल्याचा ठपका ठेवल्याची माहिती माननीय न्यायालयास अवगत केली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हा परिषदेतील विधीज्ञाकडे या प्रकरणी आवश्यक ती माहिती आहे. संबंधित कर्मचा-यांची विभागीय चौकशी पूर्ण केल्यानंतर नोकरीतून का काढून टाकण्यात येऊ नये अशा प्रकारची नोटीस त्यांना बजाविण्यात आलेली आहे. या प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर योग्य तो प्रयत्न करण्यात येत आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधितांनी जवळजवळ ९० लक्ष रुपयांचा अपहार केलेला असून, ती बाब विशेष पर्यवेक्षक अधिका-यांच्या त्याच वेळी लक्षात का आली नाही, या प्रकरणांमध्ये एकूण किती कर्मचारी दोषी आहेत.यावर जिल्हा कृषी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, उमरगामध्ये एक कर्मचारी, कळंबमध्ये चार कर्मचारी, भूममध्ये दोन कर्मचारी आणि परांडा मध्ये तीन कर्मचारी दोषी आहेत. या संबंधित सर्व कर्मचा-यांच्या विरोधात क्रिमिनल केसेस दाखल केलेल्या आहेत. संबंधितांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली असून विभागीय चौकशीमध्ये संबंधित कर्मचारी दोषी असल्याचे सिध्द झालेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, विभागीय चौकशीमध्ये संबंधित कर्मचारी दोषी असल्याचे सिध्द झाल्यानंतर त्यांना कोणती शिक्षा सुनावलेली आहे. विभागीय चौकशीमध्ये संबंधित कर्मचारी दोषी असल्याचे सिध्द झाल्यानंतर त्यांच्याकडून अपहारित रक्कम व्याजासहित वसुल करण्याबाबत सांगण्यात आले आहे अशी जिल्हा कृषी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली.

विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर कारवाई प्रस्तावित करणे अपेक्षित असते. या प्रकरणी कारवाई करण्याबाबत टाळाटाळ केली जात असल्याचे समितीस दिसून आले. त्यामुळे सदरहू प्रकरणाच्या संदर्भात संबंधित सचिवांची साक्ष घेतली जाईल. सदरहू साक्षीदरम्यान विभागीय चौकशी अहवाल आणि वसुलीच्या रक्कमेची सद्यःस्थिती समितीला अवगत करावी असे समितीने निदेश दिले. यावर जिल्हा कृषी अधिकारी यांनी संबंधितांकडून ९ लाख ८६ हजार ३६८ रुपये वसुल केले आहेत. तसेच अजून ७ लाख ७ हजार रुपये वसुल करण्याचे बाकी आहे अशी माहिती दिली. यावर समितीने यासंदर्भातील अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अपहारित रकमेच्या संदर्भात समितीने तातडीने कार्यवाही करुन अपहारित रक्कम संबंधिताकडून व्याजासहित वसुल करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार अपहारित रकमेची वसुली करण्यात आली आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, प्रस्तुत प्रकरणी एस.डी.गायकवाड,

कनिष्ठ लिपीक, पंचायत समिती, उमरगा यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले असले तरी अपहारित व्याजासहित रक्कम रुपये ८,३४,७४६/- वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच श्री. एस. डी. गायकवाड यांना बडतर्फ केल्यानंतर त्यांना देय असलेल्या रकमा कार्यालयाने अदा केल्या आहेत काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अपहारित रक्कम व्याजासह वसूल करण्यासाठी कार्यालयाने क्र. जिपऊ/तंत्र.३/२८९५/२०१६, दि.४/११/२०१६ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. परंतु श्री. एस. डी. गायकवाड यांचेकडून कोणत्याही प्रकारची रक्कम वसूल झालेली नाही. त्यास्तव खात्याने त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या नावावर असलेल्या स्थावर मालमत्तेची माहिती संबंधित ग्रामसेवक, गावकामगार, तलाठी व मुख्याधिकारी न.प.उमरगा यांचेकडून घेतली असता त्यांच्या नावावर कोणत्याही स्वरुपाची स्थावर मालमत्ता नसलेबाबत संबंधितांना कळविले आहे.

श्री. एस. डी. गायकवाड यांना सेवेतून बडतर्फ केले असल्यामुळे त्यांना शासनाकडून कोणत्याही स्वरुपाची रक्कम देय नाही. त्यांच्या भ.नि.नि. खाते क्रमांक A.१९८४ मध्ये त्यांच्या बडतर्फ समयी रुपये ९०४६/- रक्कम जमा असून सदर रक्कम त्यांच्या स्वाक्षरीशिवाय आहरण करता येत नाही. सध्यःस्थितीत श्री. एस. डी. गायकवाड यांचेकडे मूळ अपहारित रकमेपैकी रु.५,८०,५६५/- व व्याज रु.२,४५,३७५/- असे एकूण रु.८,३४,९४०/- येणे बाकी आहे.

अपहार प्रकरणी संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन, उमरगा येथे गुन्हा नोंद केला असून गुन्हा नोंदवही क्र.१५८/२०१२ आहे. सध्या प्रकरण मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, उमरगा (क.स्तर) कोर्ट क्र.२ येथे न्याय प्रविष्ट आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :** जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

**प्रस्तावना :** - महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ मधील नियम ६ (३) च्या तरतुदीनुसार श्री. एस. डी. गायकवाड, निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांच्या विरुध्द मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी कारणे दाखवा नोटीस क्रमांक जिनउ/साप्रवि/ने-५/कावि/४४९७-९८/२०१२, दिनांक १९/१२/२०१२ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करुन त्यांचे आदेश क्रमांक जिपउ/साप्रवि/ने-५/कावि/५५६-५८/२०१३, दिनांक १६/०२/२०१३ अन्वये माजी चौकशी अधिकारी व श्री. डी. के. सोनटक्के, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करुन सदरचे प्रकरण विभागीय चौकशीसाठी सुपूर्द केले आहे.

**अपचारी कर्मचारी श्री. एस. डी. गायकवाड, निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत.**

**दोषारोप क्रमांक १ :** - श्री. एस. डी. गायकवाड, क.स. (गोदामपाल कृषी), पंचायत समिती, उमरगा यांनी सन २०१०-२०१२ मधील विविध योजने अंतर्गत कृषि निविष्ठा लोकवाटा रक्कम रु ६,००,५६५/ इतका भरणा न करता अपहार केलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ नियम ३ चा भंग केलेला आहे.

**दोषारोप क्रमांक २ :** - श्री. एस. डी. गायकवाड क.स.(गोदामपाल कृषि) यांनी सन २०१०-२०११ पासूनच्या पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नं.३३ मध्ये नोंदी न घेणे, खाडाखोड करणे, पावती क्रमांक व रक्कम न दाखविणे व अभिलेखे अद्ययावत न ठेवणे व कृषी निविष्ठा वाटप करणे.

**दोषारोप क्रमांक ३ :** - श्री. एस. डी. गायकवाड, क.स.(गोदामपाल कृषी) यांनी कारणे दाखवा नोटीसचा खुलासा वेळेत न सादर करणे व कृषी अधिकारी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन न करणे, पंचायत समिती रोखपाल / सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे जमा केलेली रक्कम त्यांना योग्य त्या लेखा शिर्षाखाली जमा करणे आवश्यक होते, परंतु संबंधित हे चलन न स्विकारता अथवा कोणत्या लेखा शिर्षाखाली रक्कम भरावयाची आहे, याबाबत मार्गदर्शन न करता, रोख स्वरुपात रक्कम घेत होते व त्याबाबत कोणतेही पोहच देत नव्हते. पोहच देण्याबाबत वारंवार विनंती केली असता रक्कम जमा करुन घेतली आहे असे मला सांगत होते. व लेखा विभागाचे कामकाजाबाबत मी स्वतः अनभिज्ञ असल्यामुळे त्यांनी रक्कम जमा केली आहे. सदर रक्कम मी त्या वेळी रोखपाल/ सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे जमा केलेली आहे.

विभागाकडून प्राप्त झालेल्या सर्व निविष्ठांच्या नोंदी पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमुना क्रमांक ३३ मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. तसेच आर्थिक व्यवहारांच्या नोंदी साठा नोंदवहीत घेणेबाबत मला ज्ञात नव्हते, अथवा त्याबाबत कोणीही मला मार्गदर्शन केलेले नाही. साहित्य वाटप केल्यावर त्या त्या लाभार्थ्यांची नांवे साठा नोंद वहीत घेवून त्यापुढे त्यांची स्वाक्षरी घेत होतो व याबाबत यापूर्वी कृषी अधिकारी यांच्या सूचनेनुसार कृषी निविष्टांचे वाटप केलेले आहे. लाभार्थ्यांना अर्जावर व साठा नोंदवही वेळोवेळी कृषी अधिकारी यांना दर्शवून त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतलेली आहे.

आर्थिक व्यवहाराबाबत नोंदी घेणे याबाबत मी स्वतः अनभिज्ञ असल्यामुळे पावती क्रमांक, दिनांक, रक्कम याची नोंद साठा नोंदवहीत घेतलेली नाही. तसेच याबाबत मला कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शन केलेले नाही, यामुळे शिफारशी शिवाय कृषी निविष्ठांचे वाटप केलेले आहे.

आर्थिक व्यवहाराच्या नोंदी वगळता मी सर्व अभिलेखे साठा नोंदवह्या, लाभार्थी अर्ज, अद्ययावत ठेवलेले आहेत. निविष्ठांचा लोकवाटा स्वतःकडे प्रलंबित न ठेवता त्वरित रोखपाल / सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे जमा केलेला आहे. लाभार्थ्याच्या अर्जावर विस्तार अधिकारी (कृषी) / कृषी अधिकारी यांची स्वाक्षरी घेतल्यावर लाभार्थ्यांना निविष्ठांचे वाटप केलेले आहे. तसेच कॅशबूक लिखाणाचे काम माझ्याकडे नसल्यामुळे व त्याची जबाबदारी पंचायत समिती रोखपाल / सहाय्यक लेखाधिकारी यांची असल्यामुळे आर्थिक व्यवहार केल्याच्या नोंदी कॅशबुक मध्ये वेळेवर घेत नसल्यामुळे अनियमितता झालेली आहे. कृषी अधिकारी यांचे सूचनेनुसार सर्व साहित्य वाटप केलेले आहे. गटविकास अधिकारी यांच्या कारणे दाखवा नोटीस दिनांक ०७-०७-२०१२ चा खुलासाही सादर केलेला आहे. लाभार्थ्यांकडून स्विकारलेला लोकवाटा पंचायत समिती, रोखपाल/सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे त्वरित जमा केलेला असल्यामुळे पुनःश्च रुपये ६,००,५६५/- चा भरणा करणे शक्य नाही. त्याप्रमाणे सदर रकमेचा अपहार मी केलेला नसून सर्व रकमा जमा केलेल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे मी माझे अभिवादन सादर करीत आहे. यामध्ये मी कोणताही गैरव्यवहार अथवा अपहार केलेला नसून केवळ लेखा विभागाचे कामकाजाबाबत मी अनभिज्ञ असल्यामुळे व त्याबाबतचे कोणतेही मार्गदर्शन नसल्यामुळे सदर बाब झालेली आहे असे मी सविनय आपले निदर्शनास आणून देत आहे. तसेच यापूर्वी (सन २०१०-२०११ पूर्वी) याबाबत कोणतेही तक्रार झालेली नाही.

तरी माझे अभिवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा व खुलासा मान्य करावा अशी आपणास सविनय विनंती करीत आहे.

माझा सदर खुलासा दिनांक ३०-०१-२०१३ चा ग्राह्य धरण्यात यावा ही विनंती.

**सरकारी साक्षीदार क्रमांक १ श्री. ए. ए. अंबुरे, कृषि अधिकारी, पंचायत समिती उमरगा यांची साक्ष : -**

मी, अविनाश अनुरुद्र अंबुरे, वय ३२ वर्ष, राहणार उस्मानाबाद, दिनांक १४-०८-२००६ पासून आजपर्यंत कृषि अधिकारी या पदावर पंचायत समिती उमरगा येथे कार्यरत आहे.

मी श्री. एस. डी. गायकवाड यांना ओळखतो. त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे. त्यांचे विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीमध्ये मी माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

**दोषारोप क्रमांक १ :** -मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार मी स्वतः गोदामपाल कृषी यांच्या गोडाऊनची तपासणी केलेली आहे. अंतिम तपासणी दिनांक २०/०७/२०१२ ते ०४/०८/२०१२ या कालावधीत पूर्ण करुन मी माझा अहवाल दिनांक ०४/०८/२०१२ रोजी मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांना सादर केलेला आहे. या अहवालात श्री. एस. एम. महाजन, विस्तार अधिकारी, श्री. जी. एन. राठोड, वरिष्ठ लिपिक, श्री. बेलुरकर आर. एच., सहाय्यक लेखाधिकारी व मी स्वतः कृषी अधिकारी, पंचायत समिती, उमरगा या नात्याने स्वाक्षरी केलेली आहे. या अहवालानुसार गळीत धान्य विकास कार्यक्रम, राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजना, मका विकास कार्यक्रम, ऊस विकास व जि.प. सेस, कृषी अभियांत्रिकीकरण या योजनेअंतर्गत प्राप्त साहित्य लाभार्थ्यांना वाटप करतांना जमा झालेला सन २०११ -२०१२ मधील लोकवाटा गोदामपाल श्री. गायकवाड यांनी वेळोवेळी लेखा विभागात रोखपालाकडे जमा केलेला नाही. त्यामुळे या एकाच वर्षात रु ६,००,५६५/- चा अपहार श्री. गायकवाड यांनी केला असल्याचे सिध्द होत आहे. याबाबतचे सविस्तर विवरणपत्र मी सोबत जोडत आहे.

**दोषारोप क्रमांक २ :** - श्री. गायकवाड यांनी सन २०१० -११ पासून पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमूना ३३ मध्ये वेळोवेळी नोंदी घेतलेल्या नाहीत. घेतलेल्या नोंदीमध्ये खाडाखोड करणे, तसेच आर्थिक नमूना व्यवहार केलेल्या नोंदी साठा नोंदवहित पावती क्रमांक रक्कम व दिनांक न खतविणे तसेच गोदामपाल यांनी त्याचेकडील सर्व अभिलेख अद्ययावत ठेवलेले नसून कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी यांचे शिफारशीशिवाय काही कृषी निविष्ठांचे स्वतःच वाटप केलेले आहे.

**दोषारोप क्रमांक ३ :** - श्री. गायकवाड यांना दोषारोपात नमूद केलेल्या तारखांना कार्यालयाने कारणे दाखवा नोटीस देऊन १ ते ६ मुद्यांवरील अनियमितता केली असल्याबद्दल खुलासा मागील ७ दिवसाचे आत कृषि निविष्ठाचा लोकवाटा भरणा करण्याविषयी सूचित केले होते. परंतु श्री. गायकवाड यांनी अद्यापही रक्कम भरलेली नाही, त्यामुळे श्री. गायकवाड यांचेवर गुन्हा रजिष्टर क्रमांक १५८/२०१२, दिनांक १३/०८/२०१२ रोजी पोलीस स्टेशन, उमरगा येथे नोंदविण्यात आलेला आहे.

या उपर मला अधिक काही सांगावयाचे नाही.

अपचारी कर्मचारी यांनी वरील साक्ष वाचून पाहिली असता सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांची उलट तपासणी घ्यावयाची नाही असे चौकशीत स्पष्ट केले.

**सरकारी साक्षीदार क्रमांक १ श्री ए. ए. अंबुरे, कृषी अधिकारी, पंचायत समिती उमरगा यांनी सरतपासणीत स्पष्ट केले की : -**

प्रती एचडीपीई पाईप रु. ३४२ .५० प्रमाणे एकूण नग १३१८ करिता रु. ४,५१,४१५/- जमा होणे आवश्यक आहे, परंतु साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक १६० ते १६२ चे अवलोकन करता श्री. गायकवाड यांनी २६ लाभधारकांकडून व पृष्ठ क्रमांक १७० वर ९ लाभधारकांकडून व पृष्ठ क्रमांक १९३ वरील श्री. भिमाअण्णा जळकोटे यांना ३५ पाईपचे रु. ११,९८८/- व श्री. व्यकंट मारुती पाटील, रा.चिंचकोट या लाभधारकाकडुन २३ पाईप पोटी रु.८,५६३/- असे एकूण ३८ लाभधारकांकडून रु.४,५२,११९ /- वसूल केलेले आहेत. या रकमेचा श्री. गायकवाड यांनी पंचायत समितीमध्ये भरणा केलेला नाही.

प्रती एचडीपीई पाईप रु. ३४२.५० याप्रमाणे १३१८ नगाची किंमत रु. ४,५१,४१५/- वसूल करणे आवश्यक असतांना श्री. गायकवाड यांनी लाभार्थ्याकडून रु ४,५२,११९/- वसूल केले असल्याचे साठा नोंदवहीवरुन दिसून येते.

एका पाणबुडी पंपासाठी रु. ८,७६०/- या प्रमाणे ५७ पाणबुडी पंपापैकी श्री. गायकवाड यांनी ५५ पाणबुडी पंप वाटप केले असल्याने त्यांची रक्कम रु.४,८१,८००/- जमा होणे आवश्यक असतांना श्री. गायकवाड यांनी रु.३,५०,४००/- जमा केले आहेत. उर्वरित रक्कम (रु.४,८१,८००/- वजा ३,५०,४००/-)रु.१,३१,४००/- श्री.गायकवाड यांनी पंचायत समितीत जमा केले नसून या रकमेचा अपहार केलेला आहे. तसेच नॉपस्कॉक स्प्रे पंपापोटी रुपये ६,३३०/-, डायमोथेएट पोटी रु.१३३०/- कार्बन हायड्रींग पोटी रुपये ९८०, पावर स्प्रे पंपापोटी रुपये २११०/-, एचटीपीपी पंपापोटी रु.७,०००/- तसेच जादा केलेली वसुली रु. ७०४/- असे एकूण रु.६०,०१,२६९/- चा अपहार श्री. गायकवाड यांनी केल्याचे स्पष्ट होत आहे.

श्री. गायकवाड यांनी स्टॉक बूक पृष्ठ क्रमांक ५४ वर परिमाणामध्ये खाडाखोड केलेली असून, मुल्यामध्ये काहीही लिहिण्यात आलेले नाही. क्रमांक ३ वर दोन परिमाणासाठी रु.२८०/- वसूल करणे आवश्यक असताना रु. १४०/- वसूल केलेले आहेत.

**सरकारी साक्षीदार क्रमांक २ श्री. बिडवे एम. एस., विस्तार अधिकारी (कृषि) यांची साक्ष : -**

मी, महेशकुमार शिवलिंगप्पा बिडवे, वय २९ वर्षे, राहणार उमरगा, दिनांक २४/०७/२०११ पासून आजपर्यंत विस्तार अधिकारी (कृषि) या पदावर पंचायत समिती, उमरगा येथे कार्यरत आहे.

मी, श्री. एस. डी. गायकवाड यांना ओळखतो. त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे मी वाचन केलेले आहे. त्यांचे विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीमध्ये मी माझी साक्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

**दोषारोप क्रमांक १ :** - मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार मी स्वतः गोदामपाल कृषी यांच्या गोडाऊनची तपासणी केलेली आहे. अंतिम तपासणी दिनांक २०/०७/२०१२ ते ०४/०८/२०१२ या कालावधीत कृषि अधिकारी यांनी पूर्ण करुन अहवाल दिनांक ०४/०८/२०१२ रोजी मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांना सादर केलेला आहे. या अहवालावर श्री. एस.एम महाजन, विस्तार अधिकारी (उद्योग), श्री. जी.एन.राठोड, वरिष्ठ लिपीक, श्री. बेलुरकर आर.एच., सहाय्यक लेखाधिकारी व श्री. अंबुरे ए.ए., कृषि अधिकारी, पंचायत समिती, उमरगा याची स्वाक्षरी आहे. या अहवालानुसार गळीत धान्य विकास कार्यक्रम ,राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजना, मका विकास कार्यक्रम , ऊस विकास व जि.प.सेस.कृषि अभियांत्रिकीकरण योजनेअंतर्गत प्राप्त साहित्य लाभार्थ्यांना वाटप करतांना जमा झालेला सन २०११ -२०१२ मधील लोकवाटा गोदामपाल, श्री.गायकवाड यांनी वेळोवेळी लेखा विभागात रोखपालाकडे जमा केलेला नाही. त्यामुळे या एकाच वर्षात रु.६,००,५६५/- चा अपहार श्री. गायकवाड यांनी केला असल्याचे सिध्द होत आहे. याबाबतचे सविस्तर विवरण मी जोडत आहे.

**दोषारोप क्रमांक २ :** -कार्यालयीन अभिलेख्याचे अवलोकन करता श्री. गायकवाड यांनी सन २०१०-११ पासून पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमूना ३३ मध्ये वेळोवेळी नोंदी घेतलेल्या नाहीत. घेतलेल्या नोंदी मध्ये खाडाखोड करणे, तसेच आर्थिक व्यवहार केलेल्या नोंदी साठा नोंदवहीत पावती क्रमांक, रक्कम व दिनांक न खतविणे तसेच गोदामपाल यांनी त्यांचेकडील सर्व अभिलेख अद्ययावत ठेवलेले नसून कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांचे शिफारशी शिवाय बहुतेक कृषी निविष्ठांचे स्वतःच वाटप केलेले आहे.

**दोषारोप क्रमांक ३ :** -श्री.गायकवाड यांना दोषारोपात नमूद केलेल्या तारखांना कार्यालयाने कारणे दाखवा नोटीस देऊन १ ते ६ मुद्यावरील अनियमितता केली असल्याबद्दल खुलासा मागवून ७ दिवसाचे आत कृषी निविष्ठांचा लोकवाटा भरणा करण्याविषयी सूचित केले होते, परंतु श्री. गायकवाड यांनी अद्यापही रक्कम भरलेली नाही. तसेच त्यांनी कारणे दाखवा नोटिसचे उत्तर देखील सादर केलेले नाही. त्यामुळे श्री.गायकवाड यांचेवर गुन्हा रजिस्टर नंबर १५८/२०१२ दिनांक १३/०८/२०१२ रोजी पोलीस स्टेशन, उमरगा येथे नोंदविण्यात आलेला आहे.

या उपर मला अधिक काही सांगावयाचे नाही.

अपचारी कर्मचारी यांनी वरील साक्ष वाचून पहिली असता, सरकारी साक्षीदार क्रमांक २ यांची उलट तपासणी घ्यावयाची नाही असे चौकशीत स्पष्ट केले.

**श्री. डी. के. सोनटक्के, सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांचे अंतिम अभिकथन ( टाचण )**

वरील विषयास अनुसरुन सादर की, श्री. गायकवाड, क.स. पंचायत समिती, उमरगा यांचे विभागीय चौकशीमध्ये सरकारी साक्षीदार यांनी नोंदविलेल्या अभिप्रायावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी व सादरकर्ता अधिकारी म्हणुन मी खालील प्रमाणे अंतिम अभिकथन सादर करीत आहे.

**दोषारोप क्रमांक १ :** - श्री. गायकवाड, क.स. पंचायत समिती, उमरगा यांनी दिनांक ०४/०८/२०१२ च्या चौकशी अहवालावरुन गळीत धान्य विकास कार्यक्रम, राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजना, मका विकास कार्यक्रम, ऊस विकास व जिल्हा परिषद स्वउत्पन्नातील अभियांत्रिकीकरण या योजनेतील प्राप्त साहित्य लाभार्थ्यांना वाटप करताना सन २०११-१२ मध्ये जमा झालेला लोकवाटा श्री. गायकवाड, क.स. तथा गोदामपाल यांनी वेळोवेळी लेखा विभागात रोखपाल यांचेकडे जमा केलेला नाही. या एका वर्षात रुपये ६,०१,२६९/- जमा होणे अपेक्षित होते. रु. ६,०१,२६९/- (अक्षरी रुपये सहा लाख एक हजार दोनशे एकोणसत्तर फक्त) इतकी रक्कम जमा करणे आवश्यक असल्याने सदर रक्कम शासन खाती न भरता त्याचा अपहार केला आहे. हे सरकारी साक्षीदार यांनी नोंदविलेल्या साक्षीनुसार दोषारोप सिध्द् होतो.

**दोषारोप क्रमांक २ :** - श्री. गायकवाड यांनी सन २०१० -२०११ पासून पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमूना ३३ मध्ये वेळोवेळी नोंदी घेतलेल्या नाहीत तसेच घेतलेल्या नोंदीमध्ये खाडाखोड करणे तसेच आर्थिक व्यवहाराच्या नोंदी साठा नोंदवहीत लोकवाटा वसुलीच्या पावत्यांच्या क्रमांक व दिनांक न खतवणे तसेच त्यांचेकडील इतर सर्व अभिलेखे अद्ययावत ठेवलेले नसुन कृषि अधिकारी व कृषी विस्तार अधिकारी यांच्या शिफारशी शिवाय काही कृषि निविष्ठांचे स्वतःच्या स्तरावरुन वाटप केलेले आहे. सरकारी साक्षीदार व अभिलेख्यांवरुन सदरील दोषारोप सिध्द् होतो.

**दोषारोप क्रमांक ३ :** - श्री. गायकवाड, क.स. यांनी त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर न करणे , तसेच ७ दिवसाचे आत कृषी निविष्ठांचा लोकवाटा शासन खाती भरणा करण्याबाबत सूचना करुनही तो अद्यापपर्यंत भरण्यात आलेला नाही, त्यामुळे संबंधितांविरुध्द पोलिस स्टेशन, उमरगा येथे गुन्हा क्रमांक १०५८ /२०१२ दिनांक १३/०८/२०१२ अन्वये नोंद केलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी श्री. गायकवाड हे दोषी असुन सदरील गुन्हा सिध्द होतो.

सादरकर्ता अधिकारी म्हणून मी आपणाकडे सादर केलेली सर्व कागदपत्रे पुराव्यावरुन व सरकारी साक्षीदार यांचे नोंदविलेले जबाबावरुन श्री. एस. डी. गायकवाड यांचेवरील दोषारोप क्रमांक १ ते ३ पूर्ण सिध्द् होत आहेत. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, उमरगा येथे संबधितांवर गुन्हा नोंदविलेला असून प्रकरण न्याय प्रविष्ट होणारआहे. तरी सदर प्रकरणाचे आपला चौकशी अहवाल गोपनीय स्वरुपात सादर करावा ही विनंती.कृपया सदरचे प्रकरण अंतिम करण्यात यावे ही विनंती.

**अपचारी कर्मचारी श्री. एस. डी. गायकवाड, कनिष्ठ सहाय्यक पंचायत समिती उमरगा यांचे बचावात्मक अंतिम अभिकथन**

उपरोक्त सविनय विनंती की, सादरकर्ता अधिकारी यांचे अंतिम अभिकथन (टाचण) मला दिनांक २२/०४/२०१३ रोजी प्राप्त झाले. त्यानुसार मी माझे बचावात्मक अंतिम अभिकथन खालीलप्रमाणे सादर करीत आहे. कृपया सहानुभुतीपूर्वक विचार करण्यात यावा, ही नम्र विनंती.

**दोषारोप क्रमांक १ :** - सन २०११-१२ मधील मी गोदामपाल म्हणून कार्यरत असताना विविध योजने अंतर्गत कृषि निविष्ठा लोकवाटा रक्कम रु.६,००,५६५/- ही रक्कम त्या त्या वेळी पंचायत समिती, उमरगा येथील लेखा शाखेत जमा केले आहेत. सन २०११-१२ च्या स्थानिक लेखा परिक्षणानुसार स्पष्टपणे दिसून येत असल्याने सदर रकमेचा मी अपहार केला आहे हे मला मान्य नाही.

**दोषारोप क्रमांक २ :** - सन २०११-१२ मध्ये प्राप्त झालेला कृषि विषयक साहित्याची नोंद पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमुना नंबर ३३ मध्ये वेळोवेळी नोंद घेण्यात आल्या असून त्या अद्ययावत असल्याने दोषारोप क्रमांक २ मला मान्य नाही.

**दोषारोप क्रमांक ३ :** - मला देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा मा. कृषि विकास अधिकारी व गटविकास अधिकारी यांना आदरपुर्वक व वस्तुस्थितीदर्शक सादर केलेला आहे. त्यामुळे सदर दोषारोप मला मान्य नाही.

सबब माझ्या अंतिम अभिकथनाचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन मला सदर दोषारोपातून दोषमुक्त करावे, ही विनंती.

**भाग - २** **समालोचन**

अपचारी कर्मचारी श्री. एस. डी. गायकवाड, निलंबित कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, उमरगा यांनी दिनांक १९/१२/२०१२ अन्वये जोडपत्र -१ मध्ये दोषारोप क्रमांक १ ते ३ ठेवून विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सरकारी साक्षीदार क्रमांक १ व २ यांनी त्यांची साक्ष नोंदवली असून, अपचारी कर्मचारी यांना त्यांचा प्राथमिक जबाब व बचावात्मक अंतिम अभिकथन सादर करण्यासाठी पुरेशी संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

i. **दोषारोप क्रमांक १ :** -(अ) मी शिपाई पदावरुन दिनांक ०७/०२/२००७ रोजी पदोन्नतीने कनिष्ठ सहाय्यक पदावर रुजू झालो. त्यावेळी पासून कृषि गोदामाचा पदभार घेतला होता. वेळोवेळी जमा झालेली लोकवाट्याची रक्कम मी पंचायत समिती रोखपालाकडे जमा करत होतो. व रोखपाल यांची बदलीनंतर सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे जमा करत होतो. सन २००७-२००८ पासुन ते निलंबित दिनांकापर्यतचा लोकवाटा वेळोवेळी पंचायत समिती रोखपाल/सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे जमा केल्यानंतर कृषि अधिकारी यांचे सूचनेनुसार लाभार्थ्यांना निविष्ठांचे वाटप करित होतो, असे अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या प्राथमिक जबाबात नमूद केलेले आहे.

ii. पंचायत समिती रोखपाल/सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे जमा केलेली रक्कम त्यांनी योग्य त्या लेखा शिर्षाखाली जमा करणे आवश्यक होते. परंतु संबंधित हे चलन न स्विकारता अथवा कोणत्या लेखा शिर्षाखाली रक्कम भरावयाची आहे. याबाबत मार्गदर्शन न करता, रोख स्वरुपात रक्कम घेत होते व त्याबाबत कोणतीही पोहोच देत नव्हते. पोहच देण्याबाबत वारंवार विनंती केली असता, रक्कम जमा करुन घेतली आहे असे मला सांगत होते. लेखा विभागाचे कामकाजाबाबत मी स्वतः अनभिज्ञ असल्यामुळे त्यांनी रक्कम जमा केली आहे असेच माझा समज झाला. त्यामुळे लोकवाट्याची कोणतीही रक्कम माझ्याकडे प्रलंबित नसुन, सदर रक्कम मी त्या त्या वेळी रोखपाल / सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे जमा केलेली असल्याचे अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या प्राथमिक जबाबात नमूद केलेले आहे.

iii. सन २०११-१२ मधील मी गोदामपाल म्हणून कार्यरत असतांना विविध योजनेंतर्गत कृषि निविष्ठा लोकवाटा रक्कम रु.६,००,५६५/- ही रक्कम त्या त्यावेळी पंचायत समिती, उमरगा येथील लेखा शाखेत जमा केलेली आहे. सन २०११-१२ च्या स्थानिक लेखा परिक्षणानुसार स्पष्टपणे दिसुन येत असल्याने सदर रकमेचा मी अपहार केला आहे हे मला मान्य नसल्याचे अपचारी कर्मचारी प्रति त्यांच्या बचावात्मक अंतिम अभिकथनात नमुद केलेले आहे.

(ब) (i) मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार मी स्वतः गोदामपाल कृषी यांच्या गोडाऊनची तपासणी केलेली आहे. अंतिम तपासणी दिनांक २०/०७/२०१२ ते ०४/०८/२०१२ या कालावधीत पूर्ण करुन मी माझा अहवाल दिनांक ०४/०८/२०१२ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांना सादर केलेला आहे. या अहवालावर श्री. एस. एम. महाजन, विस्तार अधिकारी (उद्योग), श्री. जी. एन. राठोड, वरिष्ठ लिपिक, श्री. बेलुरकर आर.एच., सहाय्यक लेखाधिकारी व मी स्वतः कृषी अधिकारी, पंचायत समिती, उमरगा या नात्याने स्वाक्षरी केलेली असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक १ व २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

ii.) या अहवालानुसार गळीत धान्य विकास कार्यक्रम, राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजना मला विकास कार्यक्रम , ऊस विकास व जि.प.सेस, कृषी अभियांत्रिकीकरण या योजनेअंतर्गत प्राप्त साहित्य लाभार्थ्यांना वाटप करतांना जमा झालेला सन २०११ -२०१२ मधील लोकवाटा गोदामपाल श्री. गायकवाड यांनी वेळोवेळी लेखा विभागात रोखपालाकडे जमा केलेला नाही, त्यामुळे या एकाच वर्षात रु.६,००,५६५/- चा अपहार श्री. गायकवाड यांनी केला असल्याचे सिध्द होत आहे. याबाबतचे साक्षीत स्पष्ट केले आहे.

iii.) प्रति एचडीपीई पाईप रु.३४२.५० प्रमाणे एकूण नग १३१८/ करीता रु. ४,५१,४१५/- जमा होणे आवश्यक आहे. परंतु साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक १६० ते १६२ चे अवलोकन करता, श्री. गायकवाड यांनी २७ लाभधारकाकडुन, पृष्ठ क्रमांक १९३ वरील श्री. भिमाअण्णा जळकोटे यांना ३५ पाईपचे रु.११,९८८/- व श्री. व्यंकट मारुती पाटील, रा. चिंचकोट या लाभधारकाकडून २३ पाईप पोटी रु.८,५६३/- असे एकुण ३८ लाभधारकाकडून रु. ४,५२,११९/- वसूल केलेले आहेत. या रक्कमेचा श्री. गायकवाड यांनी पंचायत समितीमध्ये भरणा केलेला नसल्याने सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या सरतपासणीत स्पष्ट केलेले आहे.

iv.) एका पाणबुडी पंपासाठी रु.८,७६०/- या प्रमाण ५७ पाणबुडी पंपापैकी श्री.गायकवाड यांनी ५५ पाणबुडी पंप वाटप केले असल्याने त्याची रक्कम रु.४,८१,८००/- जमा होणे आवश्यक असतांना श्री.गायकवाड यांनी रु.३,५०,४००/- जमा केलेले आहेत. उर्वरित रक्कम (रु.४,८१,८००/- वजा ३,५०,४००/-) रु. १,३१,४००/- श्री.गायकवाड यांनी पंचायत सहमतीत जमा केले नसून या रकमेचा अपहार केलेला आहे. तसेच नॅापस्कॅाक स्प्रे पंपापोटी रु. ६,३३०/-, डायमोथेएट पोटी रु. १३३०/-, कार्बन डायझिंग पोटी रु. ९८०/-, पॅावर स्प्रे पंपापोटी रु.२,११०/- एचटीपीपी पंपा पोटी रु. ७,०००/- तसेच जादा केलेली वसुली रु.७०४/- असे एकूण रु.६,०१,२६९/- चा अपहार श्री. गायकवाड यांनी केल्याचे स्पष्ट होत असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या सरतपासणीत स्पष्ट केलेले आहे.

v) श्री. गायकवाड यांनी स्टॅाक बूक पृष्ठ क्रमांक ५४ वर परिमाणामध्ये खाडाखोड केलेली असून, मुल्यामध्ये काहीही लिहिण्यात आलेले नाही. क्रमांक ३ वर दोन परिमाणासाठी रु. २८०/- वसूल करणे आवश्यक असतांना रु १४०/- वसूल केलेले असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या सरतपासणी स्पष्ट केलेले आहे.

(क) श्री. गायकवाड, क.स. पंचायत समिती, उमरगा यांनी दिनांक ०४/०८/२०१२ च्या चौकशी अहवालावरुन गळीत धान्य विकास कार्यक्रम राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजना, मका विकास कार्यक्रम ऊस विकास व जिल्हा परिषद स्वउत्पन्नतील अभियांत्रिकी करण या योजनेतील प्राप्त साहित्य लाभार्थ्यांना वाटप करतांना सन २०११-१२ मध्ये जमा झालेला लोकवाटा श्री.गायकवाड, क.स. तथा गोदामपाल यांनी वेळोवेळी लेखा विभागात रोखपाल यांचेकडे जमा केलेला नाही. या एका वर्षात रु.६,०१,२६९/- जमा होणे अपेक्षित होते. रु. ६,०१,२६९/- अक्षरी रुपये सहा लाख एक हजार दोनशे एकोणसत्तर फक्त इतकी रक्कम जमा करणे आवश्यक असल्याने सदर रक्कम शासन खाती न भरणा करता त्याचा अपहार केला आहे. हे सरकारी साक्षीदार यांनी नोंदविलेल्या साक्षीनुसार दोषारोप सिध्द होत असल्याचे सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती उमरगा यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

उपरोक्त विवेचन, वेळोवेळी लोकवाटयाच्या रक्कमा रोखपाल व सहाय्यक लेखाधिकारी यांचेकडे भरणा केल्याबाबत अपचारी कर्मचारी यांनी प्राथमिक जबाबात व बचावात्मक अंतिम अभिकथनात नमूद केले असले तरी वारंवार संधी देऊनही रकमा भरणा केल्याबाबतचा कुठलाही पुरावा चौकशीत अपचारी कर्मचारी यांनी सादर केला नसल्याची वस्तुस्थिती विचारात घेता हा दोषारोप सिध्द होत आहे.

**दोषारोप क्रमांक २ :** - (अ) (i) विभागाकडुन प्राप्त झालेल्या सर्व निविष्ठांच्या नोंदी पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमुना नंबर ३३ मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. तसेच आर्थिक व्यवहाराच्या नोंदी साठा वहीत घेणे बाबत मला ज्ञात नव्हते. अथवा त्याबाबत कोणीही मला मार्गदर्शन केलेले नाही. साहित्य वाटप केल्यावर त्या त्या लाभार्थ्यांचे नावे साठा नोंदवहीत नोंद घेवून त्यापुढे त्यांची स्वाक्षरी घेत होतो. व याबाबत यापुर्वी कृषि अधिकारी यांनी कुठलीही तक्रार केली नाही. त्याचप्रमाणे कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषि) यांचे सुचनेनुसार कृषि निविष्ठाचे वाटप लाभार्थ्यांना केलेले आहे. लाभार्थ्यांना अर्जावर व साठा नोंदवही वेळोवेळी कृषी अधिकारी यांनी दर्शवुन त्यावर त्यांची स्वाक्षरी घेतलेली असल्याचे, अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या प्राथमिक जबाबात नमूद केलेले आहे.

ii) आर्थिक व्यवहाराबाबत नोंद घेणे याबाबत मी स्वतः अनभिज्ञ असल्यामुळे पावती क्रमांक, दिनांक, रक्कम खर्चाची नोंद साठा नोंदवहीत घेतलेली नाही. तसेच याबाबत मला कृषी अधिकारी यांनी मार्गदर्शन केलेले नाही, त्यामुळे शिफारशी शिवाय कृषी निविष्ठांचे वाटप केलेले असल्याचे अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या प्राथमिक जबाबात नमुद केलेले आहे.

iii) सन २०११ -१२ मध्ये प्राप्त झालेला कृषि विषयक साहित्याची नोंद पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमुना नंबर ३३ मध्ये वेळोवेळी नोंद घेण्यात आल्या असून त्या अद्ययावत असल्याने दोषारोप क्रमांक २ मला मान्य नसल्याचे, अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या बचावात्मक अंतिम अभिकथनात नमूद केलेले आहे.

(ब) श्री. गायकवाड यांनी सन २०१० -११ पासून पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमुना ३३ मध्ये वेळोवळी नोंदी घेतलेल्या नाहीत. घेतलेल्या नोंदीमध्ये खाडाखोड करणे, तसेच आर्थिक व्यवहार असलेल्या नोंदी साठानोंदवहीत पावती क्रमांक, रक्कम व दिनांक न खतविणे तसेच गोदामपाल यांनी त्याचेकडील सर्व अभिलेखे अद्ययावत ठेवलेले नसून कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांचे शिफारशी शिवाय काही कृषी निविष्ठांचे स्वतःच वाटप केलेले असल्याचे, सरकारी साक्षीदार क्रमांक १ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

(क) कार्यालयीन अभिलेख्याचे अवलोकन करता, श्री. गायकवाड यांनी सन २०१० - ११ पासून पुरवठा चलनामध्ये साठा नोंदवही नमुना ३३ मध्ये वेळोवेळी नोंदी घेतलेल्या नाहीत. घेतलेल्या नोंदीमध्ये खाडाखोडी करणे, तसेच आर्थिक व्यवहार केलेल्या नोंदी साठानोंदवहीत पावती क्रमांक रक्कम व दिनांक न खतविणे तसेच गोदामपाल यांनी त्यांचेकडील सर्व अभिलेख अद्ययावत ठेवलेले नसून कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांचे शिफारशी शिवाय बहुतेक कृषी निविष्ठांचे स्वतःच वाटप केलेले असल्याचे सरकारी साक्षीदार क्रमांक २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

(ड) श्री.गायकवाड यांनी सन २०१०-१२ पासून पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमुना २३ मध्ये वेळोवेळी नोंदी घेतलेल्या नाहीत. तसेच घेतलेल्या नोंदीमध्ये खाडाखोड करणे तसेच आर्थिक व्यवहाराच्या नोंदी साठा नोंदवहीत लोकवाटा वसुलीच्या पावत्याच्या क्रमांक व दिनांक न खतवणे तसेच त्यांचेकडील इतर सर्व अभिलेखे अद्ययावत ठेवलेले नसून कृषी अधिकारी व कृषी विस्तार अधिकारी व यांच्या शिफारशी शिवाय काही कृषी निविष्ठांचे स्वतःच्या स्तरावरुन वाटप केलेले आहे. सरकारी साक्षीदार व अभिलेखावरुन सदरील दोषारोप सिध्द होत असल्याचे सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

**उपरोक्त विवेचन, श्री. गायकवाड यांनी सन २०१०-१२ पासुन पुरवठा चलनाप्रमाणे साठा नोंदवही नमुना नंबर ३३ मध्ये वेळोवेळी नोंदी घेतल्या नसल्याचे, नोंदीमध्ये खाडाखोड केल्याचे विचारात घेता, हा दोषारोप सिध्द होत आहे.**

**दोषारोप क्रमांक ३ :** - (अ) (i) कृषि अधिकारी यांचे सूचनेनुसार सर्व साहित्य वाटप केलेले आहे. गटविकास अधिकारी यांचे कारणे दाखवा नोटीस दिनांक ०७/०७/२०१२ चा खुलासाही सादर केलेला असल्याचे कर्मचारी यांनी त्यांच्या प्राथमिक जबाबात नमूद केलेले आहे.

ii) मला देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा मा. कृषि विकास अधिकारी व गटविकास अधिकारी यांना आदरपूर्वक व वस्तुस्थितीदर्शक सादर केलेला आहे. त्यामुळे सदर दोषारोप मला अमान्य नाही. असे अपचारी कर्मचारी यांनी त्यांच्या बचावात्मक अंतिम अभिकथनात नमूद केलेले आहे.

(ब) श्री. गायकवाड यांना दोषारोपात नमूद केलेल्या तारखांना कार्यालयाने कारणे दाखवा नोटिस देऊन, १ ते ६ मुद्यावरील अनियमितता केली असल्याबद्दल खुलासा मागवून ७ दिवसाचे आत कृषी निविष्ठांचा लोकवाटा भरणा करण्याविषयी सूचित केले होते, परंतु श्री. गायकवाड यांनी अद्यापही रक्कम भरलेली नाही, तसेच त्यांनी कारणे दाखवा नोटीसचे उत्तर देखील सादर केलेले नाही. त्यामुळे श्री. गायकवाड यांचेवर गुन्हा रजिष्टर नंबर १५८/२०१२ दिनांक १२/०८/२०१२ रोजी पोलिस स्टेशन, उमरगा येथे नोंदविण्यात आला असल्याचे सरकारी क्रमांक १ व २ यांनी त्यांच्या साक्षीत स्पष्ट केलेले आहे.

(क) श्री. गायकवाड, क.स.यांनी त्यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर न करणे, तसेच ७ दिवसाचे आत कृषी निविष्ठांचा लोकवाटा शासन खाती भरणा करण्याबाबत सूचना करुन ही तो अद्यापपर्यंत भरण्यात आलेला नाही त्यामुळे संबंधितांविरुध्द पोलिस स्टेशन, उमरगा येथे गुन्हा क्रमांक १०५८/२०१२ दिनांक १३/०८/२०१२ अन्वये नोंद केलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी श्री. गायकवाड हे दोषी असून सदरील दोषारोप सिध्द होत असल्याचे, सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी त्यांच्या अंतिम अभिकथनात (टाचण) स्पष्ट केलेले आहे.

**उपरोक्त विवेचन, पंचायत समिती, उमरगा यांनी दिलेल्या नोटीसचे उत्तर सादर न करणे, लोकवाटा चलनाद्वारे भरणा न करणे व कृषी अधिकारी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन न करण्याची अपचारी कर्मचारी यांची प्रवृत्ती विचारात घेता, हा दोषारोप सिध्द होत आहे.**

## निष्कर्ष

प्रकरणात सादर करण्यात आलेले अभिलेख / दस्तऐवज, सरकारी साक्षीदार क्रमांक १ व २ यांनी नोंदविलेल्या साक्षी व सरतपासणीत स्पष्ट केलेली वस्तुस्थिती, अपचारी कर्मचारी श्री.एस.डी.गायकवाड, निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांचा प्राथमिक जबाब व त्यांचे बचावात्मक अंतिम अभिकथन, वारंवार संधी देऊनही रकमा पंचायत समितीमध्ये जमा केल्याचा कुठलाही पुरावा सादर न करण्याची अपचारी कर्मचारी यांची प्रवत्ती तसेच सादरकर्ता अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, उमरगा श्री.सोनटक्के यांचे स्वयंस्पष्ट असे अंतिम अभिकथन (टाचण) विचारात घेता, अपचारी कर्मचारी, श्री. गायकवाड, निलंबित कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, उमरगा यांचेवर जोडपत्र-१ मध्ये ठेवण्यात आलेले दोषारोप खालील प्रमाणे सिध्द होत आहेत.

१) दोषारोप क्रमाक १ : - पुर्णत : सिध्द होत आहे.

२) दोषारोप क्रमाक १ : - पुर्णत : सिध्द होत आहे.

३) दोषारोप क्रमाक १ : - पुर्णत : सिध्द होत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारलेल्या प्रश्नास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अशी माहिती दिली की, अपहारित रक्कम व्याजासहित वसूल करण्यासाठी दिनांक ४.११.२०१६ रोजी आदेश निर्गमित केले होते. त्यानुसार श्री. एस. डी. गायकवाड यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. मूळ रक्कम रुपये ५,८०,५६५/- इतकी आहे. तर व्याज रुपये २,४५,३७५/- असून एकूण ८,३४,९४०/- रुपये येणे बाकी आहे. याप्रकरणी त्यांना बडतर्फ करण्यात आले असून पोलीस ठाण्यामध्ये सन २०१२ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण सद्यःस्थितीत न्याय प्रविष्ट आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, याप्रकरणी संबंधितांना बडतर्फ करण्यात आले आहे. परंतु यामध्ये शासनाचे पैसे बुडाले आहेत ते कसे वसूल करणार आहात, तसेच संबंधितांना बडतर्फ केव्हा करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री. गायकवाड यांना दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांच्याकडून कोणतीही शासकीय रक्कम येणे नाही. न्यायालयामध्ये जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही होईल. ही क्रिमिनल केस आहे अशी समितीस माहिती दिली.

यावर समितीने न्यायालयाचा निकाल लवकर कसा लागेल याकडे विभागाने व जिल्हा परिषदने लक्ष घालावे असे निदेशित केल.

## अभिप्राय व शिफारशी

कृषी विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद द्वारा उपलब्ध झालेल्या अभिलेख्यांवरून पंचायत समिती स्तरावरून वाटप करण्यासाठी पुरवठा केलेल्या कृषी औजारांचे वाटप केल्यानंतर लाभार्थ्यांकडून वसूल केलेली लोकवाट्याची रक्कम संबंधित भांडारपालांनी कृषी विभागाकडे भरणा केली नसल्याचे निदर्शनास आले. याबाबत लेखापरिक्षणामध्ये असे आढळून आले की, पंचायत समिती, कळंब येथील सन २००८-०९ ते २०११-१२ मधील प्राप्त साहित्याचे वाटप करून लोकवाट्याची रक्कम रु.१,२९,२६०/- अद्याप भरणा केलेली नसल्यामुळे सदर रक्कम भरणा करण्यात यावी. पंचायत समिती, भूममध्ये सन २००६-०७ ते २०११-२०११-१२ या कालावधीत वाटप केलेल्या साहित्याची लोकवाटा रक्कम रु ५,३४,३६६/- तसेच पंचायत समिती, परांडा येथील कृषी अधिकारी यांचे दिनांक २७/०८/२०१२ च्या पत्रान्वये कृषी औजारांचे वाटप करून लोकवाटयाची रक्कम रु ३,२२,७०२/- वसूल केलेली असताना अद्याप भरणा केलेली नाही. सदर रक्कमा वसूल करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे पंचायत समिती, उमरगा येथे ग्रामविकास अधिकारी यांच्या दि.७/७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये वसूल केलेल्या रु ५,९६,७११/- रकमेचा अपहार केल्याप्रकरणी संबंधित गोदामपाल यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून संबंधित पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हे नोंदविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. दिनांक १३/८/२०१२ अन्वये पोलीस स्टेशन उमरगा येथे संबंधित गोदामपाल यांनी लोकवाट्याची एकूण रक्कम रुपये ६,००,५६५/- इतक्या रक्कमेचा अपहार झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल, २००७ नुसार कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांच्या कार्यसूचीमध्ये सुधारीत औजारे, किटकनाशके औषधे व खताचे वाटप करण्याबाबची कार्यवाही करणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे. परंतु विस्तार अधिकरी (कृषी) यांनीच पंचायत समिती, कळंब व परांडा येथे अपहार केलेला आहे. सदर बाब अत्यंत विलंबाने निदर्शनास आणून दिले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १३ नुसार पैशाच्या व्यवहाराची प्रत्येक नोंद कोणताही वेळ न दवडता त्वरित लेख्यात घेवून योग्य त्या नोंदवहीत त्याच्या नोंदी घेवून रक्कम त्वरित जिल्हा निधीचे खाती असलेल्या बँकेत जमा करणे आवश्यक आहे. तसेच नियम ५० (३) नुसार वसूल केलेल्या रकमेबद्दल संबंधित पावती देऊन त्या पावतीवर रोखपाल व उपलेखापाल यांचेकडून सही करण्यात येईल तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम ५० (४) नुसार समितीच्या कोणत्याही प्रधिका-यांकडून घेण्यात आलेल्या सर्व पैशांची नियमित व निरपवादपणे पैसे मिळत असतील त्या तारखेस नमूद क्र.१० मधील दुहेरी बाजू असलेल्या कार्बन कागदाच्या दुस-या प्रतीत पावती देण्यात येईल. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. लाभार्थ्यांकडून वसूल करण्यात आलेला लोकवाटा रकमेच्या पावत्या संबंधितांना देण्यात येत नाही. त्यामुळे भांडारपाल हे लोकवाट्याची रक्कम वसूल केल्यावर त्वरित जिल्हा निधीत जमा करण्यात येत नसल्याचे आढळून येत आहे.

महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, उस्मानाबाद यांचे दि २७/६/२०१२ च्या पत्रानुसार सन २००१-०२ ते २०११-१२ वर्षातील विविध योजनासाठीच्या कृषी औजारांची लोकवाट्याची रक्कम रुपये ७५,९७,६८६/- प्रलंबित आहे. तसेच संबंधित भांडारपाल रोखपाल कनिष्ठ सहाय्यक यांच्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करून एकूण रक्कम रुपये १५,८६,८९३/- वसूल करून पुरवठादारास अदा करण्यात यावी. उपरोक्त लेखापरिक्षणातील आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचेकडून प्राप्त लेखी खुलाशानुसार व मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या समवेत झालेल्या साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती, कळंब अंतर्गत सन २००८-०९ ते २०११-१२ या वर्षात विविध योजनांमध्ये जमा केलेल्या लोकवाट्याच्या रूपये १,२९,२७०/- एवढ्या रकमेचा अपहार झालेला होता. सदर रक्कम महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, उस्मानाबाद यांचेकडे डीमांड ड्राफव्दारे जमा केली आहे याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

**पंचायत समिती, भूम यांच्याकडे अंतिम ताळमेळ बसविल्यानंतर अपहाराची रूपये ६,४१,१७१/-एवढी रक्कम होती त्यापैकी श्री.खरपुडे यांच्याकडून बाकी असलेली रक्कम १,०६,८१५/- रुपये वसूल करण्यात यावी. श्री.खरपुडे यांच्या विरोधात देखील पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. संबंधित कर्मचा-याची विभागीय चौकशी पूर्ण केल्यानंतर त्यांना नोकरीतून का काढून टाकण्यात येऊ नये अशी नोटीस बजावलेली आहे. तसेच विभागाने ९० लक्ष रूपये व्याजासहीत वसूल करावे असा ठपका ठेवलेला आहे, दोषीतांविरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी त्वरेने पूर्ण करण्यात यावी तसेच यासंबंधी दाखल असलेल्या गुन्ह्यात फौजदारी प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा व दोषीतांना कडक शासन कसे होईल याची दक्षता घेण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस पाठविण्यात यावी.**

पंचायत समिती, उमरगा येथील श्री.सी.डी.गायकवाड यांची विभागीय चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये दोषारोप सिध्द झालेले असून श्री.गायवाड यांना दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांच्याकडून एकूण रुपये ८,३४,९४०/- इतकी रक्कम येणे बाकी आहे. सद्यःस्थितीत प्रकरण मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

**त्याचप्रमाणे पंचायत समिती, परांडा येथील विस्तार अधिकारी (कृषी) श्री.वाय.जे रणखांबे यांनी लोकवाट्याची अपहारीत रक्कम पुरवठादार संस्थेस अदा केलेली आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापि, ही बाब विलंबाने निदर्शनास आणून दिली आहे. तत्कालीन अधिका-यांनी वेळीच ही बाब निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. त्यामुळे तत्कालीन संबंधित अधिका-यांची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

पंचायत समिती, कळंब येथील श्री.जाधव एम, विस्तार अधिकारी (कृषी), श्री.तावरे एस.एस. (विस्तार अधिकारी कृषी), श्री.राऊत बी.आर (कृषी अधिकारी) यांनी लोकवाटा रक्कम अपहारीत केल्याने गटविकास अधिकारी, कळंब यांनी नोटीस देऊन अपहारीत रक्कम वसूल करून पुरवठा संस्थेस अदा केली असली तर अपहार झाल्यानंतर उघडकीस आल्यावर वसूली करून करावाईची पूर्तता होऊ शकत नाही कारण पैशाचा अपहार झालेला असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी संबंधितांवर कठोर शास्ती लावण्यात यावी जेणेकरून यापुढे असे गैरव्यहार करण्यास कोणीही प्रवृत्त होणार नाही.

उमरग्यामध्ये एक कर्मचारी, कळंबमध्ये चार कर्मचारी, भूममध्ये दोन कर्मचारी आणि परांडामध्ये तीन कर्मचारी दोषी असून सर्व कर्मचा-यांच्या विरोधात गुन्हेगारीची प्रकरणे दाखल केलेली आहेत. त्यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. त्यामध्ये संबंधित कर्मचारी दोषी असल्याचे सिध्द झालेले असून त्यांच्याकडून अपहारीत रक्कम व्याजासहीत वसुल करण्याबाबत सांगितले आहे. संबंधितांकडून ९,८६,३६८/- रूपये वसूल केले आहेत. तसेच अजून ७,०७,०००/- रुपये वसूल करण्याचे बाकी आहे. सदर रक्कमेची वसुली करण्यात यावी.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १३ तसेच नियम ५० (३) नुसार आणि नियम ५० (४) नुसार कोणत्याही कार्यवाहीचे पालन झालेले नाही. त्यामुळे लाभार्थ्यांकडून वसूल करण्यात आलेल्या लोकवाटा रक्कमेच्या पावत्या संबंधित भांडारपाल हे लोकवाट्याची रक्कम वसूल केल्यावर त्वरित जिल्हा निधीत जमा करणे आवश्यक आहे. या प्रकरणी संबंधितांकडून मोठ्या प्रमाणावर रक्कम वसुल केली आहे. त्यामुळे एकप्रकारे त्यांनी गुन्हा कबुल केला असल्याने त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही त्वरेने सुरु करुन तोवर तातडीने निर्णय घ्यावा तसेच नियमाचे काटेकोरपणे पालन व्हावे यासाठी भांडारपाल वर नियंत्रण ठेवण्यासाठी वरीष्ठ दर्जाच्या अधिका-यांवर सर्व आर्थिक व्यवहाराची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. याकरीता ग्रामविकास विभागाने त्यादृष्टीने लोकवाट्याची रक्कम संबंधित पुरवठादारास विहित कालावधीत प्राप्त होण्यासाठी सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## थकित आगाऊ रक्कमा (थकित अग्रिम)

**परिच्छेद क्रमांक ३.८१४/(४०) (सन २०११-२०१२)**

जिल्हा परिषदामध्ये निरनिराळ्या योजना, बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित, करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अगर कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रक्कमा देण्यात येतात. अशाप्रकारे दिलेल्या रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजन/ वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रकमांचे संबंधित वर्षाअखेर खर्चाची प्रमाणके व हिशेब देऊन समायोजन/ वसुली करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अगोदर दिलेल्या आगाऊ रक्कमा देता येतात. परंतु जिल्हा परिषदांकडील आगाऊ रक्कमांच्या नोंदवह्या पाहता वेळोवेळी दिलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन/ वसुली होत नसल्याचे आढळून येते. अशा थकित आगाऊ रकमांचे फार जुन्या म्हणजेच १९६२ पासूनच्या आगाऊ रकमांचे समायोजन/ वसुली थकित असल्याचे दिसुन येते.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ४० | उस्मानाबाद | वित्त | १९ | ६४,६३,१६३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१० नुसार आवश्यक त्या बाबीसाठी आगाऊ अग्रिम विभाग प्रमुख व कर्मचारी यांना मंजूर करण्यात येतो. सन २०११-१२ अखेर खालील प्रमाणे आगाऊ अग्रिम प्रलंबित असल्याचे आक्षेपात दर्शविण्यात आले आहे. त्याची वसुली खालील तपशील प्रमाणे करण्यात आली आहे.

| अ.क्र. | अग्रिमाचा प्रकार | प्रलंबित अग्रिम | वसुली करण्यात आलेले अग्रिम | प्रलंबित अग्रिम |
|---|---|---|---|---|
| १) | वेतनअग्रिम | ४०९३४ | ३६९३४ | ४००० |
| २) | प्रवास भत्ता अग्रिम | ३९७६५ | ३९७६५ | निरंक |
| ३) | सण अग्रिम | १८२८० | १८२८० | निरंक |
| ४) | वैद्यकीयअग्रिम | निरंक | निरंक | निरंक |
| ५) | क इतर अग्रिम | ६३६४१८४ | २३००६०५ | ४०६३५७९ |
| | **एकूण** | **६४६३१६३** | **२३९५५८४** | **४०६७५७९** |

प्रलंबित अग्रिमाबाबत विभागनिहाय माहिती खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | विभागाचे नाव | वेतन अग्रिम | | क-इतर | |
|---|---|---|---|---|---|
| १) | सामान्य प्रशासन विभाग | ० | ० | ४ | ७५३१७ |
| २) | शिक्षण विभाग | ० | ० | २४ | २४४२२७४ |
| ३) | बांधकाम विभाग | ० | ० | २ | २६६५६० |
| ४) | लघु पाटबंधारे विभाग | ० | ० | ७ | ३७००७० |
| ५) | आरोग्य विभाग | ० | ० | २ | १०००० |
| ६) | कृषी विभाग | ० | ० | २ | ६०००० |
| ७) | भुजल संर्वेक्षण | ० | ० | २ | २६२५१ |
| ८) | पंचायत समिती उस्मानाबाद | ० | ० | २ | ८१३१०७ |
| ९) | पंचायत समिती उस्मानाबाद | १ | ४००० | ० | ० |
| | एकूण | ०१ | ४००० | ४५ | ४०६३५७९ |

पैकी शिक्षण विभागाकडे २,४४,२७४/- एवढी रक्कम प्रलंबित आहे व उर्वरित विभागाकडे असणा-या प्रलंबित अग्रिम वसुलीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बैठकित व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विभाग प्रमुखांना व संबंधित कर्मचा-यांना सक्त सूचना दिलेल्या आहेत व वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे. उर्वरित रक्कमेबाबत वसुलीची कार्यवाही अनुसरण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,वित्त विभागामार्फत विविध विभागांना देण्यात आलेले अग्रिम रुपये ६४ लाख ६३ हजार १६३ दीर्घकाळ प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत. तसेच थकित अग्रिमे वसूल होण्यासाठी जिल्हा परिषदेने काय नियोजन केले आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१० नुसार आवश्यक त्या बाबीसाठी आगाऊ अग्रिम विभाग प्रमुख व कर्मचारी यांना मंजूर करण्यात येतो. सन २०११-२०१२ अखेर खालील प्रमाणे आगाऊ अग्रिम प्रलंबित असल्याचे आक्षेपात दर्शविण्यात आले आहे. त्याची वसुली खालील तपशीलाप्रमाणे करण्यात आलेली आहे. प्रलंबित अग्रिम रक्कम ६४ लाख ६३ हजार १६३ असून वसूल करण्यात आलेली अग्रिम रक्कम २३ लाख ९५ हजार ५८४ आहे. अद्याप ४० लाख ६७ हजार ५७९ अग्रिम प्रलंबित आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, विभाग प्रमुख व कर्मचा-यांकडे रक्कम प्रलंबित असताना त्यांना दुसरी रक्कम अग्रिम म्हणून का दिलेली आहे. याला जबाबदार कोण आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना खुलासा केली की, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अग्रिम मंजूर करण्यापूर्वी संबंधित विभागाकडे अग्रिम प्रलंबित असल्याचे अभिप्रायही दिलेले होते. त्यावेळी अत्यावश्यक बाब म्हणून अग्रिम मंजूर केलेला आहे.

तद्नंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केली की, संबंधित खातेप्रमुखांच्या मागणीप्रमाणे अग्रिम मागणीसाठी वित्त विभागामध्ये नस्ती आल्यानंतर आम्ही त्यावर शिफारस केलेली नाही. मात्र अत्यावश्यक बाबी म्हणजे जिल्हा परिषदेचे वीज देयक न्यायालयीन प्रकरणे याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे अग्रिम मंजूर केलेले आहेत. आम्ही त्यांच्या आदेशाचे पालनही केलेले आहे.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात खुलासा केला की, याबाबत २-३ बाबींचा आढावा घेणे आवश्यक होते. कारण काही ठिकाणी रक्कम अडकलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे रक्कम अडकली आहे. ती रक्कम आम्हाला प्राप्त न झाल्यामुळे काही ठिकाणी आम्हाला असे निर्णय घ्यावे लागले आहेत. वीज देयक न भरल्याने आपली पूर्ण कार्यवाही थांबली होती. काही तातडीचे न्यायालयीन प्रकरणे आल्यामुळे तातडीची बाब म्हणून हा निर्णय घ्यावा लागला होता. याबाबत शासनाकडून मंजूरी मिळण्याबाबत आम्ही पाठपुरावा सुरू ठेवलेला आहे.

यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रलंबित अग्रिमामध्ये जास्त रक्कम शिक्षण विभागाची आहे. शिक्षण विभागाचा २५ कोटी निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकला आहे. हा निधी शासनास न भरल्यास सादील अनुदान प्राप्त होत नाही. सादील अनुदानाच्या आधारे त्यांना ही रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. सादील अनुदान शिक्षण विभागाकडून प्राप्त झाल्यास त्याचे समायोजन होईल.

या संदर्भातील माहिती प्राप्त करून समितीला अहवाल सादर करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आश्वस्त केले. समितीने यानंतर असे मत व्यक्त केले की, आज सकाळी अनौपचारिक बैठकीमध्ये हा विषय चर्चेला आला होता. या विषयाबाबत समिती विभागीय सचिवांची साक्ष घेणार आहे. जिल्हा परिषदेची साधारणपणे ६० कोटी रुपये एवढी रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकून पडली आहे. जिल्हा परिषदेची एवढी मोठी रक्कम बँकेत अडकून पडली असल्यामुळे जिल्हा परिषदेला योजना राबविण्यामध्ये अनेक अडचणी येत आहेत. यापूर्वी राज्य शासनाने बुलढाणा जिल्हा परिषदेच्या रकमेबाबत निर्णय घेतला आहे व त्यांना मदत करण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या बँकेत अडकलेल्या रकमेबाबतही समिती संबंधित विभागीय सचिव आणि संबंधित अधिका-यांची बैठक घेऊन जिल्हा परिषदेची अडकून पडलेली रक्कम टप्प्याटप्प्याने का होईना परत मिळवून देण्याचा प्रयत्न करील.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

वित्त विभागामार्फत विविध विभागांना देण्यात आलेले अग्रिम रुपये ६४ लाख ६३ हजार १६३ पैकी समितीच्या भेटीपर्यंत सुमारे ४० लक्ष रुपयांच्या अग्रिमांचे समायोजन झालेले नव्हते यामध्ये शिक्षण विभागाच्या थकित अग्रिमाचा मोठा वाटा असून थकित आगाऊ रक्कमांचे समायोजन/ वसुली संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीने निदेश देवूनही समायोजन वसुली बाबत कार्यवाही अहवाल समितीस सादर न करण्याची कारणे काय आहेत, संबंधित विभाग प्रमुखांनी सदरची कार्यवाही करण्यात दिरंगाई केल्याप्रकरणी त्यांचेवर कोणती कार्यवाही केली, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१० नुसार आवश्यक त्या बाबीसाठी आगाऊ अग्रिम विभाग प्रमुख व कर्मचारी यांना मंजूर करण्यात येतो. सन २०११-१२ अखेर खालील प्रमाणे आगाऊ अग्रिम प्रलंबित असल्याचे आक्षेपात दर्शविण्यात आले आहे त्याची वसुली खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | अग्रिमाचा प्रकार | प्रलंबित अग्रिम | माहे २/१६ अखेर वसूल झालेले अग्रिम | प्रलंबित अग्रिम (३-४) | पैकी १२/१७ अखेर वसूल अग्रिम | प्रलंबित शिल्लक अग्रिम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | वेतन अग्रिम | ४०९३४ | ३६९३४ | ४००० | ४००० | निरंक |
| २) | प्रवास अग्रिम | ३९७६५ | ३९७६५ | निरंक | निरंक | निरंक |
| ३) | सण अग्रिम | १८२८० | १८२८० | निरंक | निरंक | निरंक |
| ४) | क-इतर अग्रिम | ६३६४१८४ | २३००६०५ | ४०६३५७९ | ३१००० | ४०३२५७९ |
| | एकूण | ६४६३१६३ | २३९५५८४ | ४०६७५७९ | ३५००० | ४०३२५७९ |

प्रलंबित अग्रिमाबाबत विभाग निहाय माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | अग्रिमाचा प्रकार | प्रलंबित अग्रिम रक्कम |
|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन विभाग | क-इतर अग्रिम | ५४३१७ |
| २. | शिक्षण विभाग | क-इतर अग्रिम | २४४२२७४ |
| ३. | बांधकाम विभाग | क-इतर अग्रिम | २६६५६० |
| ४. | लघुपाटबंधारे विभाग | क-इतर अग्रिम | ३७००७० |
| ५. | कृषि विभाग | क-इतर अग्रिम | ६०००० |
| ६. | भू.स.वि.यं. | क-इतर अग्रिम | २६२५१ |
| ७. | पं.स.भूम | क-इतर अग्रिम | ८१३१०७ |
| | | एकूण | ४०३२५७९ |

(२) सन २०१६-१७ अखेर प्रलंबित असलेले अग्रीम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | अग्रिमाचा प्रकार | प्रलंबित अग्रिम रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सामान्य प्रशासन विभाग | क-इतर अग्रिम | ४२०३१७ |
| २) | बांधकाम विभाग | क-इतर अग्रिम | २६६५६० |
| ३) | लघुपाटबंधारे विभाग | क-इतर अग्रिम | ३७००७० |
| ४) | कृषि विभाग | क-इतर अग्रिम | ६०००० |
| ५) | ग्रा.पा.पु.विभाग | क-इतर अग्रिम | ५०००० |
| ६) | शिक्षण विभाग | क-इतर अग्रिम | ४५३१३६७ |
| ७) | भू.स.वि.यं. | क-इतर अग्रिम | २६२५१ |
| ८) | पं.स.भूम | क-इतर अग्रिम | ८१३१०७ |
| | | एकूण | ६५३७६७२ |

माहे मार्च २०१७ अखेर प्रलंबित अग्रीमापैकी सद्य:स्थितीत प्रलंबित असलेले अग्रीम खालील प्रमाणे

| अ.क्र. | विभागाचे नाव | अग्रिमांची संख्या | अग्रिमाचा प्रकार | प्रलंबित अग्रिम दि.३१.३.२०१७ | माहे १२/१७ पर्यंत वसूल करण्यात आलेले अग्रिम | १/१८ रोजी प्रलंबित अग्रिम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १) | सा.प्र.वि. | ०७ | क-इतर | ४२०३१७ | २२९००० | १९१३१७ |
| २) | बांधकाम | ०२ | क-इतर | २६६५६० | ० | २६६५६० |
| ३) | ल.पा.वि. | ०६ | क-इतर | ३७००७० | ० | ३७००७० |
| ४) | कृषि | ०२ | क-इतर | ६०००० | ० | ६०००० |
| ५) | ग्रा.पा.पु. | ०१ | क-इतर | ५०००० | ० | ५०००० |
| ६) | भू.स.वि.यं. | ०२ | क-इतर | २६२५१ | ० | २६२५१ |
| ७) | शिक्षण विभाग | ३२ | क-इतर | ४५३१३६७ | ० | ४५३१३६७ |
| ८) | पं.स.भूम | ०२ | क-इतर | ८१३१०७ | ० | ८१३१०७ |
| ९) | एकूण | ५४ | | ६५३७६७२ | २२९००० | ६३०८६७२ |

सन २०१६-१७ अखेर वरील प्रलंबित अग्रिम समायोजन करणेसाठी संबंधित विभाग प्रमुखांना वेळोवेळी पत्र व्यवहार करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे बैठकीत आदेशित करण्यात आले आहे. तसेच विभागाकडे प्रलंबित असलेल्या अग्रिम समायोजन, वसुलीची कार्यवाही चालु आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

जिल्हा परिषदांमधील प्रलंबित अग्रिमाची वसुली करण्याबाबत दिनांक २३ मार्च, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना नव्याने सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, यात फार मोठी रक्कम शिल्लक आहे, त्यासंबंधी आपले काय म्हणणे आहे, रक्कम वाढली आहे. रकमेची संख्या ४० वरून ६३ वर गेली आहे, यात वसुल करण्याचे काम झालेले नाही, उलट रकमेची संख्येत वाढ होत असल्याने ही बाब बरोबर नाही. आपण पान क्रमांक ६५ पहावे. ही रक्कम किती दिवसामध्ये वसूल करणे अपेक्षित होते, ह्या रक्कमेचे ३० दिवसाच्या आत समायोजन करणे आवश्यक होते. सहा वर्षे झाली तरी आपण यात काहीही केलेले नाही, यासाठी आमच्याकडे कोणताही बचाव नाही. पुढील पगारापासून रक्कम वसूल करण्याचे आदेश देण्यात येतील.

यानंतर समितीने विचारणा केली की, विभागाने राज्य स्तरावरुन ३० दिवसात, तीन महिन्यात किंवा त्या आर्थिक वर्षात वसुली बाबत उपाययोजना करणे अपेक्षित होते, परंतु तुमच्याकडून काहीच अंमलबजावणी झाली नाही हे संयुक्तिक आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रामुख्याने असे नमूद करावयाचे आहे की, शिक्षण विभागाची वसुली रु. ४५.३१ लाख इतकी आहे. याचे कारण असे की, त्या विभागाला जे आकस्मिक निधी अनुदान मिळते ते येणे बंद झाले आहे. अखर्चित रक्कम त्यांच्याकडे जमा होती ती शासन जमा झालेली नाही. त्या विभागाचे पैसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकले आहेत.

या उत्तरावर समितीने असे मत व्यक्त केले की, समितीसमोर असे उत्तर देणे योग्य नाही. विभागाने सादर केलेल्या अभिप्रायामध्ये असे कुठेही नमूद केलेले नाही. याठिकाणी सविस्तरपणे नमूद केलेले नाही हे कारणे होऊ शकत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एकमेकांशी संबंधित विषय आहेत. अखर्चित रक्कम जमा न झाल्यामुळे शासनाकडील आकस्मिक निधी अनुदान येणे बंद झाल्यामुळे या अग्रिमांचे समायोजन होऊ शकले नाही असे एक कारण आहे. या उत्तरानंतर समितीने नाराजी व्यक्त केली की, मोघम उत्तर देऊ नये. जे उत्तर समितीला देत आहात त्याबाबत विभागीय सचिवांशी पूर्व चर्चा केली आहे काय, कोणाचाही संबंध कोणाबरोबर जोडायचे योग्य नाही.

त्यानंतर विभागीय सचिवांनी देखील असे मत व्यक्त केले की, अग्रिमाच्या वसुलीचा याच्याशी काही संबंध नाही. जे अग्रिम दिले आहे त्याचा हिशोब देणे आवश्यक आहे. यावर समितीने विचारणा केली की, सीईओ यांनी उत्तर दिले की, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेत पैसे अडकले आहेत. बँक बुडीत निघाली म्हणून समायोजन करता आले नाही हे उत्तर योग्य आहे का, विभागाच्या सचिवांनी आपल्या स्तरावर निदेश दिले पाहिजेत. वसुली होत नसेल तर संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल केला पाहिजे.  सहा वर्षात सचिव स्तरावरुन काहीही कारवाई झालेली नाही. हा संपूर्ण राज्याचा विषय आहे.  शासनाचे करोडो रुपये अग्रिम रक्कमेच्या स्वरुपात गुंतून पडले आहेत. असे असतांना शासन स्तरावर का कारवाई केली नाही, यावर विभागीय सचिवांनी विदित केले की, मागील वर्षी आम्ही नवीन परिपत्रक काढून किती दिवसात कार्यवाही करायची हे सांगितले आहे. समायोजनाची रक्कम प्रलंबित असेल तर पुन्हा अग्रिम मिळता कामा नये. निवृत्त झाल्यानंतरही वसुली झालेली नाही असे होता कामा नये.

समितीने असे मत व्यक्त केले की, रक्कम कमी न होता वाढली आहे.  ही रक्कम ४० लाखावरुन ४५ लाख रुपयांवर गेली आहे. प्रशासन चुकीच्या मार्गावर चालले आहे याची सखोल चौकशी झाली पाहिजे. अग्रिमाचे पैसे वसूल करण्याच्या संदर्भात सचिवांमार्फत उपाययोजना केली गेली पाहिजे. गुन्हा दाखल केला पाहिजे असे आमचे म्हणणे नाही, परंतु किमान आपल्यामार्फत परिपत्रक निर्गमित केले पाहिजे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, समितीची परवानगी असेल तर सर्व जिल्हयांसाठी तसे परिपत्रक काढता येईल, हा सर्वच जिल्हयांचा प्रश्न आहे. ज्यांची अग्रिमाची रक्कम तीन महिने झाले किंवा वित्तीय वर्ष उलटूनही समायोजन झाले नाही तर जो पर्यंत अग्रिम वसूल होत नाही तोपर्यंत संबंधित अधिका-यांच्या वेतनातून ५० टक्के अग्रिमाची रक्कम वसूल करावी. सात दिवसात त्यांच्याकडून माहिती घेऊन समितीला अहवाल सादर करण्यात येईल. इतकी वर्षे अग्रिम देऊनही वसुली का झाली नाही, अग्रिम घेऊनही समायोजन केले नसेल तर पगारातून टप्प्याटप्प्याने वसुली करण्याचे आदेश द्यावे लागतील. यामध्ये निष्काळजीपणा झालेला आहे. अग्रिमाचे स्वरुप असे असते की, अग्रिम देऊन काही तरी घ्यावे लागते. देयक

त्यावेळी मिळत नाही. दौरा करावयाचा असेल, समिती आली असेल आणि त्यासाठी तिकिट काढावयाचे असते, त्याकरिता अग्रिम दिला जातो. पैसे खर्च होतात, परंतु निष्काळजीपणामुळे चलन किंवा पावती सादर केले जात नसल्यामुळे समायोजन होत नाही. ९० टक्के प्रकरणात अपहार नसतो, परंतु शिस्तीचा अभाव आहे. पदाधिका-यांच्या नांवे अग्रिम काढता येत नाही म्हणून अधिका-यांचे नांवे अग्रिम काढला जातो.

समितीने निदर्शनास आणून दिले की, समिती जिल्हा परिषदांमध्ये फिरते. जिल्हा परिषद लेखा संहिता, १९६८ च्या कोणत्या नियमांचे पालन करुन जिल्हा परिषदेचे लेखापाल काम करतात, कोणत्याही जिल्हा परिषदेमध्ये नियमांचे पालन केले जात नाही. पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेला भेट दिल्यानंतर कुठेही नियम ६७ प्रमाणे नमुना २३ पहावयास मिळत नाही. नमुना २३ हे बांधकामाचे प्रगती पुस्तक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांचा आरसा आहे. अग्रिमाच्या संदर्भातील अनियमितता राज्यात सर्वत्र दिसून येते. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी अध्यक्ष आणि सभागृहाची परवानगी न घेता परस्पर मेळघाट येथील कार्यक्रमाची आखणी केली. तीन दिवस सर्व पंचायत समित्या रिकामी, जिल्हा परिषद रिकामी होती. परवा सोमवारी सुध्दा मुख्यालयात कोणी नव्हते. आपण स्वतः सचिव या नात्याने मुख्य अभियान कार्यक्रम हाती घ्यावा आणि थकलेल्या अग्रिमाची वसुली करण्याकरिता तपासणी तातडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. किती दिवसात ही कार्यवाही करणार आहात हे समितीला सांगावे.

यानंतर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ठराविक प्रकरणामध्ये प्रत्यक्ष रक्कम का वाढली याचा अहवाल सात दिवसात समितीला सादर करण्यात येईल. सन २०१६-१७ च्या वर्षाचे सुध्दा अग्रिम वसूल व्हायचे आहे. तुम्हाला लक्ष घालावे लागणार आहे. संपूर्ण राज्यामध्ये अग्रिमाच्या अनुषंगाने राज्य सरकारची करोडो रुपयांची रक्कम वसूल होणे प्रलंबित आहे. अग्रिम रक्कमेच्या पावत्या सादर केल्या जात नाहीत. रक्कम खर्च झाली किंवा नाही याचा रेकॉर्ड असला पाहिजे. रेकॉर्ड उपलब्ध करुन दिला पाहिजे. गैरव्यवहार काही अंशी आढळून आला असेल तर कारवाई करणे क्रमप्राप्त आहे. त्याची जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी व त्याचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत थकित आगाऊ रक्कमा (थकित अग्रिम) प्रकरणी लेखा परिक्षणामध्ये खालील आक्षेप घेण्यात आलेले आहेत. जिल्हा परिषदामध्ये निरनिराळया योजना बांधकाम वगैरे बाबी कार्यान्वित करण्यासाठी संबंधित ठेकेदार, विभाग प्रमुख अथवा कर्मचारी यांना वेळोवेळी आगाऊ रक्कमा दिल्या जातात.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार सन २०११-१२ अखेर वेळोवेळी देण्यात आलेले अग्रिम रूपये ६४,६३,१६३/-पैकी रक्कम रूपये २३,६५,५८४/- एवढे अग्रिम वसुल करण्यात आलेले असून रूपये ४०,६७,५७९/- एवढे अग्रिम जिल्हा परिषदेच्या विविध विभागांकडे प्रलंबित आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या समवेत झालेल्या साक्षी दरम्यान समितीस असे निदर्शनास आले की, दुसरी रक्कम अग्रिम म्हणून दिलेली आहे. तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी संबंधित विभागाकडे अग्रिम प्रलंबित असल्याचे अभिप्राय दिलेले होते. अत्यावश्यक बाब म्हणून जिल्हा परिषदेचे वीज देयक न्यायालयीन प्रकरणे या सबबी खाली अग्रिम मंजूर केलेला आहे. प्रलंबित अग्रिमामध्ये शिक्षण विभागाची रक्कम जास्त आहे. शिक्षण विभागाची रूपये २५ कोटी एवढा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकला आहे, हा निधी शासनास न भरल्यास सादील अनुदान प्राप्त होत नाही. सादील अनुदान शिक्षण विभागाकडून प्राप्त झाल्यास अग्रिम रकमेचे समायोजन होईल. जिल्हा परिषदेची साधारणपणे ६० कोटी रूपये एवढी रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकून पडली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेला योजना राबविण्यामध्ये अनेक अडचणी येत आहेत. यापूर्वी राज्य शासनाने बुलढाणा जिल्हा परिषदेच्या रकमेबाबत निर्णय घेतला आहे व त्यांना मदत करण्याची भूमिका घेतली आहे. **त्यामुळे उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या बँकेत अडकलेल्या रक्कमेची वसुली बुलढाणा जिल्हा परिषदेच्या रकमेबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे करण्यात यावी याकरीता सहकार विभागाने जिल्हा बँकमध्ये अडकून पडलेला निधी त्वरीत प्राप्त होण्यासाठी सचिवांनी आपल्या स्तरावर तात्काळ कार्यवाही करावी तसेच जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या अधिका-यांकडे प्रलंबित असलेली अग्रिम रक्कम कमी न होता ही रक्कम ४० लाख रुपयांवरून ४५ लाख रुपयांवर गेली. उक्त प्रलंबित असलेली अग्रिम रक्कम वसूल करण्यासंदर्भात सचिवांनी समितीस आश्वासित केलेल्या उपाययोजनांबाबत सर्व जिल्हयांसाठी परिपत्रक निर्गमित करण्यात यावे. ज्याची अग्रिमाची रक्कम तीन महिने झाले किंवा वित्तिय वर्ष उलटूनही समायोजन न झाल्यास अग्रिम वसूल न होणे ही बाब गंभीर आहे. ज्या कारणासाठी अग्रिम घेतला तो त्याच कामासाठी वापरणे योग्य असताना त्याचा वापर न होणे तसेच सदरचा अग्रिम जर वापरला नसेल तर त्याचा विनियोग दुसरीकडे कुठे केला याची चौकशी करुन संबंधित अधिका-यांकडून अग्रिम घेतला त्या तारखेपासून वसुल होईपर्यंत बँकेतील प्रचलित व्याजदराप्रमाणे वसुल करावा व असा अग्रिम वसुल होत नसल्यास जिल्हा परिषदेच्या पॅनेल वकीलाचा सल्ला घेऊन संबंधितांवर फौजदारी गुन्हे व दावे दाखल करण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## यशवंत पंचायत राज अभियान अंतर्गत हाती घेतलेल्या कामावरील खर्चाबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.१७८ (सन २०११-१२)**

पंचायत समिती, उमरगा द्वारा यशवंत पंचायत राज अभियान अंतर्गत हाती घेतलेल्या पाच कामावर रुपये २,००,०००/- खर्च नोंदविण्यात आलेला आहे. यावर पुढील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १२३(२) नुसार रुपये ५०,०००/- पर्यंत किंमतीची कामे रितसर कंत्राटाने किंवा उक्ता कामाने करता येऊ शकतात व त्यापेक्षा कमी किंमतीचे काम सर्व वर्गाच्या स्थानिक कंत्राटदारामार्फत मंजूर सुचीवर पार पाडता येतात व या प्रयोजनासाठी स्थानिक कंत्राटदाराची सुची ठेवण्यात येईल, परंतु पंचायत समितीने त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १२५ नुसार नमुना नंबर ४३ मध्ये कामावरील मजुरांचे हजेरीपट ठेवणे आवश्यक आहे. नियम १२८ नुसार मजुरांनी केलेले काम हजर दिवस मजुरीचा दर इत्यादीच्या नोंदी घेणे आवश्यक आहे, तसेच नियम १३० नुसार केलेल्या कामाची मोजमापे घेवून त्यावर नोंदी करणे आवश्यक असतांना शाखा अभियंता यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १९० नुसार विहित नमुना नं.६५ मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे परंतु असे प्रमाणपत्र दिलेले नाही.

(४) सदरील कामाचे मुल्यांकनाची नोंद असलेली मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील कलम १२३(२) अन्वये या पंचायत समितीने यशवंत पंचायत राज अभियान अंतर्गत उत्कृष्ट पंचायत समितीला मिळालेल्या बक्षिसाच्या रक्कम रु. २,००,०००/- मधून पुढीलप्रमाणे ५ कामे हाती घेण्यात आली.

| अ.क्र. | कामाचे नाव / गाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत जकेकुर येथील अंगणवाडी दुरुस्ती | २५,०००/- |
| २) | पंचायत समिती उमरगा कार्यालय दुरुस्ती | १,००,०००/- |
| ३) | ग्रामपंचायत कोरेगाव येथील अंगणवाडी दुरुस्ती | ४०,०००/- |
| ४) | पंचायती समिती उमरगा परिसर स्वच्छ करणे | १०,०००/- |
| ५) | ग्रामपंचायत कंटेकुर येथील अंगणवाडी दुरुस्ती | २५,०००/- |
| | एकुण रक्कम | २,००,०००/- |

पंचायत समितीने यशवंत पंचायत राज अभियान अंतर्गत प्राप्त झालेल्या बक्षिसाच्या रक्कमेचा पंचायत संस्थानी विनियोग करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे शासन निर्णय शासन परिपत्रक क्र. झेडपीए/१००८/प्र.क्र.१४८/पंरा-१ मंत्रालय मुंबई दिनांक २४ डिसेंबर, २००९ **(परिशिष्ट १०.१)** मधील अनुक्रमांक ७ अन्वये पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक १४/११/२०११ ठराव क्र.०९ अन्वये उक्त बक्षिसाच्या रकमेच्या कामाचे नियोजन करुन मान्यता घेण्यात येऊन किरकोळ स्वरुपाची कामे असल्यामुळे खात्यामार्फत करण्यात आली आहेत.

(२) कामावरील मजुरांची मंजुरी अदाई करणे बाबतचे मजुराचे हजेरी पट नमुना नं.४३ मध्ये ठेवण्यात आले असुन संचिकेस उपलब्ध आहे. तसेच कामाची मोजमापे घेवुन शाखा अभियंता उप विभागीय अभियंता बांधकाम यांनी सर्व नोंदी तपासल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही केली आहे.

(३) सदरील पाच कामाचे मुल्यांकनाप्रमाणे विहित नमुन्यात काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेण्यात आले असुन तपासणीस उपलब्ध आहेत.

(४) सदरील कामाच्या मुल्यांकनाची नोंदी असलेल्या मोजमाप पुस्तिका क्र.२४४६, ३६७० व २३७४ उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, उपरोक्त कामे कंत्राट पध्दतीने न करता शाखा अभियंता यांच्यामार्फत का करण्यात आली आहेत, शाखा अभियंता यांच्या नावाने धनादेश काढण्यात आला होता का, तसा नियम आहे का आणि याबाबत कोण दोषी आहेत. याबाबत गट विकास अधिकारी, उमरगा यांनी खुलासा केला की, सदर प्रकरणात कंत्राटदाराने काम करावयाचे होते. परंतु, ते सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध नव्हते. आता एम.बी.रेकॉर्ड व सी.सी.उपलब्ध झाले आहेत. तसेच शाखा अभियंता यांच्या नावाने धनादेश काढण्यात आला आहे. तसा नियम नाही. ज्यांनी धनादेश काढला व ज्यांच्या नावाने काढला ते दोघेही दोषी आहेत.

यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई प्रस्तावित करावी व त्याचा अहवाल समितीला सादर करावा. अशा प्रकारचा तिसरा विषय समितीसमोर येत आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणांबाबत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) प्रस्तुत प्रकरणात कंत्राटदाराऐवजी शाखा अभियंत्याने काम करणे, लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न करणे, मजुरांचा हजेरीपट ठेवलेला नसणे याबाबतीत चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत समितीने निर्देशित केलेले आहे. त्यानुसार शाखा अभियंत्यावर केवळ २५,०००/- रुपये दंडाची शास्ती करण्यात आलेली आहे. परंतु त्यांचेवर त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंद घेऊन त्याची एक वेतनवाढ न रोखण्याची कारणे काय आहेत ?

(२) तत्कालिन गट विकास अधिकारी व सहाय्यक लेखा अधिकारी यांच्यावरील कारवाई अद्याप अंतिम झालेली नाही. त्यांच्या विलंबाची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सदरील प्रकरणी शाखा अभियंता यांनी कामे केलेली आहे व त्यांनी अभिलेखे लेखा परिक्षणात उपलब्ध न करणे, मजुरांचा हजेरी पट ठेवलेला नसल्याने संबधीत श्री. एम. एम. दुधभाते शा.अ.यांना रु.२५०००/- दंडाची शास्ती करुन दंड वसुल करुन चलन क्रमांक ३ दिनांक ६ एप्रिल, २०१७ चलनाद्वारे शासन खाती जमा करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी श्री. एम. एम. दुधभाते, शाखा अभियंता यांची एक वेतनवाढ कार्यकारी अभियंता (बांध.) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश क्र./आस्था-१/१४६/२५६/२०१७ दि.०९/०१/२०१८ अन्वये रोखण्यात आलेली आहे.

(२) तत्कालीन गटविकास अधिकारी श्री. सावळसुरकर हे पंचायत समिती, उमरगा हे दिनांक ३१/०३/२०१४ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम २७(२) बी प्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या पूर्व परवानगीची आवश्यकता आहे. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर करण्यात येत आहे. श्री. बेलूरकर आर. एस, सहाय्यक लेखाधिकारी याप्रकरणी दोषी आढळून येत नसल्याने त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात आली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :**

प्रस्ताव शासनास अद्यापी प्राप्त झालेला नाही. प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**चौकशी अहवाल**

पंचायती राज समिती यांचा दौरा दिनांक २२, २३ व २४ फेब्रुवारी, २०१६ मधील झालेल्या बैठकीतील कार्यवृत्ताचे पृष्ठ क्र.४५ परिच्छेद क्र.४.१७८ पृष्ट क्र.५३५ बाबत मा.समिती प्रमुख यांनी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कारवाई प्रस्तावित करून त्याचा अहवाल समितीला सादर करण्याबाबत व विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्याबाबत सुचविलेले आहे.

त्या अनुषंगाने मी श्री. डि. टी. भिसे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा चौकशी अहवाल सादर करतो की, सन २०११-१२ मध्ये कार्यरत असलेले तत्कालिन गट विकास अधिकारी, श्री.एम.एल.सावळसुरकर व सहाय्यक लेखाधिकारी, श्री. आर. एच. बेलुरकर या दोन्ही अधिकारी/कर्मचारी (सेवानिवृत्त) यांना या कार्यालयाचे पत्र क्र.जाक्र.पसउ/आस्था-२/कवि१८५०/२०१६ दिनांक ०६/०९/२०१६ अन्वये व जाक्र.पसउ/आस्था-२ /कवि २३५०/२०१६ दि.१८/११/२०१६ अन्वये पत्र व्यवहार करून याबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे. सदर परिच्छेदातील माहितीस अनुसरून लेखा शाखेतील तत्कालिन कर्मचारी व तत्कालिन गट विकास अधिकारी हे सेवानिवृत्त असून या कर्मचा-यांकडून लेखा विषयक अनियमितता झाली असल्याचे दिसून आले. परंतू यात कसल्याही प्रकारचा अपहार अथवा गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही. पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, उमरगा द्वारा यशवंत पंचायत राज अभियान अंतर्गत हाती घेतलेल्या ५ कामांवर रुपये २,००,०००/- खर्च नोंदविण्यात आलेला आहे. यावर लेखापरिक्षणामध्ये पुढील प्रमाणे असे आक्षेप घेण्यात आले होते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १२३ (२) नुसार रुपये ५०,०००/- पर्यंत किंमतीची कामे रितसर कंत्राटाने किंवा उक्त कामाने करता येऊ शकतात व त्यापेक्षा कमी किंमतीचे काम सर्व वर्गाच्या स्थानिक कंत्राटदारामार्फत मंजुर सुचीवर पूर्ण करता येतात परंतु पंचायत समितीने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १९५ नुसार नमुना नंबर ४३ मध्ये हजेरीपट ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. नियम १९० नुसार नमुना ६५ मध्ये काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक असताना असे प्रमाणपत्र दिलेले नाही. मोजमाप पुस्तिका दर्शविणे आवश्यक आहे. उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, कंत्राटदारामार्फत काम करावयाचे होते. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे नव्हते आता एम. बी. रेकॉर्ड व सी.सी. उपलब्ध झाले आहेत. शाखा अभियंत्यांच्या नावे धनादेश काढण्यात आला असल्यामुळे ज्यांनी धनादेश काढला व ज्यांच्या नावे धनादेश काढण्यात आला आहे ते दोघेही दोषी असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित शाखा अभियंता श्री. एम. एम. दुधभाते यांना रुपये २५०००/- दंडाची शास्ती आकारुन ती शासन खाती जमा करण्यात आलेली असून त्यांची एक वेतनवाढ दिनांक ९ जानेवारी, २०१८ अन्वये रोखण्यात आलेली आहे. **तथापि, तत्कालिन गटविकास अधिकारी श्री. सावळसुरकर, पंचायत समिती, उमरगा हे दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत तसेच लेखा शाखेतील तत्कालिन कर्मचारी सेवानिवृत्त असून या कर्मचा-यांकडून लेखा विषयक अनियमितता झालेली असताना सुध्दा त्यांचेविरुध्द ते सेवानिवृत्त होईपर्यंत कुठलीही कारवाई केली नाही. त्यांचे निवृत्ती वेतन रोखून किंवा त्यांचेवर दंडात्मक शास्ती लावून अथवा अनियमितता झालेल्या बाबीतील अपहारित रक्कम वसुल करुन कारवाई करणे आवश्यक असताना संबंधित सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांना ना-देय (No dues) प्रमाणपत्र देणे ही देखील गंभीर बाब आहे. म्हणून या प्रकरणी ना-देय प्रमाणपत्र देण्यास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द देखील कारवाई करावी व संबंधितांकडून सदरची रक्कम वसुल करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## वाशी (ता.वाशी) ग्रामपंचायतीमधील इतर अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ५.५०/ (२)(सन २०११-१२)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जि.प.चे नाव | पं.स.चे नाव | ग्रा.पं.चे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक व लेखा परिक्षण अहवाल वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रमाणकाशिवाय खर्च | उस्मानाबाद | वाशी | वाशी | परिच्छेद क्रमांक-२ सन २००७-०८ ते २००९-१० | १०,५८,१९६/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्रामपंचायत वाशी यांचेकडुन दिनांक ०३.०४.२००७ ते ११.०२.२०१० या कालावधीत ग्रामपंचायतीने मोटार दुरुस्ती, पाणी पुरवठा साहित्य खरेदी व पाणी पुरवठा विद्युत देयकाचा भरणा करणे या बाबींवर रू.१०,५८,१९६/- इतका खर्च केलेला असुन त्याची खात्री विस्तार अधिकारी (पं) यांचे मार्फत दिनांक ०२.०६.२०१५ रोजी करण्यात आलेली आहे. सदर खर्च ग्रामपंचायतीच्या आवश्यक त्या बाबींवर केलेला असल्याने व केलेल्या खर्चाविषयक बाबीची पडताळणी गट विकास अधिकारी यांनी केली आहे. सद्यःस्थितीत सर्व अभिलेखे उपलब्ध आहेत. तथापी सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन न दिल्याबाबतची जबाबदारी श्री.एस.के.लांबडे, व श्री.वा.व्ही.वाघ, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत वाशी यांच्यावर निश्चित करुन अनुक्रमे आदेश क्र.पंसवा/पंचायत-३/ कावि-१७८/१५ दि.०९/१०/२०१५ व पंसवा/ पंचायत-३/कावि-१७९/१५ दि.०९/ १०/२०१५ अन्वये ठपका ठेवणेची शास्ती करण्यात आली आहे. सदर आदेशाची प्रत व रुपये १०,५८,१९६/- च्या खर्चाची प्रमाणके तपासणीस उपलब्ध आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,ग्रामपंचायत स्तरावर होणा-या खर्चाची प्रमाणके महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ६२ (४) नुसार क्रमांक १५ मध्ये नोंदविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही का केलेली नाही.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केली की, ग्रामपंचायत वाशी यांचेकडून दिनांक ३-०४-२००७ ते ११-०२-२०१० या कालावधीत ग्रामपंचायतीने मोटार दुरुस्ती, पाणी पुरवठा साहित्य खरेदी व पाणी पुरवठा विद्युत देयकाचा भरणा करणे या बाबींवर रुपये १०,५८,१९६/- इतका खर्च केलेला असून, त्याची खात्री विस्तार अधिकारी, (पंचायत) यांच्यामार्फत दिनांक ०२-०६-२०१५ रोजी करण्यात आली आहे. सदर खर्च ग्रामपंचायतीच्या आवश्यक त्या बाबींवर केलेला असल्याने व केलेल्या खर्चाविषयक बाबींची पडताळणी गट विकास अधिकारी यांनी केली आहे. सद्यःस्थितीत सर्व अभिलेखे उपलब्ध आहेत. तथापि, सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन न दिल्याबाबतची जबाबदारी श्री. एस.के.लोखंडे व श्री. वाय.व्ही.वाघ, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वाशी यांच्यावर निश्चित करुन ठपका ठेवल्याबाबतची शास्ती करण्यात आली आहे. सदर आदेशाची प्रत व रुपये १०,५८,१९६/- च्या खर्चाची प्रमाणके तपासणीस उपलब्ध आहेत.

तद्नंतर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, वाशी ग्रामपंचायतचे लेखा परिक्षण केलेले आहे काय, १ कोटी ४२ लाख रुपयांची खरेदी केलेली आहे. ग्रामपंचायतीमार्फत जो खर्च केला जातो, त्यासंदर्भातील पावत्या लावल्या जात नाहीत. दुस-या कोणत्या तरी पावत्या जोडल्या जातात. वास्तविक पाहता अशा पावत्यांना कोणताही अर्थ नसतो. त्यामुळे एखाद्या कामावर किती खर्च झाला हे देखील कळत नाही. असा प्रकार सर्वच जिल्हा परिषदेमध्ये होताना दिसून येत आहे.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, यामध्ये संबंधित दोषी लोकांवर जबाबदारी निश्चित करुन पुढील नियमानुसार योग्य ती कारवाई करावी अशी समितीची सूचना आहे.त्यांच्याकडून व्याजासहित रक्कम वसूल करावी. यासंदर्भातील केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला देण्यात यावा. समिती हा विषय सचिवांच्या साक्षीसाठी घेत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्रस्तुत प्रकरणी संबंधित दोषी अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार योग्य ती कारवाई करावी त्याच्याकडून व्याजा सहित रक्कम वसूल करावी व या संदर्भातील अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार केलेल्या चौकशीत श्री.एस.के.लांबडे व श्री वाय.व्ही.वाघ तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत वाशी हे दोषी आढळले असून लेखापरिक्षण कालावधीत त्यांनी रुपये १०,५८,१९६/- एवढा खर्च विकास कामावर केला असल्याचे सिध्द होऊ शकले नसताना त्याचेवर केवळ कलम ७ नुसार २५०००/- रुपये दंडाची शास्ति केल्या प्रकरणी शासन सहमत आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत ? अन्य प्रशासकीय कारवाई का करण्यात आली नाही.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा.पंचायती राज समितींनी दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात मा.विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये ग्रामपंचायत लेखा परिक्षण सन २००७-०८ ते २००९-२०१० परिच्छेद क्र.०२ प्रमाणकाशिवाय कीर्द वर खर्च नोंदविणे या सदराखाली आक्षेप नोंदविण्यात आला असून सदरील आक्षेपाचे अवलोकन केले असता लेखा परिक्षण करतेवेळी रुपये १०,५८,१६९/- इतक्या रक्कमेचे खर्च प्रमाणके परिक्षकास तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले नाहीत, त्यामुळे प्रमाणकाच्या आधारे खर्चाबाबत पुर्तता दर्शवावी व सर्व प्रमाणके नमुना नं.१५ मध्ये नोंदवून त्यास ग्रामपंचायत सभेची मंजुरी घेवून पुढील लेखा परिक्षणास दर्शवावे असे नमुद आहे. त्याअनुषंगाने विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वाशी यांनी दिनांक ०२/०६/२०१५ रोजी तपासणी केली असता खर्चाची सर्व प्रमाणके ग्रामपंचायत मध्ये असुन सदरील खर्च ग्रामपंचायत वाशी यांनी पाणीपुरवठा साहित्य खरेदी व अनुषंगिक बाबीवर केलेला आहे. तसेच प्रमाणकांच्या नोंदी ग्रा.पं.नमुना नं.१५ मध्ये घेण्यात आलेल्या असुन वसुल पात्र रक्कम निरंक आहेत. त्यामुळे रक्कम वसुल केलेली नाही. तथापि, सदरील प्रकरणामध्ये दोषी असलेले तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री.वाघ वाय.व्ही.व श्री.लांबडे एस.के. यांचेकडून स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम १९३० मधील कलम ०७ नुसार रक्कम २५०००/-रुपये दंडाची आकारणी करुन दोघांकडून दंड वसुल करण्यात आला आहे.

तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाशी यांचे आदेश क्र.पंसवा/पंचायत-३/कावी ७९/२०१६ दिनांक ०८/०१/२०१६ अन्वये श्री एस.के.लांबडे ग्रामसेवक यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात थोपविण्याची शास्ती करण्यात आली आहे व आदेश क्र पंसवा/पंचायत-३/कावी ८०/२०१६ दिनांक ८/०१/२०१६ अन्वये श्री वाय.व्ही.वाघ, ग्रामसेवक यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात थोपविण्याची शास्ती करण्यात आली आहे. त्याची नोंद सेवा पुस्तिकेत घेण्यात आलेली आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

### चौकशी अहवाल

(१) सहाय्यक संचालक,स्थानिक निधी लेखा परिक्षा, उस्मानाबाद यांनी संदर्भ क्र-२ अन्वये प्रमाणकशिवाय खर्च केलेबाबतचा आक्षेप नोंदवून सदरचा आक्षेप पंचायती राज समितीच्या अहवालामध्ये समाविष्ट करणे बाबत शिफारस केलेली आहे.सदरील परिच्छेद पंचायती राज समिती लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवाल सन २०११-१२ मध्ये परिच्छेद क्र.५.५० नुसार समाविष्ट करण्यात आलेला आहे.त्या अनुषंगाने श्री.लांबडे एस.के.हे दिनांक ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय,वाशी येथे ग्रामविकास अधिकारी या पदावर कार्यरत असतांना दिनांक ०३.०४.२००७ ते २६.११.२००७ या कालावधीत ग्रामपंचयातीच्या विविध बाबींवर रू.३,१९,४१८/-इतका खर्च प्रमाणकशिवाय केल्याबाबत संदर्भ क्र.३ अन्वये कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला आहे.संबधितांनी आजतागायत खुलासा सादर केलेला नाही.तेव्हा वरील खर्चाचे प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना आपण अभिलेखे विहित मुदतीत उपलब्ध करून न दिल्याने उक्त कालावधीत विकास कामावर रू.३,१९,४१८/- इतका खर्च झाल्याचे सिध्द होऊ शकले नाही.सदरील प्रकरणी संबधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.या बाबीस श्री.लांबडे एस.के., तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वाशी हे व्यक्तीशः जबाबदार ठरत असल्याने श्री.लांबडे एस.के., तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाशी यांची संदर्भ क्र.१ मधील तरतुदीनुसार एक वेतन वाढ तात्पुरत्या स्वरूपात एक वर्षासाठी थांबविण्याची शास्ती करण्यात येत आहे.सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मूळ सेवापुस्तकेत घेण्यात यावी.

(२) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा उस्मानाबाद यांनी संदर्भ क्र.२ अन्वये प्रमाणकाशिवाय खर्च केलेबाबतचा आक्षेप नोंदवून सदरचा आक्षेप पंचायती राज समितीच्या अहवालामध्ये समाविष्ट करणे बाबत शिफारस केलेली आहे. सदरील परिच्छेद पंचायती राज समिती लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवाल सन २०११-१२ मध्ये परिच्छेद क्र.५.५० नुसार समाविष्ट करण्यात आलेला आहे.त्या अनुषंगाने श्री.वाघ वाय.व्ही. हे दिनांक २७.११.२००७ ते ३१.०३.२०१० या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय,वाशी येथे ग्राम विकास अधिकारी या पदावर कार्यरत असतांना दिनांक १२.१२.२००७ ते ११.०२.२०१० या कालावधीत ग्रामपंचायतीच्या विविध बाबीवर रू.७,३०,७७८/- इतका खर्च प्रमाणकाशिवाय केल्याबाबत संदर्भ क्र.३ अन्वये कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला होता.वरील खर्चाचे प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना आपण अभिलेखे विहित मुदतीत उपलब्ध करून न दिल्याने उक्त कालावधीत विकास कामांवर रू.७,३०,७७८/- इतका खर्च झाल्याचे सिध्द होऊ शकले नाही.सदरील प्रकरणी संबंधितांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.या बाबीस श्री.वाघ वाय.व्ही. तत्कालीन ग्रामसेवक,ग्रामपंचायत, वाशी हे व्यक्तीशः जबाबदार ठरत असल्याने श्री.वाघ.वाय.व्ही., तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वाशी यांची संदर्भ क्र.१ मधील तरतुदीनुसार एक वेतन वाढ तात्पुरत्या स्वरूपात एक वर्षासाठी थोपविण्याची शास्ती करण्यात येत आहे.सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मूळ सेवापुस्तिकेत घेण्यात यावी.

## अभिप्राय व शिफारशी

वाशी ग्रामपंचायतीमध्ये दिनांक ३/४/२००७ ते ११/२/२०१० या कालावधीत ग्रामपंचायतीने मोटार दुरुस्ती, पाणी पुरवठा साहित्य खरेदी व पाणी पुरवठा विद्युत देयकाचा भरणा करणे या बाबींवर रुपये १०,५७,१९६/- एवढा प्रमाणकाशिवाय खर्च झाला असून सदर अभिलेखे लेखापरिक्षणावेळी उपलब्ध करुन न दिल्याबाबतची जबाबदारी श्री. एस. के. लांबडे व श्री. वाय. व्ही. वाघ, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वाशी यांच्यावर निश्‍चित करुन त्यांच्यावर ठपका ठेवण्याची शास्ती करण्यात आली असल्याचे लेखी खुलाशामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासमवेत झालेल्या साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, प्रस्तुत प्रकरणी लेखापरिक्षणावेळी अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी सादर केलला अनुपालन अहवालामध्ये समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशीत श्री.एस. के. लांबडे व श्री. वाय. व्ही. वाघ, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वाशी हे दोषी आढळलेले असून त्यांच्याकडून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ नुसार २५,०००/- रुपये दंडाची शास्ती वसूल करण्यात आलेली आहे. तसेच श्री. लांबडे व श्री. वाघ यांची एक वेतनवाढ तात्पूरत्या स्वरुपात थोपविण्याची शास्ती करण्यात आली असून त्याची नोंद सेवा पुस्तिकेत घेण्यात आलेली आहे.

दिनांक ३/४/२००७ ते ११/२/२०१० या कालावधीत ग्रामपंचायतीने मोटार दुरुस्ती पाणी पुरवठा विद्युत देयकाचा भरणा करणे याबाबीवर रुपये १०,५८,१९६/- एवढा खर्च केलेला असून त्याची खात्री विस्तार अधिकारी, (पंचायत) यांच्यामार्फत खूप विलंबाने म्हणजे दिनांक २/६/२०१५ रोजी करण्यात आली आहे. प्रत्यक्षात रुपये १०,५०,१९६/- एवढया रकमेचा प्रमाणकाशिवाय खर्च झालेला आहे. ग्रामपंचायती मार्फत जो खर्च केला जातो, त्यासंदर्भातील पावत्या न जोडता दुस-या कोणत्यातरी पावत्या जोडल्या जातात त्यामुळे एखाद्या कामावर किती खर्च झाला हे ज्ञात होत नाही, असा प्रकार राज्यातील सर्व जिल्हा परिषदामध्ये वारंवार होताना दिसून येत आहे. त्यामुळे प्रमाणकाशिवाय खर्च केल्याचे आढळून आल्यास कठोर शास्ती लागू करण्यात यावी असे निदेश ग्रामविकास विभागाने निर्गमित करावेत अशी समितीची शिफारस आहे व त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.

प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.५३/२० :- यशवंत ग्रामसमृध्दी योजनेच्या कामाबाबत, सन २००८-०९**

यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना विकास कामापोटी रक्कम रुपये १३,९७,९३६/- एवढी रक्कम वितरित करण्यात आली आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७९ नुसार अग्रिम म्हणून ग्रामपंचायतींना दिलेल्या रक्कमाची नोंद नोंदवहीत घेतली नाही.

(२) लोकवाट्याच्या प्रमाणात निधीचे वाटप व विनियोग यांचे लेखे उपलब्ध केले नाहीत, कामास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी दिल्याचे आदेश काढलेले नाहीत.

(३) कामाच्या मोजमाप पुस्तिका मागणी करुनही उपलब्ध केले नाहीत. कळंब, पंचायत समिती मधील १ ते १३ ग्रामपंचायतीने कामाचा कृती आराखडा केल्याची लेखे उपलब्ध केले नाहीत.

(४) अर्धसमास पत्र क्र.४, दिनांक ३१/१०/२००९ अन्वये मागणी करुनही मोजमाप पुस्तिका व प्रकरण क्रमांक ४ व ८ ची संबंधित संचिका उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

(५) पंचायत समिती कळंबने विकास कामापोटी रुपये ५,९९,११,०००/- बाबत कृती आराखडा तयार केलेबाबत कागदपत्रे उपलब्ध करावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७९ नुसार यशवंत ग्रामसमृध्दी योजना शासन निर्णय क्रमांक यग्रावि-२००१/प्र.क्र.-१९४/पंरा-६(४७) दिनांक २७/६/२००२ शासन निर्णयातील अनुक्रमांक ३ नुसार निधी वाटपाबाबत प्राप्त तरतुदीनुसार अनुक्रमांक ३ नुसार निधी वाटपाबाबत प्राप्त तरतुदीनुसार रक्कम हप्ता म्हणून ४०:४०:२० या प्रमाणात ग्रामपंचायतींना निधी देण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्यानुसार प्रथम हप्ता ग्रामपंचायतींना वितरित केलेला असल्याने अग्रिम नोंदवही नमुना नंबर ७९ मध्ये नोंद घेण्यात आलेली नाही.

(२) लोकवाट्याच्या प्रमाणात निधीचे वाटप व विनीयोग लेखे (सामान्य रोजकिर्द नमुना नंबर ७, जमेची नोंदवही नमुना नंबर १३, खर्चाची नोंदवही नमुना नंबर १४ इत्यादी) उपलब्ध आहे. तथापी कामास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी दिल्याच्या संचिका उपलब्ध नाहीत. त्यामुळे सदरील बाबीस जबाबदार असलेले तत्कालिन कर्मचारी श्री. हारके एस. एम., सहाय्यक आरेखक यांचेवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कारवाईसाठी आरोपपत्र तयार करुन कार्यकारी अभियंता (बां) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडे या कार्यालयाचे पत्र जाक्र.पंसक/आस्था-२/कावी/६६५५/२०१५, दिनांक ९/१२/२०१५ अन्वये सादर केलेले आहे.

(३) कामाच्या मोजमाप पुस्तिका व कळंब, पंचायत समिती मधील १ ते ७३ ग्रामपंचायतीकडील कामाचा कृतीआराखडा उपलब्ध झालेला नाही, त्याचीही जबाबदारी श्री. हारके एस. एम. यांचेवर निश्चित करुन वरील अ.क्र.२ मध्ये नमुद कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

(४) मुळ परिच्छेदात नमूद प्रमाणक क्रमांक ४ मधील ग्रामपंचायत दाभा येथील रस्ता व नाली बांधकामाची तसेच प्रमाणक क्रमांक ८ ग्रामपंचायत आंदोरा येथील रस्ता नाली बांधकामाची कार्यालयीन संचिका सद्यःस्थितीतही उपलब्ध झालेली नाही, त्याची जबाबदारी श्री.हारके एस. एम. यांचेवर निश्चित करुन वरील अनुक्रमांक २ मध्ये नमुद केले प्रमाणे कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

(५) आक्षेपात नमुद केलेनुसार पंचायत समिती, कळंबने सन २००५-०६ या वर्षाचा यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या ७३ ग्रामपंचायतींच्या कामाचा रुपये ५,९९,११,०००/- चा कृती आराखडा सद्यःस्थितीत उपलब्ध नसल्याने व त्यास श्री.हारके एस. एम. हेच जबाबदार असल्याने त्यांच्यावर वरील अ. क्र. २ प्रमाणे कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५४ : यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत सिमेंट रस्ता/नाली बांधकामातील अनियमितता (सन २००८-०९)**

(१) अर्धसमास पत्र क्र. दि. ०९/०९/२००९ द्वारे मागणी करुनही मोजमाप पुस्तिका क्र. ८०१,११७९,१३१३ व १३१२ उपलब्ध केले नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९६ व ९९ प्रमाणे कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणात दिसून आले नाही.

(३) कामास प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी दिल्याचे लेखे दर्शविले नाहीत. ५ टक्के रक्कम ग्रामनिधीत भरणा केल्याचे लेखे उपलब्ध केले नाहीत.

(४) मौ. सांगवी मार्डी रस्ता कामास प्राकलनाप्रमाणे भाग ब मध्ये सिमेंट कॉंक्रीट पाईप जोडणे एका ठिकाणी मंजूर असताना दोन ठिकाणी जोडणी केली आहे. एक नग पाईपची रक्कम रुपये २२२२/- वसुल करुन निधीत भरणा करावी. सिमेंटचा चाचणी अहवाल घेतला नाही.

(५) मौ. बाभळगांव येथे सिमेंट रस्ता बांधकामासाठी ११८३ गोण्या पुरवठा फरकाची रक्कम रुपये ६५,०६५/- ला मान्यता न घेताच पुरवठा केला आहे तसेच सिमेंटच्या योग्य दर्जा व गुणवत्ताबाबत शासकीय प्रयोग शाळेचा चाचणी अहवाल घेतला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) यशवंत ग्राम समृध्दी योजनेअंतर्गत घेण्यात आलेले सिमेंट रस्ता/नाली बांधकाम ४ कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखा परिक्षणास उपलब्ध केले नसले बाबत अहवालात नमूद आहे. त्या सद्य:स्थितीत उपलब्ध असून त्याचा कामनिहाय तपशील खालील प्रमाणे—

| अ क्र | ग्रा.पं.चे नाव | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय तरतुद | झालेला खर्च | कामाचे मूल्यांकन | मो.मा.पु.क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तिर्थ खु. | वाचनालय | ८४८८०० | ८४८८०० | ८७५०३६ | ११७९ नसून ११७० |
| २ | सांगवी मार्डी | सिमेंट रोड | ९८८००० | ९९२००० | ९९२८०० | १३१२ |
| ३ | काक्रंबा | सिमेंट रोड | ९८८००० | ९८८००० | १०००००० | १३१३ |
| ४ | रायखेल | सिमेंट रोड | ५००००० | ४५१२५० | ५०२२८२ | ८०१ |

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९६ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रदान केलेल्या अधिकारानुसार ग्राम पंचायतीने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे व कलम ९९ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता बांधकाम यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

(३) सदर कामाच्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे आदेश उपलब्ध आहेत. सदर काम ग्रामपंचायतीने स्वतः केलेले असल्याने ५ टक्के रक्कम कपात ग्रामनिधीत जमा केलेली नाही.

(४) मौजे सांगवी मार्डी येथील कामास जादा जोडणी करण्यात आलेल्या एका पाईपची किंमत रु.२,२२२/- वसूल करण्यात येवून ग्रामपंचायत ग्रामनिधी खाते क्र.६२२८४३३८७४८ वर दि.०१/०७/२०१४ रोजी जमा केलेली आहे. तसेच सिमेंट चाचणी अहवाल प्राचार्य तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, उस्मानाबाद यांचेकडून पत्र क्र. १४७/२००९, दि.१५/०५/२००९ अन्वये घेण्यात आला आहे.

(५) मौजे बाभळगांव येथील सन २००५-०६ या वर्षात यशवंत ग्राम समृध्दी योजनेमध्ये सिमेंट रस्ता बांधकाम पूर्ण केलेले असून सदर कामावर ११८३ सिमेंट गोण्या वापरण्यात आलेल्या आहेत. जिल्हा दर सूचीपेक्षा प्रति सिमेंट गोणी ५५/- रुपयाने बाजारभाव जास्तीचा असल्याने ग्राम पंचायतीने ग्रामसभा दि. २६ जानेवारी, २००९ रोजी ठराव क्र. ०६ अन्वये वाढीव दरास मान्यता घेवून खर्च करण्यात आलेला आहे. ठरावाची छायाप्रत उपलब्ध आहे. तसेच सिमेंटचा योग्य दर्जा व गुणवत्ता बाबत सहाय्यक गुण नियंत्रण अधिकारी, जिल्हा प्रयोग शाळा, सोलापूर यांचा अहवाल दि. ०९/०४/२००९ अन्वये घेण्यात आला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.१३९ :- ४ टक्के सादील मधून प्राथमिक शाळांना अग्निशमन यंत्र पुरवठा करणे बाबत (२००८-०९)**

अग्नीशमन यंत्र खरेदीसाठी रक्कम रुपये १९,९९,३९४/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शा.नि.क्र.पीआई-२००८(१२१/०८) प्रा.शि.दिनांक २८.०३.२००८ मधील अट क्र.४ नुसार महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळाने अग्निशमनयंत्राचा पुरवठा संबंधित शाळेत करावा व ते यंत्र शाळेत बसविण्याची जबाबदारी महामंडळाची असेल असे नमूद केले आहे, त्यानुसार शाळा निहाय दिलेले पुरवठा आदेश दिनांक ०८.०१.२०१० अर्धसमास अन्वये मागणी करुन उपलब्ध केले नाही. मागणी आदेश उपलब्ध करावे.

(२) उक्त शासन निर्णयातील अट क्र.३ नुसार १ वर्ष वॉरंटी बाबत करारनाम्यात उल्लेख केलेला नाही.

(३) अट क्र.६ नुसार यंत्र सुस्थितीत प्राप्त झालेबाबत प्रमाणपत्र दिलेले नाही.

(४) गटशिक्षण अधिकारी यांचे स्तरावर साठा नोंदवही उपलब्ध केली नाही.

(५) शासकिय तंत्रनिकेतन अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचा चाचणी अहवाल घेतलेला नाही.

(६) डिलीव्हरी चलनवर पोच पावतीवर दिनांक नमुद केलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) या कार्यालयाचे पुरवठा आदेश क्र.जिपउ/शिक्षण/भां/कावि-३०६/२००९, दि.२७.०२.२००९ अन्वये महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महाराष्ट्र राज्य मंडळ यांना अग्निशमनयंत्र पुरवठा करणे बाबतचे आदेश देण्यात आले होते. सदरचे आदेश तपासणीस उपलब्ध आहेत. सदरच्या आदेशामध्ये अग्निशमनयंत्र हे गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती स्तरावर पुरवठा करणेबाबत नमूद करण्यात आले. तसेच उक्त आदेशान्वये सर्व गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती यांना अग्निशमनयंत्र पुरवठा गट स्तरावर केल्यानंतर सदरचे अग्निशमनयंत्र हाताळणे बाबत प्रशिक्षण देणे बाबत आदेशामध्ये नमुद करण्यात आले होते. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. पीआरई-२००७/(१२१/०८)/प्राशि-१ दि.२७ ऑक्टोंबर २००८ मध्ये अग्निशमनयंत्राचा पुरवठा महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाने तालुका स्तरावर गटशिक्षण अधिकारी यांचे स्तरावर करण्यात यावा व गटशिक्षण अधिकारी त्या यंत्राचा पुरवठा शालेय स्तरावर करावा असे आहे. त्यामुळे या विभागाने उक्त आदेशामध्ये एकुण १०४९ जिल्हा परिषदेच्या शाळांना अग्निशमनयंत्राचा पुरवठा करणे करिता गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती स्तरावर पुरवठा करावा असे आदेश दिलेले आहे.

(२) शासन निर्णयातील अट क्र.३ अन्वये १ वर्ष वॉंरटी बाबत करारनाम्यात उल्लेख केला नसला तरी करारनाम्यात अट क्र. १० मध्ये शालेय शिक्षण निर्णय क्रमांक पीआरई क्र.२००८/१२१/२००८प्राशि-१, दिनांक २८/०३/२००८ व शासन निर्णय क्र.पीआरई१२१/२००८प्राशि-१, दिनांक २७/१०/२००८ अन्वये सर्व अटी व शर्ती संबंधीत पुरवठाधारक संस्थेस बांधील आहेत असा उल्लेख केलेला आहे.

(३) प्रत्येक गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती स्तरावर अग्निशमनयंत्र पुरवठा केल्यानंतर यंत्र सुस्थितीत प्राप्त झाल्याचे संबंधीत गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रमाणपत्र दिलेले असुन तपासणीस उपलब्ध आहे.

(४) गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती यांचे स्तरावर यंत्राचा पुरवठा केल्यानंतर त्याची साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती यांनी दिलेले आहे. तसेच साठा नोंदवही तपासणीस उपलब्ध आहे.

(५) उक्त अग्निशमनयंत्रे ही युनिवर्सल इंजिनिअरींग कार्पोरेशन मुंबई या कंपनीचे असुन सदरच्या कंपनीस भारतीय मानक ब्युरो मुंबई यांचे आय.एस.आय. मार्कचे प्रामाणपत्र प्राप्त आहे, तसेच महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय, भाखास/१०८८(२५१२) उद्योग-६, दि. २/१/९२ मध्ये जर एखादी संस्था भारतीय मानक संस्था चिन्हांकित वस्तु खरेदी केल्यास नियम ८(४)नुसार त्या वस्तुची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी/चाचणी करुन घेण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे शासकीय तंत्रनिकेतन अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडुन तपासणी करुन घेण्यात आलेले नाही.

(६) अग्निशमनयंत्र संबंधीत गटशिक्षण अधिकारी यांना दि.३०/३/०९ रोजी प्राप्त झाल्याचे साठा नोंदवही वरुन दिसुन येते.

**परिच्छेद क्रमांक ३.१४० :- मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदानाचे निर्धारण नियम बाह्यपणे करुन ज्यादा रक्कमेचे प्रदान झाले बाबत (सन २००८-०९)**

खाजगी शाळांना वेतनेत्तर वेतन अनुदान वाटप नियमबाहयरित्या केल्याबाबत

(१) खाजगी प्राथमिक शाळेच्या परिरक्षणासाठी रुपये ७,६२,०००/- अनुदान प्राप्त झाले असताना वाटप रुपये ७,६१,५९१/- चे झालेले आहे. तसेच एकुण १० शाळांना १५ टक्के प्रमाण रुपये ३०,९७४/- अनुदान देय असताना रुपये २,०५,७७६/- चे वाटप केलेले आहे. जादा प्रदान रक्कम रुपये १,७४,८०२/- वसूल करण्यात यावे.

(२) मागील वर्षातील वेतन व भत्ते, कार्यालयीन खर्च याच्या बेरजेच्या ८ टक्के किंवा शासन निर्णय शिक्षण विभाग दिनांक १६/०२/१९९४ वरील निर्देशानुसार या पैकी कमी असेल तर एकुण खर्चाच्या ६६ २/३ टक्के प्रमाणे येणा-या रक्कमेवर देय होते, परंतू तसे निर्धारण केलेले नाही.

(३) शासन निर्णय क्रमांक शालेय शिक्षण विभाग ११९९/८७-८८/९९, दिनांक३०/११/१९९९ नुसार शाळा निहाय एपीपी-६ नोंदवही ठेवलेली नाही.

(४) मुंबई प्राथमिक शिक्षण (सुधारित) नियम १९५४ मधील नियम १५५ नुसार फर्निचर व सादिल, सामुग्रीवरील खर्च हा एकुण अनुज्ञेय खर्चाच्या ८ टक्के पण मर्यादीत ठेवणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) खाजगी प्राथमिक शाळेच्या परिरक्षण अनुदानासाठी रुपये ७,६२,०००/- निधी प्राप्त झालेला होता. या निधीतून शाळांना रुपये ७,६१,५९१/- अनुदान वितरित केलेले आहे. यापैकी १० शाळांना १५ टक्के प्रमाणे रुपये ३०,९७४/- अनुदान देय असताना रुपये २,०५,७७६/- अनुदान वितरण केल्यामुळे जास्तीचे अनुदान १,७४,८०२/- रुपये जादा दिलेले आहेत. सदरचे जादा दिलेले अनुदान १२ शाळेकडून १७,५०६४/- रुपये खालील प्रमाणे वसूल करुन शासन खाती चलनाने भरणा केलेले आहेत आहे.

| अ. क्र. | शाळचे नांव | वसूल रक्कम | चलन दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गुरुदेव प्रा.वि.भूम | ४१२१ | १९/१/१५ |
| २ | श.भ.प्रा.वि.म.कळंब | ११०९४ | १९/१/१५ |
| ३ | इं.गां.प्रा.शा. रुईभर | १३४३ | १९/१/१५ |
| ४ | म.मु.उर्दु प्रा.वि.शा.हंगरगा | १७९६७ | १९/१/१५ |
| ५ | स्वा.रा.तिर्थ.प्रा.वि.म.उ,बाद | २५३८३ | १९/१/१५ |
| ६ | सुफिया ऊर्दु प्रा.शा.कळंब | २३९९७ | १९/१/१५ |
| ७ | शांतीसागर प्रा.वि.म.तु,पूर | २२२५७ | १९/१/१५ |
| ८ | म.गांधी उर्दु प्रा.वि.म.भूम | २७८१० | १९/१/१५ |
| ९ | भारत प्रा.वि.माकणी | २८४० | १९/१/१५ |
| १० | सरस्वती प्रा.शा.उ,बाद | १७२१८ | १९/१/१५ |
| ११ | श.भगतसिंग प्रा.शा.कळंब | २०७३२ | १९/१/१५ |
| १२ | सरस्वती प्रा.शा.उ,बाद | ३०१ | १४/१२/१५ |
| | | एकूण | १७५०६४ |

(२) मागील वर्षातील वेतन व भत्ते कार्यालयीन खर्च यांच्या बेरजेच्या ८ टक्के किंवा शासन निर्णय, शिक्षण विभाग, दिनांक १६/०२/१९९४ मधील निर्देशानुसार या पैकी कमी असेल तर एकुण खर्चाच्या ६६ २/३ टक्के प्रमाणे खर्च करणे बाबत शाळेस कळविले आहे.

तसेच खाजगी प्राथमिक शाळांना शासन निर्णय, दिनांक १९/०१/२०१३ नुसार खाजगी प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान दि.०१/०४/२००८ चे देय वेतन अनुदान गोठवून ५ टक्के तरतुद मान्य केलेली आहे. यामध्ये ४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्के इमारत भाडे सन २०१३/१४ पासून देय ठरविण्यात आलेली आहे, त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

(३) नोंदवही ठेवण्यात आलेली असून अद्ययावत करण्यात आलेली आहे.

(४) मुंबई प्राथमिक शिक्षण (सुधारित) नियम १९५४ मधील नियम १५५ नुसार फर्निचर व सादील सामुग्री वरील खर्च हा एकुण अनुज्ञेय खर्चाच्या ८ टक्के अनुदान वितरित करण्यात आले आहे. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. तरी वरील प्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.१४१ :- शालेय पोषण आहाराबाबत. (२००८-०९) जिल्हा परिषद, उस्मानाबाद (परि. क्र. ३५)**

लेखे/अभिलेखे लेखा परिक्षण सादर न केल्याबाबतचा खर्च.

(१) अर्धसमास पत्र क्र.१ दिनांक २९/०९/२००९ व क्र.२, दिनांक ०९/१०/२००९ अन्वये लेखी मागणी करुनही खाजगी संस्थाचे शालेय पोषण आहार योजनेचे अभिलेखे, रोजकीर्द, बँक पासबुक, साठा नोंदवही, इंधनदेयके इ. अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शालेय पोषण आहार सन २००८-०९ अंतर्गत होणा-या लेखापरिक्षाणास खाजगी संस्थाचे शालेय पोषण आहार योजनेचे अभिलेखे, रोजकीर्द, बँक पासबुक, साठा नोंदवही, इंधन देयके, अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध केलेले नसल्यामुळे,

(१) मुख्याध्यापक लता मंगेशकर प्राथमिक विद्यालय, कळंब

(२) मुख्याध्यापक यशवंतराव चव्हाण प्राथमिक विद्यालय, कळंब

(३) जनजागृती प्राथमिक विद्यालय, कळंब

(४) जनजागृती माध्यमिक विद्यालय, कळंब यांना आक्षेपातील अंतिम अमान्य रक्कम शासन खाती जमा करणेबाबत दि.१८/०८/२०१५ रोजी नोटीस देवून खुलासा मागविण्यात आलेला होता. संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक यांनी विहित वेळेत खुलासा सादर न केल्यामुळे संबंधीत मुख्याध्यापकांना तात्काळ या कार्यालयामार्फत भविष्यात अशा प्रकारची कृती व वर्तन होवू नये यासाठी सक्त ताकीद देण्यात आलेली असल्याने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी सन २००८-०९ चे अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध केले आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.३२१ : अंतिम देयकासोबत गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करणेबाबत. (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन २००८-०९ (परिच्छेद क्र. ३३) - गुणवत्ता चाचणी अहवाल सादर न करणे बाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ८७ नुसार अंतिम देयका सोबत गुणवत्ता व चाचणी अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना एकूण ८७ कामांचे अंतिम देयकाचे प्रदान नियमबाह्यपणे केलेले आहे, त्यामुळे कामांची गुणवत्ता योग्य असल्याची पडताळणी करता येत नाही.

(२) संबंधितांनी काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व हस्तांतरण केल्याची कार्यवाही केली नाही. गुणवत्ता चाचणी अहवाल न घेताच अग्रिम रक्कम परत केली जाते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम अंतिम देयकासोबत गुणवत्ता व चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त आक्षेपात नमूद केलेल्या (८७) कामाचे अंतिम देयके अदायी करते वेळी सदरकामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत. विविध चाचण्यांच्या निकषानुसार आवश्यक कालावधी पूर्ण न झाल्यामुळे केवळ चाचणी अहवाल आर्थिक वर्षाचे अखेर प्राप्त न झाल्यामुळे काही रक्कम अनामत खाती जमा ठेवण्यात येऊन देयके अदा करण्यात आली. आक्षेपात नमूद एकूण (८७) कामापैकी सद्यःस्थितीत (४८) कामाचे चाचणी अहवाल उपलब्ध आहेत. उर्वरित (३९) कामाचे चाचणी अहवाल उपलब्ध नसल्याने संबंधितांस नोटीस दिली आहे.

(२) आक्षेपात नमुद (८७) कामापैकी (६९) पूर्णत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध आहेत. उर्वरित (१८) कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्याने संबंधितांस नोटीस दिली आहे व एकूण (८७) कामापैकी (३८) कामे मार्ग व पूलाचे व निवासस्थानाचे असल्याने ताबा पावतीची आवश्यकता नाही. उर्वरित (४९) कामापैकी (१९) कामांच्या ताबा पावती उपलब्ध आहेत. उर्वरित (३०) कामाचे ताबा पावती उपलब्ध नसल्याने संबंधितास नोटीस दिली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.३२३ :- आष्टा (का) ते कोळनुर पांढरी रस्ता कि. मी ०/०० ते १/० (सन २००८-०९)**

**जिल्हा परिषद, उस्मानाबाद (परि.क्र.९४)** याबाबत खालील प्रमाणे आक्षेप देत आहे.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ प्रमाणे अंतिम देयकासोबत गुणवत्ता चाचणी अहवाल जोडणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

(२) चाचणी अहवाल न घेता रुपये ४,२९,६८६/- चे नियमबाह्यरित्या प्रदान केले आहे.

(३) देयकात डी.एस.आर. प्रमाणे बाब क्र.१२ मध्ये ७५ एम.एम.थीक बी.बी.एम. सरफेस ॲन्ड कम्पीलीट ईटीसी १३६.६३ घ.मी. दर्शविला आहे. एकुण परिणाम १५७.५० घ.मी. साठी रुपये २१,५१९/- गणिनीय बेरीज येते, तथापी त्यासाठी देयकात रुपये २,१५,०८७/- आकारणी केली आहे. त्यामुळे जादा रक्कम रुपये १,९३,५६८/- संबंधितांकडुन वसुल करण्यात यावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) आष्टा (का.) ते कोळनुर पांढरी रस्ता कि.मी.०/०० ते १/०० कामाची गुणवत्ता चाचणी अहवाल डांबर व खडी करीता सहाय्यक संशोधन अधिकारी, जिल्हा प्रयोगशाळा, उस्मानाबाद यांचे जॉब नंबर ४२३ दिनांक ०८/०५/२००९ नुसार घेण्यात आला आहे.

(२) चाचणी अहवालासाठी रुपये १,००,०००/- अनामत ठेवण्यात आली होती. सदर अनामत रक्कम दिनांक ८/०५/२००९ रोजी चाचणी अहवाल प्राप्त झाले नंतर प्रमाणक क्रमांक-४०, दिनांक ०६/०६/२००९ अन्वये परत करण्यात आली आहे.

(३) मंजूर निविदेतील बाब क्र. १२ मध्ये ७५ मिमी थिक बी.बी.एम चा दर १३६.६३ प्रती घ.मी. नसून रु.१३६५.६३ प्रती घ.मी. आहे व त्याप्रमाणे २१५०८७/- केलेली अदाई योग्य आहे.

याबाबतचे अभिलेखे तपासण्यात आले असून खात्री करण्यात आली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.४४० :- पाझर तलाव वलगुड तालुका उस्मानाबाद/पाझर तलाव क्रमांक २ दुधाळवाडी, तालुका कळंब कामातील अनियमितता (सन २००८-०९)**

विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई जा.क्र.वि.न.(कार)/डब्ल्यु/सी/शा.नि.संकीर्ण/ प्र.क्र.२०, दि.२७.०४.२००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कामावर नेमलेल्या मजुरांचा विम्याची रक्कम देयकातून कपात केल्याचे दिसून येते,मात्र त्याची पोच पावती दर्शविण्यात आलेली नाही.

(२) रॉयल्टीची रक्कम देयकातून कपात केल्याचे दिसून येते, मात्र त्याची पोच पावती दर्शविण्यात आलेली नाही.

(३) मोजमाप पुस्तिका दिनांकित स्वाक्ष-या न केल्याबाबत तसेच कामातील मुदतवाढ नियमबाहयतेबाबत खुलासा दर्शविणे आवश्यक आहे.

(४) काम उशिराने पूर्ण केले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४८ (१) नुसार किमान १५ दिवस आधी कामास मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. तसेच नियम ९७ नुसार मालमत्ता नोंदवहीवर नोंद घेतली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

नमूद परिच्छेद हे (अ) पाझर तलाव वलगुड, तालुका उस्मानाबाद व (ब) पाझर तलाव क्रमांक २ दुधाळवाडी, तालुका कळंब या कामाचे आहे.

(१) विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई जा.क्र.वि.न.(कार)/डब्ल्यु/सी/शा.नि.संकीर्ण/ प्र.क्र.२०, दि.२७.०४.२००६ अन्वये ठेकेदाराने कामावर नेमलेल्या मजुरांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विमा उतरविण्यात आला आहे, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(अ) पाझर तलाव वलगुड या कामाचे रु.६२००/- रक्कम ही पत्र क्र.जा.क्र.जिपउ/लपावि/लेखा/कावि/४०३४/२००७, दिनांक २७.१२.२००७ अन्वये धनाकर्षाद्वारे पाठविलेले पत्र व धनाकर्षाची छायाप्रत संचिकेस संलग्न आहे.

(ब) पाझर तलाव दुधाळवाडी क्रमांक २, तालुका कळंब या कामाचे रुपये ११,३७७/- रक्कम ही पत्र क्र.जा.क्र.जिपउ/लपावि/लेखा/कावि/५९३/२००९, दिनांक १६.०६.२००९ अन्वये धनाकर्षाद्वारे पाठविलेले पत्र व धनाकर्षाची छायाप्रत संचिकेस संलग्न आहे. तसेच सदरहू धनाकर्ष मिळाल्याची पोच पावती पाठविण्याकरिता विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना लघु पाटबंधारे विभागाचे पत्र जा.क्र.जिपउ/लपावि/रोखपाल/२०३०/२०१५, दिनांक ०८.१२.२०१५ अन्वये कळविले आहे.

(२) पाझर तलाव दुधाळवाडी, तालुका कळंब देयकातून रॉयल्टी पोटी रक्कम रु, ८६,५२९/- कपात करण्यात आलेली आहे. सदर रक्कम चलनाद्वारे शासन खाती भरणा केली आहे. चलनाची प्रत संचिकेस संलग्न आहे.

(३) पाझर तलाव वलगुड, तालुका उस्मानाबाद या कामाच्या मोजमाप नोंदी मोजमाप पुस्तिकेत दिनांक ०४.११.२००७ ते दिनांक दि.१७.०४.२००८ या कालावधीत तपासण्यात आल्या आहेत. तसेच पाझर तलाव दुधाळवाडी, तालुका कळंब या कामाच्या मोजमाप नोंदीच्या तपासणीच्या दिनांकित स्वाक्ष-या नोंदविण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४८-१ अन्वये पाझर तलाव वलगुड, ता. उस्मानाबाद करिता मुळ मुदत सहा महिने होती, तद्नंतर ठेकेदार स्वतः आजारी असल्याने दंडात्मक मुदतवाढ मंजूर करुन दंड रु.२३७०/- देयकातून वसूल करण्यात आली आहे. पाझर तलाव दुधाळवाडी क्र.२, ता. कळंब या कामाची मुळ मुदत सहा महिने होती. तद्नंतर ठेकेदारास (दि.१७.०४.२००९ ते दि. ३०.११.२००९ पर्यंत) सांडवा बांधकामास पाणी उपलब्ध नसल्याने दंडात्मक मुदतवाढ मंजूर करुन दंड रु.४२२/- अंतिम देयकातून वसूल करण्यात आला आहे.

(४) सदरील कामे उशिराने पूर्ण केले आहेत व ठेकेदारानी किमान १५ दिवस आधी कामास मुदतवाढ घेणे आवश्यक होते, तथापि ठेकेदारांना दंड आकारुन मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. या कार्यालयातील नमुना नं.३९ स्थावर मालमत्ता नोंदवही मध्ये (अ) पाझर तलाव वलगुड, तालुका उस्मानाबाद पृष्ठ (०२) व (ब) पाझर तलाव दुधाळवाडी क्रमांक २, तालुका कळंब पृष्ठ (४६) वर कामाची नोंद घेण्यात आली असून नोंदवही तपासणीसाठी उपलब्ध आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५७१ :- सिध्देश्वर मंदिर वडगाव तालुका उस्मानाबाद येथील पाणी पुरवठा योजना अनियमिततेबाबत. (सन २००८-०९) (परिच्छेद क्र.७)**

सिध्देश्वर मंदिर वडगाव येथील पाणी पुरवठा योजने बाबत खालील प्रमाणे आक्षेप देण्यात येत आहे.

(१) विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रसिध्द (१८९१) सी डी आर (जि.प/संकीर्ण) दि ३० जुलै, २००२ नुसार ठेकेदारानी कामावरील मजुराचा विमा रु.२७६४/- देयकातुन कपात दर्शविला आहे. सदर रक्कम विमा कंपनीस प्राप्त झाल्याची पोहोच दर्शविली नाही दर्शवुन खात्री पटवावी. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक १०८३/प्र.क्र.५५/३४ दि ५ ऑक्टोबर १९८९ प्रमाणे योजनेची मास्टर नोंद वही ठेवलेली नाही.

(२) मुल्यवर्धीत रुपये ११०५५/- २ टक्के आयकर रु.६५५७/- कपात करण्यात आली आहे. सदरच्या रक्कमा शासन खाती भरणा केल्याचे दर्शवून अनुपालन दर्शवावे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १६८ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के तपासणी संदर्भात त्याची प्रवास दैनंदिनी लेखा परिक्षणास दर्शविली नाही.

(४) सदरील कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका लेखा परिक्षणास दर्शविली नाही, त्यामुळे झालेल्या कामाच्या व मुल्यंकनाबाबत खात्री करता आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) देयकातून कपात केलेला विमा रक्कम रुपये २७६४/- चा धनादेश क्र.४३४१०३, दिनांक १६ जून, २००९ तत्कालीन रोखपाल, श्री.कल्याणी व श्री.डी.एम.नवले यांनी विमा संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर केला नसून सदर धनादेश त्यांच्या जुन्या बस्त्यात शोध घेतला असता आढळून आला असल्याने कर्तव्यात कसुर केल्याप्रकरणी वरील दोन्ही कर्मचारी यांना ताकीद देऊन सेवा पुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालू आहे. तथापि, सदरील कपातीचा धनादेश नुतनीकरण करणेसाठी डी.सी.सी.बँक, उस्मानाबाद यांचेशी संपर्क साधून धनादेश नुतनीकरण करणेची कार्यवाही सुरु आहे.

(२) देयकातून कपात करण्यात आलेली मुल्यावर्धीत कर रुपये ११०५५/- व २ टक्के आयकर ६५५७/- कपात केलेले आहे, परंतू शासन खाती भरणा केलेले चलन उपलब्ध नाही. याबाबत तत्कालीन रोखपाल श्री.कल्याणी व श्री.डी.एम.नवले यांना जिपउ/ग्रापाउवि/लेखा/कावी/७०/१५, दिनांक ३/१०/२०१५ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे आणि अंतिमतः ताकीद देऊन सेवा पुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १६८ प्रमाणे उक्त कामाची ५ टक्के तपासणी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी मोजमाप पुस्तिका क्र.५३८५ वर करण्यात आलेली आहे. तथापि, त्यांची प्रवास दैनंदिनी उपलब्ध नाही. याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता,श्री.डी.एन.कुलकर्णी यांना कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस जिपउ/ग्रापउवि/लेखा/कावि/९१/१५, दिनांक ३/१०/२०१५ बजावण्यात आलेली होती, त्या अनुषंगाने संबंधिताचा खुलासा दिनांक २/११/२०१५ अन्वये प्राप्त झालेला असून त्यामध्ये प्रवास दैनंदिनी सादर न करणे बाबत काहीही खुलासा केलेला नाही. सदर खुलासा अमान्य असल्याने अंतिमतः ताकीद देऊन सेवा पुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्र.५३८५ व कामाचे मुळ अंदाजपत्रक उपलब्ध आहे, याबाबत संबंधित तत्कालीन उपविभागीय अभियंता, श्री.एच.आर.नागदे यांना या कार्यालयाची जिपउ/ ग्रापउवि / लेखा/ कावि/६८/१५, दिनांक ३/१०/२०१५ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती. अंतिमतः ताकीद देऊन सेवा पुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालू आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५७२ :- हातपंप सुटे भाग पुरवठा केले बाबत (सन २००८-०९) (परि.क्र.१६)**

ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत पाणी निधी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी हातपंप सुटे पार्ट मल्होत्रा इंजिनिअरींग, कळंब व तनय एन्टरप्राइजेस, उस्मानाबाद यांचेकडुन रु.९,०५,६५०/- ची खरेदी करण्यात आलेली आहे, याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक, दिनांक ३० मार्च २००० नुसार वर्षाच्या अखेरीस साहित्याची खरेदी करु नये असे असताना व विभागाकडे दरकरार असुन देखील वार्षिक नियोजन न करता सन २००८-०९ अखेर साहित्याची नियमबाहयपणे खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच एकुण गरज प्रत्येक तालुक्यातील गत तीन वर्षातील वापर शिल्लक साहित्य या आधारे ठरवुन आणि हातपंप वर्गणीची उपलब्ध रक्कम याचा आढावा न घेता केलेल्या नियमबाहय खरेदीमुळे झालेला निष्फळ गुंतवणुकीबाबत जबाबदारी निश्चित ठरवुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

(२) शासन निर्णय, दिनांक ११ जानेवरी, १९९९ चे परिच्छेद २७ नुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणी झालेल्या ठेकेदारानांच कामे देण्यात यावीत असे असतांना नोंदणीकृत ठेकेदारांना कामे देण्यात आली आहेत याबाबत कागदोपत्री लेख्याद्वारे खात्री पटवावी. अन्यथा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

(३) हातपंप सुटेभाग भांडारातील व विद्युतपंपाचे जुने साहित्य तसेच पडुन असुन त्याची नियमानुसार लिलावाद्वारे त्वरीत विक्री करुन येणारी रक्कम शासकीय कोषागारात भरणा करणे आवश्यक आहे.

(४) तपशीलातील देयकाची तपासणी केली असता हातपंप/विद्युतपंप सुटेभाग इत्यादीचा तपशील एफ.ओ.आर डिस्टीनेशन प्रमाणे खरेदीच्या बोलीत नमुद करण्यात आलेला नाही. असे असतानाही देयकाची रक्कम नियमबाहयपणे प्रदान केल्याचे लेखा परिक्षणात सकृतदर्शनी आढळुन आले.

(५) खरेदी करण्यात आलेले हातपंप, विद्युतपंप व सुटेभाग वर्ष अखेरीस खरेदी करण्यात आल्याने त्याचा वापर वा विनियोग त्याच आर्थिक वर्षात होणे आवश्यक असताना त्याचा वापर पुढील वर्षात होत असुन अनावश्यकरित्या शासनाचा निधी गुंतून पडल्याचे दिसुन येते, कागदोपत्री लेख्या आधारे सत्यता पटवावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१००२/प्र.क्र.-५९१/पा.पु-०७, दिनांक

१ ऑक्टोबर २००३ अन्वये शासन स्तरावरुन करण्यात येणारा दर कराराऐवजी यापुढे जिल्हा परिषदांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन हातपंप, विद्युतपंपाचे साहित्य खरेदी करण्यात शासनाने परवानगी दिलेली आहे. हातपंप सुटेभाग खरेदी करिता शासनाचा दरकरार उपलब्ध नाही. साहित्याची खरेदी उदाः-हॅडंल, हेड ऍसंबली, सिलेडंर ऍसंबली, अपॅर वॉल, खालील तक्त्याप्रमाणे गत तीन वर्षातील वापर शिल्लक साहित्य या आधारे ठरवुन आणि हातपंप वर्गणीची उपलब्ध रक्कम याचा आढावा घेवुन करण्यात आली आहे.

| वर्ष | प्राप्त साहित्य | मागील शिल्लकसह एकुण साहित्य | वापर | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ७८१९ | ८४४५ | ७८४५ | ६०० |
| २००७-०८ | ५८५२ | ६५५१ | ६२४५ | ३०६ |
| २००८-०९ | १०९०६ | ११२१२ | ११०८५ | १२७ |

पर्जन्यमान कमी झाल्यास पाणी टंचाई माहे ऑक्टोबर ते जुन अखेर पर्यंत भासते. माहे मार्च महिन्यापासुन हातपंप नादुरुस्त होण्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याने सुटे भागाची आवश्यकता अधिक प्रमाणात भासते, त्यामुळे आथिर्क वर्ष संपण्यापुर्वी खरेदी करणे क्रमप्राप्त ठरते. खरेदी करण्यात आलेल्या हातपंप सुटेभागाचा वापर पुढील चार महिन्यात पुर्ण करुन हातपंपाद्वारे पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ११ जानेवरी, १९९९ चे परिच्छेद २७ नुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे (नळ पाणी पुरवठा योजनेची स्थापत्य कामे) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणी झालेल्या ठेकेदारानांच देण्यात यावीत अशा सुचना आहेत. यात साहित्य खरेदीचा समावेश नाही. संचालक भू.स.वि.यं (म.रा.) यांच्या दिनांक ०१ ऑक्टोबर २००३ च्या परिपत्रकानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन दरकरारानुसार खरेदी करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार खरेदीची प्रक्रिया पुर्ण केली आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील स्थापत्य नोंदणीकृत्य ठेकेदारानांच ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत स्थापत्य काम देण्यात आली आहेत.

(३) हातपंप व विद्युतपंपाचे निकामी सुटेभाग तसेच इतर निकामी साहित्य गट पातळीवरुन जिल्हा मुख्यालयात एकत्रित करुन सन २०१०-११ पर्यंतचे सर्व निकामी साहित्य दिनांक २.०२.२०१२ रोजी जाहीर निविदा मागवुन विक्री करण्यात आलेले आहे व विक्री करुन प्राप्त झालेली एकुण रक्कम रुपये ४४,७९,१४८/- चलनाद्वारे जिल्हा देखभाल दुरुस्ती (पाणी निधी) मध्ये जमा करण्यात आली आहे.

(४) मे. तनय इंटरप्रायजेस उस्मानाबाद (वरुण इंडीया प्रा.लि.भोपालचे अधिकृत विक्रेता) पुरवठा आदेश क्र. ZPO/RWS/DYE(M)/HP-Store/११४/२००९, Dt. १०.०२.२००९ व म. मल्होत्रा इंजिनिअरिंग कं. कळंब (अधिकृत विक्रता, मे.श्री साई डिपवेल हॅन्डपंप हैद्राबाद, पुरवठा आदेश क्र. ZPO/RWS/DYE(M)/HP-Store/११६/२००९, Dt.१०.०२.२००९ आदेशात पुरवठा करावयाचे सुटेभागाचा संपुर्ण तपशील नमुद करण्यात आला आहे. उक्त तपशिलाप्रमाणे त्रयस्त निरक्षण संस्था (Third Party Inspection Agency) टी.यु.व्ही सुध्दा हैद्राबाद व एस.जी.एस इंडिया लि.भोपाल यांनी दिनांक ३१/०३/२००९ नुसार तपासणी करुन साहित्य आदेशातील गुणवत्तेप्रमाणे असल्याचे प्रमाणित केले आहे. तसेच आदेशात एफ.ओ.आर. डिस्टीनेशन उप अभियंता (यां) यांत्रिकी उप विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद नमुद आहे. वरील प्रमाणे सर्व बाबीची पुर्तता झाल्याने प्रमाणक क्र.३, दिनांक १९.०३.२००९ अन्वये मे.मल्होत्रा इंजिनिअरिंग कं. कळंब यांना रु.२,५९,६०० व प्रमाणक क्र.११, दिनांक ३१.०३.२००९ अन्वये मे.तनय इंटरप्रायजेस, उस्मानाबाद यांना रु.६४६०५०/- निविदेतील अटी व शर्ती नुसार देयकाची अदाई करण्यात आली आहे.

(५) पर्जन्यमान कमी झाल्यास पाणी टंचाई माहे ऑक्टोबर ते जुन अखेर पर्यंत भासते, त्यामुळे माहे मार्च पासुन नादुरुस्त हातपंपाचे प्रमाणात वाढ होत असल्याने सुटे भागाची आवश्यकता अधिक प्रमाणात असल्याने वर्ष अखेर खरेदी करणे क्रमप्राप्त ठरते. माहे एप्रिल पासुन सुटेभाग खरेदीची कार्यवाही सुरुवात केल्यास साहित्य प्राप्त होण्यास साधारणपणे तीन महिन्याचा कालावधी लागतो, त्यामुळे टंचाई कालावधीत हातपंप सुटेभागाअभावी हातपंप दुरुस्तीचे काम ठप्प होते. म्हणुन आर्थिक वर्षे संपण्यापुर्वी सुटेभाग साहित्य खरेदी करणे क्रमप्राप्त ठरते, त्यामुळे खरेदी करण्यात आलेल्या हातपंप सुटेभागाचा पुर्णपणे वापर पुढील चार महिन्यात करुन हातपंपाद्वारे पाणी पुरवठा सुरु केला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.५७३ :- विहिर / बोअर अधिग्रहण अनियमितता. (सन २००८-०९)**

पंचायत समिती कळंब व तुळजापुर यांनी सन २००८-०९ या वर्षात अनुक्रमे रक्कम रु.९,२२,११०/- व रुपये ५,८०,८४७/- चे अधिग्रहण देयके पारित केले असुन याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) अधिग्रहित केलेल्या विहिर मालकी बाबतच्या संबंधिताचा ७/१२ जोडलेला नाही, त्यामुळे विहिर अधिग्रहणाबाबत पडताळणी करता आली नाही.

(२) शासन निर्णय पुरवठा विभाग व स्वच्छता विभाग, दिनांक ३/२/१९९९ अन्वये ज्या गावामध्ये विहिर अधिग्रहित करायची आहे. ती गावे टंचाईग्रस्त म्हणून घोषित होणे आवश्यक आहे. त्याबाबत पाणीटंचाई असलेबाबत लेखे लेखा परिक्षणस दर्शविले नाही.

(३) अधिग्रहणापुर्वी विहिरीला पाणी असल्याबाबतचा महसुल अधिकारी व पंचायत अधिकारी यांचा निरिक्षण अहवाल दिसुन आला नाही.

(४) सरपंच तलाठी यांची पाणीपुरठा करण्यासंबंधीचे पत्र दर्शविले नाही. तसेच संचिकेत भार नियमन वेळा संलग्न केले नाही.

(५) विहिर अधिग्रहणापुर्वी ग्रामपंचायत ठराव दर्शविला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) अधिग्रहित केलेल्या विहिर मालकी बाबतचे तालुका कळंबचे ६७ व तालुका तुळजापुरचे २७ असे एकुण ९४ संबंधिताचे ७/१२ जोडले असुन विभागीय कार्यालयात उपलब्ध आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ३/२/१९९९ नुसार विहीर अधिग्रहण केलेल्या टंचाईग्रस्त गावाचा कृती आराखडा जिल्हाधिकारी यांना सादर करुन त्याप्रमाणे टंचाईग्रस्त गावामधील विहीर/बोर अधिग्रहित करण्यात आले आहेत. आता सदर लेखे विभागीय कार्यालयात उपलब्ध आहेत.

(३) अधिग्रहण करण्यासंदर्भात ग्रामपंचायतचा ठराव प्राप्त झाल्यानंतर तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन अधिग्रहण करण्यात आलेले असल्यामुळे महसुल अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी पाणी असल्याची खात्री करुन अधिग्रहण करण्यात आलेले आहे. तसा पाहणी अहवाल सोबत संलग्न करण्यात आलेला असुन व त्या अनुषंगाने अधिग्रहणाचे आदेश तहसीलदार यांनी निर्गमित केलेले आहेत. सदर निरिक्षण अहवाल आता विभागीय कार्यालयात उपलब्ध आहे.

(४) संबंधित गावच्या सरपंच/ग्रामसेवक यांनी ठरावाद्वारे अधिग्रहण करण्यासंबंधी विनंती केले नुसार गट विकास अधिकारी व तहसीलदार यांच्या संयुक्त पाहणी अहवाला वरुन अधिग्रहण करण्यात आलेले आहे. सदर संयुक्त पहाणी अहवाल विभागीय कार्यालयास उपलब्ध आहे. तसेच पाणी पुरवठा करते वेळी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे भार नियमनाचे वेळा पत्रक पाळण्यात आले आहे.

(५) ग्रामपंचायतीचे विहीर/बोर अधिग्रहणाचे ठराव घेण्यात आलेले असुन विभागीय कार्यालयात उपलब्ध आहे.

**परिच्छेद क्रमांक३.६४१ :- साथ रोग नियंत्रक औषधी खरेदी पुरवठा करणे बाबत (सन २००८-०९)**

औषधी खरेदीवर रक्कम रुपये ४,७९,२२२/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) साथ रोग नियंत्रण औषध खरेदी ही पावसाळयात रोगाचा प्रादुर्भाव होवू नये या उद्देशाने केलेली आहे, परंतु केलेली खरेदी पावसाळा संपल्यानंतर केल्याचे आढळून आले त्यामुळे खरेदीचा उद्देश सफल झालेला नाही.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. दिनांक १०/१०/१९९६ नुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांची वार्षिक मागणी व साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव कोणत्या भागात होता याबाबतचा विचार करुन खरेदी केली नाही.

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. बीपीआर-२००१ प्रशासन १, दिनांक २२/०५/२००३ मध्ये दिलेल्या निदेशानुसार संस्थेकडून विहित टक्केवारी नुसार औषधी खरेदी करणे आवश्यक असताना दरकरार केलेल्या कंपनीकडून जादा खरेदी केलेली आहे.

(४) संचालक, आरोग्य विभाग परिपत्रक क्र. सभोसे/औषधी/१२, दिनांक १७/२/१९९८ अन्वये खरेदी केलेली औषधी सम प्रमाणात वाटप न करता उपस्थित प्रमाणे व केंद्राच्या वर्गवारी वाटप करावे अशा सूचना असताना तशी कार्यवाही केली नाही.

(५) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. बबीपीआर/१०८८/सीआर/७९३, दिनांक २६/१०/१९८९ नुसार खरेदी केलेल्या औषधांचा विनियोग त्याच आर्थिक वर्षात करणे आवश्यक असताना पुढील आर्थिक वर्षात विनियोग केलेला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) आक्षेपात दर्शविल्याप्रमाणे जिल्हा परिषद स्वसंपादित निधीमधून सन २००८-०९ मध्ये साथीच्या रोगांना आळा घालणे या योजनेसाठी रुपये ५.०० लक्ष निधी मंजूर केलेला होता. सदर योजनेस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १०९ नुसार योजना राबविण्यास दिनांक ३०.६.२००८ रोजी आरोग्य विषय समिती सभेने विषय क्र. २ अन्वये मान्यता दिलेली होती. तदनंतर सदर योजनेस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९९ (अ) नुसार तांत्रिक मान्यता दिनांक ८.०८.२००८ अन्वये जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रदान केलेली असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता व कलम १२६ नुसार दरास मान्यता प्रदान करुन सदर योजनेतून साथीच्या रोगांना आवश्यक असलेल्या नऊ औषधांचे शासन अंगिकृत कंपनी व शासन दरकरारावर पुरवठा आदेश दिनांक १६.०८.२००८ रोजी पावसाळा चालू असताना दिलेले आहेत.

पुरवठा आदेश देण्यात आलेली औषधी प्रत्यक्ष पावसाळयात उत्तरार्धात माहे ऑक्टोबर अखेर पर्यंत सर्व औषधी प्राप्त झालेली होती. सन २००८-०९ मध्ये पावसाळा दिनांक ३.१२.२००८ अखेर पर्यत चालू होता. (सोबत कृषी विभागाचा पावसाची नोंद केलेल्या अहवालाची प्रत) दरम्यानच्या काळात विभागाकडे असलेल्या संरक्षित साठा (बफर स्टॉक) साथीच्या रोगाच्या काळात वापरण्यात आलेला आहे. तसेच प्राप्त औषध साठयाचा विनियोग तात्काळ आरोग्य केंद्राच्या मागणी व गरजेनुसार करण्यात आलेला आहे. त्यामुळे साथीच्या रोगांची औषधी खरेदीचा मूळ उद्देश सफल झालेला आहे.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्राकडून मागणी येताना ३ वर्षाचा खर्च व साथीच्या रोगांचा प्रादूर्भाव होणा-या जोखमीच्या गावांचा विचार करुन वैद्यकीय अधिकारी त्यांचे वार्षिक मागणीपत्रक या कार्यालयाकडे सादर करतात. त्यानुसार एकत्रित मागणीचा विचार करुन त्या आधारावरच सदरची औषधी खरेदी करण्यात आलेली आहे. व त्याचा साथरोग निर्मुलनासाठी विनियोग करण्यात आलेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी पत्रकाची स्वतंत्र संचिका उपलब्ध आहे.

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासननिर्णय क्र. बीपीआर-२००१ प्रशासन-१, दिनांक २२/०५/२००३ नुसार ५० टक्के प्रमाण निश्चित केलेले आहे. निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार केंद्र शासन अंगिकृत शासन उत्पादित हिन्दुस्थान ॲन्टीबायोटीक्स व कर्नाटका ॲन्टीबायोटीक्स कंपनी कडून ४२ टक्के खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित औषधी शासन दरकरारानुसार खरेदी केलेली आहे.

(४) सदरील परिपत्रकाप्रमाणे औषधीचे वाटप रुग्णांची उपस्थिती, प्राथमिक आरोग्य केंद्राची वर्गवारी व संबंधीत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी व गरजेप्रमाणे वितरित करण्यात आलेली आहे.

(५) साथीच्या रोगांना आळा घालणे योजनेमधून ९ औषधांची खरेदी करण्यात आली असून त्यांपैकी तीन औषधाचा त्याच आर्थिक वर्षात पूर्ण वितरण झालेले आहे. चार औषधी नाममात्र शिल्लक राहिलेल्या असून दोन औषधीचा साठा काही प्रमाणात माहे मार्च, २००९ अखेर शिल्लक राहिलेला आहे. माहे एप्रिल नंतर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे व गरजेनुसार औषधांचा पुरवठा केलेला आहे. साथरोगाच्या अनुषंगाने व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे प्राप्त औषधांचा विनियोग करण्यात आलेला असून काही औषधी संरक्षित साठा (बफर स्टॉक) म्हणून शिल्लक ठेवणे आवश्यक असते, त्यामुळे असा राहिलेला शिल्लक औषधीच्या साठयाचा विनियोग पुढील वर्षात झालेला आहे. तसेच एकही औषधी मुदतबाहय झालेली नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.६४२ :- जिल्हापरिषद सेस अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र औषधी पुरवठा अनियमितताबाबत (सन २००८-०९)**

जिल्हा परिषदेने रक्कम १३,४९,९८३/- चे कंपन्यांकडून औषधे खरेदी केले आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहे.

(१) आरोग्य विभागाकडील १९,१२,८८ च्या शासन निर्णय प्रमाणे शासनमान्य औषधी यादी प्रमाणे खरेदी करताना उपसंचालक, आरोग्य यांची पूर्वपरवानगी घेतलेली नाही.

(२) वैदयकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय डी.पी.आर/२००१/प्र.क्र. १९३/१, दिनांक २२/०५/२००३ अन्वये ज्या कंपन्याकडून खरेदी करण्याबाबत प्रमाण विहित केले आहे. त्यापेक्षा जास्तीची खरेदी केल्याने शासन निर्णय आदेशाचे उल्लंघन झालेले आहे.

(३) सचांलक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे परिपत्रक स.ओ.से. औषधी /१२ दिनांक १७/१२/१९९८, अन्वये औषधे समप्रमाणात वाटप न करता उपस्थितीप्रमाणे व केंद्राच्या वर्गवारीप्रमाणे वाटप करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

(४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. डीपीआर/१०८८/सीआर/७९३ दिनांक २६/१०/१९८९ नुसार खरेदी केलेल्या औषधाचा विनियोग त्याच आर्थिक वर्षात करणे आवश्यक असताना वर्षात विनियोग केला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/साव्य/औषधे, उपकरणे/कक्ष-१२ दि.११/०८/१९९५ अन्वये आरोग्य संस्थे मध्ये औषधी व साहित्य सामुग्रीचा तुटवडा निर्माण होऊन रुग्णांची गैरसोय होऊ नये या करिता डीएमइआर दरकरार/हाफकिन/डिजीएसएनडी/ईएसआयएस /बीएमसी /जुने सीएसपीओ याचे दरकरारावर निश्चित केलेल्या दराच्या यादीतील खरेदीस उपसंचालक, आरोग्य सेवा यांची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही असे सुचित केलेले आहे.

जिल्हा परिषद सेस योजनेंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्राच्या औषधी पुरवठा करणे या योजनेसाठी सन २००८-०९ मध्ये रु. १३,५०,०००/- निधी मंजूर करण्यात आलेला होता. सदर योजनेस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९९१ चे कलम १०९ नुसार योजना दिनांक ३०/६/२००८ रोजी मान्यता दिलेली होती. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९९ (अ) नुसार तांत्रिक मान्यता, कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता व कलम १२६ नुसार दरास मान्यता व पुरवठा आदेश दिनांक ०४/०९/२००८ रोजी देऊन मान्य यादीतील औषधीची खरेदी शासन अंगीकृत कंपनी व शासन दरकरारावर खरेदी करण्यात आली आहे.

(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.बीपीआर-२००१ /प्रशासन-१ दिनांक २२/०५/२००३ नुसार ५० टक्के प्रमाण निश्चित केलेले आहे. निश्चित केलेल्या प्राथम्यानुसार केंद्र शासन अंगीकृत/शासन उत्पादित हिन्दुस्थान प्राथम्यानुसार केंद्र शासन अंगीकृत /शासन उत्पादित ॲन्टीबायोटीक्स व कर्नाटका ॲन्टीबायोटीक्स कंपनीकडून ४३ टक्के खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित औषधी शासन दरकराराकडून खरेदी केलेली आहे.

(३) सदरील परिपत्रकातील औषधीचे वाटप रुग्णाची उपस्थिती प्राथमिक आरोग्य केंद्राची वर्गवारी व संबंधीत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी व गरजेप्रमाणे वितरीत करण्यात आलेली आहे.

(४) प्राप्त औषधीचे वितरण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे औषधाचे वितरण करण्यात आलेले आहे व जी औषधी माहे मार्च अखेर पर्यंत प्राप्त झाली त्याचे वितरण एप्रिल नंतर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे व गरजेनुसार केले आहे. तसेच माहे एप्रिल ते नविन औषधी खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत रुग्णांना औषधी पुरवठा करणे आवश्यक असते, त्यामुळे त्याच वित्तीय वर्षामध्ये विनियोग होऊ शकत नाही. तसेच काही औषधी संरक्षित साठा (बफर स्टॉक) म्हणून शिल्लक ठेवणे आवश्यक असते. त्यामुळे असा राहिलेला शिल्लक औषधीचा साठयाचा विनियोग पुढील वर्षात झालेला आहे व एकही औषधी मुदतबाहय झालेली नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.६४३ :- श्वानदंश लस खरेदी अनियमिततेबाबत (सन २००८-०९)**

जिल्हा परिषद, उस्मानाबाद आरोग्य विभाग अंतर्गत सन २००८-०९ मध्ये जिल्हा उपकरातून रुपये ४,९९,७९०/- श्वानदंश लस खरेदी केली आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर/०३/प्रक्र ३३३/३ प्रशा १, मुंबई, दिनांक २/४/२००४ अन्वये हाफकीन जीव निर्माण औषधी महामंडळाकडून केवळ ३७.५ टक्के व गरजेनुसार औषधी ४ कालावधी मध्ये मागणी करुन खरेदी करणे आवश्यक आहे. असे असताना एकूण मागणी दिनांक २९/७/२००८ रोजी केली आहे.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. डीपीआर-१०८८/सीआर७९३/२१, दिनांक २६/१०/१९८९ नुसार खरेदी औषधी विनियोग त्याच आर्थिक वर्षात करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही व शासन निर्णय दिनांक २/७/१९९३ नुसार लक्ष प्राप्त प्राथमिक आरोग्य केंद्राकडून विनियोग प्रमाणपत्र घेतलेले नाही.

(३) सदरची खरेदी मागणीशिवाय केलेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शासन अंगीकृत कंपनी हाफकीन यांनी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार श्वानदंश लसीचे उत्पादन बंद केल्याचे सदर कंपनी दिनांक २२.०४.२००५ चे पत्र उपलब्ध आहे. तसेच संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक ११/०५/२००५ च्या पत्रकान्वये सदर कंपनीचे श्वानदंश लसीचे उत्पादन दिनांक ३१/१२/२००४ पासून बंद करण्यात आल्यामुळे शासकीय रुग्णालयामध्ये रुग्ण सेवेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासन दरकरारावर लस खरेदी करण्याची परवानगी दिलेली आहे.

जिल्हा परिषद उपकरातून सन २००८-०९ मध्ये श्वानदंश लस खरेदी या योजनेसाठी रुपये ५.०० लक्ष निधी मंजूर करण्यात आलेला होता. त्यानुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९९ अ नुसार तांत्रिक मान्यता जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिनांक २४.७.२००८ रोजी प्रदान केलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता, कलम १२६ नुसार दरास मान्यता दिनांक २९/०७/२००८ रोजी देण्यात आली असून पुरवठा आदेश शासन दर करारावर दिनांक २९/७/२००८ रोजी देण्यात आले आहेत. सदर लस रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध करुन देणे गरजेचे असल्यामुळे संचालक यांचे पत्र दि. ११/०५/२००५ प्रमाणे शासन दर करारावर लसीची खरेदी करुन प्राथमिक आरोग्य केंद्रामधील श्वानदंश झालेल्या रुग्णांसाठी लस उपलब्ध करण्यात आलेली आहे.

(२) खरेदी करण्यात आलेली लस या कार्यालयास दिनांक ७/०८/२००८ रोजी पुरवठादाराकडून प्राप्त झालेली होती. सदर लसीचे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे वितरण करण्यात आलेली असून लस साठा दिनांक २२.१२.२००८ रोजी संपलेला आहे, त्यामुळे सदर योजनेतून खरेदी करण्यात आलेली लस वित्तीय वर्ष अखेर शिल्लक राहिलेला नाही. खरेदी करण्यात आलेल्या लसीचा पूर्ण विनियोग रुग्णांच्या उपचारासाठी करण्यात आलेला आहे. तसेच लस प्राप्त प्राथमिक आरोग्य केंद्राचे विनियोग प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

(३ प्राथमिक आरोग्य केंद्राकडून वार्षिक मागणी घेऊन सदर मागणी पत्रकानुसार लसीची खरेदी करण्यात आलेली आहे. वार्षिक मागणी पत्र उपलब्ध आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.६४४ :- प्राथमिक आरोग्य केंद्रांना औषधी खरेदी अनियमिततेबाबत (सन २००८-०९)**

जिल्हा परिषद,उस्मानाबाद, आरोग्य विभागांतर्गत सन २००८-०९ मध्ये जिल्हा परिषद उपकरातून रुपये ८,१५,९९६/- श्वानदंश लस खरेदी केली आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) आरोग्य विभागाकडील दिनांक १९/१२/१९८८ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासनमान्य औषधी यादी प्रमाणे खरेदी करताना उपसंचालक आरोग्य यांची पूर्वपरवानगी घेतलेली नाही.

(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.डीपीआर/२००१/प्र.क्र.१९३/प्रशासन/१, दिनांक २२/०५/२००३ अन्वये ज्या कंपन्याकडून खरेदी करण्याबाबत प्रमाण विहित केले आहे, त्यापेक्षा जास्तीची खरेदी केल्याने शासन आदेशाचे उल्लंघन झालेले आहे.

(३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.डीपीआर-१०८८/सीआर/७४३/२१,दिनांक २६/१०/१९८९ नुसार खरेदी औषधी विनियोग त्याच आर्थिक वर्षात करणे आवश्यक असतना तशी कार्यवाही केली नाही व शासन निर्णय दिनांक २/७/१९९३ नुसार लक्ष प्राप्त प्राथमिक आरोग्य केंद्राकडून विनियोग प्रमाणपत्र घेतलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

संबंधित परिच्छेद हा श्वानदंश लस खरेदीशी संबंधीत नसून औषधी खरेदीशी संबंधीत आहे.

१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्रक. संआसे/साव्य/औषधे उपकरणे खरेदी/कक्ष-१२, दिनांक ११/०८/१९९५ अन्वये आरोग्य संस्थेमध्ये औषधी व साहित्य सामुग्रीचा तुटवडा निर्माण होऊन रुग्णांची गैरसोय होऊ नये या करिता डीएमईआर दरकरार/हाफकिन/डिजीएसएनडी/ईएसआयएस/बीएमसी/जुने सीएसपीओ यांचे दरकरारावर निश्‍चित केलेल्या दराच्या यादीतील खरेदीस उपसंचालक, आरोग्य सेवा यांची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही असे सूचित केलेले आहे.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांना औषधी अनुदानात वाढ या योजनेसाठी सन २००८-०९ मध्ये रु. ८.१६ लक्ष निधी मंजूर करण्यात आला होता. सदर योजनेस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत अधिनियम १९६१ चे कलम १०९ नुसार योजना राबविण्यास आरोग्य विषय समिती सभेने दि. २९/७/२००८ रोजी मान्यता दिलेली होती.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९९ (अ) नुसार तांत्रिक मान्यता,कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता व कलम १२६ नुसार दरास मान्यता व पुरवठा आदेश, दिनांक ९/०१/२००९ रोजी मान्य यादीतील औषधीची खरेदी शासन अंगीकृत कंपनी व शासन दरकरारावर करण्यात आलेली होती.

(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. बीपीआर-२००१ प्रशासन-१, दिनांक २२/०५/२००३ नुसार ५० टक्के प्रमाण निश्‍चित केलेले आहे. निश्‍चित केलेल्या प्राथम्यानुसार केंद्र शासन अंगीकृत/शासन उत्पादित हिन्दुस्थान ॲन्टीबायोटीक्स व कर्नाटका ॲन्टीबायोटीक्स कंपनी कडून ८७ टक्के खरेदी करण्यात आलेली आहे. उर्वरित औषधीची शासन दरकरारानुसार खरेदी केलेली आहे.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे औषधांचे वितरण करण्यात आलेले आहे व जी औषधी माहे मार्च अखेर प्राप्त झाली त्याचे वितरण एप्रिल नंतर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणी प्रमाणे व गरजेनुसार केले आहे. तसेच माहे एप्रिल ते नविन औषधी खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत रुग्णांना औषधी पुरवठा करणे आवश्यक असते, त्यामुळे त्याच वित्तीय वर्षामध्ये विनियोग होऊ शकत नाही. तसेच काही औषधी संरक्षित साठा (बफर स्टॉक) म्हणून शिल्लक ठेवणे आवश्यक असते. औषधी जीवनावश्यक असल्यामुळे असा संरक्षित साठा (बफर स्टॉक) कायम ठेवणे आवश्यक असते. त्यामुळे असा राहिलेला शिल्लक औषधीच्या साठयाचा विनियोग पुढील वर्षात झालेला आहे. तसेच खरेदी करण्यात आलेली कोणतीही औषधी मुदतबाह्य झालेली नाही. औषधी प्राप्त प्राथमिक आरोग्य केंद्राचे विनियोग प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७२५ : - जिल्हा परिषद उपकर योजना व कडधान्य गळीत धान्य कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर चापकटर खरेदी पुरवठा करणेत अनियमिततेबाबत (सन २००८-०९)**

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए-९/२०००/प्र.क्र.४१/३१ दिनांक १७ जानेवारी, २००१ मधील वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. १०८९/प्र.क्र. ५५/३४, दिनांक ५ ऑगस्ट १९८९ प्रमाणे योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. पंरास/१०८४/सीआर-१६३३/५७,दिनांक १९ जानेवारी, १९८५ नुसार लोकवाटा वसुली नंतरच साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु लोकवाटा सन २००९/१० या वर्षात वसुल केला आहे. सबब नियमबाहयतेबाबत खुलासा व्हावा.

(४) कृषी संचालक, पुणे यांचे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे योजना यशस्वी होण्यासाठी कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी यांनी टक्केवारी प्रमाणे पहाणी केलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीआर-१०८८/सीआर/७९४, दिनांक २६/१०/१९८९ नुसार ज्या वर्षात साहित्य खरेदी केले आहे. प्रस्तुत योजनेचे साहित्य पुढील वर्षात वाटप केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**प्रस्तावना–** जिल्हयात चारा टंचाईचे प्रश्न उद्‌भवत असल्याने उपलब्ध चा-याचे पुरेपुर वापर करण्याच्या दृष्टीकोनातून ५० टक्के अनुदानावर चापकटर वाटप करण्याच्या योजनेस दिनांक २०/५/२००८ रोजी कृषी विषय समितीने मंजूरी दिली आहे. चापकटर वापर केल्याने चा-यात बचत होवून शेतक-यांच्या श्रमात व खर्चात बचत होते. योजनेस २ लाख मुळ तरतुद मंजूर असून दिनांक ०९/०१/२००९ च्या जिल्हा

परिषद सर्वसाधारण सभेने एकूण पुनर्विनियोजनाद्वारे ५ लाख तरतुदीस मान्यता दिली आहे. दि. २६.०२.२००९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली आहे. दि. २६.०२.२००९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवुन दिनांक २७.०२.२००९ रोजी पुरवठा आदेश (एकूण नग ५१, दर १९,२५७/- प्रती नग, अनुदान रक्कम ४,९१,०५३,५०/-, लोकवाटा रक्कम ४,९१,०५३,५०/- एकूण रक्कम ९,८२,१०७/-) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित, उस्मानाबाद यांना देण्यात आलेला आहे. एकूण ५१ लाभार्थ्यांना चापकटर वाटप करुन लोकवाटा रक्कम रु. ४,९१,०७१/- व अनुदान रक्कम रु. ४,९१,०५४/- असे एकूण रक्कम रु. ९,८२,१२५/- पुरवठा संस्थेस अदा करण्यात आलेला आहे. योजनेचा उद्देश सफल झाला आहे.

**मुद्दे निहाय अनुपालन खालील प्रमाणे आहे :–**

दिनांक १७ जानेवारी २००१ मधील वेळापत्रक व जिल्हा परिषदेमार्फत केलेली कार्यवाही

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | वेळा पत्रक | जि. प. मार्फत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | योजनेची निवड व अर्थसंकल्पात तरतूद करणे. | मे पुर्वी | मे पुर्वी |
| २ | विविध योजनेचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता/मंजूरी घेणे | ३० जून | प्र. मं. २६.०२.२००९<br>ता. मं. २६.०२.२००९ |
| ३ | योजनेस प्रशासकीय/तांत्रिक मंजूरी देणे. | ३१ ऑगस्ट | फेब्रुवारी २००९ |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप करणे व प्रस्ताव प्रस्ताव मागणी प्रस्तावाची छाननी करणे लाभार्थीची निवड करणे | ३१ जुलै अखेर | ०९.०१.२००९ जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा |
| ५ | लाभार्थीची निवड करणे | ३१ जुलै अखेर | २७/२/२००९ |
| ६ | निविदा प्रक्रिया पुर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकारी/समितीची मान्यता घेणे | ३१ ऑक्टोबर पर्यत | ३१.०३.२००९ ते ०२.०३.२०१० |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश | ३० नोव्हेबर, | २७/२/२००९ |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे | ३१ जानेवारी | ३१.०३.२००९ ते ०२.०३.२०१० |
| ९ | पुरवठादाराचे देयके अदा करणे | फेब्रुवारी पर्यंत | ५० टक्के अनुदान अदाई दि. ३१.३.२००९ धनादेश क्र. ९४२४१०, ५० टक्के लोकवाटा अदाई दि. २९.८.२००९ ते ३.८.२०१० |
| १० | विनियोग दाखल प्राप्त करुन घेणे | मार्च अखेर | ३१.०३.२०१० |

जि.प.स्वसंपादित निधीअंतर्गत ५० टक्के अनुदानावर चापकटर पुरवठा करणे या योजनेचा उद्देश जिल्हयातील गरजू शेतक-यांना चापकटर लाभ मिळावा हा आहे. शेतकरी सदर लाभापासून वंचित राहू नये ही बाब समोर ठेवून आवश्यक मान्यता घेऊनच योजना राबविण्यात आली आहे. कृषी विषय समितीची म.जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १० ची मान्यता दि. २०/५/२००८ रोजी घेण्यात आली आहे. दि. ३ डिसेंबर, २००८ रोजी शासन दर करार प्राप्त झाल्यानुसार व दि. ९.१.२००९ रोजीच्या जि.प. सर्वसाधारण सभेत योजने अंतर्गत चापकटर खरेदी व त्याचे हस्तांतरण करण्यास म.जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १२८ ची मान्यता घेवून दिनांक २६.२.२००९ रोजी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्यात आली, तद्नंतर दि. २७/२/२००९ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे, परंतु योजनेचा अंतिम उद्देश सफल झाला आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई परिपत्रक्र क्रमांक १०८९/प्र.क्र.५५/३४, दिनांक ५ ऑगस्ट, १९८९ प्रमाणे पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात आल्या आहेत.

(३) जिल्हा परिषद सेस योजना सन २००८-०९ अंतर्गत ५० टक्के अनुदानावर एकूण ५१ चापकटर दर प्रती नग रुपये १९,२५७/- (५० टक्के लोकवाटा रक्कम रु. ९६२८.५०) खालील प्रमाणे या स्तरावरुन वाटप करुन लोकवाटा भरणा केलेला आहे.

| अ.क्र. | तालुका | नग | लोकवाटा | भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | १२ (दोन नग पं.स. कळंब यांच्याकडे वर्ग केले) | ९६२८५ | ९६२९० |
| २ | तुळजापूर | ०८ | ७७०२८ | ७७०२८ |
| ३ | उमरगा | ०७ | ९७३९९.५० | ६७४०३ |
| ४ | लोहारा | ०५ | ४८१४२.५० | ४८१४३ |
| ५ | कळंब | | ७७०२८ | ७७०३३ |
| ६ | वाशी | ०४ | ३८५१४ | ३८५१४ |
| ७ | भुम | ०४ | ३८५१४ | ३८५१६ |
| ८ | परांडा | ०५ | ४८१४२.५० | ४८१४३ |
| | **एकूण** | **५१** | **४९१०५४.००** | **४९१०७०** |

कृषी अधिकारी यांची मागणी घेवून औजारे खरेदी करण्यात आली, तथापि शेतकरी प्रत्यक्ष औजारे पाहणी करुन लोकवाटा भरणा करुन खरेदी करतात, त्यामुळे साहित्य विहित वेळेत वाटप झालेली नाही.

सन २००९-१० मध्ये शेतक-यांना लाभ दिला असला तरी जिल्हयातील गरजू शेतक-यांना अनुदानावर चापकटर पुरवठा करणे हा शासनाचा योजना राबविण्याचा उद्देश सफल झाला आहे. सदर योजने अंतर्गत एकूण वसुल झालेला लोकवाटा रु. ४,९१,०७०/- दि. ३/८/२०१० चे पत्रान्वये पुरवठा संस्थेला अदा केलेला आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचना दिनांक १७/४/२००८ प्रमाणे कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांनी मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के चापकटरची तपासणी केलेली आहे.

(५) आर्थिक वर्ष सन २००८-०९ मध्ये योजना राबविण्यासाठी आवश्यक मान्यता घेवून दिनांक २७/२/२००९ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात औजारे गट स्तरावर दिनांक ३१/३/२००९ रोजी प्राप्त झाल्याने त्याच वित्तीय वर्षात वाटप करण्यात आलेली नाहीत. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब होऊन पुढील वर्षात साहित्य दिनांक ३१.३.२००९ ते ०२.०३.२०१० या कालावधीत वाटप झाले आहे. प्रशासकीय कारणास्तव विलंब झालेला असला तरीही योजनेचा उद्देश सफल झाला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७२६ :- जिल्हा परिषद उपकर योजना व कडधान्य गळीत धान्य कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पॉवर स्प्रे पंप खरेदी पुरवठा करणेत अनियमितता झाल्याबाबत (सन २००८-०९)**

याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत :–

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक,क्र. झेडपीए ९/२०००/प्र.क्र.४१/३१ दिनांक १७ जानेवारी, २००१ मधील वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

(२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. १०८९/प्र.क्र.१०८९/प्र.क्र.५५/३४, दिनांक ५ ऑक्टोबर, १९८९ प्रमाणे योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. पंरास/१०८४/सीआर-१६३३/५७, दिनांक १९ जानेवारी,१९८५ नुसार लोकवाटा वसुली नंतरच साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे, परंतु लोकवाटा सन २००९-२०१० या वर्षात वसुल केला आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांचे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे योजना यशस्वी होण्यासाठी कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी यांनी टक्केवारी प्रमाणे पहाणी केलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.व्हीपीआर-१०८८/सीआर ७९४, दिनांक २६/१०/१९८९ नुसार ज्या वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. प्रस्तूत योजनेचे साहित्य पुढील वर्षात वाटप केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**प्रस्तावना—**केंद्र पुरस्कृत गळीत धान्य कार्यक्रमाचे मुख्य उद्देश गळीत धान्य पिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरिता कीड व रोगाचा प्रतिबंधक करणे व जादा उत्पादन देणा-या नवीन वाणाचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्तरावर उपलब्ध करुन देणे आहे. सदरील कार्यक्रमांतर्गत ५० टक्के अनुदानावर पॉवर स्प्रे पंप पुरवठा करणेची योजना राबविण्यात आली आहे. गट विकास अधिकारी यांच्या मागणी प्रमाणे एकूण २१३ नगांची मागणी नोंदवून २१३ शेतक-यांना वाटप केले आहे. अनुदान रक्कम (रु २०००/- प्रति नग) ४,२६,०००/- व लोकवाटा रक्कम (२४००/- प्रति नग) ५,११,२००/- असे एकूण रक्कम रुपये ९,३७,२००/- पुरवठा संस्थेस अदा केला आहे.

जिल्हा परिषद उपकर योजना व केंद्र पुरस्कृत कडधान्य कार्यक्रमांतर्गत पॉवर स्प्रे पंप पुरवठा करण्यात आलेला नाही.

(१) दिनांक १७ जानेवारी, २००१ मधील वेळापत्रक व जिल्हा परिषदेमार्फत केलेली कार्यवाही.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | वेळा पत्रक | जि. प. मार्फत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | योजनेची निवड व अर्थ संकल्पात तरतूद करणे | मे पुर्वी | मे पुर्वी |
| २ | विविध योजनेचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता/मंजूरी घेणे | ३० जून | २०/५/२००८ |
| ३ | योजनेस प्रशासकीय/तांत्रिक मंजूरी देणे | ३१ ऑगस्ट | प्र.मं. ५.९.२००८<br>ता.म. १७.४.२००८ |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दीष्ट्य वाटप करणे व प्रस्ताव मागविणे व प्रस्तावाची छाननी करणे | ३१ जुलै अखेर | १८.७.२००८ |
| ५ | लाभार्थीची निवड करणे | ३१ जुलै अखेर | – |
| ६ | निविदा प्रक्रिया पुर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकारी/समितीची मान्यता घेणे | ३१ ऑक्टोबर, पर्यत | ३.१२.२००८ च्या शासन दरकरारा नुसार खरेदी |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश | ३० नोव्हेंबर | २०.२.२००९ |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे | ३१ जानेवारी | ३१.३.२००९ ते ३.१२.२०११ |
| ९ | पुरवठादाराचे देयके अदा करणे | फेब्रुवारी पर्यंत | ३१.३.२००९ ते ९.९.२००९ |
| १० | विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे | मार्च अखेर | ३१.३.२०१० |

कृषी विषय समितीची म.जि.प व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०९ ची मान्यता दिनांक २०/५/२००८ रोजी घेण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ५ सप्टेंबर, २००८ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर दि. ३ डिसेंबर, २००८ रोजी शासन दर करार प्राप्त झाल्यानुसार दि. २०/२/२००९ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले आहे. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे, परंतु योजनेचा उद्देश सफल झाला आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई परिपत्रक क्र १०८९/प्र.क्र. ५५/३४, दिनांक ५ ऑक्टोबर, १९८९ प्रमाणे पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात आल्या आहेत.

(३) केंद्र पुरस्कृत गळीत धान्य कार्यक्रम सन २००८-०९ अंतर्गत ५० टक्के अनुदानावर एकूण २१३ नग पॉवर स्प्रे पंप दर प्रती नग रुपये ४४००/- (लोकवाटा रक्कम रु.२४००/-) खालील प्रमाणे तालुका स्तरावर वाटप करुन लोकवाटा भरणा केलेला आहे.

| अ.क्र. | तालुका | नग | लोकवाटा | भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | उस्मानाबाद | ३९ | ९३६०० | ९३६०० |
| २. | तुळजापूर | ३० | ७२००० | ७२००० |
| ३. | उमरगा | ३० | ७२००० | ७२००० |
| ४. | लोहारा | २० | ४८००० | ४८००० |
| ५. | कळंब | २५ | ६०००० | ६०००० |
| ६. | वाशी | २० | ४८००० | ४८००० |
| ७. | भुम | २५ | ६०००० | ६०००० |
| ८. | परांडा | २४ | ५७६०० | ५७६०० |
| | **एकूण** | **२१३** | **५११२००** | **५११२००** |

कृषी अधिकारी यांची मागणी घेवून औजारे खरेदी करण्यात आली, तथापि शेतकरी प्रत्यक्ष औजारे पाहणी करुन लोकवाटा भरणा करुन खरेदी करतात, त्यामुळे साहित्य विहित वेळेत वाटप झालेले नाही.

सन २००९-१० मध्ये शेतक-यांना लाभ दिला असला तरी जिल्हयातील गरजु शेतक-यांना अनुदानावर पॉवर स्प्रे पंप पुरवठा करणे हा योजना राबविण्याचा उद्देश सफल झाला आहे. योजने अंतर्गत एकूण वसुल झालेला लोकवाटा रु. ५,११,२००/- पुरवठा संस्थेला अदा केलेला आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचना दिनांक १७/४/२००८ प्रमाणे कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांनी मागदर्शक सूचनेनुसार पॉवर स्प्रे पंप तपासणी केलेली आहे.

(५) आर्थिक वर्ष सन २००८-०९ मध्ये योजना राबविण्यासाठी आवश्यक मान्यता घेवून दिनांक २७/२/२००९ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात औजारे गट स्तरावर दिनांक ३१/३/२००९ रोजी प्राप्त झाल्याचे त्याच वित्तीय वर्षात वाटप करण्यात आलेली नाहीत. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब होऊन पुढील वर्षात साहित्य दिनांक ३१.३.२००९ ते ०३.१२.२००९ या कालावधीत वाटप झाले आहे. प्रशासकीय कारणास्तव विलंब झालेला असला तरीही योजनेचा उद्देश सफल झाला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७२७ :- केंद्र पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य गळीत धान्य कार्यक्रमअंतर्गत ५० टक्के अनुदानावर एच.डी.पी. ई. पाईप खरेदी पुरवठा करणेत अनियमिततेबाबत(सन २००८-२००९)**

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए ९/२०००/प्र.क्र. ४२/३१ दि. १७ जानेवारी, २००१ मधील वेळा प्रत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.१०८९/प्र.क्र. ५५/३४ दि. ०५ ऑक्टोबर, १९८९ प्रमाणे योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. पंरास/१०८४/सीआर-१६३३/५७, दि. १९ जानेवारी, १९८५ नुसार लोकवाटा वसुली नंतरच साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे, परंतु लोकवाटा सन २००९-१० या वर्षात वसुल केला आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योजना यशस्वी होण्यासाठी कृषी अधिकारी, कृषीविकास अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी यांनी टक्केवारी प्रमाणे पहाणी केलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. व्हीपीआर-१०८८/सीआर/७९४ दि. २६/१०/१९८९ नुसार ज्या वर्षात साहित्य खरेदी केले आहे, त्याच वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. प्रस्तुत योजनेचे साहित्य पुढील वर्षात वाटप केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून पुढील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**प्रस्तावना:—** केंद्र पुरस्कृत गळीत धान्य/कडधान्य कार्यक्रमाचे मुख्य उद्देश गळीत धान्य/कडधान्य पिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरिता संरक्षित सिंचन सुविधा, कीड व रोगांना प्रतिबंधक करणे व जादा उत्पादन देणा-या नविन वाणाचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्तरावर उपलब्ध करुन देणे आहे. सदर योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर एच.डी.पी.ई.पाईप पुरवठा करणे ही योजना राबवण्यात आली आहे. सदर दोन्ही योजनेंतर्गत एकूण ९५०४ नग पाईप (कडधान्य योजना १५४४ नग व गळीत धान्य योजना ७९६० नग) पुरवठा नोंदवून २०७ शेतक-यांना वाटप पुर्ण केले आहे. अनुदान रक्कम (२५२.५०/-प्रती नग) २३,९९,८३५/-व लोकवाटा रक्कम (२५२.५०/-प्रती नग) २३,९९,७६०/- असे एकूण रक्कम रुपये ४७,९९,५९५/- पुरवठा संस्थेस अदा उद्देश सफल झाला आहे.

जिल्हा परिषद उपकर योजना व केंद्र पुरस्कृत कडधान्य कार्यक्रमांतर्गत पॉवर स्प्रे पंप पुरवठा करण्यात आलेला नाही.

(१) दिनांक १७ जानेवारी २००१ मधील वेळापत्रक व जिल्हा परिषदेमार्फत केलेली कार्यवाही.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | वेळा पत्रक | जि. प. मार्फत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | योजनेची निवड व अर्थ संकल्पात तरतूद करणे | मे पुर्वी | मे पुर्वी |
| २ | विविध योजनेचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता/मंजूरी घेणे | ३० जून | २०.५.०८ |
| ३ | योजनेस प्रशासकीय/तांत्रिक मंजूरी देणे | ३१ ऑगस्ट | प्र.मे. ८.७.०८<br>ता.म.१४.४.०८ |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दीष्ट्य वाटप करणे व प्रस्तावाची छाननी करणे | ३१ जुलै अखेर | १३.८.०८ |
| ५ | लाभार्थीची निवड करणे | ३१ जुलै अखेर | |
| ६ | निविदा प्रक्रिया पुर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकारी/समितीची मान्यता घेणे | ३१ ऑक्टोबर | ३.१२.०८ च्या शासन दरकरारानुसार |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश | ३० नोव्हेंबर | २७.२.०९ |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे | ३१ जानेवारी | १२.३.२००९ ते ११.२.२०११ |
| ९ | पुरवठादाराचे देयके अदा करणे | फेब्रुवारी पर्यंत | ३१.३.०९ |
| १० | विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे | मार्च | ३१.३.२०११ |

कृषी विषय समितीची म.जि.प व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०९ ची मान्यता दिनांक २०/५/२००८ रोजी घेण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ५ सप्टेंबर, २००८ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर दि. ३ डिसेंबर, २००८ रोजी शासन दर करार प्राप्त झाल्यानुसार दि. २७/२/२००९ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले आहे. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे. परंतु एच.डी.पी.ई. पाईप शेतक-यांना अनुदानावर वाटप करण्याचा अंतिम उद्‌देश सफल झाला आहे.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई परिपत्रक क्रमांक १०८९/प्र.क्र. ५५/३४, दिनांक ५ ऑक्टोबर,१९८९ प्रमाणे पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात आल्या आहेत.

(३) केंद्र पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य कार्यक्रम सन २००८-०९ अंतर्गत ५० टक्के अनुदानावर एकूण ९५०४ नग एच.डी.पी.ई. पाईप दर प्रती नग रुपये ५०५/- (५० टक्के लोकवाटा रक्कम रु. २५२.५०/- खालीलप्रमाणे गट स्तरावरुन वाटप करुन लोकवाटा भरणा केलेला आहे.)

| अ.क्र. | तालुका | नग | लोकवाटा | भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | २११२ | ५३३२८० | ५३३३१० |
| २ | तुळजापूर | १५८४ | ३९९९५० | ३९९९५० |
| ३ | उमरगा | १४०८ | ३५५५२० | ३५५५२१ |
| ४ | लोहारा | ८०८ | २०४०२० | २०४०२० |
| ५ | कळंब | १२४० | ३१३१०० | ३१३१४४ |
| ६ | वाशी | ७०४ | १७७७६० | १७७७७६ |
| ७ | भुम | ८४० | २१२१०० | २१२१०१ |
| ८ | परांडा | ८०८ | २०४०२० | २०४०२० |
| | **एकूण** | **९५०४** | **२३९९७६०** | **२३९९८५२** |

कृषी अधिकारी यांच्या मागणी घेवून औजारे खरेदी करण्यात आली, तथापि शेतकरी प्रत्यक्ष औजारे पाहाणी करुन लोकवाटा भरणा करुन खरेदी करतात, त्यामुळे साहित्य विहित वेळेत वाटप झालेले नाही.

सन २००९-१० मध्ये शेतक-यांना लाभ दिला असला तरी जिल्हयातील गरजू शेतक-यांच्या अनुदानावर एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करण्या मागील योजनेचा उद्देश सफल झाला आहे. सदर योजने अंतर्गत एकूण वसुल झालेला लोकवाटा रु. २३९९८५२/- पुरवठा संस्थेला अदा केलेला आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचना दिनांक १७/४/२००८ प्रमाणे कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांनी मार्गदर्शक सुचनेनुसार एच.डी.पी.ई. पाईपची तपासणी केलेली आहे.

(५) आर्थिक वर्ष सन २००८-०९ मध्ये योजना राबविण्यासाठी आवश्यक मान्यता घेवून दिनांक २७/२/२००९ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात औजारे गट स्तरावर दिनांक ३१/३/२००९ रोजी प्राप्त झाल्याने त्याच वित्तीय वर्षात वाटप करण्यात आलेली नाहीत. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब होऊन पुढील वर्षात साहित्य दिनांक १२.३.२००९ ते ११.०२.२०११ या कालावधीत वाटप झाले आहे. प्रशासकीय कारणास्तव विलंब झालेला असला तरीही योजनेचा उद्देश सफल झाला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७२८/११ :- कडधान्य गळीतधान्य कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पी.एस.बी. पाकीटे खरेदी पुरवठा करणेबाबतची अनियमितता (सन २००८-२००९)**

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र झेडपीए ९/२०००/प्र.क्र.४१/३१ दि.१७ जानेवारी, २००१ मधील वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.१०८९/प्र.क्र.५/३४ दि. ५ ऑक्टोबर, १९८९ प्रमाणे योजनेची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.पंरास/१०८४/सीआर-१६३३/५७, दि. १९ जानेवारी, १९८५ नुसार लोकवाटा वसुली नंतरच साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे, परंतु लोकवाटा सन २००९-१० या वर्षात वसुल केला आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांचे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे योजना यशस्वी होण्यासाठी कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी यांनी टक्केवारी प्रमाणे पहाणी केलेली नाही.

(५) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.व्हीपीआर-१०८८/सीआर ७९४ दि.२६/१०/१९८९ नुसार ज्या वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. प्रस्तुत योजनेचे साहित्य पुढील वर्षात वाटप केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

केंद्र पुरस्कृत गळीतधान्य/कडधान्य कार्यक्रमांचे मुख्य उद्देश गळीतधान्य/कडधान्य पिकांच्या एकूण उत्पादनात वाढ करण्याकरिता संरक्षित सिंचन सुविधा कीड व रोगांचा प्रतिबंध करणे व जादा उत्पादन देणा-या नवीन वाणाचे प्रमाणित बियाणे शेतकरी स्तरावर उपलब्ध करून देणे आहे. सदर योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर जैविक खते (पी.एस.बी.पॉकीट) पुरवठा करणेची योजना राबविण्यात आली आहे. सदर दोन्ही योजनेंतर्गत एकूण ९०००० पाकीटे (के.पु.गळीतधान्य उत्पादन कार्यक्रम ४५२०० व के.पु. कडधान्य उत्पादन कार्यक्रम ४४८०० पॉकीटे) पुरवठा नोंदवून शेतक-यांना वाटप केले आहे.

(१) दिनांक १७ जानेवारी, २००१ मधील वेळापत्रक व जिल्हा परिषदेमार्फत केलेली कार्यवाही.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | वेळा पत्रक | जि. प. मार्फत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | योजनेची निवड व अर्थ संकल्पात तरतूद करणे | मे पूर्वी | मे पूर्वी |
| २ | विविध योजनेचे प्रारूप निश्चित करून त्यास विषय समितीची मान्यता / मंजुरी घेणे | ३० जून | २०.५.०८ |
| ३ | योजनेस प्रशासकीय तांत्रिक मंजुरी देणे | ३१ ऑगस्ट | प्र.मं.५.९.०८ ता.मं. १७.४.०८ |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप करणे व प्रस्ताव मागविणे, प्रस्तावांची छाननी करणे. | ३१ जुलै अखेर | ७.१२.०८ |
| ५ | लाभार्थीची निवड करणे | ३१ जुलै अखेर | |
| ६ | निविदा प्रक्रिया पूर्ण करून खरेदीस सक्षम अधिकारी/ समितीची मान्यता घेणे | ३१ ऑक्टोबर पर्यंत | ९.६.०८ च्या शासन दरकरारानुसार |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश | ३० नोव्हेंबर | २०.२.०९ |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे | ३१ जानेवारी | ३०.३.०९ ते ६.६.०९ |
| ९ | पुरवठादारांचे देयके अदा करणे | फेब्रुवारी पर्यंत | ३१.३.०९ |
| १० | विनियोग दाखले प्राप्त करून घेणे. | मार्च | – |

केंद्र पुरस्कृत गळीत धान्य योजनेअंतर्गत कृषी विकास अधिकारी स्तरावर जिवाणू संवर्धनाचे वाटप ही योजना राबविण्यासाठी १७ मे, २००८ रोजी मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. सदर योजना राबविण्यासाठी कृषी विषय समितीची म.जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०९ ची मान्यता दि.२०/५/२००८ रोजी घेण्यात आली आहे. कृषी संचालक (नि.व.गु.नि.) यांचे सदर बाबीचे दर कराराचे (दि.९/६/२००८) पत्र दि.१८ जून, २००८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाले आहे. पुढे गटांची पीएसबी पाकीटऐवजी जिप्समसाठी मागणी पाहता दि.२५/६/२००८ अन्वये बाब बदल प्रस्ताव सादर केला होता.

तथापि, सदर बाब बदलास मान्यता देता येणार नाही असे विभागीय कृषी सहसंचालक, लातूर यांनी पत्र क्रमांक ७७१२/८/ दि.१/१०/ २००८, जा.क्र./९४७७/२००८,दिनांक ११/१२/२००८, पत्र क्र.३६९/२००९ दिनांक १४/१/२००९ अन्वये कळविल्यानुसार दिनांक.२०/२/२००९ रोजी जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. एकंदरीत प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई परिपत्रक क्र.१०८९/प्र.क्र.५५/३४, दिनांक ५ ऑक्टोबर, १९८९ प्रमाणे पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात आल्या आहेत.

(३) केंद्र पुरस्कृत गळीत धान्य व कडधान्य कार्यक्रम सन २००८-०९ अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पी.एस.बी. पाकीटे एकूण ४५२०० व ४४८०० नग दर प्रती नग रुपये १२.५०/- (५० टक्के लोकवाटा रक्कम रु.६.२५/-) खालील प्रमाणे गट स्तरावरुन वाटप करुन लोकवाटा भरणा केलेला आहे.

| अ.क्र. | तालुका | नग | लोकवाटा | भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | १२००० | ७५००० | ७०००० |
| २ | तुळजापूर | १२००० | ७५००० | ६१८७५ |
| ३ | उमरगा | १२००० | ७५००० | ७०००२ |
| ४ | लोहारा | ९२०० | ५७५०० | ० |
| ५ | कळंब | १२००० | ७५००० | २१८७५ |
| ६ | वाशी | ८८०० | ५५००० | २८७५० |
| ७ | भुम | १२००० | ७५००० | ० |
| ८ | परांडा | १२००० | ७५००० | २८१२५ |
| | **एकूण** | **९००००** | **५६२५००** | **२८०६२७** |

केंद्र पुरस्कृत गळीत धान्य/कडधान्य उत्पादन कार्यक्रम २००८-०९ मध्ये पी.एस.बी अनुदानापोटी के.पु.योजनेमधुन रुपये २,८२,५००/- व के.पु.कडधान्य योजनेमधुन रुपये २,८०,०००/- असे एकूण ५,६२,५००/- अनुदानाचा धनादेश जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद यांना देण्यात आलेला होता. परंतु पीसएबी पाकीटाचा सदर नमुना अप्रमाणित झाल्याचे अर्धवेळ गुणनियंत्रण तथा कृषी अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी दिनांक ६/६/२००९ चे पत्रान्वये कळविल्यानुसार या कार्यालयाने अनुदानाची रक्कम जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून पत्र क्रमांक २०१०/८३१/ दिनांक २/३/२०१० अन्वये रुपये ५,१९,२३१/- एवढया रक्कमेचा धनादेश, दिनांक १२.०१.२०११ व दिनांक २३.०३.२०११ च्या पत्रान्वये उर्वरित अनुदान रुपये २५,४०२/- व रुपये १७,८६७/- असे एकूण रुपये ५,६२,५००/- जमा केले आहे. उक्त अनुदान रक्कम शासन खाती जमा केली आहे. आणि लोकवाट्याची रक्कम रुपये २८०६२७/- संबंधीत गटांना दिनांक २३/६/२०१० रोजी परत केली आहे.

(४) कृषी संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांनी पाहणी केलेली आहे.

(५) शेतक-यांची पीएसबी पाकीटाऐवजी जिप्समसाठी मागणी पाहता दि.२५/६/२००८ अन्वये बाब बद्दल प्रस्ताव विभागीय कृषी सहसंचालक, लातुर यांना सादर केला होता. तथापि सदर बाब बदलास मान्यता देता येणार नाही असे विभागीय कृषि सहसंचालक, लातुर यांनी पत्र क्रमांक ७७१२/८ दि.१/१०/०८, जा.क्र/९४७७/२००८, दिनांक ११/१२/२००८, पत्र क्र. ३६९/०९, दिनांक १४/१/२००९ अन्वये कळविल्यानुसार दि.२०/२/०९ रोजी जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. एकंदरित प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे, त्यामुळे त्याच आर्थिक वर्षात साहित्याचे वाटप करता आले नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.७७५ :- मानव विकास मिशन अंतर्गत दुधाळ जनावराचे गटवाटपातील नियमबाह्यतेबाबत (सन २००८-०९).**

(१) जिल्हाधिकारी / अध्यक्ष तथा मानव विकास समिती यांचे आदेश क्र.६.७/७८, दि.२०/१/२००७ च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे अनुक्रमांक १८ प्रमाणे दुभत्या जनावरांची खरेदी करण्यापुर्वी अ ते फ पर्यंतचे प्रशिक्षण दिलेले नाही.

(२) लाभार्थ्यांनी अन्य योजनेचा लाभ घेतले नसल्याचे प्रमाणपत्र दर्शविलेले नाही.

(३) जिल्हाधिकारी यांचे दि.२०/०१/२००७ च्या मागदर्शक सुचनानुसार बाब क्र.१६ अन्वये उच्च दर्जाची व अधिक दुध देणारे जनावरे खरेदी करण्यात आल्याची खात्री करता आलेली नाही.

(४) मार्गदर्शक सुचना क्र.८ नुसार योग्य लाभार्थ्यांची निवड कागदोपत्री पुराव्या आभावी खात्री करता आली नाही.

(५) प्रमाणक क्र.१२ ते १६, दि.०२/०३/२००९ अन्वये रक्कम रु.९,९१,५००/- एवढी रक्कम लोकवाटा या सदराखाली ६४ लाभार्थ्यांची रक्कम जमा करुन परत केली आहे. योजनेची अंमजबजावणी काटेकोरपणे झालेली नाही.

(६) तुळजापुर तालुक्यातील निवडलेल्या क्लस्टर पध्दतीच्या गावांची संख्या १५ असुन १०५ लाभार्थी संख्या आहे. या बाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जिल्हाधिकारी / अध्यक्ष तथा मानव विकास समिती यांचे आदेश क्र. ६/७/७८, दि.२०/१/२००७ च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे अनुक्रमांक १८ प्रमाणे दुभत्या जनावरांची खरेदी करण्यापुर्वी अ ते फ पर्यंतचे प्रशिक्षण संबंधित लाभार्थ्यांना दि.१६/१२/२००८ रोजी पंचायत समिती, तुळजापुर येथे देण्यात आलेले असुन सदर प्रशिक्षणाचा उपस्थिती अहवाल उपलब्ध आहे.

(२) निवड केलेल्या लाभार्थ्यांना पशुसंवर्धन योजनेचा अन्य लाभ दिलेला नाही असे गटविकास अधिकरी तथा तालुका मानव विकास समिती सहअध्यक्ष पंचायत समिती, तुळजापुर यांचे प्रमाणत्र उपलब्ध आहे.

(३) जिल्हाधिकारी यांचे दि.२०/०१/२००७ च्या मार्गदर्शक सुचनानुसार बाब क्र.१६ अन्वये उच्च दर्जाची व अधिक दुध देणारे जनावरे निवड समिती मार्फत खरेदी करण्यात आलेली असुन खरेदी केलेल्या जनावरांना पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, तुळजापुर यांनी आरोग्य दाखले प्रदान केलेले आहेत. सदर आरोग्य दाखले पाहुनच विमा कंपनीने सदर जनावरांचे आरोग्य चांगले असल्यामुळे विमे उतरविले आहेत.

(४) मार्गदर्शक सुचना क्र.८ नुसार १०५ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असुन त्यामध्ये (१८) मागासवर्गीय लाभार्थी असुन (६६) अल्पभूधारक शेतकरी, (१०) शेतमजुर असुन आर्थिकदृष्टया मागासलेल्या (११) महिलांना लाभ देण्यात आलेला आहे.

(५) सदर योजनेमध्ये एकुण १०५ लाभार्थ्याना लाभ देण्यात आला होता. त्याची ५० टक्के लोकवाट्याची रक्कम रु.१९,५५,०००/- गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापुर यांचे खात्यावर जमा करुन घेण्यात आली होती, परंतु काही लाभार्थ्यानी निवड होण्यापुर्वीच लोकवाट्याची रक्कम गटविकास अधिकारी यांचे खात्यावर जमा केली होती. निधीअभावी उद्दिष्ट कमी झाल्यामुळे त्यांना लाभ देण्यात आलेला नसल्यामुळे लोकवाट्याची रक्कम रु.९,९१,५००/- (६४) लाभार्थ्याना परत करण्यात आलेली आहे.

(६) तुळजापुर तालुक्यातील नजिकच्या १५ गावातील १०५ लाभार्थ्यांची निवड करुन योजना मार्गदर्शक सुचनेप्रमाणे क्लस्टर पध्दतीने राबविण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.७७६ :- मानव विकास मिशन अंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटप योजनेतील अनियमिततेबाबत (सन २००८-०९).**

सन २००८-२००९ मधील वित्तीय वर्षाच्या निवड महिन्यातील उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन उक्त योजनेतून ७७ लाभार्थीना जनावरे वाटप करुन रक्कम रुपये ३७,२१,०००/- नोंदविला आहे.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक मागास क्र. १०८९ तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास १०३३/प्रक्र २३९/३४, दि.१/६/१९९३ नुसार मागासवर्गीय प्रवर्ग निहाय नोंदवही ठेवलेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक भ.म.वि/२००६/प्रक्र २०/का-१४१३, दिनांक २९/०३/२००६ नुसार परि(८) ब नुसार खरेदी प्रक्रिया केलेली नाही.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र. ४४६/वित्त-९, दिनांक २० जुन, २००८ मधील सुचनेनुसार वेळापत्रकाचे पालन केले नाही.

(४) अध्यक्ष, जिल्हा मानव विकास समिती तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे निधी वितरण आदेश क्रमांक जिमाविस १३ निधी / वितरण आदेश/०८-०९/५४४, दिनांक १२/१२/२००८ नुसार दिलेल्या सुचना क्रमांक ७(अ) अन्वये उक्त उच्च दर्जाचे पशुचीच खरेदी केल्याची खात्री करता आली नाही.

(५) पशुधन विकास अधिकारी यांनी पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिल्याच्या नोंदी घेतलेल्या नाहीत. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी दर तीन महिन्यांनी जनावरांची प्रत्यक्षात तपासणी केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. योजनेचे नांव - मानव विकास मिशन अंतर्गत निवडलेल्या गावातील लाभार्थीना दुधाळ जनावरांचे गट वाटप (पंचायत समिती), उस्मानाबाद.

२. प्रशासकिय मान्यता देणारे कार्यालय-

जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

३. योजनेचा मंजूर निधी व खर्च-

३७,२१,०००/-(५० टक्के लोकवाटयासह)

४.एकूण निवडलेले लाभार्थी - ७७

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक मागास क्र १०८९/प्रक्र ५५११/३३, दिनांक ५/१०/१९८९ तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास १०३३/प्रक्र२३९/३४, दि १/६/१९९३ नुसार मागासवर्गीय प्रवर्ग निहाय नोंदवही ठेवलेली आहे.

(२) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक भ.म.वि./२००६/प्रक्र२०/का-१४१३, दिनांक २९/०३/२००६ नुसार परि(८) ब नुसार गठीत केलेल्या समिती मार्फत प्रक्रिया केलेली आहे. खरेदी समितीची शिफारस संचिकेत संलग्न केली आहे.

(३) सदर योजनेसाठी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालयीन आदेश दिनांक १२/१२/२००८ अन्वये निधी प्राप्त झाला असून त्या नुसार विहित मुदतीत योजना राबविण्यात आलेली आहे.

(४) अध्यक्ष, जिल्हा मानव विकास समिती तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे निधी वितरण आदेश क्रमांक जिमाविस १३, निधी/वितरण आदेश/०८-०९/५४४, दिनांक १२/१२/२००८ नुसार दिलेल्या सुचना क्रमांक ७(अ) अन्वये उक्त उच्च दर्जाची व अधिक दुध देणारी जनावरे खरेदी करण्यात आली असून खरेदी केलेल्या जनावरांना पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी आरोग्य दाखले प्रदान केलेले आहेत, त्यानुसार आरोग्य दाखले पाहून विमा कंपनीने सदर जनावरांचे आरोग्य चांगले असल्यामुळे विमे उतरविले आहेत.

(५) पशुधन विकास अधिकारी यांनी वेळोवेळी पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिल्या असून त्या अनुषंगाने दर महिन्यास गाव निहाय तपशील व मासिक प्रगती अहवाल सादर केलेला आहे. तसेच पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी दर तीन महिन्यांनी प्रत्यक्ष पहाणी केलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.८८५ :- मागासवर्गीय शेतक-यांना १०० टक्के अनुदानावर ५ एच पी पाणबुडी पंप सेट पुरवठा करणेबाबत (सन २००८-०९).**

सन २००८-०९ मध्ये १००% अनुदानावर ५ एच.पी. पाणबुडी पंप सेट पुरवठा करणेबाबत रुपये १९,९८,९२०/- चा खर्च नोंदविला आहे, केलेली खरेदी ही शासन दरकरार कृषी पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शुध्दीपत्रक क्र. शुल्क ओ दर प्रतिनग १६,५२०/- प्रमाणे ६१ नग खरेदी केलेली आहे याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, उस्मानाबाद यांचा प्रोफॉर्मा इनव्हाईस नं.एलटीआर/एमआरके/३२२, दिनांक २६.०३.२००९ अन्वये पाच एच.पी. ओपनवेल इलेक्ट्रीक मोटार सेट as per ISI Mark &/RC/२००८-२००९, लक्ष्मी ब्रँड ६१ नग रुपये १६,५२०/- प्रती नग दराने रुपये १०,०७,७२०/- चा पुरवठा केलेला आहे. प्रत्यक्षात समाज कल्याण अधिकारी यांनी Passed for Rs. १,००,०००/- केलेले आहे.

(२) पुरवठा आदेश क्र.जिपउ/सकवि/सेस पापुपंप १६६६/२००९, दिनांक २७.०२.२००९ नुसार Details of Specifcation Item १ ते ११ पर्यंतच्या असेसरिजची पोच पावती लाभार्थी यांच्याकडून घेतलेली नाही.

(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पंढरपूर यांच्याकडून गुणवत्ता तपासणी करुन घेतलेली आहे, तथापि प्रत्यक्षात तपासणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद यांच्याकडून करुन घेतलेली नाही.

(४) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विद्युत पंपासाठी लाईन रेडी प्रमाणपत्र लोहारातील तीन लाभार्थी वगळता इतर गटातील म्हणजे पंचायत समिती, कळंब, उमरगा, तुळजापूर, परांडा, भूम व वाशी यांनी लाभार्थ्यांकडून घेतलेले नाही.

(५) लाभार्थीस दुबार लाभ दिले नसल्याचे प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र करुन घेतलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, उस्मानाबाद यांचा प्रोफॉर्मा इनव्हाईस नं.एलटीआर/एमआरके/३२२, दिनांक २६.०३.२००९ अन्वये पाच एच.पी. ओपनवेल इलेक्ट्रीक मोटार सेट as per ISI Mark & RC/२००८-२००९, लक्ष्मी ब्रँड ६१ नग रुपये १६,५२०/- प्रती नग दराने रुपये १०,०७,७२०/- चा पुरवठा केलेला आहे. प्रत्यक्षात समाज कल्याण अधिकारी यांनी रक्कम रुपये १०,०७,७२०/- याच रकमेस Passed for केलेले आहे.

(२) पुरवठा आदेश क्र.जिपउ/सकवि/सेस पापुपंप १६६६/२००९, दिनांक २७.०२.२००९ नुसार Details of Specification Item १ ते ११ पर्यंतच्या असेसरिजची पोच पावती लाभार्थी यांच्याकडून घेतलेली नाही.

पुरवठा आदेश क्र. जिपउ/सकवि/सेस पापुपंप १६६६/२००९, दिनांक २७.०२.२००९ नुसार Details of Specification Item १ ते ११ पर्यंतच्या असेसरिजचे लाभार्थींना प्रत्यक्षात वाटप पंचाचत समिती स्तरावरुन होत असल्याने पंचायत समिती स्तरावरुन पाणबुडी पंप वाटप करताना प्राप्त ०१ ते ११ असेसिरीजसह पाणीबुडी पंप लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले वाटप पत्र संबंधित पंचायत समिती कडील लाभार्थी निहाय पोहोच पावती तसेच सर्व गट विकास अधिकारी यांनी लाभार्थी यांना ०१ ते ११ असेसिरीजसह पाणीबुडी पंप वाटप केले असल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहेत.

(३) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग क्र.सुक्रऔ २००८/प्र.क्र.३१४/११-अे, दिनांक ०३ डिसेंबर,२००८ मधील तसेच परिशिष्ट ०२, अ.क्र.०४ मध्ये पुरवठा संस्थांनी स्वतःची गुणवत्ता प्रयोगशाळा स्थापन करावी व पुरवठा केलेल्या सर्व औजारांची तांत्रिक गुणवत्ता तपासणी याची जबाबदारी पुरवठा संस्थेची राहील असे नमूद असलेने संबंधित पुरवठा संस्था, सोलापूर येथील असल्याने त्यांनी नजिकचे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पंढरपूर येथे गुणवत्ता तपासणी पत्र क्र.२७६, दिनांक २३.०३.२००९ अन्वये केलेली आहे.

(४) ५ एच.पी. पाणबुडी पंप लाभासाठी सन २००८-२००९ च्या विषय समितीने निश्चित केलेल्या योजना प्रारुपामध्ये लाभार्थीने स्वखर्चाने विद्युत जोडणी करुन घेणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, उस्मानाबाद यांना लाभार्थ्यांच्या यादीसह पत्र देऊन लाभार्थ्यांकडे विद्युत कनेक्शन आहे किंवा कसे याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र./जिपउ/सकवि/सेस/ ५७६, दिनांक ०७.१२.२०१५ अन्वये माहिती मागविली आहे. तसेच विद्युत पंपासाठी सर्व लाभार्थ्यांना वाटप करताना लाभार्थीकडे लाईन रेडी प्रमाणपत्र असलेची खात्री करुन पाणबुडी पंप वाटप केले असलेचे प्रमाणपत्र या कार्यालयात सर्व गट विकास अधिकारी यांनी सादर केलेले आहे.

(५) लाभार्थ्यास दुबार लाभ दिले नसल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवकाकडून प्रस्तावासोबत घेतलेले आहे, तसेच पंचायत समिती निहाय गट विकास अधिकारी यांचे दुबार लाभ दिले नसलेचे प्रमाणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयात प्राप्त आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.८८६/८ :- स्वयंसेवी संस्थानी चालविलेले मागसवर्गीय वसतीगृहास परिपोषण अनुदान निर्धारणात नियमबाह्य व जादा रक्कमेचे प्रदानाबाबत (सन २००८-२००९).**

स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतीगृहांना परिपोषण अनुदान निर्धारण्यास नियमबाहय व जादा रक्कमेचे प्रदान केलेले आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, कल्याण व सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, निर्णय क्र. बीसीएच/१०९७/ प्र.क्र.१/ १०७/मावक-४, दिनांक १६/ ०३/१९९८ चे सहपत्र जोडपत्र नुसार स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय मुला/मुलींची वसतिगृहांना सहाय्यक अनुदाने देण्याबाबतचे नियमातील परिच्छेद क्र.७ प्रमाणे निर्धारण केलेले नाही.

(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग निर्णय क्र.बी.सी.एच/२००७/ प्र.क्र.१०२/मावक-४, दि.३१.१०.२००८ नुसार प्रवेशाची टक्केवारी न तपासता व कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी न घेता हप्ता वाटप केला आहे. तसेच सनदी लेखापरिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील खर्च व अनुदान निर्धारणात देय होणारी रक्कम यांची देयता न तपासता रक्कम अदा करण्यात आली आहे.

(३) समाज कल्याण विभागाने अनुदान निर्धारण वाटप केल्याबाबतची वसतिगृह निहाय नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार देयक अदा झाल्याबाबतची खात्री करता आलेली नाही.

(४) लेखा परिक्षण निवड महिन्या व्यतिरिक्त इतर महिन्यामध्ये तपासणी करून जादा अदाई झाली नसल्याची खात्री घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १६.०३.१९९८ चे सहपत्रानुसार वसतिगृहांना सहाय्यक अनुदान या योजनेअंतर्गत परिपोषण अनुदानाचे निर्धारण करत असताना खालील ०९ वसतीगृहांना जादा रक्कम रुपये १,०४,४१७/- अदाई झालेली आहे. याबाबत तत्कालीन जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉ. किरण पराग सध्या कार्यरत जिल्हा परिषद, सोलापूर यांना पत्र देऊन सदरील वसतिगृहांना जादा रक्कम अदाई का करण्यात आली याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र/जिपउ/सकवि/अनुवगृह/५७२, दि. ०७.१२.१५ अन्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे.

**तक्ता**

| अ.क्र. | वसतिगृहाचे नांव | चलन क्र. व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | इंदिरा गांधी मुलांचे वि. वसतीगृह बावी | चलन क्र.३७, दि.१९.८.१५ | ६९१८ |
| २ | आई विद्यार्थी वसतिगृह उस्मानाबाद | चलन क्र.१५, दि.१९.८.१५ | १५६११ |
| ३ | मातोश्री वि. वसतीगृह कळंब | चलन क्र.४५, दि.१९.८.१५ | ४५५ |
| ४ | महात्मा फुले वि.वसतीगृह सावरगांव | चलन क्र.२४, दि.१९.८.१५ | ८९११ |
| ५ | महात्मा फुले वि.वसतीगृह निपाणी | चलन क्र.४१, दि.१९.८.१५ | १८२४१ |
| ६ | महात्मा फुले वि.वसतीगृह घारगांव | चलन क्र.४०, दि.१९.८.१५ | १७०३६ |
| ७ | कमला नेहरू मुलींचे वसतीगृह माडज | चलन क्र.८७, दि.२४.८.१५ | ८६२२ |
| ८ | प्रबोधन मा.विद्यार्थी व राजुरी, ता.उस्मानाबाद | चलन क्र.१५०, २४/०/२०१५ | १६५९२ |
| ९ | सावित्रीबाई फुले मुलींचे वसतीगृह सास्तुर, ता.लोहारा | चलन क्र.६९, दिनांक ०३.१०.२०१५ | १२०३१ |
| | | एकूण .. | १०४४१७ |

वरील तक्त्याप्रमाणे एकूण ०९ वसतीगृहांकडून जादा अदाई झालेली वसूल पात्र रक्कम रूपये १०४४१७/-संबंधित वसतिगृहाकडून वसुल करून शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. भरणा केलेल्या चलनाच्या प्रती कार्यालयात उपलब्ध आहेत.

(२) याबाबत खुलासा सविनय सादर की, सदरील शासन निर्णयाची प्रत या कार्यालयास डिसेंबर, २००८ मध्ये प्राप्त झाली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया जुलै, २००८ मध्येच पूर्ण झालेली होती. तसेच शासन निर्णय क्र.बी.सीएच. १०९७/प्र.क्र.१०७/मावक-/ दि.१६.०३.१९९८ मधील आठ अ नुसार माहे जून मध्ये ६० टक्के परिपोषण अनुदान देण्यात यावे असे नमूद असलेने महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बीसीएच/२००७/ प्र.क्र.१५२/मावक-४, दिनांक ३१.१०.२००८ अन्वये कार्यवाही होऊ शकली नाही.

तसेच वसतिगृहांना दुसरा टप्पा परिपोषण अनुदान अदा करताना वरील शासन निर्णय ३१.१०.२००८ नुसार १) अनु.जाती.-७५ टक्के, २) अनु.जमाती- १० टक्के, ३)विमुक्त जाती भटक्या जमाती- १० टक्के, ४)विशेष मागास प्रवर्ग- टक्के, ५) अंध व अपंग- ३ टक्के या विहित टक्केवारीनुसार वसतिगृहांनी विद्यार्थ्यांना प्रवर्ग निहाय प्रवेश दिल्याची वसतिगृहातील प्रवेश नोंदवही (रजिस्टर) तपासून अंतिम अनुदान वाटप केलेले आहे.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे आदेश दिनांक २०.०३.१९९८ अन्वये अनुदानित वसतिगृहांना ६० टक्के व ४० टक्के अनुदानाच्या संचिकाना मान्यता देणे व देयके पारित करणेचे कायम स्वरूपाचे अधिकार जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना प्रदान केलेले आहेत. तसेच वसतिगृहातील सनदी लेखा परिक्षण अहवालातील मान्य बाबींवरील खर्च व मूल्य निर्धारणातील अनुज्ञेय रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम शासन नियमानुसार अदा करण्यात आलेली आहे. सोबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश दिनांक २०.०३.१९९८ व शासन निर्णय दिनांक ३१.१०.२००८ ची प्रत या कार्यालयात उपलब्ध आहे.

(३) समाज कल्याण विभागामध्ये संबंधीत वसतिगृह निहाय व वर्षनिहाय अनुदान वाटप नोंदवही ठेवलेली असून त्यानुसार खात्री करून पुढील अनुदान निर्धारण वाटपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. नोंदवही तपासणीसाठी उपलब्ध आहे.

(४) सन २००८-०९ मधील एकूण ५६ अनुदानित वसतिगृहांना देण्यात येणा-या देयकाची पाहणी पडताळणी करून अंतर्गत तपासणी करून जादा अदाई झाले नसल्याची खात्री केलेली आहे. त्याबाबतची अनुदान वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. सदरील काळातील अनुदान वाटप नोंदवही या कार्यालयात उपलब्ध आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.८८७ :- दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत बांधकामाबाबत (सन २००८-०९).**

दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत बांधकामावर रुपये १४,८५,०००/- खर्च केल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ९९ व १२५ व प्रशासकीय मान्यता घेणेत आली नाही.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक ०३.१२.२००५ व शासन परिपत्रक, दिनांक २३.०३.२००६ प्रमाणे आराखडा मंजुरी नंतरच कामे सुरु करणे अपेक्षित असताना असे कार्यवाही केले बाबत लेखा परिक्षण व अभिलेखे दर्शविले नाही.

(३) अर्ध समास पत्र क्र.४, दिनांक ३१.१०.२००९ अन्वये मागणी करुनही निवड महिन्यातील एकूण रुपये ७,७७,०००/-चे प्रमाणके, मोजमाप पुस्तिका, संचिका व अंदाजपत्रके इत्यादी लेखे/अभिलेखे लेखा परिक्षणात दर्शविण्यात आलेले नाही.

(४) प्रमाणक क्र.९५०, दिनांक ३१.०३.२००९ अन्वये रक्कम रुपये १,१४,९१०/- अन्वये प्रदान करण्यात आलेल्या रकमेमध्ये रुपये २७,६०६/- मुल्यांकन वाढीचे काम दर्शवून रक्कम प्रदान करण्यात आली, परंतु वाढीव कामाचे मंजुरीचे लेखे/अभिलेखे लेखा परिक्षणात दर्शविण्यात आलेले नाही.

(५) प्रमाणक क्र.१०४२, दिनांक ३१.०३.२००९ अन्वये रक्कम रुपये १,१०,०००/- अन्वये प्रदान करण्यात आलेल्या रकमेमध्ये रुपये ४१,४७८/- मुल्यांकन वाढीव काम दर्शवून रक्कम प्रदान करण्यात आली, परंतु वाढीव कामाचे मंजुरीचे लेखे/अभिलेखे लेखा परिक्षणात दर्शविण्यात आलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरील परिच्छेद पंचायत समिती, कळंब अंतर्गत दलित वस्ती सुधारणा योजनेच्या कामासंदर्भात आहे.

(१) समाज कल्याण विषय समिती सभा दिनांक २९.०७.२००८, ठराव क्र.६ नुसार दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २००८-०९ मधील प्रस्तावांचा कृती आराखडयात समावेश करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १०९ प्रमाणे योजना राबविणेस व कलम १२५ अन्वये प्रशासकीय मान्यता, कलम ९९ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक दिनांक ०३.१२.२००५ व शासन परिपत्रक, दिनांक २३.०३.२००६ प्रमाणे कृती आराखडयास मंजुरी घेवून कामे मंजुर केलेली नाहीत. समाज कल्याण विषय समिती सभा दिनांक २९.०७.२००८ ठराव क्र.६ नुसार दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २००८-०९ मधील प्रस्तावांचा कृती आराखडयात समावेश करणेबाबत ठराव संमत करण्यात आला आहे.

(३) प्रमाणक क्र.१२८, १७२, १७३ माहे-१२/०८ व प्रमाणक १७७, ३४४, ३४५,१०४४, १०४५ माहे-३/०९ रक्कम रु. ७,७७,०००/-ची प्रमाणके मोजमाप पुस्तिका, संचिका, अंदाजपत्रके इत्यादी लेखे/अभिलेखे उपलब्ध आहेत.

(४) प्रमाणक क्र.९५०, दिनांक ३१.०३.२००९ अन्वये रक्कम रु.१,१४,९१०/- प्रदान करण्यात आले आहेत.

मौजे देवधानोरा येथील रस्ता व नाली कामाचे मुल्यांकन वाढ रक्कम रुपये २७,६०६/- एवढे प्राकलनापेक्षा जादा वाढीचे मुल्यांकन दर्शवून प्राकलनानुसार मोजमाप पुस्तिकेत दर्शविलेले प्रमाण सुधारित करुन त्यास सक्षम प्राधिका-यांची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

या विभागाचे पत्र जा. क्र.जिपउ/सकवि/अजानघववियो/३३०/२०१५, दिनांक ०७.०८.2015 नुसार प्राकलनापेक्षा जादा वाढीचे मुल्यांकन रुपये २७,६०६/- वसूल करणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार तत्कालीन शाखा अभियंता/सरपंच/ग्रामसेवक यांचेकडून प्रत्येकी रक्कम रुपये ९,२०२/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये २७,६०६/- वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रमाणक क्र. १०४२, मौजे सात्रा, तालुका कळंब रस्ता व नाली काम दिनांक ३१.०३.२००९ अन्वये रक्कम रुपये १,१०,०००/- अन्वये प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेमध्ये प्राकलन व मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले प्राकलनापेक्षा जादा वाढीचे मुल्यांकन रुपये ४१,४७८/- वाढीव काम दर्शवून प्राकलनानुसार मोजमाप पुस्तिकेत दर्शविलेले प्रमाण सुधारित करुन त्यास सक्षम प्राधिका-यांची मंजुरी घेण्यात आलेली नाही. या विभागाचे पत्र जा.क्र.जिपअ/सकवि/अजानघववियो/३३०/२०१५, दिनांक ०७.०८.२०१५ नुसार प्राकलनापेक्षा जादा वाढीचे मुल्यांकन रुपये ४१,४७८/- वसूल करणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांना कळविण्यात आले होते, त्यानुसार पंचायत समिती स्तरावर तत्कालीन शाखा अभियंता/सरपंच/ग्रामसेवक यांचेकडून रक्कम रुपये ४१,४७८/- वसूल करण्यात आले आहेत.

**परिच्छेद क्र. ३.८८८ :- समाज कल्याण अंतर्गत विद्युतीकरण, रस्ता व नाली कामातील अनियमितताबाबत (सन २००८-०९).**

विद्युतीकरण, रस्ता व नाली एकूण २४ कामावर रुपये ४३,३६,३००/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

| (१५) | तुगाव | ९३-९४ ते ९५-९६ | नाही | (१) निरंक |
| (१६) | बोरखेडा | १९९३-९४ | नाही | (१) माने, पि. आर. |

वरील प्रमाणे १५ ग्राम पंचायतचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षण न होण्यास जबाबदार कर्मचा-यांची नावे निश्चित करण्यात आलेली असुन संबंधीत जबाबदार कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा (सुधारणा) अधिनियम २०११ च्या कलम ८ नुसार रु. २५,०००/- दंडात्मक कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७ (८३) :- पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेखांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविले जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/ विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.

अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८३ | उस्मानाबाद | तुळजापुर | १७ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा परिक्षण अहवालामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे पंचायत समिती तुळजापूर अंतर्गत (१०८) ग्राम पंचायती असुन, त्यापैकी (२१) ग्रामपंचायतीने अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्याचे नमूद आहे.

सदरील (२१) ग्रामपंचायतींपैकी (६) ग्राम पंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून (१५) ग्राम पंचायतीचे अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन न दिलेले जबाबदार कर्मचारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ग्रा. पं. चे नाव | लेखा परिक्षण वर्ष | लेखा परिक्षण झाले काय | जबाबदार कर्मचा-यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) | जळकोट-वाडी (सा) | १९९२-९३,<br>१९९३-९४,<br>१९९६-९७,<br>१९९७-९८<br>१९९८-९९ ते २००३-०४<br>२००७-०८ | नाही | बी.डी.पवार,ग्रामसेवक व<br>लाटकर पी.एस.ग्रामसेवक |
| (२) | केशेगांव | १९९२-९३ ते १९९५-९६ | होय | – |
| (३) | कार्ला | १९९२-९३ ते १९९५-९६ | होय | – |
| (४) | वागदरी | १९९२-९३<br>१९९३-९४ | नाही | मोरे ग्रामसेवक (से.नि.) |

**अ**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (५) | बसंवत वाडी | १९९४-९५ ते १९९८-९९ | नाही | एस.एम.दहिरे,ग्रामसेवक, |
| | | १९९९-०० | | डी.एम.वाणी,ग्रामसेवक व |
| | | २००२-०३ ते २००६-०७ | | आर.एस.कदम,ग्रामसेवक |
| (६) | खानापूर | १९८९-९० ते १९९८-९९ | नाही | डी.बी.गायकवाड, तत्कालीन ग्रामसेवक |
| (७) | फुलवाडी | १९९४-९५ ते १९९७ | होय | – |
| | | ९८-९९ | | |
| | | २००० ते २००२-०३ | | |
| (८) | पिंपळ खु. | १९९३-९४ | नाही | आर.डी.बागल, ग्रामसेवक (से.नि.) व |
| | | १९९५-९६ | | एस.एल.राऊत ग्रामसेवक |
| | | १९९९-०० | | |
| (९) | मंगरुळ | २००३-०४ | होय | – |
| (१०) | सिंदफळ | १९९३-९४ | नाही | के.बी.कुंभार |
| | | १९९५-९६ | | ग्रा.से. (से.नि.),एस.एन.बागवान,ग्रासे |
| | | १९९९-०० | | लोकरे सी.एन.ग्रामसेवक |
| | | | | आर.एन.वरपे,ग्रामसेवक मयत |
| (११) | नांदूरी | १९९४-९५ ते १९९९-०० | नाही | बी.यु.लोखंडे, ग्रामसेवक |
| | | २००५-०६ ते २००६-०७ | | ए.आर.तुपरे,ग्रामसेवक |
| | | | | डी.एम.क्षिरसागर ग्रामसेवक (से.नि.), |
| (१२) | वडगांव | १९८९-९० | नाही | आयुब शेख,ग्रामसेवक (से.नि.), |
| | | १९९७-९८ ते २००१-०२ | | |
| (१३) | दहिवडी | १९९३-९४ ते २०००-०१ | नाही | आर.एन.वरपे,ग्रामसेवक (मयत) |
| | | २००२-०३ ते २००४-०५ | | |
| (१४) | तिर्थ बु | १९८९-९० | नाही | आयुब शेख,(से.नि.), |
| | | २००१-०२ | | आर.एस.कदम,ग्रामसेवक |
| | | २००५-०६ | | |
| (१५) | होनाळा | १९८९-९० ते १९९३-९४ | नाही | पाटील, एन.बी.ग्रामसेवक |
| | | १९९५-९६ | | |
| | | २००२-०३ ते २००४-०५ | | |
| (१६) | इटकळ | १९९३-९४ ते १९९५-९६ | नाही | के.बी.कदम,ग्रामसेवक (से.नि.), |
| | | १९९७-९८ | | शबाना तांबोळी,ग्रामसेवक |
| | | २००४-०५ ते २००६-०७ | | |

**अ—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (१७) | सरडेवाडी | १९९५-९६ | नाही | बी.एल.गुरव, ग्रामसेवक (सेनि) |
| | | १९९७-९८ | | व्ही.के.निकम, ग्रामसेवक (सेनि) |
| | | १९९९-०० | | |
| | | २०००-०१ | | |
| | | २००२-०३ | | |
| | | २००४-०५ | | |
| (१८) | कसई | १९९३-९४ | नाही | बी.यु.लोखंडे,ग्रामसेवक |
| | | १९९४-९५ | | ए.आर.तुपेरे, ग्रामसेवक |
| | | १९९९-२००० | | |
| | | ते २००३-०४ | | |
| | | २००६-०७ | | |
| (१९) | माळुंबा | २००२-०३ ते २००६-०७ | होय | – |
| (२०) | अणदूर | २००२-०३ | नाही | बी.एम.सावंत,ग्रामसेवक (मयत) |
| | | | | जे.टी.वग्गे, तत्कालीन ग्रामसेवक |
| (२१) | कन्सावळी | २००२-०३ ते २००३-०४ | होय | – |

वरील प्रमाणे (२१) पैकी (१५) ग्राम पंचायतीचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षण न होण्यास जबाबदार कर्मचा-यांची नांवे निश्चित करण्यात आलेली असून संबंधित जबाबदार कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा (सुधारणा) अधिनियम २०११ च्या कलम (८) नुसार रु.२५०००/- दंडात्मक कार्यवाही करणेसाठीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्रमांक पंसतु/ पंचायत/ कावि/ ११६१/१५, दि.११.१२.१५ अन्वये सादर केलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक४.३४७ (८४) : पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेखांच्या सदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविले जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/ विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.

अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८४ | उस्मानाबाद | परांडा | १८ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखापरिक्षण अहवालात दर्शविलेल्या मुद्दाप्रमाणे पंचायत समिती, परांडा अंतर्गत एकूण ७२ ग्रामपंचायती असून त्यापैकी १२ ग्रामपंचायतीपैकी ०१ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून ११ ग्रामपंचायतींचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्याचे नमूद आहे.

सदरील १२ ग्रामपंचायतीपैकी ०१ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून ११ ग्रामपंचायतींचे अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन न दिलेल्या जबाबदार कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत.—

**तक्ता**

| अ.क्र. | ग्रा. पं. चे नाव | लेखा परिक्षण वर्ष | लेखा परिक्षण झाले काय | जबाबदार कर्मचा-यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | पिंपळवाडी | १९९३-९४ | झाले | निरंक |
| | | २००३-०४ | नाही | तडवी एच.आर. व राठोड बी.ए. |
| | | २००५-०६ | नाही | खरात एस.डी. |
| | | १९९३-९४ | नाही | केंदे एस.के. |
| | | १९९८-९९ | नाही | तडवीएच.आर. |
| | | २००२-०३, २००४-०५ | नाही | तडवी, एच.आर. व राठोड बी.ए. |
| | | १९९९-०० | नाही | तडवीएच.आर. |
| | | २००१-०२ | | |
| २. | कात्राबाद | २००२-०३, २००४-०५ | झाले | निरंक |
| | | १९९२-९३, १९९३-९४ | नाही | सुरवसेएन.ए. |
| | | २००२-०३, २००४-०५ | नाही | साळवे एन.ए. व व्ही.आर.डोरले |
| ३. | कौडगांव | १९९९-००, २०००-०१ | झाले | निरंक |
| | | २००२-०३, २००४-०५ | झाले | निरंक |
| ४. | दहिटना | १९९४-९५ | झाले | निरंक |
| | | १९९८-८९ | नाही | केंद्रे एस.के. व सुरवसे जी.जी. |
| | | १९९९-०० | नाही | तडवी एच. आर. |
| | | २००१-०२ | नाही | तडवी एस. आर. |
| | | २००२-०३, २००३-०४ | नाही | तडवी एच. आर. व राठोड बी.ए. |
| ५. | जेकटेवाडी | २००१-०२ | झाले | निरंक |
| | | १९९४-९५, १९९८-९९, १९९९-०० | नाही | नागटिळक आर.एस. व उसराटे यु.आर. |

**तक्ता—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| ६. | पाचपिंपळा | २०००-०१ | झाले | निरंक |
| | | १९९१-९२, १९९३-९४ | नाही | पाटील जे.व्ही. व मुळे व्ही.डी. |
| ७. | घारगांव | १९९८-९९ | नाही | नंदनवार एन.बी. |
| | | १९९९-००, २००१-०२ | नाही | नंदनवार एन.बी. |
| | | १९९४-९५ | नाही | कदम एस.जे. |
| | | १९९७-९८, १९९८-९९ | नाही | कदम एस.जे. |
| | | २००२-०३, २००३-०४ | नाही | नंदनवार एन.बी. व घोडे व्ही.एन. |
| ८. | वाटेफळ | १९९३-९४ | नाही | गंभीरे व्ही.बी. |
| | | १९९५-९६ | नाही | गंभीरे व्ही.बी. |
| ९. | इंदगोंदा | १९९२-९३ | नाही | गावडे एस.एन |
| | | १९९३-९४ | नाही | गंभीरे व्ही.बी. |
| | | १९९५-९६ | नाही | गंभीरे व्ही.बी. |
| | | २००१-०२ | नाही | कोलगणे बी.टी. |
| १०. | देवगांव | २००२-०३, २००३-०४ | नाही | पवार आर.ए. |
| ११. | राजूरी | १९८८-८९, १९९०-९१ | नाही | काळे सी.व्ही. |
| १२. | हिगणगांव (बु) | १९९३-९४<br>१९९६-९७<br>१९९७-९८ | नाही | वाघमारे बी.एस. |

वरीलप्रमाणे ११ ग्रामपंचायतींचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षण न होण्यास जबाबदार कर्मचा-यांची नांवे निश्चित करण्यात आलेली असून संबंधित जबाबदार कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ च्या कलम ८ नुसार रु.२५,०००/- दंडात्मक कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७ (८५) : पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९) :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अभिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेखांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविले जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/ विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.

अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते, तथापि, या सूचनेबाबतही नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८५ | उस्मानाबाद | कळंब | ३० | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखापरिक्षण अहवालात दर्शविलेल्या मुद्दाप्रमाणे पंचायत समिती कळंब अंतर्गत एकूण ९१ ग्रामपंचायती असून त्यापैकी १६ ग्राम पंचायतीचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्याचे नमूद केलेले आहे.

सदरील १६ ग्रामपंचायतीपैकी ७ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून ९ ग्रामपंचायतींचे अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन न दिलेले जबाबदार कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत.

**तक्ता**

| अ.क्र. | ग्रा. पं. चे नाव | लेखा परिक्षण वर्ष | लेखा परिक्षण झाले काय | जबाबदार कर्मचा-यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | इटकूर | ६०-६१, ६२-६३ | नाही | नामांतरात रेकॉर्ड जळाले आहे. |
| | | ८९-९० | होय | निरंक |
| | | ९०-९१ | होय | निरंक |
| | | ९१-९२ | होय | निरंक |
| | | ९२-९३ | नाही | नामांतरात रेकॉर्ड जळाले आहे. |
| | | ९४-९५ | होय | निरंक |
| | | ९६-९७ | होय | निरंक |
| | | ९८-९९ | होय | निरंक |
| २. | खामसवाडी | ९३-९४ | होय | निरंक |
| | | ९४-९५ | होय | निरंक |
| ३. | मोहा | ८९-९० | होय | निरंक |
| | | ९०-९१ | होय | निरंक |
| | | ९१-९२ | होय | निरंक |
| | | ९२-९३ | होय | निरंक |
| | | ९४-९५ | होय | निरंक |
| | | ९८-९९ | होय | निरंक |

**तक्ता**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४. | खोंदला | ९२-९३ | | |
| | | ९३-९४ | नाही | ढवळे बी.जी. |
| | | ९४-९५ | | |
| | | ९८-९९ | | |
| ५. | सापनाई | ९६-९७ | होय | निरंक |
| ६. | सौंदणा ढो. | ९४-९५ | | |
| | | ९५-९६ | नाही | केद्रे एस.बी. |
| | | ९६-९७ | | |
| | | ९७-९८ | | |
| ७. | कन्हेवाडी | ९४-९५ | होय | निरंक |
| | | ९५-९६ | होय | निरंक |
| ८. | शेळका | ६०-६१ | नाही | गवळी जी.व्ही |
| | धानोरा | ६१-६२ | नाही | |
| ९. | उपळाई | ९१-९२ | होय | निरंक |
| | | ९३-९४ | होय | निरंक |
| | | ९४-९५ | होय | निरंक |
| | | ९५-९६ | होय | निरंक |
| | | ९६-९७ | होय | निरंक |
| | | ९७-९८ | होय | निरंक |
| | | ९८-९९ | होय | निरंक |
| १०. | दहीफळ | ९९-०० | नाही | एम.आर.गिरी |
| | | ००-०१ | | |
| | | ०१-०२ | होय | निरंक |
| | | ०२-०३ | होय | निरंक |
| | | ०३-०४ | होय | निरंक |
| | | ०४-०५ | होय | निरंक |
| ११. | वाठवडा | ९३-९४ | नाही | जगताप एम.एस. |
| | | ०१-०२ | | |
| | | ०३-०४ | | |
| १२. | आढळा | ८९-९० | नाही | मस्के एस.पी. |
| | | ९०-९१ | | |
| | | ९३-९४ | होय | निरंक |
| | | ९४-९५ | होय | निरंक |
| | | ९५-९६ | होय | निरंक |
| | | ९८-९९ | नाही | जाधव टी.जे. |
| | | ०६-०७ | होय | निरंक |

**तक्ता**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १३. | जायफळ | ८९-९०<br>९०-९१<br>९१-९२ | नाही | गायकेपी.एस |
| १४. | पिंपळगांव डो. | ८९-९०<br>९०-९१<br>९१-९२<br>९२-९३<br>९३-९४<br>९४-९५<br>९५-९६ | नाही | भंडे ए.जी. |
| १५. | गोविंदपूर | ९१-९२<br>९२-९३<br>९३-९४<br>९४-९५<br>९५-९६<br>९६-९७<br>९७-९८ | होय | निरंक |
| १६. | भाटशिरपुरा | ८९-९०<br>९१-९२ | नाही | श्री.धावारे एस.टी |
| | | ८९-९९ | होय | निरंक |

वरीलप्रमाणे ९ ग्रामपंचायतींचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षण न होण्यास जबाबदार कर्मचा-यांची नांवे निश्चित करण्यात आलेली असून संबंधित जबाबदार कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ च्या कलम ८ नुसार रु.२५,०००/- दंडात्मक कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७ (८६) : पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९).**

मुंबई स्थानिक निधी लेखा अभिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते, त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेखांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धेसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविले जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/ विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.

अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८६ | उस्मानाबाद | भूम | १९ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखापरिक्षण अहवालात दर्शविलेल्या मुद्दाप्रमाणे पंचायत समिती भूम अंतर्गत एकूण ७४ ग्रामपंचायती असून त्यापैकी ११ ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्याचे नमूद आहे.

सदरील ११ ग्रामपंचायतींपैकी ०१ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून उर्वरित १० ग्रामपंचायतींचे अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन न दिलेल्या जबाबदार कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत.

**तक्ता**

| अ.क्र. | ग्रा. पं. चे नाव | लेखा परिक्षण वर्ष | लेखा परिक्षण झाले काय | जबाबदार कर्मचा-यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | गोलेगाव | ९३-९४ ते ९७-९८ | होय | निरंक |
| २. | पाथ्रुड | ०५-०६ | नाही | सी.व्ही. काळे |
| | | ८९-९०, ९२-९३ | नाही | सि.एन.शिनागारे, ग्रामसेवक से.नि. |
| | | ९३-९४ | नाही | बी.बी.कुलकर्णी, ग्रामसेवक से.नि. |
| | | ९४-९५, ९५-९६ | नाही | व्ही.डी.मुळ, ग्रामसेवक |
| | | ९६-९७, ९७-९८ | नाही | आर.एस.जाधव |
| ३. | सुकटा | ९९-०० | नाही | ए.एम.मगर, ग्रामसेवक से.नि. |
| | | ०५-०६ | नाही | यु.एम.मगर, ग्रामसेवक,<br>एस.ए.मुंढे ग्रामसेवक |
| | | ०६-०७ | नाही | यु.वाय.माने, ग्रामसेवक,<br>एम.व्ही.गायकवाड, ग्रामसेवक |
| | | ८९-९०, ९२-९३ ते ९३-९४ | नाही | व्ही.एस.मोहिते, ग्रामसेवक (मयत) |
| | | ९०-९१, ९१-९२ | नाही | बी.बी.सोनवणे, ग्रामसेवक |
| ४. | गोरमाळा | ८९-९०, ९३-९४ | नाही | बी.बी.सोनवणे, ग्रामसेवक |
| | | ०६-०७<br>९८-९९ | नाही | एम.एस.जगताप, ग्रामसेवक |
| ५. | डोकेवाडी | ९४-९५ | नाही | डी.एफ.ओव्हाळ, ग्रामसेवक से.नि.(मयत) |
| | | ९८-९९ | नाही | बी.बी.टेकाळे, ग्रामसेवक से.नि.,<br>एम.आर.पोतान्ना, ग्रामसेवक (अनाधिकृत गैरहजर) |

**तक्ता**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६. | चूंबळी | ९२-९३, ९३-९४ | नाही | जी.एन.डोंबळे, तत्कालीन ग्रामसेवक, (कृषी अधिकारी) |
| ७. | अंद्रुड | ९२-९३, ९५-९६ | नाही | यु.डी.तपीसे, ग्रामसेवक से.नि. |
| | | ०४-०५, ०५-०६ | नाही | डी.टी.साळूंखे, तत्कालीन ग्रामसेवक (वि.अ. वि.ग्रा.वि.अ.) |
| | | ०६-०७ | नाही | सी.आर.मोटे ग्रामसेवक |
| ८. | वाडाची वाडी | ०६-०७ | नाही | डी.एम.वाणी ग्रामसेवक |
| | | ९४-९५ | नाही | व्ही.डी.मुळे ग्रामसेवक |
| ९. | चांदवड | ९३-९४ | नाही | बी.बी.कुलकर्णी, ग्रामसेवक से.नि. |
| | | | | सी.एन.शिनगारे, ग्रामसेवक से.नि. |
| १०. | घाटनांदुर | ९३-९४ | नाही | बी.बी.कुलकर्णी ग्रामसेवक से.नि. |
| ११. | गणेगांव | ८९-९०, ९०-९१ | नाही | आर.बी.गरड से.नि. ग्रामसेवक (मयत) |

वरीलप्रमाणे १० ग्रामपंचायतींचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षण न होण्यास जबाबदार कर्मचा-यांची नांवे निश्चित करण्यात आलेली असून संबंधीत जबाबदार कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ च्या कलम ८ नुसार रु.२५,०००/- दंडात्मक कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३४७ (८७) :- पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे (सन २००८-०९).**

मुंबई स्थानिक निधी लेखा अभिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधित जिल्हा परिषदेचे विभाग/ पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेखांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविले जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/ अभिलेख उपलब्ध केले जात नाही. त्या त्या जिल्हा परिषद/ विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.

अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणे बाबत सूचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८७ | उस्मानाबाद | लोहारा | १२ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा परीक्षण अहवालात दर्शविलेल्या मुद्दा प्रमाणे पंचायत समिती भूम अंतर्गत एकूण ४५ ग्रामपंचायती असून त्यापैकी ७ ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्याचे नमूद आहे.

सदरील ७ ग्रामपंचायतींपैकी ०१ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून ६ ग्रामपंचायतींचे अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन न दिलेल्या जबाबदार कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ग्रा. पं. चे नाव | लेखा परिक्षण वर्ष | लेखा परिक्षण झाले काय | जबाबदार कर्मचा-यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | उदतपुर | १९९४-९५, १९९५-९६, | | |
| | | १९९८-९९ व २००३-०४ | होय | निरंक |
| | | १९८९-९० ते १९९७-९८ | होय | निरंक |
| | | २०००-०१ | नही | एम.पी.यादव |
| | | २००२-०३, २००४-०५ | होय | निरंक |
| २. | धानुरी | २००१-०२ ते २००५-०६ | होय | निरंक |
| | | १९८९-९० ते १९९८-९९ | होय | निरंक |
| | | १९९९-०० ते २००१-०२ | नाही | ओ.एम.बिराजदार |
| | | २००२-०३ ते २००५-०६ | होय | निरंक |
| ३. | कानेगाव | १९९९-०० ते २०००-०१ | नाही | बी.एस.शिंदे |
| | | १९८९-९० ते १९९८-९९ | नाही | यु.एस.शिंदे |
| ४. | वडगाव (गां) | १९९२-९३ ते १९९५-९६ व | | |
| | | १९९७-९८ ते २०००-०१ व | नाही | एल.डी.गायकवाड |
| | | २००५-०६ | | आर.एन.धाबेकर |
| | | १९८९-९० | नाही | एल.डी.गायकवाड |
| ५. | भातांगळी | १९८९-९० ते १९९३-९४ व | नाही | यु.एस.शिंदे |
| | | १९९५-९६ ते १९९७-९८ | | |
| | | १९९९-०० ते २००१-०२ | नाही | एस.के.भड/यु.एस.शिंदे/एस.एन.लोकर |
| ६. | कास्तीबु | १९८९-९० ते १९९३-९४ व | होय | निरंक |
| | | १९९५-९६ ते १९९७-९८ | | |
| | | १९९९-०० ते २००१-०२ | होय | निरंक |
| | | २००२-०३ | होय | निरंक |
| ७. | जेवळी | १९९९-०० ते | | |
| | | २००१-०२ | नाही | जे.टी.वग्गे |
| | | २००५-०६ ते २००६-०७ | नाही | बी.एम.काळे |

वरीलप्रमाणे ०६ ग्रामपंचायतींचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षण न होण्यास जबाबदार कर्मचा-यांची नांवे निश्चित करण्यात आलेली असून संबंधीत जबाबदार कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा (सुधारणा) अधिनियम २०११ च्या कलम ०८ नुसार रु.२५,०००/- दंडात्मक कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.४५३/१५ दि.११/१२/२०१५ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३५२ (११) : सन २००८-०९ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २००८-०९)**

| अ.क्र. | नियम- बाह्य बाबीचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ११ | अपूर्ण नोंदवही बाबत | उस्मानाबाद | तुळजापूर | ४३ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील आक्षेपामध्ये विविध नमुन्यामधील एकुण १८ नोंदवह्या अपूर्ण असल्याबाबत आक्षेप घेण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत खालील प्रमाणे नोंदवह्या पूर्ण करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | नोंदवह्याचा तपशील | नमुना क्रमांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | मागणी वसुली नोंदवही | ९ | पूर्ण |
| (२) | प्राप्त देयकाची नोंदवही | १२ | पूर्ण |
| (३) | महसुली जमा नोंदवही | १३ | पूर्ण |
| (४) | खर्चाची नोंदवही | १४ | पूर्ण |
| (५) | उपदान नोंदवही | १५ | पूर्ण |
| (६) | खाते बदल नोंदवही | १७ | पूर्ण |
| (७) | पंचायत समिती वर्गीकृत गोषवारा नोंदवही | १९ | पूर्ण |
| (८) | जमा खर्चाची प्रगती नोंदवही | २० | पूर्ण |
| (९) | आकस्मीक खर्चाची नोंदवही | ३० | पूर्ण |
| (१०) | करारपत्राची नोंदवही | ४८ | पूर्ण |
| (११) | विभागीय लेखापालाची आक्षेप नोंदवही | ६१ | पूर्ण |
| (१२) | ठेव नोंदवही | ७१ | पूर्ण |
| (१३) | अग्रीम नोंदवही | ७९ | पूर्ण |
| (१४) | शासकीय अनुदान व खर्चाची नोंदवही | ९० | पूर्ण |
| (१५) | योजना निहाय प्रगती नोंदवही | २४ | पूर्ण |
| (१६) | स्थायी / अस्थायी आस्थापना लेखा परिक्षा नोंदवही | ए.पी.पी.२ | पूर्ण |
| (१७) | निवृत्ती वेतन लेखा परिक्षण नोंदवही | ए.पी.पी.९ | पूर्ण |
| (१८) | निवृत्ती वेतन प्रदान आदेश नोंदवही | ए.पी.पी.१० | पूर्ण |

वर नमुद केल्याप्रमाणे सर्व नोंदवह्या ठेवण्यात आल्या असून सद्यःस्थितीत पूर्ण आहेत.

**परिच्छेद क्रमांक ४.३५२ (११) :- सन २००८-०९ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २००८-०९)**

| अ.क्र. | नियम- बाह्य बाबीचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ११ | अपूर्ण नोंदवही बाबत | उस्मानाबाद | कळंब | ३२ | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ च्या नियमानुसार पंचायत समिती कळंबने सन २००८-०९ च्या वित्तीय वर्षात परिच्छेद क्र.३२ नुसार खालील प्रमाणे नोंदवह्या ठेवल्या आहे.

| अ. क्र. | नोंदवह्याचा प्रकार | नियम क्रमांक | नमुना क्रमांक | तपशील | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) | योजनानिहाय प्रगती खर्च अहवाल | २३ | ६७ | ठेवलेली नाही | पूर्ण करण्यात आली |
| (२) | जमा खर्चाची प्रगती नोंदवही | ६० | २३ | अपूर्ण | पूर्ण |
| (३) | मागणी वसुली व थकबाकी नोंदवही | ५० | ११अ | अपुर्ण | पूर्ण |
| (४) | करार पत्राची नोंदवही | १४० | ४८ | ठेवलेली नाही | पूर्ण करण्यात आली |
| (५) | अग्रीम नोंदवही | २१२ | ७९ | अपूर्ण | पूर्ण करण्यात आली |
| (६) | ठेव नोंदवही | २१५ | ७१ | अपूर्ण | पूर्ण करण्यात आली |
| (७) | आकस्मीक खर्चाची नोंदवही | ८० | ३० | अपूर्ण | पूर्ण करण्यात आली |
| (८) | स्थायी/अस्थायी आस्थापना | | एपीपी २ | अपूर्ण | पूर्ण करण्यात आली |
| (९) | लेखापरिक्षा आक्षेप नोंदवही | २३ | ६१ | अपूर्ण | पूर्ण करण्यात आली |
| १०) | दुरध्वनी नोंदवही | २१७ | ९१ | अपूर्ण | पूर्ण करण्यात आली |

संबंधित तत्कालिन कर्मचारी श्री.व्हि.जी.रेणके, सहाय्यक लेखाधिकारी, श्री.डी.आर.यादर, कनिष्ठ सहाय्यक भांडार, श्री.एस.एम.हारके, कनिष्ठ आरेखक, बांधकाम विभाग यांना त्यावेळी नोंदवह्या न ठेवलेबाबत/अपूर्णतेबाबत दिनांक ११/१२/२०१५ रोजी पत्र देवून खुलासा मागविण्यात आला आहे.

पंचायत समिती स्तरावर लेखा संहितेतील तरतुदीप्रमाणे नोंदवह्या पंचायत समिती सभागृहासमोर त्याच स्थितीत वर्षातून चारवेळा मान्यतेस्तव सादर करण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३५२ (११) : सन २००८-०९ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २००८-०९)**

| अ.क्र. | नियम- बाह्य बाबीचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ११ | अपूर्ण नोंदवही बाबत | उस्मानाबाद | भूम | २० | निरंक |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, भूम अंतर्गत १६ नोंदवह्या लेखा परिक्षणाच्या वेळी अपूर्ण होत्या त्या सद्य:स्थितीत पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | नोंदवह्याचा प्रकार | नमुना क्रमांक | तपशिल |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | ठेव नोंदवही | ७१ | पूर्ण |
| (२) | अग्रीम नोंदवही | ७९ | पूर्ण |
| (३) | मागणी वसुल व थकबाकी | ९.९ (४) | पूर्ण |
| (४) | खर्चाची वर्गीकृत नोंदवही | १९ | लागू नाही |
| (५) | जमा खर्चाची एकत्रित नोंदवही | २० | पूर्ण |
| (६) | करारपत्राची नोंदवही | ४८ | पूर्ण |
| (७) | स्थायी/अस्थायी अस्थापना नोंदवही | ०२ | पूर्ण |
| (८) | आकस्मिक खर्चाची नोंदवही | ३० | पूर्ण |
| (९) | योजनानिहाय प्रगती खर्च नोंदवही | ६७ | पूर्ण |
| (१०) | उपदाने नोंदवही | १५ | पूर्ण |
| (११) | शासकीय अनुदान व खर्चाची नोंदवही | ९० | पूर्ण |
| (१२) | प्राप्त देयकाची नोंदवही | १२ | पूर्ण |
| (१३) | जमा नोंदवही | १३ | पूर्ण |
| (१४) | उपलेखापाल आक्षेप नोंदवही | ६१ | पूर्ण |
| (१५) | नि.वे.लेखापरिक्षण नोंदवही | एपीपी ९ | पूर्ण |
| (१६) | नि.वे.प्रदान आदेश नोंदवही | एपीपी १० | पूर्ण |

वर नमूद केल्याप्रमाणे सर्व नोंदवह्या ठेवण्यात आल्या असून सद्य:स्थितीत पूर्ण आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.१६४ शालेय पोषण आहारांतर्गत धान्यादी वस्तू खरेदीतील अनियमिततेबाबत (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी शालेय पोषण आहारांतर्गत धान्यादी वस्तू खरेदी बाबत रुपये २,११,८७,३९२/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

१. उपलब्ध अभिलेख्यावरुन दिनांक ३०.०९.२०११ च्या पटसंख्या नोंदीनुसार इयत्ता पहिली ते पाचवी विद्यार्थी संख्या १,४४,२०५ आहे. इयत्ता सहावी ते आठवीची विद्यार्थी संख्या ७५,४४८/- एवढी आहे. इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी रु. १.५८ व सहावी ते आठवीसाठी प्रति विद्यार्थी रु. २.१० व वर्षामध्ये २०० दिवस आहार पुरवठा करावा असे नमूद असताना प्रत्यक्षात गट शिक्षण अधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थी संख्याप्रमाणे प्रति विद्यार्थी पहिली ते पाचवी पर्यंत योग्य उष्मांक दिल्याचे प्रमाणित केले नाही.

२. माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१२ साठी धान्यादी वस्तुची मागणी गट शिक्षणाधिकारी यांनी केल्यानुसार धान्यादी मागणी प्रमाणे पुरवठादाराने पुरवठा न करता कमी जादा पुरवठा केलेला आहे. मागणी प्रमाणे पुरवठा केलेला नसतांना संबंधित शाळेने तो कसा स्विकारला तसेच शासन निर्णय दिनांक १८.०६.२००९ मध्ये नमूद केल्यानुसार सोमवार ते शनिवार जो मेनू निश्चित केलेला आहे, त्याप्रमाणे पोषण आहार दिला गेला नसल्याचे स्पष्ट होते.

३. उपरोक्त शासन निर्णय दिनांक १८.०६.२००९ मधील परिशिष्ट अ नुसार पाककृतीचा तपशील व शासन परिपत्रक दिनांक २६-०२-२०१० नुसार तांदळाचा पुरवठा भारतीय अन्न महामंडळ यांचेकडून करण्यात येत असल्याने विद्यार्थी संख्येवर आधारित तांदळाचा पुरवठा केला किंवा कसे याचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध न केल्याने पुरवठा केलेला तांदूळ बरोबर पुरवठा केल्याची पडताळणी करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत इयत्ता पहिली ते पाचवी पटसंख्या १,४४,२०५ व इयत्ता सहावी ते आठवीची पटसंख्या ७५,४४८/- ही दिनांक ३०.०९.२०११ च्या नोंदी नुसार दर्शविण्यात आली असून विद्यार्थ्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व शासन निर्णय दिनांक १८.०६.२००९ अन्वये शाळा स्तरावर अन्न शिजवून देण्यासाठी शासनामार्फत नियुक्त केलेल्या पुरवठादारामार्फत तांदूळ, मसुरदाळ, तुरदाळ, मटकी, मोहरी, जिरे, तिखट, हळद, मीठ, तेल इत्यादी वस्तूंचा पुरवठा करण्यात येतो व सदरच्या पुरवठा केलेल्या तांदूळ व धान्यादी मालाचे प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी प्रतिलाभार्थी प्रमाणे अन्न शिजवून देण्याचे निश्चित केले असून त्यानुसार इयत्ता पहिली ते पाचवी साठी ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार व इयत्ता सहावी ते आठवीसाठी ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार पुरविला जातो व त्यानुसारच शाळा स्तरावर आहार पुरवठा केला जातो.

(२) माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१२ साठी सर्व तालुक्यातील गट शिक्षणाधिकारी यांचेकडून तांदूळ व धान्यादी मालाची मागणी घेण्यात आली असून त्यानुसार पुरवठाधारकांकडून धान्यादी मालाची मागणी केली आहे. ज्या शाळांना कमी/जास्त माल शिल्लक राहिला असल्यास पुढील १५ दिवस ग्राह्य धरुन मालाची मागणी करण्यात येते. प्रत्येक शाळेच्या स्टॉक बुकवर नोंद करण्यात आली असून लेखा परिक्षणाच्या वेळी सदर नोंद रजिस्टर दर्शविण्यात आले आहे. सन २०११-१२ मध्ये शासनाचा सुधारित शासन निर्णय दिनांक ०२.०२.२०११ निर्गमित झाला असून उक्त निर्णयाद्वारे इयत्ता पहिली ते पाचवी-सहावी ते आठवी साठी मेनू निश्चित खालील प्रमाणे आहे.

(१) सोमवार : डाळ तांदुळाची खिचडी /मसाले भात/पुलाव

(२) मंगळवार : कडधान्याची उसळ (आमटी) भात

(३) बुधवार : वरण भात/सांबर भात/आमटी भात

(४) गुरुवार : डाळ तांदुळाची खिचडी

(५) शुक्रवार : कडधान्याची उसळ-हरभरा (आमटी) भात

(६) शनिवार : वरण भात/सांबर भात/आमटी भात

वरील प्रमाणे आठवडयाचा मेनू निश्चित करण्यात आलेला आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १८.०.६.२००९ मधील परिशिष्ट अ नुसार शासनाने ठरवून दिलेल्या पाककृती करुन सदर विद्यार्थ्यांना आहार पुरवठा केला जातो. तसेच संचालनालय स्तरावरुन दर तिमाही मध्ये इयत्ता पहिली ते पाचवी व सहावी ते आठवी साठी मंजूर करण्यात येते. सदरचे तांदुळ भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून उचल करणे आवश्यक आहे व गटशिक्षणाधिकारी यांच्या मागणी नुसार मंजूर तांदूळ नियतनापैकी किती तांदुळ उचल करणे आवश्यक आहे, याबाबत जिल्हा स्तरावरुन खात्री करुन आवश्यकतेनुसार तांदूळ उचल करुन पुरवठादार संस्थेमार्फत शाळा स्तरावर पुरवठा करण्यात येतो, या बाबतचे सर्व अभिलेखे तपासणी पथकास दर्शविण्यात आले आहे. संबंधित अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध आहेत.

**सन २०११-१२**

| अ. क्र. | इयत्ता | मंजूर नियतन मे. टन | आवश्यकतेनुसार उचल केलेला तांदूळ मे. टन |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | १ ते ५ | २६३२.२७०.००० | २२५२.७०४.२०० |
| २ | ६ ते ८ | २२५१.७५.००० | १७६७.३४८.८०० |

(४) पुरवठा आदेश दिल्यानंतर मालाचा पुरवठा १५ दिवसाच्या आत केला जात असून सदर शाळेमध्ये पुढील १५ दिवस तांदुळ व धान्यादी मालाचा साठा उपलब्ध असल्याने व दिनांक २१.०१.२०१२ रोजी त्याची नोंद शाळेच्या साठा नोंदवहीवर घेण्यात आली असून पुरवठा केलेल्या काही पावतीवर दिनांक नमूद केला नाही हे खरे आहे. यापुढे दिनांकित पावत्या ठेवण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(५) धान्यादी वस्तुचा पुरवठा महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई विभागीय शाखा, लातूर यांचेमार्फत केला असून सदर धान्यादी मालाची तपासणी ही शाळा स्तरावर केलेल्या धान्यादी वस्तुची तपासणी केली जाते, कारण गट शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर सादर केलेल्या देयकाची अदाई ही प्रयोगशाळेचा अहवाल समाधानकारक असल्याशिवाय देयकाची अदाई करता येत नाही, त्यानुसार सर्व गट शिक्षणाधिकारी यांनी तपासणी अहवाल कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, प्रयोगशाळा, जिल्हा सोलापूर यांचेकडून घेतला आहे. धान्यादी वस्तुंचा पुरवठा केल्यानंतरच प्रत्यक्ष पुरवठा केलेल्या वस्तुंची तपासणी करण्यात येते. जिल्हा प्रयोगशाळा सोलापूर यांचा तपासणी अहवाल घेतलेला असून तपासणीसाठी उपलब्ध आहे.

(६) सदर शालेय पोषण आहार योजनेमुळे जिल्हा स्तर व तालुका स्तर विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढली असून मुलांच्या शारीरिक बौध्दीक क्षमतेमध्ये वाढ होणे, तसेच वजनात वाढ झाल्याचे शालेय आरोग्य तपासणी आधारे आढळून आलेले आहे, त्याचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळोवेळी वरिष्ठांकडे पाठविण्यात आलेला आहे.

**विद्यार्थी उपस्थिती वर्ष निहाय खालील प्रमाणे आहे**

| अ.क्र. | वर्ष | इयत्ता | पटसंख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | २००९-१० | १ ते ८ | २१८६३२ |
| २ | २०१०-११ | १ ते ८ | २४४४५१ |

वरील प्रमाणे विद्यार्थी पट संख्येमध्ये वाढ झालेली आहे.

**परिच्छेद क्र. ३.३०१ :- जनसुविधा अंतर्गत तीन वेगवेगळ्या बांधकामाचे नोंद एकाच मोजमाप पुस्तिकेत एकाच पृष्ठ क्रमांकावर असल्याचे दर्शवून रक्कम प्रदान केलेबाबत. (सन २०११-१२)**

जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत पंचायत समिती, उमरगा द्वारा जनसुविधा योजनेंतर्गत ३ बांधकामावर रुपये ३,००,०००/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) पंचायत समिती, उमरगाचे सन २०११-१२ लेखा परिक्षणात जनसुविधा योजनेंतर्गत बांधकामावर खर्च नोंदविलेल्या कामाचे अभिलेखे लेखा परिक्षणास अर्धसमास पत्र क्र.७, दिनांक १८.०७.२०१२ व अर्धसमास पत्र क्र.११, दिनांक २६.०७.२०१२ अन्वये मागणी करुनही लेखा उपलब्ध न केल्याने मंजूर केलेल्या निकषाप्रमाणे करण्यात आले काय, काम पूर्ण झाले आहे काय, याबाबत पडताळणी करता आली नाही.

(२) जिल्हा परिषदेने एकाच प्रकारच्या तीन कामांची मोजमापे एकाच मोजमाप पुस्तकात एकाच पृष्ठ क्रमांकावर नोंदविली असल्याचे देयकावर दर्शविले आहे.

सदर देयके पंचायत समिती लेखा शाखेकडे प्रदानार्थ दाखल केल्यावर त्याची योग्य तपासणी सहाय्यक लेखा अधिकारी यांनी न करताच देयकाचे प्रदान केले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ३७ (२) नुसार पंचायत समितीच्या लेखा विभागाकडे सादर करण्यात आलेल्या प्रत्येक देयकाची तपासणी सहाय्यक लेखाअधिकारी यांनी केल्यानंतरच देयक मंजूर करणे आवश्यक असतांना अशी तपासणी न करताच देयके पारित करुन प्रदान करण्यात आली आहेत. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे परिशिष्ट ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे देयकाचे अंतर्गत लेखा परिक्षण करुन अवाजवी व दुबार मागणी करण्यात आली आहे काय ? देयकाच्या अचुकतेबाबत बेरीज करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करताच देयके पारित केलेली आहेत, त्यामुळे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे गंभीर स्वरुपाच्या अनियमितता होऊन रकमेचे प्रदान झाल्याने शासन निधीचे नुकसान झालेले आहे. याबाबत रक्कम रुपये ३,००,०००/- वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर परिच्छेद गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांच्या संबंधित असून तत्कालीन संबंधितांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. एम. एल. सावळसुरकर (तत्कालीन गट विकास अधिकारी)

२. श्री. आर. एच. बेंलुरकर (तत्कालीन सहाय्यक लेखा अधिकारी)

३. श्री. आर. एन. भोकरे (शाखा अभियंता)

४. श्री. जी. एस. राठोड (वरिष्ठ सहाय्यक)

तसेच वेळीच ज्यांनी लेखा परिक्षणास अभिलेखे दर्शविले नाहीत त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी पत्र क्र. ३३८९, दिनांक १७.११.२०१५ दिले आहे. १) पंचायत समिती, उमरगाने अर्धसमास पत्र क्र. ७ व ११ अन्वये मागणी करुनही लेखा परिक्षणाच्या वेळी न दर्शविलेले अभिलेखे आता खालील विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन ठेवण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव व अंदाजित किंमत | ता.मा.क्र./दिनांक | मोजमाप पुस्तिका क्र./पृष्ठ क्र./रक्कम/ प्रमाणक क्र.दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | स्मशान भूमीस कंपाऊंड बांधकाम, कदमापूर, किंमत २.५० लक्ष | ता.मा.क्र./१५/११, दिनांक ७.३.२०११ | मोजमाप पुस्तिका क्र.९४, पान क्र.२४ ते २७, रक्कम ५०,००० प्रमाणक क्र.११०१, दि.३१.३.१२ (एकूण मुल्यांकन) रुपये २,५०,०००/- | काम पूर्ण दिनांक २९.२.२०१२ |
| २. | स्मशान भूमीस कंपाऊंड बांधकाम, माडज, किंमत २.५० लक्ष | ता.मा.क्र./९१/११, दिनांक १०.३.२०११ | मोजमाप पुस्तिका क्र.६९, पान क्र.१९ ते २१, रक्कम १,७५,००० प्रमाणक क्र.१०९७, दि.३१.३.१२ (एकूण मुल्यांकन) रुपये २,५०,०००/- | काम पूर्ण दिनांक २४.३.२०१२ |
| ३. | स्मशान भूमीस रस्ता बांधकाम, माडज, किंमत २.५० लक्ष | ता.मा.क्र./९०/११, दिनांक १०.३.२०११ | मोजमाप पुस्तिका क्र.६९, पान क्र.१६ ते १८, रक्कम ७५,००० प्रमाणक क्र.१०९८, दि.३१.३.१२ (एकूण मुल्यांकन) रुपये २,५०,०००/- | काम पूर्ण दिनांक २४.३.२०१२ |

(२) वरील तीन कामाचे मोजमापे एकाच मोजमाप पुस्तिकात एकाच पृष्ठ क्रमांकावर नोंदविली असल्याचे देयकावर दर्शविले आहे. ही बाब मुद्रण दोषाची असून परिच्छेद एक मधील विवरण पत्रात दर्शविल्यानुसार तीन कामे दोन मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळया पृष्ठ क्रमांकावर नोंद घेऊन देयकाची अदाई केल्याचे दिसून येते. तरी कामात कसूर केल्याबद्दल संबंधितास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी पत्र क्रमांक ३६०८,३६०९ व ३६१०, दिनांक ०९.१२.२०१५ अन्वये समज देण्यात आली आहे.

सदरचे रुपये ३.०० लक्ष मुल्याचे काम झाले असल्याने रक्कम वसूल करणे आवश्यक नाही, परंतु झालेल्या त्रुटी बाबत संबंधितास समज देण्यात आली आहे.

**परिच्छेद क्र. ३.४८२ : कंत्राटी वाहन चालकाचे मानधन वाटपावरील नियमबाह्यखर्चाबाबत (सन २०११-१२)**

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी कंत्राटी वाहन चालकाचे मानधन वाटपाबाबत रुपये ६,३४,९४२/- खर्च नोंदविला आहे. याबाबत पुढील प्रमाणे आक्षेप आहेत.

१) संबंधित पुरवठादाराबरोबर करारनामा केव्हा करण्यात आला याबाबत करारनाम्यावर दिनांक नमूद नाही, परंतु स्टॅम्प पेपर दिनांक १३.१२.२०११ रोजी खरेदी केल्याचे दिसून येते. त्यामुळे करारनामा करण्याआधीच कामाचा आदेश दिलेला आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे आदेश क्रमांक १३०, दिनांक २२.०८.२०११ अन्वये मागील सेवा पुरवठादारास दिनांक २४.०९.२०११ ते २३.११.२०११ व दिनांक ०८.१०.२०११ ते ०७.१२.२०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली व मागील दरानुसार सेवा पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आलेली असताना सदर देयकात वाढीव नवीन करार माहे १२/११ मध्ये झालेला असताना जुना दर रुपये ३८००/- प्रमाणे प्रदान करणे आवश्यक असताना वाढीव दर रुपये ५२००/- प्रमाणे प्रदान केलेले आहे. १७ वाहन चालकासाठी माहे ११/२०११ मध्ये ७ दिवस रु. ४६.६७/- जादा दराप्रमाणे रुपये ५,५५४/- व माहे १२/२०११ मध्ये १२ दिवसासाठी रुपये ४६.६७/-जादा प्रदान झालेले आहे ते वसूल करणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र शासन, आरोग्यविभाग, शासन निर्णय क्रमांक पीएससी १०९७/२८६/प्र.क्र.२६९७/आरोग्य-४, दिनांक २६.०१.२००३ मधील ०१ तरतुदी नुसार प्रपत्र ब व क मधील प्राथमिक आरोग्य केंद्र व ३० खाटांच्या ग्रामीण व कुटीर रुग्णालयाच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे.त्यानुसार कोणकोणते प्राथमिक आरोग्य केंद्र प्रपत्र ब व क मध्ये येतात, याबाबत माहिती उपलब्ध नाही.

४) प्राथमिक आरोग्य केंद्र पाथ्रुड येथे वाहन चालक, श्री. एस.टी.पौळ हे दिनांक ०५.०१.२०१२ रोजी रुजू झाल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी कळविले असताना संबंधितांचे नावे माहे १२/२०११ व ०१/२०१२ चे पूर्ण प्रदान करण्यात आलेले आहे. माहे १२/२०११ चे रुपये ५,२०० व दिनांक ०१. ते ०४.०१.२०१२ चे रुपये ६३३/- असे एकूण ५,८९३/- जादा प्रदान झालेले आहे ते वसूल करणे आवश्यक आहे.

५) केंद्र शासन वित्तीय कायदा १९९४ मधील कलम ६५ (३१) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, महसूल विभाग, नवी दिल्ली, शासन परिपत्रक क्रमांक ९६/०७/२००७ एस.टी. दिनांक २३ ऑगस्ट, २००७ अन्वये पुरवठाधारक यांनी त्यांची तांत्रिक सेवा पुरविल्याबाबत त्यांना मिळणा-या मोबदला बाबतीत सेवाकर शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे, परंतु रुपये ६,३४,९४२/- वर १० टक्के प्रमाणे ६३,४९४/- सेवाकर देयकातून कपात न केल्याने शासनाचे नुकसान झाल्याचे दिसून येते. तरी रक्कम रुपये ६३,४९४/- वसूल करणे आवश्यक आहे.

६) प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता भाड्याने घेतलेल्या वाहनाचे लॉगबुक, इतिहास पुस्तिका व अनुषंगिक कागदपत्रे तपासणीस सादर केलेली नाही. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण १०९४/७६/प्र.क्र.६/९५, दिनांक ०७.०१.१९९५ मधील अट क्रमांक ३ नुसार भाड्याने लावलेल्या वाहनाची धाव दरमहा १२०० ते १५०० कि.मी. पर्यंत होणे आवश्यक आहे व त्यावर धाव गेल्यास जिल्हा परिषदेची मंजूरी घेणे आवश्यक आहे, परंतु वाहनाचे लॉगबुक अथवा त्याचे प्रती लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

७) हजेरी पत्रकाची तपासणी न करताच देयक मंजूर करुन प्रदानार्थ दाखल करुन प्रदान करण्यात आल्याने प्रत्यक्षात हजर दिवसापेक्षा जादा रक्कमेचे प्रदान करण्यात आल्याचे दिसून आले. वाहन चालक प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाचे हजेरी पत्रक वैद्यकीय अधिकारी यांनी दिले असताना तेवढयाच दिवसाचे प्रदान न करता एकूण रुपये ४९,६२५/- चे जादा प्रदान झालेले आहे ते वसूल करणे आवश्यक आहे.

८) अर्ध समास पत्र क्रमांक ८, दिनांक २८.०९.२०१२ व अर्ध समास पत्र क्रमांक ९, दिनांक २९.०९.२०१२ अन्वये मागणी करुनही वाहन चालकाचे हजेरी पत्रक, वैद्यकीय चाचणी अहवाल, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुजू दिनांक, वाहन चालक बदल करण्यास परवानगी, सेवेची गुणवत्ता पडताळणी, वाहन चालकाचा विमा इत्यादी माहिती लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) वाहन चालकाची सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबत पुरवठा आदेश दिनांक ०१.१२.२०११ रोजी दिले असून सदर आदेशातील आपण या कार्यालयास रु.२००/- स्टँप पेपरवर अटी व शर्ती प्रमाणे करारनामा या कार्यालयास करुन देणे आपणावर बंधनकारक राहील. त्यानुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा केलेला असून त्यानंतरच कंत्राटी वाहन चालकाची सेवा घेण्यात आली आहे. पुरवठा आदेश दिल्यानंतरच करारनामा करणे पुरवठा आदेशामधील अटी मध्ये नमूद केलेले आहे.

२) भुमिपूत्र सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था मर्यादित, औरंगाबाद यांना वसुलपात्र रक्कम १५,०७५/- ही या कार्यालयात जमा करण्याकरिता दिनांक १२.०९.१४, २४.१०.१४, २८.११.१४, २६.१२.१४, २०.०१.१५, २६.०२.१५, २४.०३.१५, १७.०४.१५, २९.०५.१५,

२५.०६.१५, २९.०७.१५, १९.११.१५ व ०४.१२.१५ अन्वये पत्र व्यवहार केलेला आहे, परंतु संबंधित संस्थेने वसुल पात्र रक्कम रुपये १५,०७५/ अद्यापपर्यंत या कार्यालयास जमा केलेली नाही. सदर वसुलपात्र रक्कम वसुलीसाठी या कार्यालयाकडून जिल्हा उपनिबंधक यांना पत्र क्र. जा.क्र.जिपउ/आरोग्य/ले-३/कावि/३०२९-३१/२०१५, दिनांक २४.०९.२०१५ व पत्र जा.क्र.जिपअ/आरोग्य/ले-३/कावि/५१३५-३६/१५, दिनांक ०४.१२.१५ अन्वये पत्र व्यवहार करुन सदर संस्थेकडील वसुल पात्र रक्कम वसुलीसाठी पाठपुरावा सतत चालू आहे.

३) महाराष्ट्र शासन, आरोगय विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएससी१०९७/२८६/प्र.क्र.२६९७/आरोग्य-४, दिनांक २६.०१.२००३ मधील परिशिष्ट ०१ मधील तरतुदीनुसार प्रपत्र ब मध्ये या जिल्हा परिषद, उस्मानाबाद अंतर्गत (४२) प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत.

प्रपत्र क मधील (११) संस्था जिल्हा परिषदेच्या अधिनस्त नसून त्या जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, उस्मानाबाद यांचे अधिनस्त आहेत.

४) भुमिपुत्र सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था मर्यादित, औरंगाबाद यांना वसुल पात्र रक्कम ५,८९३/-ही रक्कम या कार्यालयास जमा करण्याकरिता १२.०९.१४, २४.१०.१४, २८.११.१४, २६.१२.१४, २०.०१.१५, २६.०२.१५, २४.०३.१५, १७.०४.१५, २९.०५.१५, २५.०६.१५, २९.०७.१५, १९.११.१५ व ०४.१२.१५ अन्वये पत्र व्यवहार केलेला आहे, परंतु संबंधित संस्थेने वसुल पात्र रक्कम रुपये ५,८९३/- अद्यापपर्यंत या कार्यालयास जमा केलेली नाही. सदर वसुलपात्र रक्कम वसुलीसाठी या कार्यालयाकडून जिल्हा उपनिबंधक यांना दिलेले पत्र क्र. जा.क्र.जिपउ/आरोग्य/ले-३/कावि/३०२९-३१/२०१५, दिनांक २४.०९.२०१५ व पत्र जा.क्र.जिपअ/आरोग्य/ले-३/कावि/५१३५-१७, दिनांक ०४.१२.१५ अन्वये पत्र व्यवहार करुन सदर संस्थेकडील वसुल पात्र रक्कम वसुलीसाठी पाठपुरावा सतत चालू आहे.

५) भुमिपूत्र सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था मर्यादित, औरंगाबाद यांना वसुलपात्र रक्कम ६३,४९४/- ही या कार्यालयात जमा करण्याकरिता दिनांक १२.०९.१४, २४.१०.१४, २८,११.१४, २६.१२.१४, २०.०१.१५, २६.०२.१५, २४.०३.१५, १७.०४.१५, २९.०५.१५, २५.०६.१५, २९.०७.१५, १९.११.१५ व ०४.१२.१५ अन्वये पत्र व्यवहार केलेला आहे, परंतु संबंधित संस्थेने वसुल पात्र रक्कम रुपये ६३,४९४/ - अद्यापपर्यंत या कार्यालयास जमा केलेली नाही. सदर वसुलपात्र रक्कम वसुलीसाठी या कार्यालयाकडून जिल्हा उपनिबंधक यांना पत्र क्र. जा.क्र.जिपउ/आरोग्य/ले-३/कावि/३०२९-३१/२०१५, दिनांक २४.०९.२०१५ व पत्र जा.क्र.जिपअ/आरोग्य/ले-३/कावि/५१३५-३६, दिनांक ०४.१२.१५ अन्वये पत्र व्यवहार करुन सदर संस्थेकडील वसुल पात्र रक्कम वसुलीसाठी पाठपुरावा सतत चालू आहे.

६) प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता शासनाने पुरवठा केलेली वाहने (शासकीय रुग्णवाहिका) वापरात आहेत, तसेच वाहन चालकाची सेवा कंत्राटी पध्दतीने घेतलेली आहे, परंतु एकही वाहन भाड्याने घेण्यात आलेले नाही. म्हणून भाड्याच्या वाहनाचे लॉगबुक अथवा त्याच्या प्रती लेखा परिक्षणास उपलब्ध करता आलेले नाही. तथापि प्राथमिक आरोग्य केंद्रामधील शासकीय रुग्ण वाहिकेचे लॉगबुक, इतिहास पुस्तिका उपलब्ध आहेत.

७) भुमिपूत्र सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था मर्यादित, औरंगाबाद यांना वसुल पात्र रक्कम रुपये ४९,६२५/- ही रक्कम या कार्यालयात जमा करण्याकरिता दिनांक १२.०९.१४, २४.१०.१४, २८,११.१४, २६.१२.१४, २०.०१.१५, २६.०२.१५, २४.०३.१५, १७.०४.१५, २९.०५.१५, २५.०६.१५, २९.०७.१५, १९.११.१५ व ०४.१२.१५ अन्वये पत्र व्यवहार केलेला आहे, परंतु संबंधित संस्थेने वसुल पात्र रक्कम रुपये ४९,६२५/ - अद्यापपर्यंत या कार्यालयास जमा केलेली नाही. सदर वसुलपात्र रक्कम वसुलीसाठी या कार्यालयाकडून जिल्हा उपनिबंधक यांना पत्र क्र. जा.क्र.जिपउ/आरोग्य/ले-३/कावि/३०२९-३१/२०१५, दिनांक २४.०९.२०१५ व पत्र जा.क्र.जिपअ/आरोग्य/ले-३/कावि/४११५-१७, दिनांक १९.११.१५ व पत्र व्यवहार करुन सदर संस्थेकडील वसुल पात्र रक्कम वसुलीसाठी पाठपुरावा सतत चालू आहे.

८) अर्ध समास पत्र क्रमांक ८, दिनांक २८.०९.२०१२ व अर्धसमास पत्र क्रमांक ९, दिनांक २९.०९.२०१२ अन्वये मागणी करुनही वाहन चालकाचे हजेरी पत्रक, वैद्यकीय चाचणी अहवाल, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुजू दिनांक, सेवेची गुणवत्ता पडताळणी, वाहन चालकाचा विमा उतरिवल्याबाबत कागदपत्रे या कार्यालयात उपलबध आहेत. तसेच सदर वर्षाचे स्थानिक निधीचे लेखा परिक्षण दिनांक ०५.०९.२०१२ व अर्धसमास पत्र क्रमांक ९, दिनांक २०.०९.२०१२ अन्वये मागणी केलेले अभिलेखे तत्कालीन वाहन शाखेचे कामकाज पाहणारे कनिष्ठ सहाय्यक हे दिनांक ११.०९.२०१२ ते १४.०९.२०१२ या कालावधीत संबंधित हे नातेवाईक आजारी असल्याने अर्जित रजेवर गेलेले होते, त्यामुळे त्यावेळी अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करता आलेली नाहीत.

**परिच्छेद क्रमांक ३.७५५ : जिल्हा परिषद महिला सदस्यांचे अभ्यास सहलीवर केलेल्या खर्चाबाबत.(सन २०११-१२)**

महिला बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद द्वारा जिल्हा परिषद महिला सदस्याचे अभ्यास सहलीवर ३२,०००/- खर्च नोंदविलेला आहे याबाबत खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

१) सहलीचे आयोजन करण्याचा उद्देश महाराष्ट्रातील विविध विकास परियोजना प्रकल्प संस्था यांना भेटी देवुन तेथील विकास कामाची माहिती घेणे हा होता परंतु महिला सदस्या कोणकोणत्या प्रकल्प/संस्था यांना भेटी दिल्या त्या ठिकाणी कोणत्या बाबी विषयी माहिती करुन घेतली अथवा मार्गदर्शन घेतले या बाबत कोणतीच नोंद अथवा अभिलेखे संचिकेत आढुळन आले नाहीत.

२) सदर सहलीचे आयोजन करण्यापुर्वी ठिकाण निश्चित करुन दरपत्रके मागवले नाहीत. तसेच सुटटीच्या दिवशी सहलीचे आयोजन केले असते तर अशा वेळी जिल्हा परिषदेचे स्वतःचे वाहन उपलब्ध झाले असते व त्यावर फक्त इंधनाचा खर्च करावा लागला असता परंतु असे नियोजन न करता खाजगी वाहन भाड्याने घेवुन अनाठाई खर्च नोंदविल्याचे दिसुन येते.

३) खाजगी वाहनाचे दरपत्रके मागविताना सदर वाहनाचा विमा परवाना रोड टॅक्स भरणा केले बाबत पावती, इ. कागदपत्रे मागविण्यात आलेली नाहीत.

४) श्री. रमेश श्रीराम काळे रा. ढोकी याचे वाहन क्र.एम.एच.२५ आर २५७२ व एम.एच.२५ए-२१५९प्रति किलो मिटर रु ८.२५ पैसे या दराने सदर सहलीसाठी वापरण्यात आल्याबाबत खर्चाचे प्रमाणका सोबत जोडण्यात आलेल्या पावत्या वरुन आढळून आले आहे. प्रत्यक्षात सदर वाहन कोणत्या ठिकाणावरुन कोणत्या ठिकाणी गेले याबाबत कोणतीच नोंद करण्यात आलेली नाही.

५) जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे पंचायत समिती स्तरावर वाहन पुरवठा करणेसाठी दरकरार केलेला होता व त्याची मुदत दि.३०.११.२०११ नंतर दि.३०.११.११ ते ३०.६.१२ पर्यत कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचे आदेश क्र. २४०४ अन्वये व मुख्य कार्यकारी अधिकरी यांचे परवानगीने वाढविण्यात आली आहे. त्यानुसार खाजगी वाहन भाड्याने लावण्यासाठी दर प्रती दिवशी रु.४७०/- प्रति दिवस अधिक इंधनाचा खर्च करावा लागला असता, परंतु विभागाने याप्रमाणे विचारणा न करताच निविदा मागवुन प्रति किलोमिटर प्रमाणे दर रु.८.२५ प्रमाणे खाजगी वाहनावर खर्च केलेला आहे याबाबत समर्थनीय खुलासा करावा.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०११-१२ मध्ये महिला प्रतिनिधी अभ्यास सहल आयोजित करुन औरंगाबाद, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापुर, सोलापुर या ठिकाणी सहल नेण्यात आली असुन सहलीसाठी १६ सदस्यांनी सहभाग घेतला असुन जिल्हा परिषदांना भेटी देवून महिला व बाल कल्याण विभागा मार्फत राबविल्या जाणा-या योजनांची माहिती घेतली आहे, तसा अहवाल तपासणीस उपलब्ध आहे.

२) सहलीचे आयोजन करण्यापुर्वी सहलीची ठिकाणे महिला व बाल कल्याण विषय समिती सभा दिनांक ०२/०९/२०११ रोजीच्या बैठकी मध्ये निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार प्रति कि.मी. नुसार दरपत्रके मागवुन दर निश्चित केलेले आहेत, तसेच दि.९/३ ते १२/३/२०१२ या कालावधीत सहलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. उक्त कालावधीत सलग चार दिवस सुट्टी नसल्याने दोन खाजगी वाहने लावण्यात आली होती तसेच खाजगी वाहनाची आसन क्षमता जास्त आहे व शासकीय वाहनाची आसन क्षमता कमी आहे, त्यामुळे जास्तीचे वाहने लागली असती व इंधनाचा खर्च जास्तीचा झाला असता त्यामुळे खाजगी वाहनाचा वापर केलेला आहे.

३) महिला अभ्यास सहलीसाठी वाहन उपलब्ध करुन देण्यासाठी दरपत्रक मागणीसाठी सुचना काढण्यात आली होती. त्यामध्ये प्रति कि. मी. दराची मागणी करण्यात आलेली होती. इतर कागदपत्रे कार्यालयास घेतलेली नाहीत. यापुढे लेखा परिक्षकांनी निर्देशित केल्याप्रमाणे दक्षता घेण्यात येत आहे.

४) श्री. रमेश श्रीराम काळे याचे वाहन क्र एम. एच. २५ आर २५७२ व एम. एच. २५ ए २१५९ हे उस्मानाबाद येथून निघुन औरंगाबाद, नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापुर व सोलापुर या ठिकाणी भेटी दिलेल्या आहेत तसा सभापतीचे स्वीय सहाय्यक व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांचा अहवाल उपलब्ध आहे.

५) जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे पंचायत समिती स्तरावर वाहन पुरवठा करणेसाठी दर करार केलेला होता. सदर कंत्राटदारास दिनांक ९ ते १२/३ २०१२ या कालावधीत वाहन उपलब्ध करुन देणे बाबत विचारणा केली असता संबधीत कंत्राटदारानी दि. २०/०२/२०१२ च्या पत्रानुसार चार दिवसासाठी वाहन पुरविण्यात असमर्थता दर्शविली होती, त्यामुळे खाजगी वाहन भाडयाने लावण्यासाठी दर पत्रके मागवुन प्रति कि.मी. दराने वाहने भाड्याने लावण्यात आली.

**परिच्छेद क्रमांक ३.७५६ :- अंगणवाड्यांना साहित्य पुरविणे अंतर्गत दरीपंजा खरेदीबाबत (सन २०११-१२)**

महिला बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद द्वारा मागासवर्गीय वस्तीतील अंगणवाड्याना दरीपंजा खरेदी करुन पुरवठा करणेसाठी रुपये ११,३१,७४५/- खर्च नोंदवला आहे. या बाबत आक्षेप पुढील प्रमाणे आहेत.

१) शासन दरकरारा नुसार माल प्राप्त झाल्यावर ९० टक्के रक्कम दोन आठवड्यामध्ये व १० टक्के रक्कम मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत व विनिर्देशाप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसाचे आत प्रदान करणे आवश्यक आहे, परंतु जिल्हापरिषदेने माल प्राप्त झाल्यावर १०० टक्के रक्कमेचे प्रदान एकाच वेळी केले असून शासन दरकरारानुसार प्रदान केलेले नाही.

२) यापुर्वी खरेदी करण्यात आलेल्या दरीपंजी सुस्थितीत व वापरण्यायोग्य आहेत किंवा कसे याबाबत प्रकल्प स्तरावरील बालविकास अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचा तपासणी अहवाल प्राप्त करुन न घेताच व प्रत्येक अंगणवाडी निहाय प्रत्यक्ष किती विद्यार्थी उपस्थित असतात व त्यासाठी किती दरीपंजाची प्रत्यक्ष आवश्यकता आहे याबाबत खातरजमा न करताच खरेदी करण्यात आलेली आहे, त्यामुळे आवश्यकते एवढी खरेदी केल्याचे दर्शविणे आवश्यक आहे.

३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद यांना दरीपंजा तपासणी करुन देण्यासाठी पत्र क्र.३३५ दिनांक ३१/३/१२ अन्वये कळविण्यात आले आहे व त्याचा तपासणी अहवाल क्र.५९४ दिनांक ३१/३/२०१२ रोजीचा आहे. प्रत्यक्षात सदर दरीपंजा तालुका स्तरावर दिनांक ३१/३/१२ रोजी प्राप्त झालेला असताना त्याच दिवशी तपासणी अहवाल व त्याच दिवशी देयकाचे प्रदान करण्यात आले.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे सचिव यांना पत्र क्र.८५/२०१२/ दि.९.३.१२.अन्वये शासन निर्णय क्र.झेडपी.आय.२०१०/ अनौसंक्र ३३/प्र.क्र.१६८/पंरा-१ दिनांक १०.३.११ मध्ये दरिपंजा यांचा खरेदीच्या यादीत समावेश नसल्याने खरेदीस मान्यता देणे बाबत विनंती केलेली आहे. सदर पत्रास कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.झेडपीए.२०१२/२४३/प्र.क्र.६६/पंरा-१ दि. ३१.३.१२ नुसार दरिपंजा विहित पध्दतीने व नियमा नुसार खरेदी करण्यास शासन मान्यता देण्यात आली असे कळविले आहे, पंरतु विभागाने मान्यतामिळण्यापूर्वी दि.२१.३.१२ रोजी पुरवठा आदेश देणे बाबत पूर्तता दर्शवावी.

५) उप आयूक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.१४२६ / दि.१८.६.२०११ नुसार योजनेसाठी तरतुद वर्ग केलेली असताना विभागाने दि.१०.१.२०१२ रोजी बी,.डी.एस. प्रणालीद्वारे रु.५६५०००/- आहरीत केले आहेत व योजनेचा खर्च दि.३१.३.२०१२ रोजी केलेला आहे प्रत्यक्षात तरतुद प्राप्त असताना विलंबाने योजना राबविल्यामुळे अंगणवाड्या सोई सुविधा पासुन वंचित राहिल्या आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०११-१२ साठी प्राप्त तरतुद पैकी रु.११,३३,०००/- चे दरिपंजा/सतरंजी खरेदीची योजना घेण्यात आलेली होती. या कार्यालयाने बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे आवश्यक असलेल्या मागणी नुसार दरिपंजा/सतरंजी मे.महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ, मुंबई यांचे शासन दरकरार असल्यामुळे त्यांना प्रती नग रु.१५२७.३२X७४१=११,३१,७४४-१२ रक्कमेचा क्रमांक जिपउ/बाकवि/आस्था-१/कावि-२६२/१२, दिनांक २१/०३/२०१२ अन्वये दरीपंजा/सतरंजीचा पुरवठा आदेश देण्यात आला. आदेशानुसार प्रकल्प निहाय साहित्य प्राप्त झाल्यामुळे व साहित्याच्या देयका सोबत प्राचार्य आय.टी.आय. उस्मानाबाद यांचेकडून पत्र क्र. ५९४ दि.३१.३.१२ अन्वये तपासणी अहवाल प्राप्त झाल्याचे पुरवठा धारकास धनादेश क्रमांक १०४१२७, दिनांक ३१.३.२०१२ रु.११,३१,७४५/- अन्वये १०० टक्के रकमेची अदाई करण्यात आलेली आहे.

२) यापूर्वी मार्च, २००९ मध्ये एकूण ९४४ दरिपंजा खरेदी करुन अंगणवाडीस वाटप करण्यात आलेल्या होत्या. जिल्हयात एकूण १९०४ अंगणवाड्या कार्यान्वीत असून ज्या अंगणवाड्यांना दरिपंजा/सतरंजीची आवश्यकता आहे अशा अंगणवाडयांची बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी स्तरावर बालकांच्या उपस्थितीबाबत तपासणी करुन त्यानुसार मागणी केलेली आहे. त्यानुसार दरिपंजा/सतरंजीचे वाटप करण्यात आले. त्यानंतर अंगणवाडीतील बालकांच्या संख्येनुसार व आवश्यकतेनुसार अंगणवाडीतील कार्यकर्ते यांना दरिपंजा/सतरंजी वाटप केलेले आहेत. त्याचे प्रकल्प स्तरावर अभिलेखे ठेवण्यात आलेले आहेत.

३) सदर खरेदी अंगणवाडीतील बालकांसाठी असल्याने व मार्च अखेर असल्याने प्राचार्य आय.टी.आय. उस्मानाबाद यांचेकडून तात्काळ तपासणी करुन घेण्यात आली. प्राचार्य यांनी दरिपंजा/सतरंजी तपासणी करुन अहवाल सादर केल्यामुळे देयक प्रदान करण्यात आले आहे. तपासणी अहवालाची प्रत उपलब्ध आहे.

४) दि.२०.३.२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी उप सचिव, ग्राम विकास जल संधारण विभाग यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार मान्यता मिळणार असल्याने (चर्चा झाल्या बाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी टिपणी क्र.२०, दि.२१/०३/२०१२ मध्ये नमुद केलेल्या टिपणीची प्रत उपलब्ध आहे.) मार्च अखेर तरतुद खर्च करणे आवश्यक असल्याने दरिपंजा/सतरंजी खरेदी बाबत पुरवठा आदेश दि.२१.३.१२ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. उक्त चर्चे नुसार शासनाची मान्यता दि.३१.३.१२ रोजी प्राप्त झाली आहे.

५) सदर साहित्याची प्रकल्प स्तरावरुन मागणी असल्याने विषय समितीने दरिपंजा/सतरंजी खरेदीस दिनांक ०२/०९/२०११ च्या बैठकीत मान्यता दिली साहित्य खरेदीस मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव क्र.जिपउ. मुकाअ. स्वीय. कावि. ८५/२०१२ दिनांक ०९/०३/२०१२ अन्वये शासनास

पाठविण्यात आला होता. शासनाकडून अहवाल प्राप्त होण्यास विलंब होत असल्यामुळे व मार्च अखेर तरतूद खर्च होणे आवश्यक असल्यामुळे दिनांक २०.३.१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांनी उप सचिव, ग्राम विकास जल संधारण विभाग यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार दिनांक २१/०३/२०१२ रोजी शासन दर करारानुसार दरीपंजा खरेदीचे आदेश देण्यात आलेले आहेत. चर्चेनुसार दिनाक ३१ मार्च २०१२ रोजी मान्यता मिळाली आहे. विषय समितीची मान्यता मिळण्यास विलंब झाल्याने खर्च उशिराने झालेला आहे सर्व खर्च आर्थिक वर्ष संपण्यापुर्वी करण्यात आलेला असून अंगणवाड्यांना दरिपंजा/सतरंजी वाटप केलेल्या आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६८) :- जिल्हा परिषदेने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबरी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केलेले परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड केलेले परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी/ गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते. तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करुन देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ६८ | उस्मानाबाद | सा.प्र.वि. | १३ | ६२,११,९९२ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

उक्त परिच्छेदानुसार पंचायत समिती उस्मानाबाद कडील सन ११-१२ च्या लेखा परिक्षणास ग्रामपंचायत बोरखेडा, आंबेवाडी, शिंगोली, सांजा, येडशी, व इतर सांजा, कोळेवाडी, रामवाडी, चिलवडी, खांमगांव, धुत्ता, खेड, येवती, लासोना, कौडगांव (बाबी), कनगरा, केशेगांव यांनी किर्द, साठा नोंदवही, खर्च प्रमाणके, मोजमाप पुस्तके, ठराव, इ. अनुषंगिक लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिलेले नव्हते.

सदर अभिलेखे न दर्शविण्याबद्दल संबंधितास जा.क्र. पंसउ/लेखा/वशि/२४३/२०१२ दि.२७/०७/२०१२ नुसार पत्र देवून अभिलेखे दर्शविणे बाबत सुचित केले होते. तथापि संबंधिताने अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नव्हते, त्यास्तव या कार्यालयाचे आदेश क्र.पंसऊ/आ-२/२२७९/१५ दि.११/१२/१५ या आदेशान्वये जबाबदारी निश्चित करुन ठपका ठेवण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.उक्त कालावधीत संबंधीत कर्मचारी निंलबित झाल्याने तसेच सर्व अभिलेखे उपलब्ध झाल्यामुळे सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षक, उस्मानाबाद यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पंसऊ/लेखा/ वशि/१३५३/२०१३ दि.१७/१२/१३ नुसार पत्र देवुन लेखा परिक्षण करुन द्यावे असे कळविले होते.

त्यानुसार सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षक, उस्मानाबाद यांनी उक्त ग्रामपंचायतचे अभिलेखे तपासून त्यांचे पत्र जा.क्र.स्था/ १८/ब/उस्मानाबाद/१२७४/१३ स्थानिक निधी लेखापरिक्षा, उस्मानाबाद दि.१८/१२/१३ नुसार सर्व अभिलेखे तपासणी करुन सर्व अभिलेखे सुस्थितीत व पुरेसे असल्याबाबत प्रमाणपत्र दिलेले आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२ (६९) :- जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी

सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्या मुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केलेले परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड केलेले परिच्छेदांबाबत लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी/ गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते. तथापी या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करुन देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल. पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ६९ | उस्मानाबाद | सा.प्र.वि. | १२ | ४८,८०,००० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पुर्णत्वाचे प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले नव्हते. तथापी सध्या सर्व अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध आहेत व आज मितीस सर्व (४९) अंगणवाडी बांधकामे पुर्ण करण्यात आली आहेत.

या कार्यालयांचे पत्र क्रमांक पंसऊ/ग्रापवि/आस्था-१संचालक, स्थानिक निधी लेखा उस्मानाबाद यांना अभिलेखे तपासणीसाठी विनंती करण्यात आली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२ (७०) :- जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे**

**(सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्या मुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्या बाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी/ गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते. तथापी या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल,, पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ७० | उस्मानाबाद | बांधकाम | ३६ | २०,५५,८६० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर परिच्छेद गट विकास अधिकारी पंचायत समिती तुळजापुर यांच्या संबंधित असुन तत्कालीन संबंधिताची नांवे खालील प्रमाणे आहेत.

१) श्रीमती टी.आर.ढेरे (तत्कालीन गट विकास अधिकारी)

२) श्री. बी.एल.वाघमारे,श्री.बी.बी.कांबळे,व श्री.आर.एन.पताळे (शाखा अभियंता)

३) श्री.डी.एम.हंगरगेकर कनिष्ठ सहाय्यक

वेळीच ज्यांनी लेखा परिक्षणास अभिलेखे दर्शविले नाहीत त्यांना गट विकास अधिकारी पंचायत समिती तुळजापूर यांनी पत्र जा.क्र/पंसतु/बांवि/कावि/१२२३/१५ दिनांक ०८/१२/१५ दिले आहे.

पंचायत समिती, तुळजापूर लेखा परिक्षणावेळी न दर्शविलेले अभिलेख आता खालील विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून ठेवण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव व अंदाजित किंमत | प्र.मा.क्र/दिनांक ता.मा.क्र./दिनांक कामाचे आदेश क्र./दिनांक | मोजमाप पुस्तिका क्र./ पृष्ठ क्र/रक्कम/प्रमाणक क्र. दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | रस्ता बांधकाम ग्रा.प्र.माळुंब्रा किंमत ५.००लक्ष | प्र.मा.क्र.१२९८ दि.१८/११/११ ता.मा.क्र.०९ दि.२२/११/११ कामाचे आदेश क्र.१३२६ दिनांक २४/११/११ | मोजमाप पुस्तिका क्र.५६९९ पान क्र.५ते८ रक्कम ४,७७,३६८ प्र.क्र.२८२ दि.१८/३/१२ एकुण (मुल्यांकन रुपये ४९२१०३) | काम पुर्ण दिनांक १९/३/१२ |
| २) | रस्ता बांधकाम ग्रा.प्र.सलगरा किंमत ५.००लक्ष | प्र.मा.क्र.१२९८ दि.१८/११/११ ता.मा.क्र.०९ दि.२२/११/११ कामाचे आदेश क्र.१३२६ दिनांक २४/११/११ | मोजमाप पुस्तिका क्र.१४२९ पान क्र.४९ ते ५३ रक्कम ४,७४,९६० प्र.क्र.३०४ दि.३१/३/१२ एकुण मुल्यांकन रुपये ४८१४४३ | काम पुर्ण दिनांक २०/३/१२ |
| ३) | रस्ता बांधकाम ग्रा.प्र.काटगांव किंमत १०.००लक्ष | प्र.मा.क्र.१२९९ दि.१८/११/११ ता.मा.क्र.०९ दि.२२/११/११ कामाचे आदेश क्र.१३२६ दिनांक २४/११/११ | रक्कम ९,५१,३०२ प्र.क्र. ६९९ दि. ३१-३-१२ एकुण मुल्यांकन रुपये ११,२४,१६० | काम पुर्ण दिनांक ३१/३/१२ |
| ४) | रस्ता बांधकाम ग्रा.प्र.अणदुर किंमत २०.००लक्ष | प्र. मा. क्र. दि. १८-११-११ ता.मा.क्र.१६ दि.२२/११/११ कामाचे आदेश क्र.४७५ दिनांक३१/१२/११ | मोजमाप पुस्तिका क्र.३७६३ पान क्र.८० ते ८२ रक्कम १,५२,२३० प्र.क्र.७६३ दि.३१/३/१२ एकुण मुल्यांकन रुपये १५२२३० | काम पुर्ण दिनांक ३०/३/१३ |

वरिल प्रमाणे अभिलेखे आगामी लेखा परिक्षण काळात लेखा परिक्षणास दर्शविण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२ (७१) :- जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणास अभिलेखे सादर न करणे**

**(सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणे बाबत कालावधी दिला जातो. तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेख उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद विभाग/ पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्या मुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्साठी प्रस्तावित केलेजातातव संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी/ गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापी या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याने आढळून येते.

वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देवूनसुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखा परिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ७१ | उस्मानाबाद | बांधकाम | ४० | २४,३२,२७३ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

| अ.क्र | कामाचे नांव व अंदाजित किंमत | प्र.मा.क्र/दिनांक ता.मा.क्र./दिनांक कामाचे आदेश क्र./दिनांक | मोजमाप पुस्तिका क्र./ पृष्ठ क्र/रक्कम/प्रमाणक क्र. दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | प्र.आ.केंद्र आसु कंपाउंड बांधकाम किंमत ३.५३ लक्ष | प्र.मा.क्र.५०दि.२३/२/११ ता.मा.क्र.९७दि.२२/११/११ कामाचे आदेश क्र.१६८३ दिंनाक २३/३/११ | मोजमाप पुस्तिका क्र. ३५५८ पान क्र.८१ ते८७ रक्कम ३,४३,९४६ प्र.क्र.१२० दि.२७/७/११ एकुण मुल्यांकन रुपये ३४३९४६ | काम पुर्ण दिनांक १९/७/११ |
| २) | सभागृह बांधकाम कल्याण स्वामी समाधी पेठ डोमगाव किंमत २७ लक्ष | प्र.मा.क्र. ६६ दि.२८/२/११ ता.मा.क्र.७९ दि.२८/२/११ कामाचे आदेश क्र.१८९० दिनांक २९/३/११ | मोजमाप पुस्तिका क्र. ३२२२ पान क्र.५१ ते ६७ रक्कम १३,९४,५५२ प्र.क्र.५६९ दि.३१/३/१२ एकुण मुल्यांकन रुपये २३,९७,१४१ | काम पुर्ण दिनांक ०७/४/१२ |

**उस्मानाबाद**—तक्ता चालू

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) | जि.प. शा. दुरुस्ती हिंगणगांव बु. किंमत ५ लक्ष | प्र.मा.क्र.१८२ दि.३१/३/११ ता.मा.क्र.६९९ दि.२८/०३/११ कामाचे आदेश क्र.१९३५ दिनांक ३१/३/११ | मोजमाप पुस्तिका क्र. ३२०० पान क्र.६५ ते ६९ रक्कम २,७९,१३४ प्र.क्र.६२५ दि.३१/३/१२ एकुण मुल्यांकन रुपये २,७९,१३४ | काम पुर्ण दिनांक २३/२/१३ |
| ४) | जि.प. शा. दुरुस्ती कांदलगांव किंमत ३.४० लक्ष | प्र.मा.क्र. १८३ दि.३१/३/११ ता.मा.क्र.६९८ दि.२८/०३/११ कामाचे आदेश क्र.५७७० दिनांक ०३/११/११ | मोजमाप पुस्तिका क्र. ३०५७ पान क्र.७२ ते ७४ रक्कम १,३८,६४३ प्र.क्र.५०८ दि.०८/०२/१२ एकुण मुल्यांकन रुपये १,३८,६४३ | काम पुर्ण दिनांक ११/४/१२ |
| ५) | जि.प. शा. दुरुस्ती भांडगांव किंमत ४.२० लक्ष | प्र.मा.क्र.९२ दि.२८/२/११ ता.मा.क्र. ७००दि.२०/०२/११ कामाचे आदेश क्र. ७०३४ दिनांक ३०/१२/११ | मोजमाप पुस्तिका क्र. ३११३ पान क्र.४३ ते ५३ रक्कम २,७५,९९८ प्र.क्र.१८२ दि.३१/०३/१२ एकुण मुल्यांकन रुपये २,७५,९९८ | काम पुर्ण दिनांक ११/४/१२ |

वरील प्रमाणे संपूर्ण अभिलेखे आगामी लेखा परिक्षण काळात लेखा परिक्षणास दर्शविण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२(७२) : जिल्हा परिषदेने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ३ प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते.त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येतात, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात, अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात. संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते, तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ७२ | उस्मानाबाद | ग्रा.पा.पु. | १४ | १,१८,०५,४६७ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

प्रस्तुत प्रकरणात रू.१,१८,०५,४६७/-एवढी रक्कम गुंतलेली असून ३१ योजने संबंधी अभिलेखे न दर्शविल्यामुळे तत्कालीन उपविभागीय अभियंता श्री.चाटे ए.बी.,श्री.देवकर डी.आर.,श्री.पी.व्ही.,श्री.पाटील एस.एस. श्री.अष्टगी यांना या विभागाची कारणे दाखवा नोटीस क्र.जा.क्र.जिपउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/३२३/१५ दि.२१/०८/२०१५ तसेच तत्कालीन उपविभागीय अभियंता उपविभाग उस्मानाबाद श्री.चाटे ए.बी.यांना कार्यालयाचे पत्र क्र.जिपउ/ग्रापाउवि/लेखा/कावि/६६/१५ दिनांक ०३/१०/२०१५ तत्कालीन उपविभागीय अभियंता, उपविभाग तुळजापूर, श्री.देवकर डी.आर.यांना कार्यालयाचे पत्र क्र.जिपउ/ग्रापाउवि/लेखा/कावि/६२/१५ दिनांक ०३/१०/२०१५ तत्कालीन उपविभागीय अभियंता, उपविभाग भूम, श्री.आष्टगी पी.व्ही. यांना कार्यालयाचे पत्र क्र.जिपउ/ग्रापाउवि/लेखा/कावि/८३/१५ दि.०३/१०/२०१५ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.अंतिमतः ताकीद देऊन सेवापुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालु आहे तसेच कर्मचारी श्री.देशपांडे डी.बी.यांना जा.क्र.जिपउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/३३०/१५ दि.२१/०८/२०१५ व या कार्यालयाचे पत्र क्र .जिपउ/ग्रापाउवि/लेखा/कावि/८५/१५ दि.०३/१०/२०१५ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.अंतिमतः ताकीद देऊन सेवापुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालू आहे.श्री.एन.सी.पुजारी तत्कालीन उपविभागीय अभियंता(यांत्रिकी) यांत्रिकी उपविभाग, उस्मानाबाद यांना कारणे दाखवा नोटीस देण्याची कार्यवाही चालु आहे तथापि परिच्छेद नमुद केलेले सर्व अभिलेखे विभागीय कार्यालयास उपलब्ध आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२(७३) : जिल्हा परिषदेने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ३ प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते.त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात, संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते, तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायम समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ७३ | उस्मानाबाद | ग्रा. पा. पु. | २३ | ६,१६,४६१ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

प्रस्तुत प्रकरणात रू.६,१६,४६१/- एवढी रक्कम गुंतलेली असून त्यात प्राथमिक शाळेला पिण्याच्या पाण्याची सोय करणे व विंधन विहिर घेणे या कामाचा सताविष्ठ आहे.तथापि संबंधी अभिलेखे न दर्शविल्या मुळे तत्कालीन उपविभागीय अभियंता श्री.ए.बी.चाटे, श्री.डी.आर.देवकर, श्री.पी.व्ही.पाटील, श्री.एस.एस. अष्टगी यांना या विभागाची कारणे दाखवा नोटीस क्र.जस.क्र.जिवउ/ग्रापापुवि/आ-२/ कावि /३२३/१५ दि.२१/०८/१५ व जा.क्र. .जिवउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/३३०/१५ दि.२१/०८/१५ त्यावेळी अभिलेखे लेखा परिक्षणास दर्शविले नसले बाबत आपले विरूध्द प्रशासकीय कार्यवाही का करण्यात येवू नये या बाबतचा खुलासा मागीतला आहे.परंतू संबंधितांचा खुलासा प्राप्त न झाल्यामुळे तसेच तत्कालीन उपविभागीय अभियंता उपविभाग उस्मानाबाद श्री.ए.बी.चाटे यांना कार्यालयाचे पत्र क्र.जिवउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/६६/१५ दि.०३/१०/१५ तत्कालीन उपविभागीय अभियंता उपविभाग तुळजापूर श्री.डी.आर.देवकर यांना कार्यालयाचे पत्र क्र.जिवउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/६४/१५ दि.०३/१०/१५ तत्कालीन उपविभागीय अभियंता लोहारा श्री.पी.व्ही.पाटील यांना कार्यालयाचे पत्र क्र. जिवउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/६२/१५ दि.०३/१०/१५ तत्कालीन उपविभागीय अभियंता, उपविभाग भूम, श्री.एस.एस.आष्टगी यांना कार्यालयाने पत्र क्र. जिवउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/८३/१५ दि.०३/१०/१५ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे अंतिमतः ताकीद देऊन सेवापुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालू आहे

तसेच कर्मचारी श्री.डी.बी.देशपांडे यांना या कार्यालयाचे पत्र क्र. जिवउ/ग्रापापुवि/आ-२/कावि/८५/१५ दि.०३/१०/१५ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे अंतिमतः ताकीद देऊन सेवापुस्तिकेत नोंद घेण्याची कार्यवाही चालू आहे.श्री.एन.सी.पुजारी तत्कालीन उपविभागीय अभियंता (यांत्रिकी) यांत्रिकी उपविभाग, उस्मानाबाद यांना कारणे दाखवा नोटीस देण्याची कार्यवाही चालु आहे तथापि परिच्छेदात नमुद केलेले सर्व अभिलेखे विभागीय कार्यालयास उपलब्ध आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२(७४) : जिल्हा पारिषदेने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ३ प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते.त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते.त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात. संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते, तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ७४ | उस्मानाबाद | कृषी | ३२ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती स्तरावरील गोदाम विभागाचा पदभार वरिष्ठ सहाय्यक/कनिष्ठ सहाय्यक यांना आलेले होते.तसेच कृषी व समाजकल्याण विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजनेचे साहित्य गोदामामध्ये उतरवून घेणे/साहित्य वाटप करणे यासाठी स्वतंत्र पद नसल्यामुळे वरील सर्व कामे पंचायत समितीमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांकडून पुर्ण करून घेण्यात येत होते.तसेच शासन निर्णय क्रमांक कार्यसुची २००७/ प्रक्र१३२/आस्था-९/दिनांक १९/०४/२००७ नुसार कृषी विभागाची प्राप्त साहित्यावर गोदाम पर्यवेक्षणा संदर्भात कार्यवाही करण्याची जबाबदारी विस्तार अधिकारी कृषी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.सन २०११-१२ या वर्षात पंचायत समिती, उमरगा येथील गोदाम विभागाचा पदभार श्री.एस.एस.गायकवाड, कनिष्ठ सहाय्यक यांच्याकडे देण्यात आलेला होता श्री.अंबुरे ए.ए.(कृ.अ.) आणि श्री.बिडवे एम.एस., विस्तार अधिकारी (कृषी) यांनी वेळोवेळी तपासणी करून पत्राव्दारे प्राप्त साहित्य व जमा झालेले रक्कमेमध्ये तफावत असलेचे व रुपये ६००५६५/-रक्कमेचा अपहार झाला असलेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांना कळविले आहे.सदर अहवालाचे अनुषंगाने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी उक्त अहवाल कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचेकडे सादर करून श्री.एस.एस.गायकवाड यांच्या विरूध्द पोलिसात गुन्हा नोंद करण्यासाठी परवानगी मागण्यात आली, त्यानुसार कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी पत्र क्र.जिपउ/कृषी/आस्था/कावि/१८०९/१२ दि.१०/७/२०१२ अन्वये संबंधितांवर गुन्हा नोंद करण्यास परवानगी दिल्यानंतर श्री.ए.ए.अंबुरे, कृषी अधिकारी, पंचायत समिती,उमरगा यांनी श्री.एस.जी.गायकवाड, कनिष्ठ सहाय्यक यांच्याविरूध्द पोलीस स्टेशन, उमरगा यांच्याकडे भा.दं.सं कलम ४०९ अन्वये गुन्हा क्रमांक १५८ दिनांक १३/०५/२०१२ रोजी गुन्हा नोंद केला.त्या अन्वये श्री.गायकवाड यांना निलंबित केले होते.सद्यःस्थितीत प्रकरण मा.प्रथम न्यायदंडधिकारी वर्ग-१ उस्मानाबाद यांच्या न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

सदर गुन्हयांच्या अनुषंगाने पंचायत समिती स्तरावरील सर्व अभिलेखे पोलीस स्टेशन, उमरगा यांनी ताब्यात घेतले होते.लेखा परिक्षणाचे वेळी सदर रेकॉर्ड पोलीस स्टेशन, उमरगा यांचकडे असल्याने लेखापरिक्षणास उपलब्ध करून देता आले नाही.त्यानंतर सदर अभिलेखे पोलीस स्टेशन कडून उपलब्ध करून घेऊन सदर अभिलेख्याची दिनांक १६/१२/२०१३ रोजी लेखा परिक्षण करून घेण्यात आले आहे.तसेच सहसंचालक, स्थानिक

लेखा यांनी प्रमाणपत्र क्रमांक १२४१, दिनांक १७/१२/२०१३ रोजीचे दिलेले आहे.सदर प्रमाणपत्रामध्ये श्री.गायकवाड यांच्यावर स्थानिक निधी लेखा १९३० मधील कलम ७ अन्वये कार्यवाही केलेचे दिसून आले. त्यानुसार आज दिनांक १७/१२/२०१३ रोजी सदरचे उपलब्ध न केलेले अभिलेखे पडताळणी केली असता सदर अभिलेखे सुस्थितीत/पुरेसे अभिलेखे असलेचे आढळून आले आहे असे सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, उस्मानाबाद यांनी नमूद केले आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२(७५) : जिल्हा पारिषदेने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ३ प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते.त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते.त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात.अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावीत केले जातात संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते.तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ७५ | उस्मानाबाद | पशुसंवर्धन | १९ | ६,७०,३२१ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षणकांना तत्कालीन डॉ.डी.एस.मुरूमकर पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती उस्मानाबाद यांना मागणी केलेले अभिलेखे त्यांनी वेळीच सादर न केल्यामुळे त्यांच्या विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणूक) नियम ३ नुसार कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्या विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम (५) नुसार प्रशासकीय कार्यवाही अनुसरणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्र.जाक्र/जिपउ/पशुसंवि/आ-३/८८/२०१५ दि.१२/०८/२०१५ अन्वये डॉ.मुरूमकर यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला होता.त्याअनुषंगाने त्यांनी दिनांक १३/०८/२०१५ अन्वये सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना यापुढे अशी पुर्नरावृत्ती होऊ नये म्हणून या कार्यालयाचे आदेश क्र.जिपउ/जिपसे/आस्था-१/कावि-३१६८/१५ दिनांक २८/०९/२०१५ अन्वये समज देण्यात आली आहे.

सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणाच्या वेळी मागणी केलेली सर्व अद्यावत लेखे/अभिलेखे ही लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

सदर प्रकरणी कोणतीही प्रकारचा गैरव्यवहार/अपहार झालेला नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.८१२(७६) : जिल्हा पारिषदेने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ३ प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते.त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात.

संबधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते, तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ७६ | उस्मानाबाद | समाजकल्याण | ६ | १८,७८,६३४ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरील परिच्छेद पंचायत समिती तुळजापूर ता.तुळजापूर अंतर्गत दलित वस्ती सुधारणा योजनेच्या कामासंदर्भातील आहे.

१. ग्रामपंचायत कार्यालय बोरी

२. ग्रामपंचायत कार्यालय काक्रंबा

३. ग्रामपंचायत कार्यालय मसला (खुर्द)

४. ग्रामपंचायत कार्यालय वडगाव लाख

५. ग्रामपंचायत कार्यालय सावरगाव

६. ग्रामपंचायत कार्यालय टेलरनगर

७. ग्रामपंचायत कार्यालय अणदुर

८. ग्रामपंचायत कार्यालय चव्हाणवाडी

९. ग्रामपंचायत कार्यालय येवती

१० ग्रामपंचायत कार्यालय बोरगाव

या ग्रामपंचायतीचे आवश्यक अभिलेख, प्रमाणके, अभिलेखे, मोजमाप पुस्तिका,संचिका कागदपत्रे व नोंदवहया उपलब्ध आहेत

| अ.क्र. | ग्रा.पं.चे नाव | कामाचे नाव | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १ | बोरी | रस्ता बांधकाम | पुर्ण |
| २ | काक्रंबा | नाली बांधकाम | पुर्ण |
| ३ | काक्रंबा | रस्ता बांधकाम | पुर्ण |
| ४ | मसला खु. | रस्ता बांधकाम | पुर्ण |
| ५ | मसला खु. | रस्ता बांधकाम | पुर्ण |
| ६ | वडगाव लाख | रस्ता व नाली | पुर्ण |
| ७ | सावरगाव | रस्ता व नाली | पुर्ण |
| ८ | टेलरनगर | रस्ता व नाली | पुर्ण |
| ९ | अणदुर | रस्ता बांधकाम | पुर्ण |
| १० | चव्हाणवाडी | रस्ता बांधकाम | पुर्ण |
| ११ | येवती | रस्ता व नाली | पुर्ण |
| १२ | बोरगाव | रस्ता व नाली | पुर्ण |

**परिच्छेद क्रमांक ४.३३९ : समाजकल्याण अतंर्गत ५० टक्के अनुदानावर मागासवर्गिय लाभधारकांना पिठाची चक्की वाटपातील अनियमिततेबाबत (सन २०११-१२)**

पंचायत समिती भूम द्वारा १४ समाज कल्याण अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पिठाची चक्की पुरविणे यावर रुपये १,३२,३००/- खर्च नोंदविला असून यावर खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

१) साहित्य खरेदी करणे पूर्वी लाभार्थ्यांची निवड करुन त्यास पंचायत समिती सभेची मान्यता घेतलेली नाही, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.पंरास/१०९६/प्र.क्र.७८/०५ दिनांक ०९-१०-१९९७ नुसार लाभार्थ्यांचे दृष्टीने लाभदायक स्वरुपाची कोणतेही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तुंची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थ्यांची निवडीची प्रक्रिया, योजनेस प्रसिध्दी देवून ग्रामसभेच्या शिफारशीने आलेल्या अर्जातून विहित निकषानुसार निवड करुन त्याच वित्तीय वर्षात विहित वेळेत होईल अशा प्रकारे योजना राबविण्याची आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २०.०६.२००८ नुसार योजनांचे वेळापत्रक ठरविण्यात आलेले आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. लाभार्थी निवड न करताच दिनांक ३१.०३.२०१२ रोजी खरेदी बाबत खर्च नोंदवून शासन आदेशाचे पालन केलेले नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गट विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष साहित्य खरेदी करण्यापूर्वी दर्जा व गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र दिलेले नाही.

४) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.मागास/१०८९/प्र.क्र.५५ दिनांक ५/१०/१९८९ नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अशी नोंदवही ठेवलेली आहे. परंतू फक्त चालू वर्षाच्या नोंदी ठेवलेल्या आहेत. त्यामुळे याच योजनेतून यापूर्वी अथवा या वर्षीही लाभ दिला गेला नाही, हे पडताळता आले नाही.

५) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.पीआरसी-१०८३/६७ दिनांक ०२.०७.१९८३ नुसार लाभार्थ्यांकडून विनियोग प्रमाणपत्र घेतलेले नाही.

६) लाभार्थ्यांची मागणी अर्जाची तपासणी केली असता कोणत्याच लाभार्थ्यांच्या अर्जावर गट विकास अधिकारी यांची मंजूरी स्वाक्षरी नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात पंचायत समिती उपकर मधून १४ समाजकल्याण अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पिठाची चक्की पुरविणे यासाठी रुपये ६५,०००/- ची योजना आहे. त्यास पंचायत समिती सर्वसाधारण सभा ठराव क्र.५ दिनांक २०.०७.२०११ अन्वये कलम १०९ ची मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९९ अ आणि १२५ नुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांनी दिनांक ७.८.२०११ रोजी प्रदान केलेली आहे. मूळ तरतुद रुपये ६५,०००/ आणि लोकवाटा रुपये ६५,०००/- अशी एकूण रुपये १,३०,०००/- ची योजना आहे व साहित्य खरेदीचे आदेश व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, उस्मानाबाद यांना दिनांक ९.२.२०१२ ला रुपये १८,९००/- प्रमाणे एकूण ७ पिठाची चक्की पुरवठा करणेचे आदेश देण्यात आले व साहित्य दिनांक ३१.३.२०१२ रोजी प्राप्त झाले व साहित्य सुस्थितीत प्राप्त झालेची खात्री गट विकास अधिकारी यांनी करुन देयकाची अदाई प्रमाणक क्रमांक १५ रुपये ६६,१५०/- व प्रमाणक क्रमांक १६ नुसार रुपये ६६,१५०/- असा एकूण रुपये १,३२,३००/- ची अदाई दिनांक ३१.३.२०१२ रोजी करण्यात आलेली आहे.

१) योजनेच्या प्रारुपानुसार योजना पंचायत समिती सभा दिनांक ०९-०२-२०१२ मधील ठराव क्र.३ च्या मान्यतेने त्याच वित्तीय वर्षात राबविण्यात आलेली आहे. साहित्य खरेदी करण्यापूर्वी योजनेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी दिली आहे व आलेल्या अर्जातून ७ लाभार्थी निवडण्यात आले आहे.

२) योजना राबविण्यासाठी वेळापत्रकानुसार कार्यवाही अनुसरणे आवश्यक आहे. सदरील योजना राबविणेस विलंब झाला आहे हे खरे आहे. यापुढे विहित वेळापत्रकानुसार योजना राबविण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

३) साहित्य प्राप्त करतेवेळी ते सुस्थितीत असल्याची खात्री गट विकास अधिकारी यांनी केलेली असून संचिकेत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार दर्जा व गुणवत्तेचे प्रमाणपत्र उपलब्ध आहे.

४) पंचायत समिती स्तरावर सन २००८-०९ या वर्षामधील मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. तसेच लाभार्थी निवडताना दुबार लाभ दिला नाही याची खात्री गट विकास अधिकारी यांनी केलेली आहे.

५) ज्या लाभधारकास साहित्य वाटप केलेले आहे त्यांचे विनियोग प्रमाणपत्र घेण्यात आले आहेत. विनियोग प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध आहेत.

६) लाभधारकाच्या मागणी अर्जावर गटविकास अधिकारी यांच्या मंजुरीच्या स्वाक्ष-या सद्यःस्थितीत घेण्यात आल्या आहेत.

सदरील योजना शासनाच्या निर्देशाप्रमाणे राबविली असून योजनेचा उद्देश सफल झालेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३७६ : ५० टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवठा करणे व जास्तीचे दराने खरेदी बाबत (सन २०११-१२)**

पंचायत समिती, उमरगा व्दारा ५० टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवठा करणे योजने अंतर्गत रक्कम रूपये ९८८६०/-खर्च नोंदविण्यात आलेला आहे, यावर पुढील अभिप्राय आहेत.

१) शासन दर कराराची तपासणी केली असता त्यात शेडयुल ए मध्ये नमुद केल्याप्रमाणे १० ते ५० स्क्वे.मी.साईजच्या ताडपत्रीचा दर रूपये ४३.६७/-प्रती स्क्वेर मी.नुसार दर्शवीला असतांना पुरवठा दाराने दिलेले दर रूपये ५७.३१/-नुसार पुरवठा आदेश देण्यात आलेला आहेत व त्यानुसार पंचायत समितीने जादा प्रदान केल्यामुळे रक्कम रूपये २३५२९/- वसुल करणे अवश्यक आहे.

२) साहित्य खरेदी करण्यापूर्वी लाभार्थीची निवड करून पंचायत समितीने सभेची मान्यता घेतलेली नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.१०९६/पत्र क्र.१७८/०५,दिनांक ०९/१०/१९९७ नुसार लाभार्थ्याच्या दृष्टीने योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तुची खरेदी करणे पुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया गावात प्रसिध्दी देवून खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/२००८/पत्रक्र.४४६/वित्त/९,दिनांक २०/०६/२००८ नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असून योजनेस प्रशासकिय/तांत्रिक मान्यता घेवून व लाभार्थी निवड तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण करूनच साहित्य खरेदी व वाटप करणे आवश्यक असतांना वेळापत्रकाप्रमाणे अशी कार्यवाही केलेली नाही.

४) ग्रामविकास परिपत्रक क्र.मागास/१०८९/५५,दिनांक ०५/१०/१९८९ नुसार योजनेतील मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेले नाही.

५)दि.०७/०७/२०१२ पर्यंत ६३ नग ताडपत्री शिल्लक आहेत. लाभार्थी निवड न करता खरेदी केल्यामुळे व वेळीच वाटप न केल्यामुळे रक्कम गुंतून राहीली असल्याने एकूण ६३ नग वाटप करून लोकवाटा रक्कम पंचायत समिती उपकरात जमा करणे अवश्यक आहे.

६) ग्रामविकास परिपत्रक दिनांक २जुलै१९८३ प्रमाणे विनियोग प्रमाणपत्र लेखा परिक्षणास दर्शविणे आवश्यक आहे.

७) लाभार्थ्यांकडून लाभ दिल्यानंतर करारनामा करून घेणे आवश्यक आहे.

८) दरकरारानुसार साहित्य पुरवठा झाल्यावर चाचणी अहवाला आधारे ९८ टक्के रक्कमेचे प्रदान करणे आवश्यक असतांना चाचणी अहवाल देयकासोबत नसतांना पुरवठादारास १०० टक्के प्रदान केलेले आहे.

९) देयकातून कपात केलेली आयकर रक्कम रुपये २३१३/- चे भरणा केलेले चलन दर्शविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

प्रशासकिय मान्यताः-गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा क्र. दिनांक २९/११/२०११, रू.१०००००/-

**१) तांत्रिक मान्यताः-**जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद क्र.–दिनांक २०/१२/२०११ रू.१०००००/-

**२) योजनेस मान्यताः**-पंचायत समिती सर्वसाधारण सभा ठराव क्र.६/दि.१४/११/२०११

**३) शासन दरकरारः-**DGS&D . क्र HDPET arp/pwl-३/RC-RBOD००००/०५१२/६६६३३३/०००५२६६६०००/२०५९, दि.२७/०५/२०११ मे.अल्टेक्स प्लास्टिकोट्स प्रा.लि.नाशिक दर रू.५७.३१ प्रती चौ.मी.

**४) पुरवठा आदेशः-**क्र.२२३६/दि.२९/१२/२०११, ६९ नग ५X५ स्क्वेअर मिटर.

५) खर्चः-प्र.क्र.५/दि.२०/०३/२०१२ रू.४९३२०/-अल्टेक्स प्लास्टीकोअट्स प्रा.लि.नाशिक (लोकवाटा)

६) प्र.क्र.५/दि.२०/०३/२०१२ रू.४९३२०/-अल्टेक्स प्लास्टीकोअट्स प्रा.लि.नाशिक (अनुदान)

७) निवड लाभार्थी संख्या ६९ वाटप नग ६९

१) पंचायत समिती उमरगाने सन २०११-१२ या वित्तिय वर्षात ५० टक्के अनुदानावर मागासवर्गीय अल्टेक्स प्लास्टीकोअट्स प्रा.लि.नाशिक यांचा शासन दर करार उपलब्ध असुन यामध्ये ५X५ स्क्वेअर मिटर (२५०जीएसएम) प्रति स्क्वेअर मी.रू.५७.३१ असा दर आहे.त्याप्रमाणे ताडपत्री खरेदी करण्यात आली आहे.दर कराराची प्रत उपलब्ध आहे.

२) पंचायत समितीने शासन निर्णय क्र.भाखस/१०८८(२५१२)/उद्योग-६ मंत्रालय मुंबई ०२जानेवारी १९९२ मधील नियम ८.३ अन्वये पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक १४/११/२०११ ठराव क्र.०६ अन्वये निवडलेल्या लाभधारकाच्या यादीस सभापती व गटविकास अधिकारी यांची मान्यता घेतली आहे व स्वाक्षरीची प्रत तपासणीस उपलब्ध आहे. उक्त योजना राबविण्यासाठी ग्रामसेवकांच्या बैठकीत व पंचायत समितीच्या नोटीस बोर्डावर योजनेची व्यापक प्रसिध्दी देऊन योजना राबविण्यात आली.

३) योजना राबविण्यासाठी वेळापत्रकानुसार कार्यवाही अनुसरणे आवश्यक आहे. सदरील योजना राबविण्यास विलंब झाला आहे.यापुढे विहित वेळापत्रकानुसार योजना राबाविण्याची दक्षता घेण्यात येत आहे.योजनेचा उद्देश साध्य झाला आहे व ताडपत्री सर्व लाभार्थ्यांना वाटप करण्यात आल्या आहेत.

४) पंचायत समिती स्तरावर मास्टर नोंदवही ठेवण्यात आली आहे.लाभार्थी निवड करतांना दुबार लाभ दिला नाही याची खात्री करण्यात आली आहे.

५) निवड केलेल्या ६९ लाभार्थ्यांपैकी ६३ लाभार्थ्यांनी लोकवाटा जमा न केल्यामुळे ६३ ताडपत्रीचे नग लेखापरिक्षणाचे वेळी शिल्लक होते. परंतु सद्य:स्थितीत संपूर्ण नग वाटप झालेले आहेत व एकूण ६३ नगांची लोकवाटा रक्कम रुपये ९०,२६३/- पंचायत समिती उपकरास जमा करण्यात आली आहे.

६) लाभधारकांना वाटप करण्यात आलेल्या ताडपत्री वापरात असल्याचे व त्या बाबतचे विनियोग प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

७) लाभार्थ्यांकडून लाभ दिल्यानंतर करारनामे घेण्यात आलेले नाहीत. योजनेच्याप्रारुपानुसार योजना राबविण्यात आली आहे.

८) शासन दर करारान्वये (डी.जी.एस.ॲन्ड डी.) असून ताडपत्री आयएसआय मार्कची असल्याने चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

९) देयकातून कपात केलेली आयकराची रक्कम दिनांक ०३.१०.२०१५ रोजी रुपये २३१२/- ही चलनाद्वारे शासन खाती भरणा करण्यात आली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९३ (४०) : पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते.त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावीत केले जातात. संबधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते, तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ४० | उस्मानाबाद | समाजकल्याण | १२ | . . |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती स्तरावरील गोदाम विभागाचा पदभार कनिष्ठ सहाय्यक, श्री.एस.डी.गायकवाड यांना देण्यात आलेला होता.तसेच कृषि व समाजकल्याण विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजनेचे साहित्य गोदामामध्ये उतरवून घेणे/त्याची नोंदसाठा नोंदवहीमध्ये घेणे/साहित्य वाटप करणे, त्यासाठी स्वतंत्र पद नसल्यामुळे वरील सर्व कामे पंचायत समिती मध्ये नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांकडून पुर्ण करून घेण्यात येत होते.तसेच शासन निर्णय क्र.कार्यसूची २००७/प्र.क्र.१३२/आस्था-९, दिनांक १९/०४/२००७ नुसार कृषी विभागाच्या प्राप्त साहित्यावर गोदाम पर्यवेक्षणासंदर्भात कार्यवाही करण्याची जबाबदारी विस्तार अधिकारी (कृषि) यांचेवर सोपविण्यात आलेली आहे. सन २०११-१२ या वर्षात पंचायत समिती, उमरगा येथील गोदाम विभागाचा पदभार श्री.एस.डी.गायकवाड, कनिष्ठ सहाय्यक यांच्याकडे देण्यात आलेला होता. श्री.ए.ए.अंबुरे, कृषी अधिकारी व श्री.एम.एस.बिडवे विस्तार अधिकारी (कृषी) यांनी वेळोवेळी तपासणी करून दिनांक २७/०६/२०१२ च्या पत्राव्दारे प्राप्त साहित्य व जमा झालेल्या रक्कमेमध्ये तफावत असल्याचे व अपहार झाल्याचे गटविकास अधिकारी, उमरगा यांना कळविले.सदर अहवालाच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी उक्त अहवाल कृषीविकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडे सादर करून श्री.एस.डी.गायकवाड यांचे विरोधात पोलिसात गुन्हा नोंद करण्यासाठी परवानगी मागण्यात आली.त्यानुसार कृषीविकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी पत्र क्र.जिपउ/कृषि/आस्था/कावि/१८०९/२०१२ दिनांक १०/७/२०१२ अन्वये संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करण्यास परवानगी दिली. त्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी पत्र क्र.जाक्र/पसउ/कृषि/कावि/२१४४/२०१२ दिनांक २०.०७.२०१२ अन्वये सदर प्रकरणाबाबत तपासणी समिती नेमली. तपासणी समितीचा अहवाल दिनांक ०४.०८.२०१२ नुसार प्राप्त साहित्य व जमा झालेल्या रक्कमेमध्ये तफावत असल्याचे व रुपये ६,००,५६५/- रक्कमेचा अपहार झालेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांना कळविण्यात आले. तपासणी अहवालाच्या अनुषंगाने श्री.ए.ए.अंबुरे, कृषि अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी श्री.एस.डी.गायकवाड, कनिष्ठ सहाय्यक यांचेविरुध्द पोलीस स्टेशन उमरगा यांचेकडे भा.दं.वि. कलम ४०९ अन्वये गुन्हा क्र.१५८, दिनांक १३/८/२०१२ रोजी गुन्हा नोंद केला आहे. त्या अन्वये श्री.गायकवाड यांना निलंबित केले आहे व संबंधितांवर विभागीय चौकशी प्रस्तावित करुन आरोप सिध्द झाले आहेत. सद्यःस्थितीत प्रकरण प्रथम न्याय दंडाधिकारी वर्ग-१ उस्मानाबाद यांचे न्यायालयात केस क्रमांक १२९/१२ दिनांक १४/०६/२०१३ नुसार न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पंचायात समिती स्तरावरील सर्व अभिलेखे पोलिस स्टेशन, उमरगा यांनी ताब्यात घेतले होते.लेखा परिक्षणाचे वेळी सर्व रेकॉर्ड लेखा परिक्षणास उपलब्ध करून देता आला नाही.त्या नंतर सदर अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध असलेबाबत सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा यांना कळवून सदर अभिलेख्याची दिनांक १७/१२/२०१३ रोजी पडताळणी करून सदर उपलब्ध न केलेले अभिलेखे सुस्थितीत असल्याचे आढळून आले.तसेच स्थानिक निधी लेखा १९३० मधील कलम ७ अन्वये कार्यवाही केल्याचे दिसून आले. याबाबत प्रमाणपत्र क्र.१२४१ दिनांक १७/१२/२०१३ सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, उस्मानाबाद यांनी दिले आहे.सदरील अपहारित रक्कमेच्या वसुलीबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.जाक्र/पसउ/आस्था-२/कावि/३०२७/२०१५ दिनांक ०१/१०/२०१५ अन्वये मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, परांडा यांना सुचित केले आहे.तसेच ग्रामपंचायत, अंबरनगर येथील ग्रामसेवक श्री.व्ही.जी.राजपूत यांनी आचारी तांडा फुलसिंगनगर येथील अंगणवाडी बांधकामात अपहारित रक्कम रू.२९९२८२/-, दिनांक ०३२/०७/२०११ रोजी पावती क्र.२१३१४३ व्दारे पंचायत समिती कार्यालयात भरणा केली आहे.संबंधितास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी जाक्र/जिपउ/साप्रवि-२/ग्रापवि-१/सिआर-४१/कावि/२४४४/२०११ सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद दिनांक १०/१०/२०११ अन्वये निलंबित करून विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९३(४१) : पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते.त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावीत केले जातात संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते, तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ४१ | उस्मानाबाद | तुळजापूर | ७ | . . |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, तुळजापूर येथील तत्कालीन गोडाऊन किपर, श्री.डी.एल.मुळे,कृषी अधिकारी यांनी लेखा परिक्षणास संपूर्ण गोडाऊनची अभिलेखे उपलब्ध करून देणे आवश्यक होते,तथापि अभिलेखे उपलब्ध न दिल्यामुळे संबंधितांना कार्यालयीन कारणे दाखवा नोटीस क्रमांक जा.क्र.पसंतु/आस्था/५२८/२०१४ दिनांक १०/०१/२०१४ नुसार खुलासा मागविण्यात आलेला आहे.सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने संबंधितांना समज देण्यात आलेली असून सद्य:स्थितीत सर्व अभिलेखे उपलब्ध आहेत.

सर्व पुरवठा झालेल्या साहित्याचे वाटप झालेले असून लोकवाटयाच्या रक्कमा भरणा केल्याबाबतचा पत्रव्यवहार संचिकेमध्ये समाविष्ट आहे.तसेच सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचा अपहार / गैरव्यवहार झालेला नाही.

सन २०१२-१३ व २०१३-१४ मधील कृषी गोडाऊनचे सर्व अभिलेख्याचे लेखा परिक्षण करून घेतले असून कोणत्याही प्रकारचा अपहार/ गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

**परिच्छेद क्रमांक ४.३९३(४२) : पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जात, त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात.अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात. संबधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते.तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचाय समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ४२ | उस्मानाबाद | तुळजापूर | १५ | . . |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा परिक्षण अहवालामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे पंचायत समिती, तुळजापूर अंतर्गत (१०८) ग्रामपंचायती असून यापैकी (३८) ग्रामपंचायतीने अभिलेखे उपलब्ध करून दिले नसल्याचे नमुद आहे.

सदरील (३८) ग्रामपंचायतीपैकी (१३) ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले असून (२५) ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून न दिलेले जबाबदार कर्मचारी खालील प्रमाणे आहेत.

**तक्ता**

| अ.क्र. | ग्रा.पं.चे नाव | वर्ष | लेखा परिक्षण झाले काय | जबाबदार कर्मचा-यांचे नांव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | वानेगाव | १९९७-९८ ते १९९९-२००० | नाही | श्री.बी.डी.तुपेरे,ग्रामसेवक |
| २ | शिराढोण | २००१-०२ ते २००३-०४, २००५-०६ ते २००६-०७ | नाही | श्री.एस.एस.चौगुले,ग्रामसेवक व श्री.लोकरे सी.एन.,ग्रामसेवक |
| ३ | बारूळ | १९९८-९९ ते २००४-०५ | होय | — |
| ४ | हगलुर | १९९७-९८ते १९९९-२००० २००२-०३ ते २००५-०६ | नाही | श्री.बी.एम.काळे,ग्रामसेवक |
| ५ | चिवरी | १९९५-९६ १९९९-२००० ते २००६-०७ | होय | — |
| ६ | कात्री | १९९५-९६ ते १९९७-९८ | होय | — |
| ७ | गंधोरा | १९९९-२००० २००१-०२ ते २००५-०६ | नाही | श्री.बी.एम.काळे,ग्रामसेवक |
| ८ | आरबळी | १९९६-९७, १९९७-९८, २००२-०३ | होय | - |
| ९ | बिजनवाडी | १९९९-२०००, २००१-०२ | नाही | श्री.एस.एल.राऊत,ग्रामसेवक व श्री.वाणी |

**तक्ता—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १० | सलगरा दिवटी | २००१-०२ ते २००२-०३, २००६-०७ | होय | — |
| ११ | कदमवाडी | १९९६-०७ ते २००३-०४, २००६-०७ | नाही | श्री.बी.एल.गुरव,ग्रा.से.से.नि. श्री.बी.यु.लोखंडे,ग्रा.से. श्री.ए.आर.तुपेरे,ग्रा.से. |
| १२ | सांगवीकाटी | १९९९-२०००, २०००-०१, २००२-०३ | होय | — |
| १३ | पिंपळा बु. | १९९९-२००० ते २००५-०६ | नाही | श्री.वाघमारे एस.एस.,ग्रा.से.(मयत) व श्री.राऊत एस.एल.,ग्रामसेवक |
| १४ | सुरतगांव | १९९९-२००० ते २००३-०४ | होय | – |
| १५ | गोंधळवाडी | १९९९-२००० ते २००३-०४ | होय | – |
| १६ | चव्हाणवाडी | १९९९-२००० ते २००६-०७ | नाही | श्री.बी.एल.गुरव,ग्रा.से.से.नि. |
| १७ | मोर्डा | १९९७-९८ ते २००५-०६ | नाही | श्री.वाघमारे एस.एस.,ग्रा.से.(मयत) |
| १८ | कुंभारी | १९९७-९८ ते २००१-०२ | होय | – |
| १९ | येवती | १९९८-९९ ते २००४-०५ | होय | – |
| २० | अमृतवाडी | १९९६-९७ ते २००६-०७ | नाही | श्री.सी.एन.लोकरे,ग्रा.से. श्री.पानसरे,(से.नि.)नागटिळक श्री.वरपे आर.एन.(मयत) श्री.आर.डी.मगर व श्री.सावंत |
| २१ | खंडाळा | १९९८-९९ ते २००१-०२ | नाही | श्री.रौंदड बी.आर.ग्रामसेवक |
| २२ | तिर्थ खु. | २००६-०७ | नाही | श्री.लोखंडे के.पी.ग्रामसेवक |
| २३ | आरळी खु. | १९९३-९४ | होय | – |

**तक्ता—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २४ | हिप्परगाताड | १९९७-९८ ते २००६-०७ | नाही | श्री.एल.ई.सुरवसे ग्रामसेवक |
| २५ | दिंडेगाव | १९९५-०६ ते २००६-०७ | नाही | श्री.एल.ई.सुरवसे,ग्रामसेवक |
| २६ | बोरनदीवाडी | १९९९-२००० ते २००६-०७ | नाही | श्री.दगडे ग्रामसेवक<br>श्री.नागणसुरे ग्रामसेवक(से.नि.) |
| २७ | देवसिंगातुळ | १९९६-९७ ते १९९७-९८ | होय | – |
| २८ | केमवाडी | २००२-०३ ते २००४-०५ | नाही | श्री.बी.डी.पवार,ग्रामसेवक |
| २९ | निलेगांव | २००३-०४ ते २००६-०७ | नाही | श्री.श्रीगोरे एन.डी.ग्रामसेवक |
| ३० | बोरी | २००६-०७ | नाही | श्री.वाघमारे एस.एस.,ग्रा.से.(मयत) |
| ३१ | दिपकनगर | २००५-०६ व २००६-०७ | नाही | श्री.सावंत एम.आर.,ग्रामसेवक |
| ३२ | ढेकरी | २००६-०७ | नाही | श्री.लोकरे सी.एन.ग्रामसेवक<br>श्रीमती शेख टी.ए.ग्रामसेवक |
| ३३ | चिंचोली | २००२-०३ ते | २००३-०४ | होय |
| ३४ | गंजेवाडी | २००६-०७ | नाही | वाय.बी.शितोळे,ग्रा.से.(से.नि.) |
| ३५ | उमरगा चिवरी | २००६-०७ | नाही | श्रीमती देशमाने व्ही.के.ग्रा.से. व<br>श्री.लोकरे सी.एन. ग्रामसेवक |
| ३६ | शिरगापूर | २००६-०७ | नाही | श्री.श्रीगीरे एन.डी. ग्रामसेवक |
| ३७ | आरळी बु. | २००६-०७ | नाही | श्री.एम.एम.मस्के,ग्रामसेवक |
| ३८ | अलियाबाद | २००६-०७ | नाही | श्री.जी.के.मानतोटे ग्रामसेवक |

वरीलप्रमाणे ३८ पैकी २५ ग्रामपंचायतीचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने लेखा परिक्षण न होण्यास जबाबदार कर्मचा-यांची नांवे निश्चित करण्यात आलेली असून संबंधित कर्मचा-यांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा (सुधारणा) अधिनियम. २०११ च्या कलम ८ नुसार रू.२५०००/- दंडात्मक कारवाई करणेसाठीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्रमांक पंसतु/पंचायत/कावि/११६१/२०१५ अन्वये सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.३९३(४३) : पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (सन २०११-१२).**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग व पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अश्या लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो.तरी सुध्दा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत.त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात, अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात. संबधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबत अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणे बाबत सुचित केले जाते, तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते.

वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊन सुध्दा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाबी गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ४३ | उस्मानाबाद | भूम | १९ | . . |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात पंचायत समिती उपकर मधून शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास २००७/ प्र.क्र.२९, दिनांक १२/१०/२००७ नुसार १० टक्के महिला व बालकल्याण विभागासाठी राखीव निधीतून रूपये २८३५०/-ग्रामीण भागातील महिलांना ५० टक्के अनुदानावर पिठाची चक्की पुरवठा करणे या योजनेसाठी तरतुद केलेली होती, त्यास पंचायत समिती सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ५, दिनांक २०/०७/२०११ मध्ये कलम १०९ ची मान्यता घेण्यात आलेली आहे.तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९९ अ नुसार तांत्रिक मान्यता व कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांनी दिनांक २६/०९/ २०११ च्या आदेशानुसार प्रदान केलेली आहे. मुळ तरतुद रूपये २८,३५०/-अधिक ५० टक्के लोकवाटा रक्कम २८,३५०/-मिळून एकूण रूपये ५६,७००/-च्या मर्यादेत महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळ, उस्मानाबाद यांना दिनांक ९/०२/२०१२ रोजी पुरवठा आदेश दिलेले आहेत.आदेशामध्ये एकूण ३ नग असून दर प्रति नग रूपये १८,९००/- आहे, त्यानुसार साहित्य दिनांक ३१/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेले आहे याची नोंद साठा नोंदवहीचे पृष्ठ क्रमांक ३५ वर घेण्यात आली आहे.

लाभार्थी निवड ही पंचायत समिती सभेत केली असून निवड झालेल्या लाभार्थ्यांना वाटप दिनांक ३१/०३/२०१२ रोजी केले आहे.सदरील योजना शासनाच्या निर्देशाप्रमाणे राबविली असून योजनेचा उद्देश सफल झालेला आहे.

तत्कालीन बालविकास प्रकल्प अधिकारी, श्री.ए.यु.माहोर हे दिनांक ०७/०४/२०१४ रोजी मयत झालेले आहेत व कनिष्ठ सहाय्यक यांना लेखा परिक्षणाचे वेळी अभिलेखे विहित मुदतीत सादर न केल्यामुळे समज देण्यात आलेली आहे.

सद्यःस्थितीत आक्षेपात नमुद केल्यानुसार अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २२, २३ व २४ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. सन २००८-०९ व सन २०११-१२ या पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही असे आक्षेप ६४ परिच्छेदांमध्ये घेतल्याचे समितीस आढळून आले. समितीने या सर्व परिच्छेदांमधील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंडात्मक कारवाई करुन त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घ्यावी. त्यांची एक वेतनवाढ थांबवावी, त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घ्यावी अशा कर्मचा-यांची नावे व त्यांच्याकडून वसुल केलेल्या रक्कमेबाबतचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ या वर्षाच्या अहवालामधील ज्या ज्या परिच्छेदामध्ये लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्र उपलब्ध करुन देण्यात आली नाही त्याबाबत लेखा संहिता नियम ७ नुसार संबंधित कर्मचारी/अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात यावी तसेच यासंदर्भातील नोंद त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये देखील घेण्यात यावी असे समितीने सर्व संबंधित परिच्छेदांवर निदेश दिलेले आहेत. त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

(२) परिच्छेद व प्रकरण परत्वे केलेल्या दंडासंदर्भात अधिकारी निहाय वसूल केलेल्या दंडाची माहिती देण्यात यावी.

**(सन २००८-२००९)** परिच्छेद क्र.३.३२१/३३ पृष्ठ क्र. पी-२ ते पी-३,परिच्छेद क्र.३.५७२/१६ पृष्ठ क्र. आर-४ ते आर-६, परिच्छेद क्र.३.६४२ पृष्ठ क्र. एस-४, परिच्छेद क्र.३.७२५ पृष्ठ क्र. टी-१ ते टी-२, परिच्छेद क्र.३.७२६/६ पृष्ठ क्र. टी-२, परिच्छेद क्र.३.७७५ पृष्ठ क्र. टी-५, परिच्छेद क्र.३.८८५/१४ पृष्ठ क्र. यू-२ ते यू-४, परिच्छेद क्र.३.८८७/२१ पृष्ठ क्र. व्ही-१, परिच्छेद क्र.३.१०३७ (१११) पृष्ठ क्र. डब्ल्यू-४ ते डब्ल्यू-५, परिच्छेद क्र.४.२१० पृष्ठ क्र. एक्स-२ ते एक्स-३, परिच्छेद क्र.४.२९९/६ पृष्ठ क्र. एक्स-३ ते एक्स-४, परिच्छेद क्र.४.३००/९ पृष्ठ क्र. एक्स-४,परिच्छेद क्र.४.३२४/१० पृष्ठ क्र. वाय-१ ते वाय-२ परिच्छेद क्र.४.३४७(८१ ते ८७)/२९ पृष्ठ क्र. वाय-४ ते वाय-५, परिच्छेद क्र.४.३५२(११)/ पृष्ठ क्र. वाय-५ ते वाय-६,परिच्छेद क्र.३.५३/२०, ३.५४/२१, ३.१३९/२०, ३.१४०/३०, ३.१४१/३५, ३.३२३/९४, ३.४४०/ ४ व १२, ३.५७१/७/, ३.५७३/२४ व २५, ३.६४१/३, ३.६४२/४, ३.६४३/८, ३.६४४/१६, ३.७२५/४, ३.७२६/६, ३.७२७/७, ३.७२८/११, ३.७७५/११, ३.७७६/१२, ३.८८६/८, ३.८८७/२१, ३.८८८/२६, ३.१०३७(११२)/३१, ३.१०३७(११३)/३६, ३.१०३७(११४)/ १०, ३.१०३७(११५)/११, ३.१०३७(११६)/२६, ४.२१०/६, ४.३००/९, ४.३२४/१०, ४.३२५/८, ४.३४७(८१), ४.३४७(८२)/४०, ४.३४७(८३), ४.३४७(८४), ४.३४७(८५)३०, ४.३४७(८६), ४.३४७(८७)

**(सन २०११-१२)** परिच्छेद क्र.३.१६४ पृष्ठ क्र. जी-१ ते जी-३, परिच्छेद क्र.३.३०१ पृष्ठ क्र. जी-३ ते जी-४, परिच्छेद क्र.४.३७६ पृष्ठ क्र. एल-२ ते एल-३,परिच्छेद क्र.३.१६४(१२), ३.४८२(८), ३.७५५(३), ३.७५६/६, ३.८१२(६८), ३.८१२(६९), ३.८१२(७१), ३.८१२(७२), ३.८१२(७३), ३.८१२(७४), ३.८१२(७५), ३.८१२(७६), ४.३३९/२, ४.३९३(४०)१२, ४.३९३(४१)७, ४.३९३(४२)१५, ४.३९३(४३)/१९

समितीने निदेश देऊनही सर्व संबंधितांवर नियम ७ अन्वये अद्यापही कारवाई का केली नाही. यासंदर्भात संबंधित विभागप्रमुख व कार्यपालन अधिकारी यांनी दिरंगाई केली असल्यास त्यांचेवर कोणती कारवाई केली, नसल्यास त्याची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्ययांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सन २००८-०९ व सन २०११-१२ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्र उपलब्ध करुन दिले नसल्यासंबंधीच्या प्रश्न क्र.१२ मध्ये नमुद केलेल्या एकूण ६४ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ ला अनुसरुन सन २००८-०९ मधील प्रकरणां संदर्भात रुपये १००/- आणि सन २०११-१२ मधील प्रकरणां संदर्भात रुपये २५,०००/- पर्यंत दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधिताचे सेवा पुस्तिके मध्ये घेण्याची कारवाई करण्यात आली आहे. प्रकरण व परिच्छेद निहाय माहिती सोबत प्रपत्रामध्ये जोडली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-** (वित्त-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने उस्मानाबाद जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. या संबंधी कारवाई झालेली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असे विदित केले की, १०० रुपये दराने २५ हजार रुपये दंड घेण्यात आलेला असून कारवाई झालेली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्या प्रकरणांमध्ये अभिलेखे उपलब्ध करुन न देणे याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही. त्या प्रकरणांमध्ये दंड आकारणी केली पाहिजे, कारण मुळ आक्षेप तसा घेतला नसता तरी लेखा परीक्षणाच्या वेळी त्या कागदपत्राअभावी खर्चाची पडताळणी करता आलेली नाही. समितीने ज्या वेळी भेटी दिल्या त्या वेळी केलेल्या अनुपालनामध्ये सदर अभिलेख उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तसे झाले असते तर आक्षेपाच्या वेळीच निरसन झाले असते. शासकीय कपातीच्या रक्कमा कोषागारात भरणे आवश्यक होते. त्याची चलने लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आली नाही. सदर

रक्कमा केव्हा भरण्यात आल्या याचे अनुपालन केलेले नाही. सदर रक्कमांचा अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण संबंधितांनी चलने उपलब्ध न करुन देण्याबाबत केवळ ताकीद देण्यात आली आहे. वरील कामांची संख्या १०१ असून रक्कम रुपये २२२.७६ लाख आहे. वरील कामांचे अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाला रुपये २५०००/- दंड केलेला आहे. प्रत्येक कामाच्या अभिलेख्यांसाठी दंड आकारणी केलेली नाही. सदर कामांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अंतर्गत लेखापरिक्षण करुन अहवाल सादर करावा असे समितीचे निदेश आहेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, यासंबंधी जिल्हा परिषदेने एक पथक नियुक्त केले होते. त्यामध्ये वित्त विभागाचे अधिकारी होते. त्यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे. जेवढी रक्कम अपहारीत झालेली आहे त्याबाबत शोकॉज नोटीस देऊन ती रक्कम तातडीने भरण्याचे निर्देश दिले असून त्यांनी काही रक्कम भरली आहे. त्याच कर्मचा-यांवर विभागीय चौकशी देखील सुरु झालेली आहे. अपहारीत रक्कमेसंबंधी लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल.

लेखापरिक्षणाच्या वेळी लेखापरिक्षकांस २ कोटी रुपयांचे कागदपत्र दिलेली नाहीत. अशा वेळी केवळ दंड लावण्यात येतो व नंतर ते नियमित होते. त्याचे नंतर लेखापरिक्षण होत नाही. २ कोटी रुपयांचा अपहार करावयाचा व नंतर केवळ २५०००/- रुपये भरायचे असे होत आहे. अशी प्रकरणे आता वाढीस लागली आहेत. यामुळे लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे याबाबत आदेश मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आदेश निर्गमित करावे. उपरोक्त प्रकरणांचे प्री-ऑडीट करुन समितीला अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, याबाबत ग्रामविकास विभाग आदेश निर्गमित करेल की, लेखापरिक्षणाच्या वेळी आर्थिक बाबीशी संबंधित चलन किंवा इतर कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत तर त्याबाबत तीन महिन्यांच्या आत फेर लेखापरिक्षण करावे. जर तीन महिन्यांमध्ये असे चलन किंवा इतर कागदपत्रे प्राप्त झाली तर त्याची एक प्रत महालेखाकारांना पाठविण्यात येईल व जर प्राप्त झाली नाहीत तर ते हरवल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तसे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

उस्मानाबाद जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २००८-०९ व सन २०११-१२ या पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले नाही. असे आक्षेप ६४ परिच्छेदांमध्ये घेतल्याचे समितीस आढळून आले. सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या अहवालामधील ज्या ज्या परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत अशा एकूण ६४ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३०च्या कलम ७ नुसार सन २००८-०९ मधील प्रकरणा संदर्भात रुपये १००/- आणि सन २०११-१२ मधील प्रकरणां संदर्भात रुपये २५,०००/- पर्यत दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांची सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार एकूण शास्तीची जमा करण्यात आलेली रक्कमेबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी.

ज्या प्रकरणांमध्ये अभिलेखे उपलब्ध करून न देणे याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही त्याप्रकरणामध्ये दंड आकारणी करण्यात यावी, समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालनामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. एकुण १०१ कामांची संख्या असून रक्कम रूपये २२२.७६ लाख आहे.महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंड करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार असून त्यांचेकडून वेळेवर कारवाई होणे आवश्यक आहे. दंडात्मक कारवाईस विलंब होत असल्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीत साशंकता दिसून येते. हे टाळण्यासाठी **महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ प्रमाणे आयुक्तांचे अधिकार हे न्यायीकवत (**Quasi Judicial**) अधिकार असल्यामुळे समिती त्यांचेवर कारवाईची शिफारस करणार नाही. परंतु कार्यबाहुल्यामुळे आयुक्ताला हे अधिकार वापरता येत नसतील तर त्यांचे अधिकारांचे विकेंद्रीकरण करुन ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर देता येतील काय, तसेच दंडात्मक तरतुदींची अंमलबजावणी (Execution) त्वरेने होण्याच्या दृष्टीने जिल्हा पातळीवर यंत्रणा निर्माण करण्यासंबंधी कायद्याद्वारे सुधारणा करण्यासंदर्भात वित्त विभागाने कार्यवाही करावी आणि त्यासंबंधात आवश्यक वाटल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमात यथोचित सुधारणा करुन कलम ७ अन्वये करावयाची दंडात्मक कार्यवाही तातडीने निकाली काढण्यासंदर्भात कायद्यात योग्य ती सुधारणेची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

## अभिलेखे उपलब्ध करुन न देणाऱ्या प्रकरणांची प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षांची माहिती

| अ.क्र | परिच्छेद क्रमांक | वर्ष | विभाग/पंचायत समितीचे नाव | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी | दंडाची रक्कम रूपये | वसुल झालेली रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ३.३२१/३३ | २००८-०९ | बांधकाम विभाग | - | - | | सदर परिच्छेद अंतिम देयकासोबत चाचणी अहवाल सादर न करणे बाबत असून प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१३ मध्ये घेण्यात आलेला आहे. |
| २) | ३.५७२/१६ | २००८-०९ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ३) | ३.६४२/४ | २००८-०९ | आरोग्य विभाग | श्री.मक्तेदार पि. के. से.नि.भांडारपाल | २५०००/- | २५०००/- | श्री.मक्तेदार पि.के. भांडारपाल सेवानिवृत झालेले असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतू त्यांचेविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| ४) | ३.७२५/४ | २००८-०९ | कृषी विभाग | १.श्री.आर.जी.जाधवर क.स.<br>२.श्री.जे.एम.कवडे क.स.<br>३.श्री.डिएन.देशपांडे क.स.<br>४.श्री.सी.खरपूडे क.स.<br>५.श्री.बी.एस.सांळूके क.स.<br>६.श्री.पी.बी.फावडे से.नि.वि.अ.<br>७.श्री.एस.डी.गायकवाड क.स.<br>८.श्री.ए.डी.चिंचोले क.स. | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>सेवेतून बडतर्फ<br>२५०००/- | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>सेवेतून बडतर्फ<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच सध्या कार्यरत कर्मचा-यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरूपी बंद करण्यात आली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५) | ३.७२६/६ | २००८-०९ | कृषी विभाग | १. श्री.आर.जी.जाधवर क.स.<br>२. श्री.जे.एम.कवडे क.स.<br>३.श्री.डिएन.देशपांडे क.स.<br>४.श्री.सी.खरपूडे क.स.<br>५.श्री.बी.एस.सांळूके क.स.<br>६.श्री.पी.बी.फावडे से.नि.वि.अ.<br>७.श्री.एस.डी.गायकवाड क.स.<br>८.श्री.ए.डी.चिंचोले क.स. | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>सेवेतुन बडतर्फ<br>२५०००/- | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>सेवेतुन बडतर्फ<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये कर्मचा-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच सध्या कार्यरत कर्मचा-यांची एक वार्षिक वेतनवाढ कायम स्वरूपी बंद करण्यात आली आहे. |
| ६) | ३.७७५/११ | २००८-०९ | पशुसंवर्धन विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ७) | ३.८८५/४ | २००८-०९ | समाजकल्याण विभाग | श्री.पी.एम.कांबळे, वि.अ. | १००/- | १००/- | सदर परिच्छेदाबाबत श्री.पी.एम.कांबळे, वि.अ.यांचे कडून दंडाची रक्कम रूपये १००/-वसुल करण्यात आली आहे व त्याची एक वेतनवाढ थोपविण्याची कार्यवाही केलेली आहे. |
| ८) | ३.८८७/२१ | २००८-०९ | समाजकल्याण विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही |
| ९) | ३.१०३७ (१११)/५९ | २००८-०९ | सामान्य प्रशासन विभाग | ५०० कर्मचारी | ३११०५५२/- | ३११०५५२/- | सदर परिच्छेदाबाबत ग्रामपंचायत स्तरावर लेखा परिक्षणासाठी एकूण ३७५ ग्रामपंचायतीच्या ५०० ग्रामसेवकाने लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत. त्यापैकी ९५ कर्मचारी मयत, बडतर्फ आहेत व उर्वरित कार्यरत व सेवानिवृत्त ४०५ कर्मचा-यांपैकी एकूण १४९ कर्मचा-यांनकडून रूपये |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | २५०००/- च्या मर्यादेत रूपये ३०,८४,९५२/- व २५६ कर्मचा-यांच्या कडून रूपये १००/- प्रमाणे रूपये २५,६००/- असा एकूण एकंदर रूपये ३१,१०,५५२/- दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच संबंधित कर्मचारी यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आली असून त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तीकेमध्ये घेण्यात आली आहे. |
| १०) | ४.२१०/६ | २००८-०९ | पं.स.तुळजापूर | श्री.एस.एम.पिंपरकर, कृ.अ. | १००/- | १००/- | सदर परिच्छेदाबाबत श्री.एस.एम.पिंपरकरकृ.अ. यांचेकडून दंडाची रक्कम रूपये १००/- वसुल करण्यात आली आहे व त्यांची एकवेतनवाढ थोपविण्याची कार्यवाही केलेली आहे. |
| ११) | ४.२९९/६ | २००८-०९ | पं.स.उस्मानाबाद | श्री.ढवळशंख बी.आर. वि.अ. | १००/- | १००/- | सदर परिच्छेदाबाबत श्री.ढवळशंख बी.आर.वि.अ.यांचेकडून दंडाची रक्कम रूपये १००/- वसुल करण्यात आली आहे |
| १२) | ४.३००/९ | २००८-०९ | पं.स.परंडा | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही |
| १३) | ४.३२४/१० | २००८-०९ | पं.स.परंडा | श्री.ए.के.शिंदे, से.नि.व.स | २५०००/- | २५०००/- | श्री.ए.के.शिंदे,व स.सेवानिवृत्त झालेले असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतू त्यांचेविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| १४) | ४.३४७ (८१)/२९ | २००८-०९ | पं.स.उस्मानाबाद | १.श्री.कावळेए.सी. ग्रा.से<br>२.श्री.तेगमपुरे एस.वी. ग्रा.से.<br>३.श्री.घोडके एस.वी ग्रा.से.<br>४.श्री.तपसे आर.एस. ग्रा.से.<br>५.श्री.जाधव पी.एम. ग्रा.से. | ७५०००/-<br>१०००००/<br>५००००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/- | ७५०००/-<br>१०००००/<br>५००००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/- | सदर परिच्छेदाबाबत ग्रामपंचायत स्तरावर लेखा परीक्षणासाठी २० ग्रामपंचायतीच्या १३ ग्रामसेवकाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिलेले दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.त्यापैकी श्री.सुतार बी.डी.(मयत) असल्यामुळे त्यांचा क्षमापनाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे व सध्या कार्यरत कर्मचा-याची वेतनवाढ बंद करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ६.श्री.कुलकर्णी एस.आर. नि.ग्रा.से.<br>७. श्री.कुलकर्णी के.ए. से. नि.ग्रा.से.<br>८.श्री.चव्हाण एन.एस. से. नि.ग्रा.से.<br>९.श्री.मगर बी.एस. (मयत) ग्रा.से.<br>१०.श्री.वाघमारे एस. एस.(मयत) ग्रा.से.<br>११.श्री.शेटे आ.जे. से.नि.ग्रा.से.<br>१२.श्री.जालीमिचे एस. एम. से.नि.ग्रा.से.<br>१३.श्री.सुतार बी.डी. (मयत) ग्रा.से.<br>१४.श्री.आढाव जे.यु. ग्रा.से. | २००००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>मयत<br>१००/- | २००००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>मयत<br>१००/- | |
| १५) | ४.३४७ (८२)/४० | २००८-०९ | पं.स.उमरगा | एकूण २३ ग्रामसेवक | २३६१००/ | २३६१००/ | सदर परिच्छेदामध्ये एकूण (२३) ग्रामसेवकापैकी (४) ग्रामसेवक मयत झाले आसून मयत कर्मचा-याकडील दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी अडचणी येत असल्याने सदर ४ मयत कर्मचा-याकडील दंडाच्या रक्कमेची वसुली न करणेबाबतचा निर्लेखनाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.उर्वरित १९ कर्मचा-याकडून संपूर्ण दंडाची रक्कम वसुल केलेली आहे व सध्या कार्यरत कर्मचा-याची एक वेतनवाढ बंद करून त्यांची सेवापुस्तकात तशी नोंद घेण्यात आलेली आहे. |
| १६) | ४.३४७(८३) १७ | २००८-०९ | पं.स. तुळजापूर | १.के.व्ही.कुंमार ग्रा.से.<br>२.एस.एम.बागवान ग्रा.से. | २५०००/-<br>२५०००/ | २५०००/-<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये एकूण (२८) ग्रामसेवकापैकी (५) ग्रामसेवक मयत झाले आसून मयत कर्मचा-याकडील दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३.श्री.सी.एन.लोकरे ग्रा.से. | २५०००/- | २५०००/- | अडचणी येत असल्याने सदर ५ मयत कर्मचा-याकडील दंडाच्या रक्कमेची वसुली न करणेबाबतचा निर्लेखनाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.उर्वरित २३ कर्मचा-याकडून संपूर्ण दंडाची रक्कम वसुल केलेली आहे व सध्या कार्यरत कर्मचा-याची एक वेतनवाढ बंद करून त्यांची सेवापुस्तकात तशी नोंद घेण्यात आलेली आहे. |
| | | | ४.श्री.आर.एन.वरपे ग्रा.से. | मयत | मयत | |
| | | | ५. श्री.आर.एन.वरपे ग्रा.से. | मयत | मयत | |
| | | | ६.एस.एस.वाघमारे ग्रा.से. | मयत | मयत | |
| | | | ७.बी.डी.पवार,ग्रा.से. | २५०००/- | २५०००/- | |
| | | | ८.सखाराम पाटील, ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | ९.एच.एम.मोरे,ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | १०.ए.आर.तुपेरे,ग्रा.से. | १००/- | १००/-१००/- | |
| | | | ११.बी.यु.लोखंडे,ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | १२.ए.आर.तुपेरे,ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | १३.बी.यु.लोखंडे,ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | १४.के.एम.क्षीरसागर, ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | १५.बी.एम.वाणी,ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | १६.आर.एस.कदम, ग्रा.से. | १००/- | २५०००/- | |
| | | | १७.डी.बी.गायकवाड ग्रा.से. | २५०००/- | २५०००/- | |
| | | | १८.बी.एन.गुरव,ग्रा.से. | २५०००/- | २५०००/- | |
| | | | १९.बी.के.निकम,ग्रा.से. | २५०००/- | मयत | |
| | | | २०.आर.डी.बागल, ग्रा.से. | मयत | १००/- | |
| | | | २१.एस.एल.राऊत, ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | २२.एन.बी.पाटील,ग्रा.से | १००/- | १००/- | |
| | | | २३.एन.बी.पाटील,ग्रा.से | १००/- | १००/- | |
| | | | २४.आयुब शेख,ग्रा.से. | १००/- | १००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २५.आर.एस.कदम, ग्रा.से. | १००/- | १००/- | |
| | | | | २६.आयुब शेख,ग्रा.से. | १००/- | २५०००/- | |
| | | | | २७.शबाना तांबोळी, | २५०००/- | मयत | |
| | | | | २८.बी.एम.सावंत,ग्रा.से. | मयत | | |
| १७) | ४.३४७(८४)/१८ | २००८-०९ | पं.स.परंडा | १.जि.व्ही.पाटील,मयत | १००/- | १००/- | सदर परिच्छेदामध्ये एकूण २५ ग्रामसेवक दोषी असून त्यांचेविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच संबधिताचे एक वेतनवाढ बंद करण्यात आली आहे. |
| | | | | २.मुळे व्ही.डी. | १००/- | १००/- | |
| | | | | ३.केंद्र एस.के. | १००/- | १००/- | |
| | | | | ४.सुरवसे जी.जी. | १००/- | १००/- | |
| | | | | ५.राठोड बी.ए. | १००/- | १००/- | |
| | | | | ६.तडवी एच.आर. | १००/- | १००/- | |
| | | | | ७.कदम एस.जे | १००/- | १००/- | |
| | | | | ८.नंदनवार एन.बी. | २५०००/- | २५०००/- | |
| | | | | ९.घोडे व्ही.आर. | १००/- | १००/- | |
| | | | | १०.साळवे एस.एस. | १००/- | १००/- | |
| | | | | ११.सुरवसे जी.जी. | १००/- | १००/- | |
| | | | | १२.डोरले व्ही.आर. | १००/- | १००/- | |
| | | | | १३.गावडे एल.एन. | १००/- | १००/- | |
| | | | | १४.व्ही.बी.गंभीरे | २५०००/- | २५०००/- | |
| | | | | १५.कोलगणे बी.टी. | १००/- | १००/- | |
| | | | | १६.पवार आर.ए. | १००/- | १००/- | |
| | | | | १७.तडवी एच.डी. | १००/- | १००/- | |
| | | | | १८.राठोड बी.ए. | १००/- | १००/- | |
| | | | | १९.खरात एस.डी. | १००/- | १००/- | |
| | | | | २०.केंद्र एस.के. | १००/- | १००/- | |
| | | | | २१.नागटीळक आर.एस. | १००/- | १००/- | |
| | | | | २२.उसराटे यु.आर | | | |
| | | | | २३.गंभीरे व्ही.बी. | २५०००/- | २५०००/- | |
| | | | | २४.काळे सी.व्ही. | २५०००/- | २५०००/- | |
| | | | | २५.वाघमारे बी.एस. | १००/- | १००/- | |
| | | | | | १००/- | १००/ | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८) | ४.३४७(८५)/३० | २००८-०९ | पं.स.कळंब | १.श्री.ढवळे बी.जी. ग्रा.से.<br>२.श्री.केंद्रे एस.बी.ग्रा.से<br>३.श्री.गवळी जी.वी. ग्रा.से<br>४.श्री.गिरी एस.आर. ग्रा.से.<br>५.श्री.भंडे ए.जी.ग्रा.से.<br>६.श्री.धावरे एस.टी. ग्रा.से.<br>७.श्री.जगताप एम.एस. से.नि.ग्रा.से.<br>८.श्री.मस्के एस.पी. से.नि.ग्रा.से.<br>९.श्री.गायके पी.एस. से.नि.ग्रा.से.<br>१०.श्री.जाधव टी.जे. ग्रा.से. | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००००/-<br>१००/-<br>२५०००/-<br>१००/-<br>१००/- | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००००/-<br>१००/-<br>२५०००/-<br>१००/-<br>१००/- | सदर परिच्छेदामध्ये एकूण १६ ग्रामपंचायतीच्या एकूण १० कर्मचारी दोषी असून त्यांचेविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच सध्या कार्यरत कर्मचा-यांची एक वेतनवाढ थोपविण्यात येऊन त्याची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तीकेत घेण्यात आली आहे. |
| १९) | ४.३४७(८६)/१९ | २००८-०९ | पं.स.भूम | १.ए.सी.काळे ग्रा.से.<br>२.आ.एस.जाधव ग्रा.से.<br>३.बी.बी.कुलकर्णी ग्रा.से.<br>४. सी.वी.काळे ग्रा.से.<br>५.डी.एम.वाणी ग्रा.से.<br>६.सी.एन.सिनगारे ग्रा.से.<br>७.ए.एम.मगर<br>८.यु.एस.डूकरे<br>९.एस.ए.मुंडे<br>१०.यु.वा.माने<br>११.व्हि.एस.मोहिते<br>१२.बी.बी.सोनावणे<br>१३.एम.एस.जगताप<br>१४.व्हि.जे.कलवाडे | १००००/-<br>२५०००/-<br>१००/-<br><br>२५०००/-<br>२५०००/-<br>३०००/-<br><br>१००/-<br>१००/-<br>१२५००/-<br>१००/-<br>मयत<br>२५०००/- | १००००/-<br>२५०००/-<br>१००/-<br><br>२५०००/-<br>२५०००/-<br>३०००/-<br><br>१००/-<br>१००/-<br>१२५००/-<br>१००/-<br>मयत<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये एकूण ११ ग्रामपंचायतीच्या एकूण२५ ग्रामसेवक दोषी असून त्यांचे विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे तसेच श्री.डी.एफ.ओव्हाळ,श्री.व्हि.एस.मोहिते,श्री.आर.बी. गरड हे तत्कालीन ग्रामसेवक मयत झालेले आहेत व श्री.एम.आर.पोत्तन्ना हे परागंदा आहेत त्यामुळे चार ग्रामसेवकांची दंडाची रक्कम वसुल करण्यात आलेली नसून रुपये ४००/- वसुलीस क्षमापनाबाबत समितीस विनंती आहे सध्या कार्यरत कर्मचा-यांची एक वेतनवाढ थोपविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १५.एम.आर.प्रोत्तन्ना<br>१६.बी.बी.टेकाळे<br>१७.डी.एफ.ओव्हाळ<br>१८.जी.एल.डोबाळे<br>१९यु.डी.तपीसे<br>२०.सी.आर.मोटे<br>२१.ए.एम.मगर<br>२२.डी.एम.वाणी<br>२३.व्हि.डी.मुळे<br>२४.सी.एन.सिनगारे<br>२५. सी.एन.सिनगारे<br>२६.आर.बी.गरड | १००/-<br>१००/-<br>परागंदा<br>२५०००/-<br>मयत<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>१००/-<br>१००/-<br>२५०००/-<br>९०००/-<br>१००/-<br>मयत | १००/-<br>१००/-<br>परागंदा<br>२५०००/-<br>मयत<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>१००/-<br>१००/-<br>२५०००/-<br>९०००/-<br>१००/-<br>मयत | |
| २०) | ४.३४७(८७)<br>/१२ | २००८-०९ | पं.स.लोहारा | १.श्री.यादव एम.पी. ग्रा.से.<br>२. श्री.बिराजदार ओ. ए. ग्रा.से.<br>३. श्री.शिंदे यु.एस. ग्रा.से.<br>४. श्री.गायकवाड एल. डी.ग्रा.से.<br>५. श्री.धाबेकर आर. एन. ग्रा.से.<br>६. श्री.शिंदे यु.एस. ग्रा.से.<br>७. श्री.लोकरे एस.एन. ग्रा.से.<br>८. श्री.भड एस.के. ग्रा.से.<br>९. श्री.वग्गे जे.टी.ग्रा.से<br>१०.श्री.काळे बी. एम. | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/- | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/- | सदर परिच्छेदामध्ये एकूण १० ग्रामसेवक दोषी असून त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच संबंधिताचे एक वेतनवाढ बंद करण्यात आली असून त्याची नोंद सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात आली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ग्रा.से. | | | |
| २१) | ४.३५२(११)/३२ | २००८-०९ | पं.स.कळंब | १.श्री.रेणके व्ही.जी. से.नि.स.ले.अ.<br>२.श्री.जकाते एस.एन. से.नि.व.स.<br>३.श्री.यादव डी.एम. क.स.<br>४.श्री.हारके एस.एम. मयत स.क.अभि. | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>२५०००/- | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-या विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच सध्या कार्यरत श्री.यादव डी.एन.क.स.यांची एक वार्षिक वेतनवाढ थोपविण्यात आलेली आहे. |
| २२) | ४.३५२(११)/-२० | २००८-०९ | पं.स.भूम | १.श्री.के.एन.थोरात व.स.ले.<br>२.श्री.व्ही.व्ही.जांबळे क.स.<br>३.श्री.ए.एम.बिराजदार अ.स.<br>४.श्री.बी.एम.जाधव स्था.अ.स.<br>५.श्री.व्ही.बी.चव्हाण क.स.ले. | ८०००/-<br>४१६७/-<br>११०००/-<br>४१६७/-<br>१००/- | ८०००/-<br>४१६७/-<br>११०००/-<br>४१६७/-<br>१००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| २३) | ३.५३/२० | २००८-०९ | सामान्य प्रशासन विभाग | १.श्री.एस.एम.हारके, आरेखक<br>२.श्री.डी.एस.सुरवसे शा.अभि | २५०००/-<br>२५०००/- | २५०००/-<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती बंद करण्यात आली आहे. |
| २४) | ३.५४/२१ | २००८-०९ | सामान्य प्रशासन विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| २५) | ३.१३९/२० | २००८-०९ | शिक्षण विभाग | १.श्री.एन.आय.शेख ग.शि.अ.<br>२.श्री.व्ही.एम.मुंडे ग.शि.अ.<br>३.श्री.ए.बी.बिराजदार ग.शि.अ. | १००/-<br>१००/-<br>१००/- | १००/-<br>१००/-<br>१००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती स्वरूपात थांबविणेबाबत दिनांक १८/०२/२०१७ च्या पत्रान्वये संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ४.श्री.एस.एन.पटवे ग.शि.अ.<br>५.श्रीम.सुलतानपुरे ए.ए ग.शि.अ.<br>६.श्री.बी.पी.बनसोड ग.शि.अ.<br>७.श्री.पारवे पी.एस. ग.शि.अ.<br>८.श्री.एस.डी.वैद्य ग.शि.अ. | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/- | १००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/-<br>१००/- | आले असून तशी नोंद संबंधिताच्या मुळसेवापस्तिकेत घेण्यात आली आहे. |
| २६) | ३.१४०/३० | २००८-०९ | शिक्षण विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| २७) | ३.१४१/३५ | २००८-०९ | शिक्षण विभाग | १.श्री.ए.व्ही.दळवी,मु.अ<br>२.श्री.बी.जी.चौधरी, मु अ.<br>३.श्री.एस.टी.रोटे से.नि.मु.अ.<br>४.श्रीम.फडकुले ए.बी. मु.अ. | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/- | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरती स्वरूपात बंद करण्यात आली आहे. |
| २८) | ३.३२३/९४ | २००८-०९ | बांधकाम विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| २९) | ३.४४०/४ व १२ | २००८-०९ | लघुपाटबंधारे विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ३०) | ३.५७१/७ | २००८-०९ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ३१) | ३.५७३/२४ व २५ | २००८-०९ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२) | ३.६४१/३ | २००८-०९ | आरोग्य विभाग | श्री.मक्तेदार पि.के. से.नि.भांडारपाल | २५०००/- | २५०००/- | श्री.मक्तेदार पि.के.भांडारपाल सेवानिवृत झालेले असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतू त्यांचे विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| ३३) | ३.६४३/८ | २००८-०९ | आरोग्य विभाग | श्री.मक्तेदार पि.के. से.नि.भांडारपाल | २५०००/- | २५०००/- | श्री.मक्तेदार पि.के.भांडारपाल सेवानिवृत झालेले असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतू त्यांचे विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| ३४) | ३.६४४/१६ | २००८-०९ | आरोग्य विभाग | श्री.मक्तेदार पि.के. से.नि.भांडारपाल | २५०००/- | २५०००/- | श्री.मक्तेदार पि.के.भांडारपाल सेवानिवृत झालेले असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतू त्यांचे विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| ३५) | ३.७२७/७ | २००८-०९ | कृषि विभाग | १.श्री.आर.जी.जाधवर क.स.<br>२.श्री.जे.एम.कवडे क.स.<br>३.श्री.डी.एन.देशपांडे व.स.<br>४.श्री.सी.खरपुडे क.स.<br>५.श्री.बी.एस.साळुके क.स.<br>६.श्री.पी.बी.फावडे से.नि.वि अ.<br>७.श्री.एस.डी.गायकवाड क.स.<br>८.श्री.ए.डी.चिंचोले क.स. | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>सेवेतुन बडतर्फ<br>२५०००/- | २५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>२५०००/-<br>सेवेतुन बडतर्फ<br>२५०००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.तसेच सध्या कार्यरत कर्मचा-यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरूपी बंद करण्यात आली आहे. |
| ३६) | ३.७२८/११ | २००८-०९ | कृषी विभाग | - | - | - | सदर परिच्छेद कडधान्य गळीतधान्य कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर पीएसबी पाकीटे खरेदी पुरवठा करणेत अनियमितते बाबत असून |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३ मध्ये घेण्यात आलेला आहे. |
| ३७) | ३.७७६/१२ | २००८-०९ | पशुसंवर्धन विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ३८) | ३.८८६/८ | २००८-०९ | सामाजकल्याण विभाग | श्री.पी.एच.पवार,व.स. | १००/- | १००/- | सदर परिच्छेदाबाबत श्री.पी.एच.पवार, व. स. यांचेकडून दंडाची रक्कम रूपये १००/- वसुलकरण्यात आली आहेत व संबंधित कर्मचारी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण उस्मानाबाद येथे कार्यरत असुन त्यांचेवर नियम ७ नुसार कार्यवाही करणे करिता दि.०१/०१/२०१८ अन्वये मा.आयुक्त समाजकल्याण पुणे यांना कळविले आहे. |
| ३९) | ३.८८८/२६ | २००८-०९ | समाजकल्याण विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ४०) | ३.१०३७(१ १२)/३१ | २००८-०९ | लघुपाटबंधारे विभाग | श्री.एस.जी.कुलकर्णी क.स.ले. | १००/- | १००/- | सदर परिच्छेदबाबत श्री.एस.जी.कुलकर्णी क.स.ले. यांचेकडून दंडाची रक्कम रूपये १००/- वसुल करण्यात आली आहे व त्याची एक वेतनवाढ कायमस्वरूपात बंद करण्यात आली असून त्याची नोंद सेवापुस्तीका मध्ये घेण्यात आली आहे. |
| ४१) | ३.१०३७(१ १३)/३६ | २००८-०९ | लघुपाटबंधारे विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ४२) | ३.१०३७(१ १४)/१० | २००८-०९ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | १.श्री.आर.एन.तागडे का.अ.<br>२.श्री.पी.आर.मुई,शा.स<br>३.श्री.डी.बी.देशपांडे व.स.(ले)<br>४.श्री.आर.एन.जेवळीकर, व.स.<br>५.श्री.ए.डी.नवाळे स.ले.अ. | ५०००/-<br>५०००/-<br>५०००/-<br>५०००/-<br>५०००/- | ५०००/-<br>५०००/-<br>५०००/-<br>५०००/-<br>५०००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याकडून दंडाची रक्कम रूपये २५०००/-वसुल करण्यात आलेली आहे. व त्याची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आली असून त्याची नोंद सेवापुस्तीकामध्ये घेण्यात आली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३) | ३.१०३७(१ १५)/११ | २००८-०९ | ग्रामीण पाणी पुरवठा पुरवठा विभाग१ | १.श्री.आर.एन.तागडे का.अ.<br>२. श्री.डी.एन.देशपांडे व.स.ले. | १२५००/-<br>१२५००/- | १२५००/-<br>१२५००/- | सदर परिच्छेदामध्ये दोषी कर्मचा-याकडून दंडाची रक्कम रूपये २५०००/-वसुल करण्यात आलेली आहे. व त्याची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आली असून त्याची नोंद सेवापुस्तीकामध्ये घेण्यात आली आहे. |
| ४४) | ३.१०३७(१ १६)/२६ | २००८-०९ | कृषी विभाग | श्री.व्ही.एम.पाटील, मयत व.स. | ३००/- | ३००/- | सदर परिच्छेदाबात श्री.व्ही.एम.पाटील, व.स.हे मयत असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतू त्यांचेविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| ४५) | ४.३२५/८ | २००८-०९ | पं.स.वाशी | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ४६) | ३.१६४/१२ | २०११-१२ | शिक्षण विभाग | १.श्री.कुलकर्णी बी.डी. क.स.<br>२.श्री.व्हटकर ए.वाय. मयत शि.अ. | १२५००/-<br>मयत | १२५००/-<br>मयत | सदर परिच्छेदाबाबत श्री.कुलकर्णी बी.डी. क.स.यांचेकडून दंडाची रक्कम वसुल केली आहे.व त्यांची वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपाची बंद करून तशी नोंद सेवापुस्तिकेत घेण्यात आलेली आहे.तसेच श्री.व्हटकर ए.वाय.शि.अ.हे मयत झालेले असल्याने त्यांचेविरूध्द कारवाई केलेली नाही. |
| ४७) | ३.३०१/६९ | २०११-१२ | बांधकाम विभाग | श्री.जी.एस.राठोड, से.नि.व.स. | २५०००/- | २५०००/- | श्री.जी.एस.राठोड,व.स.सेवानिवृत्त झालेलेअसल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही परंतू त्यांचे विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. |
| ४८) | ४.३७६/४ | २०११-१२ | पं.स.उमरगा | श्री.ए.डी.कुलकर्णी,व.स. | १००/- | १००/- | सदर परिच्छेदाबाबत श्री.ए.डी.कुलकर्णी व.स. यांचेकडून दंडाची रक्कम रूपये १००/-वसुल करण्यात आली आहे.व संबंधित कर्मचा-याची एक वार्षिक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करण्यात आली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९) | ३.४८२/८ | २०११-१२ | आरोग्य विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ५०) | ३.७५५/३ | २०११-१२ | महिला व बालकल्याण विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ५१) | ३.७५६/६ | २०११-१२ | महिला व बालकल्याण विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देण्याबाबतचा परिच्छेद नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. |
| ५२) | ३.८१२(६८)/१३ | २०११-१२ | सामान्य प्रशासन विभाग | - | - | - | सदर परिच्छेद लेखा परिक्षणास जनसुविधा योजने अंतर्गत ग्रामपंचायत बोरखेडा, आंबेवाडी, शिंगोली, येडशी, कोळेवाडी, रामवाडी, चिलवडी, खामगाव, धुत्ता, खेड, येवती, लासोना, कौडगाव (बावी), कनगरा, हिंगळजवाडी, भंडारवाडी, सारोळ(बु), कामेगाव व केशेगाव अशा २० ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध केलेले नव्हते.अभिलेखे उपलब्ध झालेनंतर मा.सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षक उस्मानाबाद यांनी २०ग्रामपंचायतीचे अभिलेखे सुस्थितीत व पुरेसे उपलब्ध असल्याने स्थानिक निधी लेखा १९३० मधील कलम ७ अन्वये कारवाई केल्यो दिसून आल्याचे प्रमाण पत्र दिनांक २३/१२/२०१३ अन्वये दिलेली आहे.<br>तसेच २०ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध न केले बाबत तत्कालीन श्री.एस.टी.कदम सहाय्यक कनिष्ठ अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित करून आदेश क्र.पसउ/लेखा/२२७९/दिनांक ११/१२/२०१५ अन्वये ठपका ठेवण्याची कारवाई केली असून त्याची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात आलेली आहे. |
| ५३) | ३.८१२(६९)/१२ | २०११-१२ | सामान्य प्रशासन विभाग | श्री.जि.एस.राठोड, से.नि.व.स. | २५०००/- | २५०००/- | सदर परिच्छेदाबाबत संबंधित श्री.जि.एस.राठोड, से.नि.व.स.यांचेकडून दंडाची रक्कम रूपये २५०००/-वसुल करण्यात आलेली आहे. व संबंधित |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | कर्मचारी सेवानिवृत्त असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही. |
| ५४) | ३.८१२(७१) /४० | २०११-१२ | बांधकाम विभाग | १.श्री.तांदळे ऐ.व्हि. से.नि.उप.अभि.<br>२.श्री.मुपडे व्ही.जी. मयत व.स.<br>३.श्री.सांजेकर बी.आर. से.नि.स्था.अ.स.<br>४.श्री.गंदे से.नि.स.ले.अ. | ६२५०/-<br>६२५०/-<br>६२५०/-<br>६२५०/- | ६२५०/-<br>६२५०/-<br>६२५०/-<br>६२५०/- | सदर परिच्छेदाबाबत कर्मचा-याकडून दंडाची रक्कम रूपये २५०००/-वसुल करण्यात आलेली आहे. व श्री.मुपडे व्ही.जी.वरिष्ठ सहाय्यक हे मयत आहे व इतर सर्व सेवानिवृत्त असल्याने एक वेतनवाढ थोपविण्याची कारवाई करता आली नाही. |
| ५५) | ३.८१२(७२) /१४ | २०११-१२ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | १.श्री.आर.एन.तागंडे का.स.<br>२.श्री.एन.सी.पुजारी उप..अभि (यां)<br>३.श्री.ए.बी.चाटे उप अभि<br>४.श्री.डी.आर.देवकर उप अभि<br>५.श्री.डी.डी.मुळे उप अभि<br>६.श्री.एस.एस.आष्टगी उप अभि<br>७.श्री.डी.बी.देशपांडे तत्का.व.स.(ले) | ३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/ | ३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/-<br>३५७२/- | सदर परिच्छेदाबाबत संबधित दोषी कर्मचा-याकडून दंडाची रक्कम रूपये २५०००/-वसुल करण्यात आलेली आहे. व त्यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आली असून त्यांची नोंद सेवापुस्तिकामध्ये घेण्यात आली आहे. |
| ५६) | ३.८१२(७३) /२३ | २०११-१२ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | १.श्री. आर.एन.तांगडे, का.अ.<br>२.श्री. एन.सी.पुजारी, उप अभि. (यां)<br>३.श्री. एन.बी.चाटे, उप अभि.<br>४. श्री.डी.आर.देवकर, उप अभि. | ४१६७<br>४१६७<br>४१६७<br>४१६७ | ४१६७<br>४१६७<br>४१६७<br>४१६७ | सदर परिच्छेदाबाबत संबधित दोषी कर्मचा-याकडून दंडाची रक्कम रूपये २५०००/-वसुल करण्यात आलेली आहे. व त्यांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात रोखण्यात आली असून त्यांची नोंद सेवापुस्तिकामध्ये घेण्यात आली आहे. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५.श्री.डी.डी.मुळे, उप अभि.<br>६.श्री.एस.एस.आष्टगी, उप अभि. | ४१६७<br>४१६७ | ४१६७<br>४१६७ | |
| ५७) | ३.८१२ (७४)/३२ | २०११-१२ | कृषी विभाग | श्री. एस.डी.गायकवाड, बडतर्फ, क.स | २५,००० | -- | सदर कर्मचाऱ्याला बडतर्फ करण्यात आले असल्यामुळे निर्धारित दंडाची रक्कम वसूल करता आली नाही. |
